म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.



REFBK-0028169

# ीत दूर आकाश

सौ. स्मिता भागवत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# वीत दूर आकाश

सौ. स्मिता भागवत

REFBK 0028169

REFBK-0028169

■
**प्रकाशक / मुद्रक :**
श्री. दिलीप महाजन
मोरया प्रकाशन
'संपदा', शास्त्रीनगर,
नगरपालिका दवाखान्याजवळ
डोंबिवली (प) - ४२१ २०२.
**पुणे शाखा**
'अनुश्री', ४०/१० एरंडवणा,
इंदिरा हाईटस् जवळ,
पुणे - ४११ ०३९.

■
**प्रथमावृत्ती :**
मे १९९५

■
© सौ. स्मिता भागवत

■
**मुद्रण-स्थळ :**
अजय ऑफसेट
काका हलवाई इंडस्ट्रियल इस्टेट
पुणे-सातारा रोड
पुणे - ४११ ००९.

■
**अक्षर-जुळणी**
आशय टाईपसेटर्स
२६६, शनिवार पेठ, पुणे - ३०.

■
किं. रु. ५५ /-

**ISBN 81-7420-060-6**

ज्यांच्या सहकार्याविना हा प्रवासानुभव
अवघडच नव्हे, तर अशक्य होता,
त्या छोट्या भाऊ, वहिनीस —
चि. अविनाश व अनुपमा कप्तान यांस
[illegible] अर्पण...

विजूताई (स्मिता भागवत)

# अनुक्रमणिका


शोध सुखाचा - सुरक्षित शांत जीवनाचा ---------- ५
१. के सेरा सेरा ---------- ११
२. नवलाई पहिल्या पावलाची ---------- १६
३. हॉरीबल वुमन ---------- २२
४. असत्यं शिवम्-सुंदरम् ---------- २८
५. चकवा ---------- ३५
६. अज्ञान ज्ञानी लोकांचं! ---------- ४२
७. फ्रेंच 'शारदा' ---------- ५१
८. सुंदर तिचं घर ---------- ५९
९. गोंधळात गोंधळ ---------- ६७
१०. म्हाताऱ्यांच्या मेळाव्यात ---------- ७६
११. चित्तरकथा स्पर्म बँकेची ---------- ८६
१२. मुंगी उडाली आकाशी ---------- ९४
१३. ऑरवा मादाम! ---------- १२०
१४. ओढ मृगजळाची ---------- १२५
१५. वीत दूर आकाश ---------- १३२


◆ ◆ ◆

# शोध सुखाचा- सुरक्षित शांत जीवनाचा....

एशियन युथ क्लब ऑफ फ्रान्सचं आमंत्रण स्वीकारलं त्या वेळी मनात कॉन्फरन्सच्या भव्यतेविषयी खूप मोठी अपेक्षा बाळगली होती. हजारो नाही तरी शेकडो माणसांच्या उपस्थितीत केल्या कामाचा आढावा, थोडं फार मूल्यांकन, औपचारिक स्तुती, आणि वास्तववादी चर्चासत्र असं काहीसं कॉन्फरन्सचं स्वरूप अभिप्रेत होतं. ही अपेक्षा अवास्तव आहे असं इथून जाताना तरी वाटलं नव्हतं. पण...

कॉन्फरन्स नाव देण्याजोगं काही नव्हतंच. भरपूर श्रोते लाभलेल्या फ्लोअर डिस्कशनच्या कार्यक्रमाला श्रोत्यांची संख्या जेमतेम तीन आकड्यांची झाली. त्यातही आशियन लोकांपेक्षा गोऱ्यांची संख्याच अधिक होती. कारण फ्रान्सच्या प्रजेत अवघ्या सात टक्के अशियाई (भारतीय नव्हे) नागरिकांचा समावेश आहे. तेही फ्रान्सभर विखुरलेले! या सात टक्क्यांत चार टक्के प्रजा गुजू आहे. मूठभर अशियाई लोक एकत्र येऊन कार्यक्रमाची योजना हाती घेऊ शकतील, भारतीय व्यक्तीला तिथे बोलवून खर्चाची जबाबदारी सहजपणे पेलतील अशी शक्यता स्वप्नवत्‌च. तरीही.... तरीही हे घडलं कारण....

फ्रेंच समाज हल्ली काहीशा असह्य परिस्थितीचा सामना करतोय. कालपरवापर्यंत आपल्या सोवळ्या वाटणाऱ्या समाजात फ्रेंच लोक म्हणजे सैल नीतिमत्ता, नाईट क्लब्ज आणि सहज घटस्फोट घेऊन भरपूर लग्न करणारे असा समाज होता. काही अंशी त्यात तथ्यही होतं. चार-पाच वेळा जीवनसाथी बदलणारे स्त्री-पुरुष तिथे पावलोपावली भेटण्याजोगी परिस्थिती होती. पण आता हे चित्र उरलेलं नाही. फ्रेंच समाज तळापासून ढवळून निघाला आहे. व्यक्तिसुखाला प्राधान्य देत सुखाचा शोध घेणाऱ्या या समाजानं काडीमोड हे सुखाच्या रस्त्यावरचं अपरिहार्य वळण म्हणून स्वीकारलं होतं. पण त्याच कारणामुळे अनाथ मुलं आणि स्त्रिया यांच्या वाट्याला काही ठिकाणी हलाखी आली. सुखाचा शोध प्रामाणिकपणे घेणाऱ्या सरकारनं 'ॲलोकेसियाल फॅमिलीयाल' नावाच्या संस्थेची निर्मिती केली. व्यक्ती आणि त्यांच्या मुलांचे आर्थिक हक्क जपणाऱ्या या संस्थेचं काम खरंच प्रशंसनीय होतं. पण शोषकांसाठी शोषितांच्या हक्कांसाठी कर्तव्यरत

असणारी संस्था शाप ठरू लागली. ॲलिमनीची (निभावखर्च, पोटगी) रकम त्यांच्या ऐश आरामावर कातर बनून फिरू लागली आणि अशा समाजानं वाकडी वाट मळायला सुरुवात केली. लग्न केलं तर घटस्फोट आणि घटस्फोट घेतला तर ॲलिमनीचा कंबरतोड भुर्दंड. त्यापेक्षा लग्नच नको. 'दुसरी भूक' ही सहज प्रकृती पण लग्न हे सामाजिक बंधन! बंधन झुगारून सहज भुकेचा स्वीकार - अर्थात् बिनलग्नाचं, पण राजरोस सहजीवन! लग्न न करताही सात-सात, आठ-आठ वर्षं बरोबर राहणारी असंख्य जोडपी फ्रेंच समाजाचा हिस्सा बनली. मुक्त जीवनाची तहान 'हम दो हमारे दो' अथवा 'वन इज फन' मधील सुखही कमी ठरवतेय. त्या ऐवजी 'नन इज फन' ही घोषणा लाडकी बनू बघतेय. मूल नकोच म्हणण्यात हा शोध सुखाचा आहे की निभावखर्चाची रकम घटविण्यासाठी शोधलेली पळवाट आहे याचं निश्चित उत्तर त्यांना देता येत नाहीय. आधीच्या पिढीनं गरगर फिरवलेल्या लग्न, घटस्फोट- लग्न घटस्फोटाच्या चक्रामुळे जी तरुण पिढी निर्माण झाली आहे त्यातील मुलं खूपशी ड्रगच्या आहारी जातायत. तरुणींना या मुलांपेक्षा बाप आणि पुरुष दोन्ही ज्यात सापडतील अशा प्रौढ - चाळिशी ओलांडलेल्या पुरुषांबरोबर नातं जोडणं आवडतंय. त्यामुळे वयाच्या दृष्टीनं त्यांना अनुरूप असणाऱ्या घटस्फोटिता एकट्या पडल्या आहेत. सर्वार्थानं - कारण सहचर मिळत नाहीये आणि मुलं सोळा वर्षांची होताच घरट्याबाहेर पडली आहेत. अशा स्त्रियांना सोबत उरलीय अनेक पाळीव प्राण्यांची वा इडियट बॉक्सची! दूरदर्शननं कितीही चांगले कार्यक्रम दिले तरी जिवंत साथसंगत वेगळीच याची जाण बाळगत भकास नजरेनं टी.व्ही. बघत फका- फका सिगरेटी ओढणाऱ्या वैफल्यग्रस्त महिलांचं प्रमाण वाढतंय आणि तरुण पोरींची संगत हवीशी वाटणाऱ्या हिरवट पुरुषांची तरुणींच्या वेगाला सामोरं जाताना दमछाक होतेय. लग्न टाळून सहजीवन स्वीकारणाऱ्यांना मुलं हवीशी वाटली तरी आतला आवाज दाबून 'नन इज फन' असं बुलंद आवाजात म्हणावंच लागतंय. एकूणच कुठचीही विचारधारा स्वीकारली तरी मुस्कटदाबीचा गुदमर अपरिहार्य ठरतोय. म्हणून काही विचारी लोकांना वाटलं - मुस्कटदाबीला पर्याय नाही असं म्हणून हताश होणं काही बरोबर नाही. आबालवृद्धांना सुख, शांती आणि सुरक्षित जीवन प्रदान करणाऱ्या भारतीय समाजाकडून काही शिकता आलं तर बघावं. अभंग दांपत्य जीवनाविषयी त्यांच्या मनात आकर्षण निर्माण झालंय. म्हणून काही लोक भारतीय सहचर निवडण्याचा विचार करू लागले आहेत (परेश इझाबेल) काहींना वाटतं, अभंग दांपत्यजीवन जिथे आहे अशा समाजातील फॅमिली काउन्सेलरशी विचार- विनिमय करून सुखी लग्नजीवनाची गुरु-किल्ली (मास्टर की) मिळवावी. वैचारिक आदान - प्रदान व्हावं या विचाराला खूप पुष्टी मिळाली आणि त्या दृष्टीनं मूठभर आशियाई लोकांशी चर्चा झाली. त्या मूठभर लोकांत

अर्ध्याहून अधिक हिस्सा गुजू समाजाचा. हेतूबाबत चर्चा करून फ्रेंच विचारकांनी मोकळेपणी स्वत:च्या गरजा सांगितल्या. येणारी व्यक्ती 'अर्ली फॉर्टिज' ची- म्हणजे अननुभवी तरुण नसावा. अनुभवाची बऱ्यापैकी पुंजी असणारी, पण प्रकृतीची कुरबूर सुरू झालेली वयस्क नसावी. इंग्रजी भाषेत तिला तिचे विचार व्यवस्थित मांडता यावेत. संमिश्र समाजात भाषण आणि चर्चेचा अनुभव तिच्या गाठी असावा. अशा व्यक्तीला पाचारण करून 'रोल ऑफ काऊन्सेलिंग इज डिक्रीजिंग पर्सेंटेज ऑफ डिव्होर्सिस' या विषयावर चर्चा आणि व्याख्यानं व्हावीत. स्पष्ट शब्दांत अपेक्षा सांगून त्यांनी प्रतिक्रिया मागितली.

गुजू समाजात नफा तोट्याच्या गणिताला पर्याय नाही. त्यांना वाटलं, गुरुकिल्ली यांना हवी आहे तर खर्चाची जबाबदारी त्यांनी घ्यावी. आमच्या समाजातून येणाऱ्या व्यक्तीच्या भेटीगाठीचा आनंद आम्ही भेट देऊन व्यक्त करू. बाकीची जबाबदारी आमची नसावी. फ्रेंच समाज घासाघीस करणारा नाही. त्यांनी रूकार देताच जाणीवपूर्वक विचाराला चालना मिळाली. संख्येनं तिकडचा गुजू समाज कमी भरला तरी गुजू भाषा त्यांच्यासाठी अप्रूप ठरल्यामुळे असेल, पण इथल्या लोकांपेक्षा त्याचं वाचन (गुजू साहित्याचं) दांडगं आहे. सुदैवानं (माझ्या) फॅमिली काऊन्सेलिंगच्या कामाला वाहिलेलं 'स्त्री स्वातंत्र्य सन्माननी वेदी पर...' हे माझं सदर असणाऱ्या साप्ताहिकाचं वितरण जगभर असल्यामुळे माझी लेखणी तिथवर पोहोचली होती. म्हणून माझी वर्णी लागली. आपल्या समजातील त्रुटींशी माझा परिचय होता. शोषण टाळून स्वातंत्र्याची जपणूक करणाऱ्या समाजापासून मलाही गुरुकिल्लीची अपेक्षा होतीच. कॉन्फरन्समध्ये निव्वळ भाषणबाजी नसून वैचारिक आदान-प्रदानाच्या हेतूनं चर्चासत्रही आहेत हे मला मनापासून आवडलं होतं. पण...

याचा अर्थ कॉन्फरन्स निरर्थक होती असा नव्हे. 'ओढ मृगजळाची' लेखातील बराचसा परिपाक कॉन्फरन्सचा परिणाम आहे. पण त्यापेक्षा कैकपटीनं अधिक अनुभवांचं संचित 'इस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशन'च्या कार्यक्रमांनी दिलं. या संपूर्ण प्रवासात जाणवत होतं...आपल्या इकडे मारे पश्चिमेत कुटुंबसंस्था मोडीत निघाल्याच्या चर्चा होत असतील तरी ते खरं नाही. कुटुंबसंस्था मोडकळीस आली असली तरी ती मोडीत निघालेली नाही. आसन्न मरणावस्थेतील रुग्णाला ऑक्सिजन लावून जगवण्याचा प्रयत्न होतो, तसा प्रयत्न कुटुंबसंस्था नष्ट होऊ नये यासाठी होतोय. आपल्या इकडे वाढत्या लोकवस्तीच्या समस्येमुळे सरकार नसबंदी करवणाऱ्याला छोट्या बक्षिसाचं आमिष दाखवतंय, तर तिकडे 'नन इज फन'च्या लोकप्रियतेमुळे वस्ती कमी होतेय. तीन मुलांना जन्म देणाऱ्या दांपत्याला तिथे आमिष दाखवण्यात येतंय. विविध गटांतील स्त्री-पुरुषांशी

तसेच मुलांशीही झालेल्या चर्चेतून हे प्रकर्षानं जाणवलं..... जे चाललंय ते स्वागतार्ह नाही याची प्रत्येकाला कल्पना आहे. 'यात सुख नाही' हे कळलं तरी कशात सुख आहे ते कळायचं आहे. म्हणूनच असुरक्षिततेच्या दडपणाखाली भेदरलेल्या समाजाचा प्रत्येक पैलू शांत सुरक्षिततेच्या शोधात आहे. एकटं राहून मुक्त जीवन जगू पाहणाऱ्या कलंदरांच्या मनातही नातेसंबंधांची ओढ आहे. काचणारी बंधनं झुगारून मनाचं अस्तित्व नाकारणारेही काहीतरी कमी पडतंय हे स्वीकारतायत.

सुखाच्या शोधात काय फक्त तेच फिरतायत ? घराबाहेर वाढत जाणारी असुरक्षितता पाहून समग्र मानव जातीच्या मनात उबदार घरट्याचा- पर्यायानं कुटुंबसंस्थेच्या अपरि-हार्यतेचा स्वीकार होतोय. आपल्याकडेही खूपदा- इलाज नाही म्हणून एकत्र राहतो असा निराशावादी विचार ओठी येताना दिसतो. पण तो बराचसा स्मशान- वैराग्याच्या पठडीतला वाटतो. समाज व्यवस्थेतील साऱ्या संस्थांत कुटुंबसंस्था सर्वांत निष्कृष्ट समजण्याचीही आपल्याकडे फॅशन आलीय. आदर्शवादात कुटुंब म्हणजे जनकाचं साम्राज्य, जननीचं विश्व आणि बालकांचा स्वर्ग असतो. अंतिमवादी स्त्री मुक्ती विचारकांच्या मते कुटुंबसंस्था पुरुषप्रधान संस्कृतीची हडेलहप्पी ठरते. कुठल्याही संस्थेच्या शासनासाठी 'प्रधान' म्हणजे शासकपक्ष गरजेचाच! पण शासकपक्षाला मनमानी करताना दहा वेळा विचार करायला लावणारा धाक विरोधपक्षानं निर्माण केला तर शासन ही हडेलहप्पी वा अरेरावी ठरणार नाही. पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीत स्त्री सुजाण आणि सुशिक्षित झाल्यावर तरी विरोधपक्षाचा धाक निर्माण करून कुटुंबसंस्थेतील शोषण तिनं रोखायला हवं. स्त्री-पुरुष आकर्षण सहज प्रकृती असली तरी लग्न हे सामाजिक बंधन आहे. समाजाची निर्मिती हासुद्धा एक प्रकारे शोध सुखाचाच आहे. फक्त इंद्रिय शमनासाठी लग्न बंधन नाही; म्हणूनच सुखाचा शोध घेताना कुटुंबसंस्थेचा खून करणं गरजेचं नाही हे बहुतांशी समाजाला पटलंय. म्हणून मोडकळीस आलेली कुटुंबसंस्था मोडीत निघणार नाही. जोवर माणसाच्या देहालाच नव्हे तर मनाला मनाची ओढ आहे, तोवर राखेच्या ढिगाऱ्याखाली धुगधुगणारी ओढ कुटुंबसंस्थेची इमारत भस्मीभूत होऊ देणार नाहीं; अशी आशा बाळगायला भरपूर वाव आहेसं वाटलं. कारण...

इस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशनलाही वैचारिक आदान-प्रदानाची अपेक्षा आहे. शेवटच्या दिवशी फ्रान्समधील सुखद वास्तव्याविषयी कृतज्ञता म्हणून 'इंडिया इव्हिनिंग-'चं आयोजन होतं. त्यात भारतीय संस्कृतीची चुणूक मिळेल असे कार्यक्रम आणि भारतीय 'खाना' असा बेत असतो. आमच्या संघात बडोद्याचे 'दादूमिया' उर्फ डॉ. नेने होते. त्यांच्यासारख्या व्यासंगी व्यक्तीमुळेच लुव्हे म्युझियममधील 'गॉडेस'च्या हातातील ब्रह्मा, विष्णू महेश यांची मी नोंद घेतली होती. 'इंडिया इव्हिनिंग'च्या

कार्यक्रमात त्यांनी भारतीय पद्धतीनं लग्न घडवून आणलं. गेली दहा वर्षं बरोबर राहणाऱ्या एका फ्रेंच अनधिकृत दांपत्यातील मारीसला पिवळी अष्टपुत्री नेसायला लावली आणि तिच्या सहचराच्या डोक्यावर साफा (फेटा) बांधला. मंगलाष्टकांसकट लग्न लागल्यावर मारीस उत्स्फूर्तपणे म्हणाली, ''मला अगदी शुचिर्भूत (पायस) झाल्यासारखं वाटतंय.'' तेव्हा प्रकर्षानं जाणवलं, कुटुंब नकोसं झालंय असं म्हणणाऱ्यांच्या अंतरंगात कुटुंब, लग्न याविषयी ओढ आहे.

वैचारिक. आदान-प्रदानाच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर खरं सांगायचं तर उभयपक्षांना 'मास्टर की' सापडली नाहीच. म्हणजे त्यांच्याही दृष्टीनं आकाश 'वीत दूरच' राहिलं तरीही हा सुखाचा शोध निरर्थक वाटला नाही.

ह्या संकलनाला प्रवास वर्णन म्हणता येईल का ते मला कळत नाही. यात साईट सीइंगचं वर्णन नाही का तारखांचा रोजमेळही नाही. हे अनुभवांचं चिंतन आहे असंही म्हणता येत नाही. कारण स्वैर उधळल्या मनानं उडविलेल्या प्रत्येक धुलीकणाचा नीट मागोवा घेणं मला जमू शकलं नाही. 'सॅरोगेट मदर्स' सारख्या ज्वलंत समस्येचा पाठपुरावा करून मुळापर्यंत पोहोचणं मर्यादित कालात जमलं नाही. इतरही काही मुद्दे पूर्णत्वापर्यंत न पोहोचता हवेत विरले. या संकलनात पोत आणि रंगाच्या दृष्टीनं अलग पडणाऱ्या 'मुंगी उडाली आकाशी' हा प्रमाणात मोठ्या लेखाचा समावेश असावा की नाही या द्विधेत होते. पण वसुधाचा तिपेडी संसार यात असावा. 'तिकडची' स्थळं बघणाऱ्यांनी चौकस आणि चोखंदळ तपास न करता अंधारात उडी घेऊ नाही यासाठीही असं उदाहरण संकलनात असावं असं बऱ्याच हितचिंतकांचं मत असल्यामुळे 'वीत दूर आकाश' मध्ये 'मुंगी' विषयीचा अवाढव्य लेखही घातला.

सदर लेखन साहित्य प्रकार आहे की नाही, या विचारात डोकं न शिणवता मी सदरं लिहिते तसंच हा लेखसंग्रह प्रवासवर्णन आहे की नाही याचं उत्तर मला शोधायचं नाही. प्रवासकाळात 'इथे तिथे'च्या तुलनात्मक विचारात मन उधळण्याची प्रतिक्षिप्त क्रिया घडत होती. भरती-ओहोटीच्या छोट्या-मोठ्या लाटा उसळत होत्या. या लाटांना शिस्तीत या असं सांगण्याची इच्छा वा कुवत माझ्यात नाही. आली लाट अंगावर घेण्याच्या प्रतिक्षिप्त क्रियेचा शब्दबद्ध आविष्कार म्हणजे 'वीत दूर आकाश' इतकंच मी म्हणू शकते. माझी नजर जिथवर पोहोचली तिथवरचंच हे निरीक्षण आहे. पूर्णत्वाला पोहोचलेला हा शोध निबंध नाही. आपल्या दृष्टीपलीकडेही खूप काही बरं-वाईट असतं, सत्याचे पैलू सात हे बाळकडू मिळालं असल्यामुळे हे आणि इतकंच खरं असं सांगण्याचा हा अट्टाहासही नाही.

किर्लोस्कर मासिकात 'दूरदेशी' या सदरात हे लेख प्रसिद्ध झाले. माझ्यासारख्या

नवशिक्या, अप्रसिद्ध लेखिकेला संधी देणाऱ्या श्री. भा. महाबळांचे मनापासून आभार. फ्रान्स मित्र मंडळाची माहिती देणारी माझी मैत्रीण पद्मजा फाटक, फ्रान्स मित्र मंडळाच्या निर्मला पुरंदरे, मीना पवार तसेच इस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशनच्या श्री गणकर, परांजपे आणि बाबुभाई कराणींची मी मनापासून आभारी आहे. लेखन हे स्वत:च्या आनंदासाठी घडतं. खरंच ते स्वांत: सुखाय असतंच. तरीही या सुखाची पूर्णता प्रगटीकरणाशिवाय अशक्यच. लेखनाचा आनंद पूर्णत्वास पोहोचविणाऱ्या मोरया प्रकाशनाच्या श्री. दिलीप महाजनांचे मन:पूर्वक आभार.

राम नवमी.

२०. ४. १९९४.

**स्मिता भागवत,**
३०४, गोल्डर्स ग्रीन नं. ३
ऋषि संकुलाजवळ,
होली क्रॉस रोड,
बोरीवली (प.),
मुंबई - ४००१०३.
फोन : ८९३४१८६

# १ / के सेरा के सेरा......

एशियन यूथ क्लब ऑफ फ्रान्सनं फेमिनिस्ट रायटर म्हणून जेव्हा मला आमंत्रण पाठ-वलं तेव्हा मी चकितच झाले. अक्षरश: गोंधळून गेले. स्वत:लाच पुन:पुन्हा विचारीत राहिले....मी फेमिनिस्ट आहे ? तोवर हा प्रश्न कधी मनात उमटला नव्हता. केवळ 'फेमि-निस्ट' या एकाच शब्दानं मनात विचारांचं मोहोळ उठविलं. क्षणार्धात हातून - लेखणी-द्वारा घडलेल्या कामाचा आढावा घेतला गेला.

माणसं 'वाचायचा' छंद तसा जुनाच ! थेट कळू लागलं तेव्हापासून जडलेला ! वाच-लेल्या व्यक्तिरेखांना शब्दरूप देण्याची इच्छाही अनावर ! त्यामुळे कथालेखनातील बरा-चसा भाग समस्याप्रधान कथांनी व्यापलेला ! समाजात फिरताना - विशेषत: समृद्ध गुज-राती समाजात वावरताना डोळ्यांत गुपित वाचलेलं ! हे गुपित होतं अव्यक्त व्यथांचं ! 'डोळ्यांत वाच माझ्या तू गीत भावनांचे' सारखं स्वप्नील नव्हे तर भरल्या घड्याला थेंबा-चंही ओझं वाटावं अशा काठोकाठ भरलेल्या व्यथांचं !

या व्यथांचं स्वरूप फार मोठं असतं असं नव्हे. कुणाजवळ मनमोकळा शब्दोच्चार करता आला तर जखम भरून यावी इतपत क्षुल्लकच असतं. पण जखमांचा शब्दोच्चार काट्याचा नायटा करणारा ठरतो. जखम चिघळत जाते. नातेवाईक वा उभयपक्षांचे स्नेही कधी सद्भावनेनं समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. पण बहुतांशी त्यांच्या सद्-भावनांची माती होताना दिसते. उलट 'वाणं' वाटल्याचा आरोप वाढतो. मैत्री- संबंधा-तील एक नाव अपरिहार्यपणे कमी होतं. 'भीक नको पण कुत्रा आवर' सारखी परिस्थिती निर्माण होते. त्यापेक्षा जखमांना शब्दरूप देणं नको असं वाटतं. म्हणून साध्या साध्या जखमा उपचारावाचून राहतात. दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत जाते. हेच गुपित वारं-वार डोळ्यांत वाचलेलं: जखमांचा बोजा उरीपोटी बाळगूनच चितेपर्यंतचा प्रवास कर-णाऱ्या या स्त्रियांसाठी 'आऊट लेट' फार आवश्यक आहे. पण मन मोकळं करणार कुठे ? कुणाजवळ ?

यासाठी मला काही करता येईल का ? हा प्रश्न मनात वारंवार उठत होता. बरोडा डेमॉक्रेटिक विमेन्स असोशिएशनच्या नलिनी मेहेंदळेंशी याबाबत थोडी बातचीत झाली. नलूताई म्हणजे बडोद्यातील उत्तम शाळेतील उत्तम शिक्षिका - गुरुबाई ! बालक मंदि-राच्या पायऱ्या चढण्यापासून ते गुजराती साहित्याच्या पायरीवर चढू की नको या द्विधेत

अडखळणाऱ्या मला ज्यांनी डोळस नजरेनं बघितलंय अशा! नजरेनंच 'हो गं पुढे! सारं जमून जाईल' असं आश्वासन देणारे भाई मेहेंदळे- वाटेल त्या विषयावर बोलताना कधी वयांतील अंतर भिंत बनू शकलं नाही असं दांपत्य!

माझ्या मनातील कल्पनेला पाठिंबा देत नलूताई म्हणाल्या होत्या, "ललित साहित्याला मी कमी लेखत नाही. तुझ्या लेखणीत स्पार्क आहे. हा स्पार्क फिक्शनमध्ये कल्पनांचा फुलोरा फुलविण्यातच खर्ची पडू नाही असं मनापासून वाटतं मला!"

"आपल्या पुरुषप्रधान समाजात सर्वत्रच स्त्री कुचंबलेली आहे." भाई उत्साहानं म्हणाले, "तरीही तू म्हणतेस तशी गुजू स्त्रीच्या शोषणाला तोड नाही. तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करणाऱ्या या भगिनीला तू सदराच्या माध्यमातून आऊटलेट देऊ शकशील. निदान त्यांच्या व्यथेला वाचा फोडून सहानुभूतीची फुंकर मारणं तुला नक्की जमेल. एका तटस्थ 'सन्मित्रा' ची कल्पना तुझ्या मनात आहे तिला मूर्त स्वरूप देणं, तुला जमेल याविषयी मला नक्की खात्री वाटते."

त्यांच्या शब्दानं मला हुरूप आला. मी उत्साहानं म्हटलं, "हे जग मी सुंदर करून जाईन असं म्हणण्याचं सामर्थ्य माझ्यात नाही. घराची जबाबदारी टाळायची नाही, आणि बदलीच्या नोकरीत बिऱ्हाड विंचवासारखं पाठीवर घेऊन फिरायचं तर मर्यादा पडतात. तरीही प्रामाणिकपणाने वाटतं निव्वळ कलम हाती घेऊन थोडंसं - खारीसारखं काहीतरी भरीव काम करावं. माझ्या आजूबाजूचं हे मूक हुंदक्यांखाली गदगदणारं, गुदमरणारं चिमुकलं जग, निदान साह्य करणं जमलं तर बघावं असं मनापासून वाटतं!"

"हे खरं नं? मग चल!" माझा उत्साह द्विगुणित करीत नलूताई म्हणाल्या. "शुभारंभाचा किस्सा मी देते तुला."

त्या नुकत्याच ऑल इंडिया विमेन्स असोसिएशन मद्रासमधील कॉन्फरन्समध्ये हजेरी लावून आल्या होत्या. आशीर्वाद म्हणून त्यांनी तिथली एक 'सत्यकथा' मला सांगितली.

'गुजरात समाचार'च्या सुरत आवृत्तीत शुक्रवारी मी 'नारी तू नारायणी' हे सदर सुरू केलं. प्रास्तविक लेखात माझी भूमिका स्पष्ट केली. अमृता प्रीतमच्या 'चौथ्या कमऱ्याची' संकल्पना मांडली. बेडरूम, ड्रॉइंगरूम आणि किचनमध्ये वावरणाऱ्या सुशिक्षित स्त्रीसाठी, अजूनही चौथ्या कमऱ्याचे - जिथे डिस्कशन होऊन डिसिजन घेतले जातात, त्या निर्णयखंडाचे दरवाजे बंद असल्याच्या वस्तुस्थितीचा उल्लेख केला. कुचंबलेल्या व्यक्तीसाठी आऊटलेटची जागा म्हणून माझा पत्ता दिला. तुमची मैत्रीण तुमच्या व्यथा-वेदनांवर फुंकर मारायला, जमलं तर तोडगा सुचवायला उत्सुक आहे असं आवर्जून लिहिलं. प्रत्यक्ष भेटीसाठीही जाहीर आमंत्रण दिलं.

हे सारं करताना हे सदर मी दहा-पंधरा - फार तर पंचवीस आठवडे चालवू शकेन अशी कल्पना होती. पण घडलं ते कल्पनातीत होतं. आऊटलेटच्या गरजेचं स्वरूप माझ्या कल्पनेतून कित्येकपट अधिक होतं. व्यथित पत्रांचाच नव्हे तर व्यक्तींचाही अव्याहत प्रवाह सुरू झाला. हा प्रवाह पावसाळ्यात येणाऱ्या हंगामी पुरासारखा नव्हता; तर गुजरात

सोडून मुंबईकर झाल्यावरही तो तितकाच - किंबहुना अधिक जोरदार आहे.

या व्यथांचं स्वरूप सवंग नव्हतं. व्यथा फक्त स्त्रियांनीच व्यक्त केलेल्या नव्हत्या. कुठलीही समस्या फक्त स्त्री वा पुरुषाची असू शकत नाही, या विश्वासानं मी फक्त स्त्री वाचकांना आमंत्रण न देता समस्त वाचकवर्गाला दिलेलं होतं. स्त्री-पुरुषविश्व एकमेकांना स्पर्श करीत असतात, याची स्पष्टता केली होती. कल्पनेपेक्षा कैकपटींनी पुरुष वाचकांनी या आमंत्रणाचा स्वीकार केला, आणि जाणवलं व्यथांचा फक्त संसर्गच लागत नाही; तर स्त्रियांच्या व्यथांचं संसर्गामुळे पुरुषात संक्रमणही घडतंय. पुरुषांशी झालेली बातचीत आणि पत्रव्यवहार माझ्या अभ्यासाला निराळीच खोली देणारा ठरला.

पुढे शुक्रवारच्या 'संस्कार सौरभ' पुरवणीतली जागा अपुरी ठरू लागली. गुजरात समाचारच्या अहमदाबादहून प्रसिद्ध होणाऱ्या 'श्री' साप्ताहिकाचं संपूर्ण पान मला मिळालं. 'स्त्री मुक्ती' शब्द मला कधीच आवडला नाही. गैरसमज करवणारा काहीसा अंतिमवादी वाटतो तो मला. म्हणून माझ्या सदराचं नाव काहीसं लांबलचक पसंत केलेलं होतं. नवं सदर 'स्त्री स्वातंत्र्य सन्माननी वेदी पर...' या नावानं प्रसिद्ध होऊ लागलं. 'श्री' चा वाचकवर्ग देशविदेशांत विखुरलेला असल्यामुळे विदेशातून पसंती-पत्रं येऊ लागली. इतकंच नव्हे तर व्यथित समस्यायुक्त पत्रंही येऊ लागली.

या दोन्ही सदरांच्या अनुषंगानं मी मेंटल हॉस्पिटल्स, नारी सुधारकेंद्र, वृद्धाश्रम, अनाथाश्रम वगैरेंना भेटी देत होते. त्यांचं काम, मर्यादा आणि मर्यादांमागची कारणं डोळस नजरेनं बघत होते. सदरात मांडल्या जाणाऱ्या विचाराचं स्वरूप एकसुरी होऊ नये, यासाठी जीवाचं रान करीत होते. कधी प्रसंगकथा लिहून तर कधी कायदाविषयक माहिती देत, तर कधी चौथ्या कमऱ्यात यशस्वी वावर असणाऱ्या स्त्रियांचा परिचय करवून देऊन सदर लेखन साहित्य प्रकारात मोडतं की नाही या प्रश्नात डोकं शिणवून न घेता माझ्या याही अपत्याचं संगोपन कथा-कादंबऱ्यांइतकंच साहित्यिक दृष्टिकोणातून करीत होते. जे करीत होते त्या विचारानं मला पुरतं झपाटलं होतं. माझ्या या झपाटल्या अवस्थेशी मी प्रामाणिक होते हे निश्चित!

या प्रामाणिक प्रयत्नांचं फळ अनपेक्षितपणे माझ्या ओंजळीत पडलं होतं. ८५ साली युनिसेफनं दक्षिण गुजरातच्या ग्रामपंचायतीत टीव्ही सेटस्‌चं वितरण केलं. त्या समारंभाचे थेट प्रक्षेपण दूरदर्शनवर बघितलं. खेड्यांतील स्त्रियांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून त्यांना काय वाचायला आवडतं वगैरे गोष्टींचा आढावा घेण्यात आला. तेव्हा एक चिटुकली म्हणाली, "घरकाम उरकून आम्ही एक दीडच्या सुमारास इथे जमतो साक्षर स्त्रियांपैकी कुणीतरी पेपर आणि इतर नियतकालिकं मोठ्यानं वाचते. शुक्रवारी भरपूर हजेरी असते. कारण त्या दिवशी स्मिताबेनचा लेख असतो. आज कुठचा विषय हाताळला असेल याविषयी आमच्या मनात उत्सुकता असते. घरी जाऊन आम्ही आमच्या 'घरवाल्यांनाही' त्यातील मजकूर सांगतो. त्यांनाही ते बरंच पटतं. त्यामुळे आमच्या त्रासाची मात्रा घटतेय. दांपत्य जीवन 'सरस' होतंय असं आम्हा बऱ्याचजणींना वाटत."

ऐकून अक्षरश: माझे डोळे पाणावले. माझ्या पाठीवर जोरदार थाप मारून सिद्धार्थ - अर्थात् नवऱ्यानं म्हटलं, "तुझी छोटी लेखणी थेट खेड्यात पोहोचली बघ! आता वाचन ही फक्त मध्यमवर्गाची गरज आणि आवड आहे असं म्हणत जाऊ नकोस."

या छोट्या वाक्यात प्रशंसेचा आणि उत्तेजनाचा महासागर दडलेला होता. त्यानं मला अधिक काम करायला प्रेरणा आणि पाठबळ पुरवलं होतं हे मला कबूल करायलाच हवं. स्वाभाविकच 'कलमद्वारा काऊन्सिलिंग'चा व्याप वाढत गेला.

पण हे सारं खरं असलं तरी याचा अर्थ मी फेमिनिस्ट असा होतो?

भूतकाळात फेरफटका मारून मन पुन्हा समेवर येत होतं. शिवाय तिथे जाऊन मी नक्की काय करायचं हे स्पष्ट होत नव्हतं. 'बोलणं' ही बाब नवलाची नव्हती. वयाच्या तिसऱ्या वर्षी बडोद्याच्या सहविचारिणी सभेत आई-वडिलांनी माईकसमोर उभं केलं होतं. तो वसा मी उतल्या-मातल्यावाचून चाळिशीतही गणेशोत्सवात, जेसिस, लायनेस क्लब-मध्ये बोलून चालू ठेवला होता.... तरीही... तरीही मनात आनंद आणि गोंधळाचं विचित्र रसायन तयार होत होतं. हे सारं ओठी आणावं तर 'प्रेरणेचा स्रोत' नेमका बदलीनिमित्त लंडनला पोहोचलेला! आता? अरेच्चा? आऊटलेटची गरज चक्क मलाच भासतेय की! मी मजेत हसले. तशी नव्यानंच मुंबईकर झाले होते. आऊटलेट मुंबईत सापडणार नव्हती. मग मनातील गोंधळ बिनधास्तपणे मी बडोद्याला 'पास ऑन' केला. शेंडा ना बुडखा असं पत्र लिहिलं. शक्यतो लवकर भेटून जा इतकंच. अविनाशला - धाकट्या भावाला लिहिलं. अतिस्नेह: पापशंकी असतो नं? मेव्हण्याच्या गैरहजेरीत तीन भाचरांनी बहिणीवर कुठचं संकट आणलं असेल या काळजीनं तो धावत पळत मुंबईत हजर झाला.

माझ्या मनात कोण गोंधळ उडालेला आणि हा मोठ्या बहिणीची चक्क फिरकी घेत म्हणाला, "घनचक्कर आहेस झालं! त्यांनी या म्हटलं तर आपण जायचं. प्रामाणिकपणे आपले विचार मांडायचे. जात्यावर बसलं की आपोआप ओवी सुचेल. त्यात आहे काय आणि नाही काय?"

"अरे, पण सिद्धार्थ इथे नाहीत. एप्रिलमध्ये जायचं तर मुलांचं काय? त्यांच्या परीक्षा बाकी असणार! या परक्या मुंबईत आपलं कुणी आहे का? कुठे ठेवायचं त्यांना? सिद्धार्थ इथे असते तर प्रश्न नव्हता."

"मी आहे नं?"

"कुठे? बडोद्यास? बडोदं काय मुंबईचं उपनगर आहे? 'गॉड इज इन हिज हेवन'-सारखा बडोद्याहून मुलांची काळजी घेणार आहेस?"

"मला इथे येऊन राहता येणार नाही? काहीतरीच विचारतेस ते? तू जाण्याचा निर्णय घे. मी सारं जमवून आणीन. रजा घेऊन इथे येईन. परीक्षा संपल्या की त्यांना बडोद्यास घेऊन जाईन. त्यात आहे काय नि नाही काय?"

"पण या भानगडीत तुझी रजा फुकट जाणार?"

"तुला परदेशाचं आमंत्रण येण्याला भानगड म्हणतात? अशी संधी हातची न जावी

यासाठी मी रजा घेण्याला रजा फुकट गेली म्हणताय ? कमाल करतेस....'' त्यानं झापलं.

तरीही माझं मन कच खात होतं. मग मात्र तो रागावलाच. म्हणाला, ''मुलांची इतकी काळजी का करतेस ? ती काय बाटलीनं दूध पितात ? पीत असतील तरी त्यांना बाटली देणं जमेल मला. पैशाचं पाठबळ नसताना तीन-वेळा जगप्रदक्षिणा करणाऱ्या वसंतराव कप्तानांची पुतणी तू! इतक्या छोट्या प्रश्नांचे इश्यू करणं फारच म्हणायचं हं...''

मग मात्र मी ''के सेरा सेरा, व्हॉट एव्हर विल बी विल बी...'' म्हणत जाण्याचा निर्णय घेतला.

लंडन-पॅरिस अंतर फक्त चाळीस मिनिटांचं! शिवाय माझ्या 'प्रेरणेच्या अक्षयपात्रा-'च्या वास्तव्यामुळे लंडन शहराला माझ्या लेखी हळवी किनार प्राप्त झालेली! तिथे जाणं ओघानं आलंच!

लंडनमध्ये 'गुजरात समाचार' नावाचं साप्ताहिक प्रगट होतं. त्यात माझ्या तिथल्या वास्तव्याविषयीची विस्तृत माहिती आणि काळ प्रसिद्ध झाला. इदी अमीनच्या कृपेनं (?) केनिया - आफ्रिकेतील बराच गुजू समाज लंडनकडे वळलेला! त्यामुळे तिथल्या छोट्या-मोठ्या संस्थांकडून आमंत्रणं येऊ लागली. सिद्धार्थ त्यांच्या कामात असताना रिकामा वेळ मला वैताग आणण्याची शक्यता होती. साईट सीइंग वीक एंडलाच जमणारं होतं. सोमवार ते शुक्रवारच्या वेळात काय! या यक्षप्रश्नाचं सुखद उत्तर अशा आमंत्रणांनी माझ्या समोर धरलं. फावल्या वेळात माणसं वाचायचा छंद वाढीस लावणारी आमंत्रणं म्हणजे 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन' अशीच वाटली मला! फ्रान्स आणि यु.के. च्या प्रवासात तर देवानं दोन डोळे दिले असं म्हणणंही मला अन्यायाचं वाटू लागलं. अंगभर डोळेच डोळे फुटले असावेत अशी भावना निर्माण झाली.

लंडनच्या प्रवासाचा मनावर ताण नव्हता. कारण आपल्या इथे सुशिक्षित मध्यमवर्गात मातृभाषेहून किंचित् अधिकच साहेबाच्या भाषेवर प्रभुत्व बघायला मिळतं. मीही याला अपवाद नव्हते. पण फ्रान्समध्ये भाषा हा प्रश्न अडचण निर्माण करण्याची शक्यता होती. कारण मला फक्त कॉन्फरन्समध्ये हजेरी लावून 'उलट टपाली' परत येणं रुचणार नव्हतं. पण एकदा छोट्या-मोठ्या प्रश्नांचे इश्यू न करण्याचा निर्णय घेतला आणि वाट सापडत गेली.

बडोद्याच्या पद्मजा फाटकनं (मोडक) फ्रान्स मित्र मंडळाविषयी सांगितलं, पुण्याची वारी करून मी निर्मला पुरंदरेंना भेटले. त्यांनी हेच काम मुंबईत 'इस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशन' करीत असल्याचं सांगितलं. स्वत:चे इंटरेस्ट, काम आणि उद्देश याविषयी सविस्तर माहिती देऊन मी असोसिएशनची मेंबर झाले. अनायासे माझ्या तारखाही जुळण्यातल्या होत्या. असोसिएशनचे कार्यकर्ते- श्री. गणकर, श्री. परांजपे आणि श्री. बाबुभाई कराणी यांनी मनापासून सहकार दिला. के सेरा सेराची हिंदी धून - जो भी होगा अच्छा होगा.... गुणगुणत मी 'चार्ल्स द गॉल' एअर पोर्टवर उतरले.

◆◆

# २ / नवलाई पहिल्या पावलाची

कॉन्फरन्सच्या निमित्तानं फ्रान्सला जाणं होणारच होतं. नंतर एखाद्या टुरिस्ट कंपनीबरोबर फ्रान्स बघणंही जमलं असतं. पण मनाला भूक बघण्यापेक्षा 'जाणण्याची' अधिक होती. म्हणजे प्रेक्षणीय स्थळं बघायची होतीच. पण त्यामागची पार्श्वभूमी व्यावसायिक गाईडकडून ऐकण्यापेक्षा संवेदनक्षम फ्रेंच नागरिकाकडून ऐकावी असं वाटत होतं. म्हणून इस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशनची मेंबर झाले.

पाश्चात्त्य देशाचं दर्शन म्हणजे माझ्या लेखी भविष्य दाखविणाऱ्या जादुई गोळ्यांत बघण्याजोगं होतं. माणसाच्या मनात अगदी आता कशाला उद्याची बात ? असा बेदरकार सवाल टाकणाऱ्या बिनधास्त माणसाच्या मनातही 'उद्या' विषयी कुतूहल असतं. तसं माझ्याही मनात होतं. पण कुडमुड्या ज्योतिष्यानं केलेल्या भाकितात मला रस नव्हता. आपल्याकडे हल्ली वेस्टर्नाइझेशनची लाट फार वेगाने येतेय. आज पाश्चिमात्य देश बघणं म्हणजे माझ्या लेखी पंचवीस-तीस वर्षांनंतरचा आपला देश बघण्याजोगं होतं. आपल्या मुला-नातवंडांना कुठल्या सामाजिक परिस्थितीला सामोरं जावं लागेल हे जाणणं म्हणजे लहानपणी भविष्य दाखविणाऱ्या जादुई गोळ्याच्या चित्तरकथा ऐकल्या होत्या त्यातील थ्रील अनुभवण्याजोगं होतं.

थोडक्यात म्हणजे कळू लागलं (?) तेव्हापासून माणसं वाचायचा छंद लागला होता तो तिथेही जोपासायचा होता. अर्थात् आपल्याला कळतं हा गोड गैरसमज असल्याचे खूपदा सिद्ध होतं. आपल्याला काहीही कळत नाही याची प्रचीती करून देणारे, आपल्याच मूर्खपणाचं दर्शन घडविणारे प्रसंग अजूनही खूपदा घडतात ती गोष्ट अलाहिदा ! पण कलमद्वारा कौन्सिलिंगचा प्रयोग सुरू केला आणि 'हे' वाचन वाढीस लागलं. कारणपरत्वे इथली काही नारी सुधारकेंद्र अनाथालयं, वृद्धाश्रम नजरेखालून घातले होते. आपल्या इथे काहीसं दयनीय वाटणाऱ्या या संस्थांचं स्वरूप 'तिथे' कसं आहे हे जाणून घ्यायची इच्छा होती.

माझ्या इच्छे-अनिच्छेला न जुमानता फेमिनिस्ट हा शिक्का कपाळी बसला होता. स्वातंत्र्याची रणचंडी जोन ऑफ आर्क जिथे जन्मली, तिच्या देशात स्त्रियांची स्थिती कशी आहे हे जाणायला मन उत्सुक होतं. नाईट क्लब्ज, सैल नीतिमत्तेसाठी बदनाम ठरलेला, सुगंधाचं वेड असलेला फ्रेंच माणूस कसा आहे ह्या प्रश्नाचं खरं उत्तर जाणायचं

होतं. कलासक्त कलंदर फ्रेंच माणूस जाणायचा तर ते टुरिस्ट कंपनीबरोबर फ्रान्स बघून जमलं नसतं.

अक्षांश-रेखांशाची कल्पना देणाऱ्या जमिनीच्या विशिष्ट तुकड्याला भूगोलात देश म्हणण्याचा रिवाज आहे. या देशाला खऱ्या अर्थानं सौंदर्य प्राप्त करून देतात इथली माणसं! जी इतिहास घडवितात ती आणि जी इतिहास जोपासतात तीही! म्हणूनच मला सामान्य फ्रेंच माणसाच्या मदतीनं फ्रान्स बघायचा, जाणायचा होता. प्रवासाची पूर्वतयारी म्हणून मी फ्रेंच शिकले. एका शिक्षिकेच्या मदतीनं 'फ्रेंच इन अ मंथ' पुस्तक अक्षरश: कोळून प्यायले. कारण इस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशनने किंचित नियमाबाहेर जाऊन आपल्या संचांत स्थान दिलं होतं. तीस जणांच्या ग्रुपनं मुंबईहून बरोबर उडून फ्रान्सला उतरायचं या नियमाला अपवाद म्हणून माझा स्वीकार केला. अर्थात् कुठलीही समस्या निर्माण न करता भारतीय संघ पॅरिसला उतरेल त्या वेळी तिथे हजर असण्याची अट घातली होती. कुठल्याही कारणामुळे त्या वेळी मी हजर राहू शकले नाही तर पुढची जबाबदारी असोसिएशनची नसेल याची जाणीवही दिली होती.

भारतीय संघ पॅरिसला पोहोचणार होता त्यादिवशी संचापूर्वी सहा तास अथवा त्यानंतर दीड तास मी चार्ल्स द गॉलला पोहोचू शकणार होते. एअर पोर्ट बदलून जाणंही आवश्यक होतं. स्वत:च्या हिंमतीवर एका एअर पोर्टहून दुसऱ्या एअर पोर्टवर जायचं आणि खरंच समस्या निर्माण न करता भारतीय संघात सामील व्हायचं, तर मला पहिल्या पर्यायावर मोहोर मारणं भाग होतं. शिवाय काही तास एकट्याने काढायचे तर भाषा येणे आवश्यक होते. म्हणून कंबर कसून मी भाषा आत्मसात केली. संपूर्ण आत्मविश्वासानं मी विमानातून उतरले.

पण जमिनीला पाय (की बूट ?) लावताच पहिल्या दहाच मिनिटांत भ्रमनिरास झाला. आत्मविश्वास गळून पडला. कळून चुकलं आपल्याला येते ती पुस्तकांतील भाषा! तिचा ओठातील भाषेशी काहीही संबंध नाही. त्यातून प्रत्येकाच्या ओठांतील भाषा वेगळी! कंट्री, फॉन्से, पॅरिझिअन फॉन्से, कलर्ड पिपल्स फॉन्से... प्रत्येकाचे उच्चार वेगळे आणि आपलं फ्रेंच या सर्वांहून भिन्न! दुसऱ्या महायुद्धात इंग्रजांनी आपल्याला तोंडघशी दिलं या रागावर त्यांची इंग्रजी भाषेशी तेढ! त्यामुळे एक एक शब्द सुटा पाडीत सावकाश बोलत माहिती मिळवत रस्त्याला लागता लागता नाकीनऊ आले. एअर बसमधून भारतीय ग्रूपमध्ये उतरणार होता त्या ठिकाणी पोहोचले तरीही आपण योग्य ठिकाणी उतरलो आहोत याविषयी मनात खात्री नव्हती. मी बोललेलं कुणाला आणि कुणी बोललेलं मला जाम कळत नव्हतं.

शेवटी एकदाचं 'ध्येयपूर्तीचं' स्थान गाठलं. तोवर कमालीची भूक लागली होती. लोक ओव्हरकोटमध्ये वावरत होते; नि मी घामानं निथळत होते. थेट भारतातून चालत आल्यागत पायात गोळे येत होते. काही खायला कुठे गेले तर पुन्हा 'ध्येय' सापडेल याविषयी मन हमी देईना. चार तासांच्या पायपिटीनंतर जे गवसलं होतं ते पोटाची खळगी

भरण्यासाठी गमाविण्याची तयारी नव्हती.

मनातील अस्वस्थता दडवायला मी स्टॉलवरून पेपर घेतला. जाणकाराच्या थाटात मी विझिटर्स लाऊंजमध्ये शिरले. पायपीट झाली. पण वेळ तर गेला. आता सारा दीड तासाचा प्रश्न! पेपर वाचण्यात (?) सहज संपण्यातला! मी मनाला धीर देत पेपर सावरला. त्यात डोकं खुपसण्यापूर्वी सहजच मी मिटी मिटी उघडझाप करणाऱ्या इन्फर्मेशन स्क्रीनकडे बघितलं...काळजाचा ठोकाच चुकला. प्लेन दोन तास लेट असल्याची माहिती देत स्क्रीनवरील अक्षरं माझ्याकडे खट्याळपणे बघत हसत होती. मी थकून डोळे मिटले.

मी विलक्षण थकले होते. दुसऱ्याच क्षणी माझा डोळा लागला. तरीही पॅरिसला एअरपोर्टवर चोऱ्यांचं प्रमाण फार आहे याची जाण मनात जागत होती. क्षणाक्षणाला असुरक्षितपणाची जाणीव घेरत होती. मी दचकून डोळे उघडत होते. थकले डोळे पापण्यांचा भार उचलायला राजी नसल्यागत गपागप मिटत होते. अशांतच कुणाचेसे शब्द कानी पडले- 'एक्सक्यूज मी!' डोळे उघडले तरी मी झोपेतच होते. इथे कुणीही इंग्लिश बोलणार नाही या खात्रीने मनाचा ताबा घेतला. सामानाला विळखा घालून बसले होते. ती पकड मी अधिकच घट्ट केली. तरीही पुन्हा कुणीसं बोलल्याचं जाणवलं, "एक्सक्यूज मी! डेनिस बोर्डेटज हिअर! आय होप यू आर स्मिता... मादाम भागवत.."

मी खडबडून जागी झाले. हे नाव आपलंच असल्याचा जसा नव्यानंच साक्षात्कार झाला. सामानावरची मिठी सोडून मी पटकन् उठले. समोर उभ्या असलेल्या प्रौढेचे हात हाती घेत सुहास्य वदनानं जमेल तितक्या गोड स्वरात म्हणाले, 'बोन्झूर मादाम' वा! आपण भलतंच गोड बोलू शकतो याची जाणीव झाली आणि ओठ खरंच हसले.

'फार वेळ थांबावं लागलं का? प्रवासात काही त्रास?' तिनं औपचारिक प्रश्न केला.

"छे! त्रास कसला? मी मजेत आहे." मी सहज स्वरात म्हटलं. खरंच डेनिसच्या दर्शनानं मला 'अजि मी ब्रह्म पाहिले' सारखा आनंद झाला होता. झाल्या त्रासाचं विस्मरण झालं होतं. "यांचं प्लेन बरंच लेट आहे म्हणतात. तुम्ही लवकर कशा?" माझा प्रश्न!

"तू लवकर येणार हेही ठाऊक होतं नं मला? तुला फार वेळ एकटं बसावं लागू नये म्हणून शक्य तितकी लवकर आले." मी कृतज्ञ नजरेनं तिच्याकडे पाहिलं. "पटकन् ओळखलं मी तुला! फोटोप्रमाणेच कपडे आहेत नं तुझे? पण कमालीची थकलेली वाटलीस!" तिनं गोड स्वर लावला.

"कसचं! कसचं" मी सारवासारवीचा निष्फळ प्रयत्न केला.

डेनिस आग्रहाने मला कॉफी हाऊसमध्ये घेऊन गेली. कॉफीबरोबर तिनं सॅंडविचेसही खायला लावली. चार-सहा तासांत हरवलेलं माझं 'मी पण' तिनं चार-सहा मिनिटांत परत मिळवून दिलं. माझी संपूर्ण माहिती असोसिएशननं तिला कळवलीच होती. स्वत:विषयी तिनं मला जुजबी माहिती दिली.

"ब्रेर्न ग्रूपच्या स्वागत समितीची मी प्रमुख आहे. बासष्ट वर्षांच्या वयाला- तीन

वर्षानंतर निवृत्त झालं की खूप भटकायचं अशी स्वप्न बघतेय. मला दोन मुली आहेत. सतरा वर्षांच्या सहजीवनानंतर माझ्या नवऱ्यानं दुसरी मैत्रीण शोधली आहे. तिच्यासह तो पॅरिसला असतो. अधून मधून आम्हाला भेटायला बेर्नेला येतो. माझ्या एक्स हजबंडशी (एक्स हजबंड आणि एक्स वाईफ ही नव्यानंच अस्तित्वात आलेली जमात) माझे सलोख्याचे संबंध आहेत. मला वाटतं, माझ्याविषयी मी तुला पुरेशी माहिती दिली आहे.''
मी होकारात मान डोलविली.

अजूनही भारतीय ग्रूप यायला दीड तासाचा अवधी होता. शिवाय कस्टम क्लिअर करून लोक बाहेर येण्यात अर्धा पाऊण तास मोडला असता. डेनिसला बऱ्यापैकी इंग्रजी येत होतं. गप्पांचा सोसही दांडगा! तिथेच आमच्यात आपल्या तुपल्या गप्पा रंगल्या. ''तुझं नवल वाटलं आम्हाला'' ती सहज स्वरात म्हणाली ''नवलापेक्षा खरं म्हणजे कौतुक वाटलं.''

हे लोक एटिकेटस पाळतात याची जाणीव होती. तरीही किंचित जानपहेचान नसताना या बाईला माझं कौतुक वाटल्याचं ही का सांगतेय ते मला कळेना. म्हणजे नवल करण्याचा आता माझा टर्न असावा.

''तुला खरं वाटत नाही नं?'' तिनं हसून विचारलं. मी होकार भरताच ती पुढे म्हणाली, ''आम्ही मोकळ्या मनाची माणसं! हिपोक्रसीबद्दल नावड असलेली! म्हणून तुला स्पष्टपणे विचारते, आम्ही प्रपोज केलेल्या गावांतून तू बेर्ने का पसंत केलंस?''

''मलाही हिपोक्रसी आवडत नाही म्हणून, स्पष्ट सांगायचं तर मला तुझा प्रश्न कळला नाही.''

''तुमच्या असोसिएशनच्या लोकांना इथे तीन गावं 'ट्रीट' करतात. कुठे जायला आवडेल ते विचारून आम्ही पाहुण्यांना निवडीचा हक्क देतो. पण त्याबरोबर थोडी आमचीही सोय बघावी लागते. यंदा असं झालं की तू सोडून कुणीही बेर्नेला येणं पसंत केलेलं नाही. म्हणून आम्ही खट्टू झालो होतो. तू तरी बेर्ने पसंत केलंय की कशावर तरी टिक मारायची ती बर्नेवर मारलीस हे कळेना. तू मला सांग पतीये. मार्सालिससारखी शहरं सोडून तू बेर्नेवर का पसंतीची मोहोर मारली? बेर्नेला तू चॉइसनं येतेस की फ्लुकनं?''

''बेर्ने मी पसंत केलं. कारण बेर्ने शहर नाही हे मी तिथेच जाणून घेतलं होतं. मला खेड्याला प्राधान्य द्यायचं होतं.''

''का बरं?''

''मार्सालिस आणि पतिये शहर आहेत. पॅरिसला राहणं होणार आहे. म्हणजे फ्रान्सचं शहर दिसणार आहेच. तिथे मी मुंबईला असते. जगातील सर्व कॉस्मोपॉलिटन शहरांचा चेहरा-मोहरा बराच सारखा असतो. म्हणून वाटलं खेडं बघावं. शिवाय माझ्या व्यवसा-याच्या दृष्टीनेही मला खेड्यात यायचं होतं.''

''ते कशासाठी? तुझा सविस्तर बायोडेटा माझ्याजवळ आहे. तरी तू काय म्हणतेस

ते मला कळलं नाही.''

''आमच्याकडे शहरात राहणारे लोक पुरोगामी होत आहेत. पण खेडोपाडी मात्र प्रतिगामी वातावरण दिसतं. तिथे स्त्री अजूनही माझ्या आजी-पणजीच्या काळच्या समस्यांना तोंड देतेय. तसं इथे आहे का ? खेड्याचं स्त्री-जीवन वेगळं आहे का ? जाचक ठरणारं आहे का ? ते मला जाणायचंय. शहरी स्त्रीहून तिच्या समस्या वेगळ्या आहेत का ? त्या सोडविण्यासाठी तिला कुणाची मदत मिळते की सारं स्वत:च स्वत:ला निपटावं लागतं ? थोडी तुलनात्मक माहिती मिळावी म्हणून मी बेर्नेवर पसंतीची मोहोर मारली.''

''एक्सलंट !'' खुशीची तत्काळ पावती देत डेनिस म्हणाली ''इतर कुणीच आमचं गाव पसंत केलं नसल्यानं आम्ही नर्व्हस होतो. तू पूर्ण विचारांती बेर्नेला यायचं ठरवलंय हे ऐकून मला फार बरं वाटलं. आता मला सांग, हे सारं कसं, केव्हा आणि अशा रीतीनं जुळवून आणायचं याविषयी तू काही विचार केलायस का ?''

''असोसिएशनच्या कार्यक्रमानंतर फावल्या वेळात इथल्या करियर ओरीएंटेड स्त्रियांची भेट घेणं मला आवडेल. तसंच काही घटस्फोटित स्त्री-पुरुषांशी मनमोकळी बातचीत करायची इच्छा आहे. फक्त आई वा फक्त वडिलांजवळ राहणाऱ्या काही मुलांना भेटायचं आहे. अर्थात माझ्याशी मोकळेपणानं बोलणं त्यांना आवडलं तरच जमायचं. शिवाय बेर्नेचं गावरान सौंदर्यही बघायचं आहे.''

''अबबब !'' डोळे विस्फारीत ती कौतुकली, ''अगदी थियॉरॉटिकल स्केलेटन घेऊन आली आहेस की ! तसं तुझ्या स्पष्ट भूमिकेचं प्रतिबिंब तुझ्या सविस्तर बायोडेटांत पडलं होतं. त्याच कारणामुळे मी तुझी व्यवस्था एका चाळीस वर्षांच्या घटस्फोटितेकडे केली आहे. तिला एक मुलगा आहे. गव्हर्मेंट अपॉईंटेड सोशल वर्कर असलेली ही स्त्री 'हॉरीबल वुमन' म्हणून थोडी बदनाम आहे. तरीही तुझ्या बऱ्याच इच्छा पूर्ण करायचं सामर्थ्य तिच्यात आहे असं मला वाटतं.''

''उत्तम !'' मी संतोष व्यक्त केला.

''आता गावरान निसर्गाविषयी. खरं म्हणजे बेर्नेविषयी ! नॉर्मंडी जिल्ह्यातील हे मध्यावरचं गाव आहे. पॅरिसपासून सुमारे दीडशे किलोमिटर्स अंतरावरील हे छोटंसं गाव चॅरीटोन नदीच्या देखण्या खोऱ्यात आहे. त्याला ऐतिहासिक आणि भौगोलिक दृष्टीनेही महत्त्व प्राप्त झालं आहे. पंधराव्या शतकातील घरं इथे आजही सांस्कृतिक वारसा म्हणून जतन केली आहेत. नव्या युगाची पावती देणारे सुरेख स्वीमिंग पूल्स, अद्ययावत स्टेडियम्स, इतकंच नव्हे तर फ्लाईंग क्लबही आहे.''

''मुख्यत: इथे शेती आणि पशुपालनावर लोक जगतात. इथल्या सशक्त गायींमुळे इथे दूध, चीज, लोर्णी यांची रेलचेल असते. शिवाय इथल्या सफरचंदाच्या बागा, त्यातून तयार होणारी 'कॅल्व्हाडोस' जगभर प्रसिद्धी मिळवून आहे. हे सारं पाहून तुझं निसर्गप्रेमी मन सुखावेल. होस्ट- मादाम स्पिंडलर क्लॉडच्या मदतीनं वैचारिक भूकही भागेल.

आपली निवड चुकली असं तुला वाटू नये म्हणून आम्ही शक्य ते सारं करू या विषयी खात्री बाळग!"

"मेर्सी! मेर्सी बोक्कु!!" (थँक्स अ लॉट.) जवळीक साधायला मी ठेवणीतले दोन शब्द बोलून किंचित हसले. तीही छानसं हसली.

"तशी मीही तुझ्या कामाची आहे बरं का!" ती हसून म्हणाली. माझ्या प्रश्नार्थक मुद्रेच्या उत्तरादाखल म्हणाली,

"घटस्फोटितांना भेटायचं नं तुला? मोकळ्या मनानं बोलायला मला आवडेल. इतरही तुला सहकार्य देतील. पण यावर आपण सवडीनं बोलू. प्लेन लँड होऊन वीस-तीस मिनिटं उलटली आहेत. भारतीय ग्रूपला सामोरं जायला हवं! तू येणार की थकली आहेस? इथेच आराम करतेस!"

माझा थकवा कधीच पळाला होता. फ्रान्सच्या अनोळखी परिसरात लटलटत पहिलं पाऊल ठेवलं होतं. डेनिसच्या दर्शनानं त्या पायांत नव्यानंच बळ प्रगटलं होतं. भारतीय संघाचे उत्साहानं स्वागत करायला मीही डेनिसबरोबर चालू लागले.

◆ ◆

# ३ / हॉरीबल वुमन

चार्ल्स द गॉल एअर पोर्टवर भारतीय संघाची तीन उपसंघांत विभागणी झाली. प्रत्येकाला आपआपल्या नावाचं फोल्डर देण्यात आलं. स्वागताचा पुष्पगुच्छ देऊन टुरिस्ट बसमध्ये बसण्याची विनंती करण्यात आली. ही बस पाहुण्यांना जरूर त्या रेल्वे स्टेशनवर सोडण्यास येणार असल्याचं सांगण्यात आलं. सर्व प्रथम मार्सालीसला जाणारे, त्यानंतर पतिये गावी जाणारे लोक बसमधून उतरणार होते. मी बेर्नेला जाणार होते. आमचा ग्रुप सर्वांत शेवटी गार सेंट लझारे पॅरिसला उतरणार होता. सर्वांना नीट माहिती देऊन डेनिसनं वर्गवारीप्रमाणे बसमध्ये बसायला सांगितलं.

दुतर्फा दिसणाऱ्या पॅरिसविषयी डेनिस सर्वांना माहिती देत होती. मध्योमध्य वाहणारी सेन नदी, अधून मधून दिसणाऱ्या ऐतिहासिक इमारती वगैरेंवर धावती नजर करीत आम्ही पुढे सरकत होतो. शेवटी टुरिस्ट बसमध्ये बेर्ने ग्रूपची दहा जणं उरली. अर्थात् अकरावी डेनिस! आमच्या ग्रूपमध्ये एक जोडपे पाचगणीचे, एक कोल्हापूरचे आणि एक पुण्याचे अशी तीन जोडपी आणि सातवा सडा तरुण अशी पुण्याच्या ग्रूपमधून आलेली मंडळी होती. मी एकटी मुंबईची आणि एक जोडपं बडोदा ग्रूपचं! सारी एकमेकांशी अपरिचित! संघातील लोकांचा एकमेकांशी जुजबी परिचय व्हावा या हेतूनं 'उडण्याच्या' आदल्या रात्री मुंबईत 'अॅलायन्स फॉन्सें'त गेट टुगेदर कम डिनरचा कार्यक्रम असतो. मी आधीच फ्रान्सला आले होते. त्यामुळे हा कार्यक्रम हुकला होता. कुणाची साधी तोंडओळखही नव्हती. परिचय करून घेणं आवश्यक असलं तरी चालू बसमध्ये मात्र नजर खिडकीबाहेर होती.

गार सेंट लझारे पॅरिसला उतरलो तिथे कामगारदिनानिमित्त (१मे) कामगार घोषणा देत होते; ते पाहून इकडच्या सामंत, फर्नांडिस यांच्या सभांची आठवण झाली. गर्दीतून वाट काढीत तिने आम्हाला स्टेशनवरील एका कॅफेत नेलं. गाडीला अजून दीड-दोन तासांचा अवधी होता. डेनिस सर्वांशी औपचारिक ओळख करून घेण्यात, त्यांना चहा-कॉफी विचारण्यात गुंतली होती. मलाही सर्वांशी ओळख करून घेणं आवश्यक होतं. तशी औपचारिक ओळख झालीही! पण मला मराठीचा सराव नव्हता. 'पुणे' नावाचंही थोडंसं दडपण होतं. त्यामुळे मराठी बोलताना थोडं चाचपडायला व्हायचं. आत्मविश्वासाचा अभाव. नीट ठाऊक असलेले शब्दही चक्क आठवायचे नाही. त्यापेक्षा

गुजराती भाषेत संवाद अधिक सहजपणे व्हायचा. बडोदा ग्रूपमधून आलेल्या जोडप्यात राहुल गज्जर आणि संध्या, असणं मला ओॲसिससारखं वाटलं. ग्रूपमध्ये राहुल एकटाच गुजराती ! बाकी सारे - अगदी त्याची पत्नीही मराठी ! त्यामुळे तो जरा अस्वस्थ होता. स्वाभाविकच सारख्या समस्येमुळे आम्ही जवळ आलो.

राहुल-संध्याला बघताक्षणीच ते परिचित असावे असं वाटत होतं. पण आमच्या घरात माझ्या 'वाटण्याची' नेहमीच फिरकी घेण्यात येते. बडोदं सोडल्याला वीस वर्ष होऊन गेली तरी हिला बडोद्याची प्रत्येक व्यक्ती ओळखीची वाटते. वडाचे पान पिंपळाला चिकटवीत स्वत:चं हसं करून घ्यायचा हिला भारीच सोस आहे असं घरातील प्रत्येकाचं अनुभवसिद्ध मत ! म्हणून मी माझं 'वाटणं' ओठाआड दडवलं तर ही मंडळी खरंच ओळखीची निघाली. राहुलनंच स्पष्टीकरण दिलं - अहमदाबादच्या ज्या ज्युनिअर कॉलेजमध्ये मी विज्ञानशाखेत काम करीत होते, तिथेच हा कॉमर्सचा विद्यार्थी होता. मला ओळखणं त्याला सहज जमण्यातलं असलं तरी त्या वेळी पोरगेलासा वाटणारा; पण आता भरगच्च मिशा ठेवलेला बाप होऊ घातलेला राहुल मला मात्र फक्त पहिल्यासारखा वाटला होता. गंमत म्हणजे त्याची पत्नी संध्या बडोद्याची ! माझ्या एका मैत्रिणीची आत तशी भाची 'तशी भाची' होती. यांना बघून आपल्याला उगीचच ओळख असल्यासारखं वाटलं नव्हतं हे जाणवून मी स्वत:वरच खूश झाले. माझ्याच स्मरणशक्तीला दाद देत राहिले. (दुसरे कोण देणार हो ?) भरीस भर म्हणून संध्या फ्री लान्स कॉलमिस्ट होती. मग काय ? बेर्नेला पोहोचण्यापूर्वीच आमचं झकास मेतकूट जमलं (की त्रिकूट म्हणायला हवं ?)

बेर्ने स्टेशनवर समस्त होस्ट मंडळ स्वागतासाठी हजर होतं. मादाम पिशॉंच्या घरी छोटासा स्वागत-समारंभ होता. प्रत्येकाचा परिचय करून देत डेनिसनं गेस्ट होस्टकडे सोपवले. माझी होस्ट मादाम क्लॉड स्पिंडलर असल्याचे डेनिस आधीच बोलली होती. ती तिच्या मुलासह - फ्रेडरिकला घेऊन आली होती. मला सामोरं येत त्यांनी कौतुकमाखलं स्मित उधळलं. विचित्र पद्धतीनं मेकअप केलेल्या क्लॉडची नजर अस्वस्थ होती. माझ्याशी ती गोड हसली तरीही इतरांशी तिचं वर्तन तुसड्यात जमा होणारं वाटलं. प्रत्येकाकडे ती संशयानं बघत होती. जरा कुणी काही बोललं की किंवा कुणी काहीही न बोललं तर त्याचे भांडवल करून ती तणतणत होती. छोट्या-मोठ्या शब्दांचे इश्यू करून हमरीतुमरीवर येणं हा तिचा स्वभावधर्म असावा. कदाचित म्हणूनही डेनिसनं तिच्यासाठी 'हॉरीबल' हे विशेषण वापरलं असेल. अनोळखी वातावरणात दिसेल ते, जाणवेल ते टिपत आडाखे बांधण्याची प्रतिक्षिप्त क्रिया होत होती. तटस्थ मन सभोवतालच्या वातावरणाचा वेध घेत होते.

फ्रान्समध्ये कॉफीपान हे काम न समजता सोहळा समजण्याची पद्धत आहे. मजेत गप्पा रंगवीत घोटाघोटानं कॉफीची लज्जत वाढवायची त्यांना सवय आहे. त्याच पद्धतीनं कॉफीपान रंगत होतं. डेनिस होस्ट आणि गेस्टना काहीबाही सांगत होती. बेर्नेतील आमचं

वास्तव्य सुखाचं व्हावं यासाठी बहुमोल सूचना देत होती. होस्ट आणि गेस्टची परस्परांशी ओळख व्हावी म्हणून दोन दिवस मोकळे ठेवण्यात आले होते. या दोन दिवसांत गेस्टच्या आवडी-निवडींना प्राधान्य देऊन असोसिएशनच्या कार्यक्रमात समावेश नसलेल्या ठिकाणी त्यांना न्यावे असे होस्टना सांगून डेनिस पाहुण्यांकडे वळली. त्यांच्या इंटरेस्टची कल्पना होस्टना बायोडेटावरून न आली तर प्रत्यक्ष भेटीत संवाद साधून नि:संकोचपणे होस्टना आवडी-निवडी कळवाव्यात अशी विनंती करून डेनिसनं सर्वांना निरोप दिला.

निघताना डेनिस पुन्हा माझ्याजवळ आली. मृदू स्वरात ती म्हणाली, 'स्मिता, मादाम स्पिंडलर क्लॉडची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही. पण तू तिच्या घरी असावंस अशी तिनं मनापासून इच्छा प्रगट केली होती. खरं सांगायचं तर आग्रहच धरला होता म्हण ना! तुझ्या अपेक्षा पूर्ण करायचं सामर्थ्य तिच्यात आहे असं समजून मी तिची विनंती मान्य केली आहे. तुला तिच्याशी जुळवून घेता आलं तर उत्तमच. पण न जमलं तर- तिचं रुसणं, तिचा कांगावखोर स्वभाव तुला असह्य वाटला तर अवश्य सांग! मी होस्ट बदलण्याची व्यवस्था करीन याविषयी खात्री बाळग! विश यू ऑल द बेस्ट!' म्हणत ती गोडसं हसली.

'बो स्वां!' (गुड नाईट). मीही हसत तिला तिच्या भाषेत निरोप दिला.

मादाम पिर्शोच्या घराबाहेर पडलो तेव्हा रात्रीचे आठ वाजून गेले होते. तरी बाहेर लख्ख सूर्यप्रकाश होता. त्या सोनेरी प्रकाशावरची नजर माझ्याकडे वळवून क्लॉडनं पुन्हा कौतुक माखलं स्मित उधळत म्हटलं, "सूर्याच्या देशातून आली आहेस बाई! तूच सूर्य आणलास. इथे आहेस तोवर 'सनी डेज' असेल तर तुला खूप मजा येईल." गाडीचा दरवाजा उघडून तिने अदबीनं मला आधी बसू दिलं. तिचा मुलगाही खुसूखुसू हसत होता.

रस्त्यात क्लॉड आणि फ्रेडरिक वारंवार मी त्यांचं आमंत्रण स्वीकारल्याबद्दल आनंद व्यक्त करीत होते. मादाम पिर्शोच्या घरीही तिच्या हास्यात मला कौतुक दिसलं होतं. हा सारा औपचारिकतेचा भाग आहे असं समजून मी हुरळून न जाता त्यांना माफक प्रतिसाद देत होते. तरीही तिनं वारंवार आनंद व्यक्त करणं मला विचित्र वाटत होतं. (कारण पुढे कळले). ही विचित्र आहे असं डेनिसही म्हणाली होती. विचित्र शब्दाचा भावार्थ समजून घ्यायला मन आतुरलं असतानाच मनाच्या कोपऱ्यात किंचित् असुरक्षि-ततेची भावना मूळ धरू लागली होती. 'डिफेन्सिव बॅटिंग' करायचा विचार मनात दाटत होता. क्लॉडला नीटसं इंग्रजी येत नव्हतं. हावभावांची मदत घेत, हाताशी डिक्शनरी ठेवून ती काम धकवून नेत होती.

घरात शिरल्या शिरल्या अत्यंत कुबट वास नाकात शिरला. पाश्चात्त्यांची सुंदर, सुबक आणि सुगंधी घरं बघायची तोवर सवय झाली होती. त्या पार्श्वभूमीवर हा कुबट वास कमालीचा विसंगत वाटला. दार उघडताच एक गुबगुबीत कुत्रा आणि बोका स्वागताला पुढे सरसावले. पाठोपाठ पिंजऱ्यांतील काकाकौव्याने हाळी दिली. दुसऱ्या पिंजऱ्यांतील

तीन कबरे उंदीर (मुद्दाम पाळलेले) पिंजऱ्यातच धुमाकूळ घालू लागले. क्षणार्धात समग्र दुर्गंधापाठचं रहस्य उलगडलं. बोलायच्या प्रयत्नांत फ्रेडरिक म्हणाला, 'उन शा-उन शीआ" (एक मांजर-एक कुत्रा!) ज स्ये (मला आवडतात) तू? (तुला?)

खरं सांगायचं तर मला कुठलाही प्राणी माझ्या अंगचटीस आलेला आवडत नाही. तरीही मी होकार दिला. फ्रेडरिक खुशीनं हसला. पिंजऱ्यात धुमाकूळ घालणाऱ्या उंदरांना तळव्यावर घेऊन त्याने काहीतरी खायला दिलं. 'रा -रा'- (उंदिर) म्हणत त्यानं आनंदाने शीळ घातली. माणसं थोडी आणि प्राणी फार ·हा घाट पाहून माझ्या गळ्यात उमासे दाटत होते. तरी मी बळेच हसले.

घरकाम, स्वयंपाक ही कामं क्लॉडला आवडत नसावी. प्राण्यांचे लाड संपवून ती माझ्याकडे वळली. अत्यंत निरुत्साहानं ती म्हणाली, "स्वयंपाक करू या की सकाळचं चालवून घेऊ या?"

"चालेल की सकाळचे!" मी समजूतदारपणे - खरं सांगायचे तर भिडस्त स्वरात उत्तरले.

"नक्की!" तिने पुन्हा प्रश्न विचारून खुंटा हालवून बळकट असल्याची खात्री करवून घेतली.

एका टोपलीत कोबी उकलून सुटी पाने ठेवलेली दिसत होती. ती टोपली पुढ्यात खेचून तिने फ्रेडरिकला फ्रीजमधून काहीतरी काढायला सांगितले. डायनिंग टेबलपर्यंत जाण्याची तसदी न घेता तिने तो चटणीसारखा पदार्थ फ्रेडरिकला सेंटर टेबलवरच ठेवायला सांगितला. तिथेच दाटीवाटीनं कॉफीचा परकोलेटर, मग कोबीच्या पानांचे शिस्तर सारं काही ठेवलं. माझ्या मगमध्ये काळी ढुस्स कॉफी ओतत तिने विचारले, "दूध हवं?"

भिडस्त स्वभाव नको म्हणू बघत होता. त्याला गप्प करीत मी निगरगट्टपणे 'हो' म्हणायचे धाडस केले. चहाचा चमचा दुधाच्या भांड्यातून भरून घेत तिने कॉफीत ओतून विचारलं, "अजून हवं?" प्रत्येक चमच्याला ती हा प्रश्न विचारीत होती. पाचव्या चमच्यापर्यंत मी ओढून ताणून आणलेलं अवसान संपलंच. तिच्या मते भरपूर दुधाची तर माझ्या मते कमालीची पांचट कॉफी तयार झाली.

त्या दोघांच्या मगमध्ये काळी कॉफीच होती. कोबीच्या पानात चटणीसारखा पदार्थ ठेवून त्याची पुडी करून फ्रेडरिकनं तोंडात सरकवली. मीही त्याचे अनुकरण केले. जेवणाचा एकूण थाटच भूक मारणारा होता. कोबीच्या तशा तीन पुड्यांत मी माझं जेवण गुंडाळलंच! पोटात काव काव करणाऱ्या कावळ्यांच्या तोंडावर कॉफीचं कडूझार पाणी ओतून मी उठलेच.

जेवण (?) होताच क्लॉडनं मला माझी खोली दाखवली. वरच्या मजल्यावर दोन बेडरूम्स होत्या. मध्ये एक कॉमन वॉशरूम कम मेकअप रूम होती. दोन्ही बेडरूम्सना दरवाजा नव्हता.

"या खोलीला दरवाजा नाहीय स्मिता!" तिचा स्वर अपराधी वाटला.

"असू दे गं! त्याचं काय इतकं!" मी आश्वासक स्वरात म्हटलं. चाळिशीतील दोन स्त्रिया आणि नऊ वर्षांचे एक पोर! माझ्यासाठी तर बेडरूम ही गरजेची बाब नव्हती. ड्रॉईंगरूम रात्रीच्या वेळी बेडरूम होणं हेही मुंबईच्या लोकांसाठी सामान्य ठरतं. इथे दरवाज्यावाचून का होईना माझ्यासाठी वेगळी खोली होती हेच खूप होतं. अशा सामान्य बेडरूमचा मी सहज स्वीकार केलेला पाहून क्लॉडच्या डोळ्यांत कृतज्ञता उमटली. ती खालच्या मजल्यावर व जवळच्या खोलीत फ्रेडरिक झोपणार असल्याचं मला सांगून ती खाली जायला वळली. मी बाथरूममध्ये गेले. प्रशस्त बाथरूमच्या अर्ध्या भागात टब, बेसिन आणि कमोड होता. मध्ये कार्पेट घातलेला मोकळा भाग आणि पुढे मेकअप स्टॅंड आणि ड्रेसिंग टेबल होतं. थंड देशात रात्री गरम पाण्यानं स्नान करून झोपलं की थकली गात्रं मोकळी होऊन झोप छान येते हे अनुभवलं होतं म्हणून मी टबमध्ये गरम पाण्याचा नळ चालू केला. आणि बघते तर-उलट पावली माघारी येत मी क्लॉडला हाक मारीत म्हटले 'अगं, या दरवाज्याची कडी कुठे ?' माझा बावळटासारखा प्रश्न ऐकून क्लॉड गोंधळली. तिच्या मते मुळी कडीची आवश्यकताच नव्हती. एक जण स्नान करीत असताना दुसऱ्याने ड्रेसिंग टेबल वापरत मेकअप करणं तिच्या मते योग्य होतं. तसे असण्यात गैर काय हे तिला कळेना आणि भाषेच्या तोकड्या ज्ञानामुळे मला समजवणंही जमेना. कडीवाचून आत जाणं मला काही सुधरेना. शेवटी मी तिला म्हटलं, "सकाळी वा रात्री मी आत असेन तोवर काहीतरी गुणगुणत राहीन. मी आत असताना कुणी आत यायचे नाही."

"का ?" तिनं नवलानं विचारलं. "मी अथवा फ्रेडरिकनं त्या वेळी ब्रश केला वा इतर काही केलं तर बिघडतं कुठे ?"

मला कपाळावर हात मारून घ्यावासा वाटला. डेनिसला फोन करायची इच्छा झाली. पण दुसऱ्या होस्टकडे हीच तऱ्हा असली तर ? क्लॉडनं मला मागून घेतली होती. दुसऱ्या होस्टकडे माथी मारलेली पाहुणी म्हणून जाण्यापेक्षा- घायकुतीस येत मी आमच्याकडे 'तशी' पद्धत आहे हे सांगून दार बंद करून स्नानासाठी साडीला हात घातला. गंमत म्हणजे जागेपणी सतत गुणगुणण्याची सवय असलेल्या मला गुणगुणायला एकही गाणं आठवेना.

स्नान उरकून बाहेर आले तर क्लॉड माझी वाट बघत उभी होती. तिच्या हातात वेगवेगळ्या साईझचे तीन गुबगुबीत टॅडी बेअर्स होते. हे तिनं मला दिले. कशासाठी हे विचारायची मला संधीही न देता तिने विचारले "पुरेत नं ? की अजून हवे ?"

मी चक्रावले. पुरेत म्हणजे ? मला हे तरी कुठे हवेत ते मला कळेना. "याचं काय करू मी ? मला एकही नकोय !" मी अजागळासारखी तिच्याकडे बघत राहिले.

"मग तुला उंदीर किंवा काकाकौवा देऊ ? की बोका चालेल ? कुत्रा मला हवाय."

मला काहीही नकोय हे तिला पटेना. मन मोठं करीत ती औदार्याने म्हणाली, "हवं तर तुला कुत्रा घे. माझा काही आग्रह नाही."

"अगं पण मला कुत्रा तरी काय करायचाय?"

आता चक्रावण्याची तिची पाळी असल्यागत ती गोंधळल्या स्वरात म्हणाली, "बेडवर तू एकटी कशी झोपशील? थकली असशील. कुशीत कुणी हवंच की!"

"झक्कपैकी हातपाय मोकळे करून मस्त ताणून देईन. भरपूर थकलेय. बिछान्यावर यांची गर्दी नकोय मला" म्हणत टॅडी बेअर्सची गँग मी तिच्या हातात कोंबली.

मला खरंच काही नकोय यावर तिचा मुळी विश्वासच बसेना. आल्या पाहुणीचं स्वागत नीट होत नाहीय असं वाटून ती कासावीस! शब्दांसाठी चाचपडत, डिक्शनरीची मदत घेत संवाद साधणं खरंच अवघड होऊन बसलं. गोड गोड बोलायचा जाम हँग ओव्हर आल्यागत माझे आई गंगे, मला काही नकोय. तू आता खाली टळ! असे तिरसट स्वरात किंचाळण्याची अनावर इच्छा दडपणं महा कर्म कठीण वाटत होतं. हे वाक्य मला दुसऱ्या कुठल्याही भाषेत बोलता येणार नव्हतं म्हणून बरं. नाही तर संयम सुटून मॅनर्सची ऐशी-तैशी करत ओरडलेच असते.

सर्व शक्ती पणाला लावून मी तिला माझं म्हणणं पटवीत असताना अचानक आठवलं खोलीला दरवाजा नाहीय. जबरदस्त शिसारी मनात दाटली. 'बापरे'! अजाणताच तोंडून मायबोलीतील उद्‌गार निसटला. मराठीचा गंध नसूनही शब्दावरून तिनं मनातील भय अचूक टिपलं.

"काय झालं गं?" आता या प्रश्नाचं उत्तर द्यायचं म्हणजे अजून पावशेर रक्त आटणार या जाणिवेनं मी उत्तर देण्यापूर्वीच थकले. झोपण्यापूर्वी तिने सारे प्राणी कडेकोट बंदोबस्तात ठेवावे असे तिला सांगून मी निर्वाणीच्या स्वरात म्हणाले, "मला प्रत्येक प्राण्याची ॲलर्जी आहे. कुणीही माझ्या बिछान्याकडे फिरकता कामा नये."

"ओह! पुअर फेलो!" तिच्या स्वरात दया हिंदकाळत होती. वाटलं, आधीच ॲलर्जीचं कारण सुचलं असतं तर इतकी दमछाक झाली नसती. औपचारिकपणे तिला आणि फ्रेडरिकला निरोप देऊन मी अक्षरश: त्यांना खोलीबाहेर काढले.

थकली गात्रं ऐसपैस बिछान्यांतील रजईत झोकून दिली आणि आठवलं - इथल्या मीटिंगमध्ये त्यांच्याकडे गेल्या गेल्या भेटी द्यायचा रिवाज असतो असं सांगण्यात आलं होतं. मी क्लॉड आणि फ्रेडरिकसाठी आणलेल्या भेटी अजून माझ्या जवळच होत्या; पण त्यांना परत वर बोलवून त्या प्राण्यांच्या पलटणीला सामोरं जायची शक्ती उरली नव्हती. भेटीचं काम उद्यावर ढकलून मी डोळे मिटले. थकल्यामुळे झोप तर लागली. पण झोपेतही हॉरीबल वूमनच्या घरातील अनेक प्राण्याचे चित्रविचित्र आवाज कानी पडत होते. त्यांनी माझ्यावर आक्रमण केल्याची स्वप्नं बघण्यात रात्र कशीबशी संपली.

◆◆

# ४ / असत्यं शिवम्-सुंदरम्

डेनिसनं क्लॉडचं वर्णन 'हॉरीबल वूमन' असं का केलं असावं याची कल्पना मला सलामीच्या संध्याकाळी रात्री आली. काही दिवसांच्या सहवासात मला जाणवलं, स्वयंपाक आणि घरकामच नव्हे तर तिला कसलाच उत्साह नाही. जीवनाचा प्रत्येक क्षण उपभोगण्याचा हव्यास असलेल्या फ्रेंच लोकांच्या पार्श्वभूमीवर तिचं वागणं विलक्षण विसंगत ठरायचं. नाही म्हणायला तिचा फ्रेडरिक स्वीमिंगच्या शर्यतीत पहिला आला तेव्हा मी त्याला घड्याळ दिलं. त्याच्या घोडेस्वारीचं मी कौतुक केलं त्या वेळी तिचे डोळे आनंदानं लकाकले होते. बाकी ती खदाखदा हसत असतानाही तिची विझलेली नजर कधी जिवंत वाटली नाही. अर्थात् माझ्याशी ती सौजन्याने वागायची. नव्हे कधी कधी अवास्तव वाटावं इतकी प्रेमानं वागायची. यथायथाच आर्थिक परिस्थिती असताना, मी विरोध करीत असूनही ती माझ्यावर वारेमाप खर्च करायची. कधीतरी तिच्या नजरेत कुतूहल डोकवायचं. फ्रेडरिकही माझ्या आसपास वावरायचा. माझ्या लहानसहान कृतीं-साठीही त्याच्या डोळ्यांत कृतज्ञता उमटायची. भाषेची समस्या डावलून त्याची भावना चटकन् मला कळायची. तरीही... तरीही....

क्लॉडच्या मैत्रिणींचीही थोड्याफार अंशी हीच स्थिती होती. फका फका सिगरेटी फुंकायच्या. टॅडी बेअर्स कुशीत घेऊन झोपायचं. अनेक प्राणी संभाळत, भकास नजरेनं टीव्ही बघत पोकळी भरून काढायचे निष्फळ प्रयत्न करायचे. हे सारं माझ्या आकलनश-क्तीपलीकडचं ठरायचं. वाटायचं, या इतक्या प्राण्यांची उस्तवारी यांना जमते. या प्राण्यांच्या फक्त ब्युटी पार्लरच्या खर्चात आपली कुटुंबं पोसली जातील इतका खर्च करूनही पोकळी विक्राळच ठरतेय. मग हा अट्टा हास? कशासाठी? या साऱ्याहून का नवरा नावाच्या प्राण्याशी निभवणं कठीण आहे? इतका का तो वाईट असतो? का भकास जीवन जगतात या? मनात प्रश्नांचं वारूळ फुटायचं; पण सारे प्रश्न मी गिळायची. कारण माझ्या सर्व्हेला पोषक ठरू शकेल ते करायला क्लॉड आकाश पाताळ एक करायची. माझ्यासाठी चक्क रजा घेऊन ती आठवडाभर घरी बसली होती. अनेक संस्थांना, बायकांना भेटी देणं फक्त तिच्यामुळे मला जमत होतं. असोसिएशनचे कार्यक्रम संपल्यानंतरही ती मला कुठे कुठे नेत होती. इतक्या अल्पपरिचयात कुणी माझ्यासाठी इतकं केल्याचं मला आठवत नव्हतं. म्हणूनच ती दुखावली जाईल असे

प्रश्न मी ओठांमागे ढकलायची.

मी पुस्तकं लिहिली आहेत. सदर लेखन करते- याचं तिला कोण कौतुक! या कौतुकाची झलक मला पहिल्या भेटीत दिसली होती तेव्हाच मी चक्रावले होते. हळूहळू कारण कळत गेलं तसतशी चक्रावण्याची मात्राही वाढत गेली. क्लॉडचा नवरा म्हणे प्रख्यात साप्ताहिकाचा संपादक होता. त्यानं बरीच पुस्तके लिहिली होती. नाट्यसमी-क्षेच्या त्याच्या पुस्तकाला सरकारी पुरस्कारही प्राप्त झाला होता. त्याची पुस्तके तिने मला कौतुकाने दाखविली होती. ती पुस्तकं दाखवताना ती कमालीची हळवी झाली होती. साक्षात् 'तो' हातात असावा अशा रीतीने पुस्तकांना कुरवाळणाऱ्या क्लॉडकडे मी थक्क होऊन बघत राहिले. त्याच्यासारखी मी! म्हणून माझ्यावर कौतुकाची उधळण! गंमत म्हणजे 'त्याच्या' आणि माझ्या नावावर जमा असलेल्या पुस्तकांची संख्याही सारखीच! हेही अर्थात् क्लॉडनं सांगितलं म्हणूनच मला कळलं होतं. कौतुकापाठचे कारण कळले तेव्हा बुचकळ्यात पडले.

तिचं सारं वागणंच मला चमत्कारिक वाटायचं. 'फ्रेडरिकला पुरुष औषधालाही दिसत नाही. कसं व्हायचं याचं?' म्हणत ती हळहळायची. घरात आणि शाळेत बाई! म्हणत उसासत राह्यची. त्याला केवळ पुरुष दिसावा यासाठी हॉर्स रायडिंग स्कूलमध्ये पाठवा-यची. नवऱ्याच्या कला-गुणा विषयी तिच्या मनातील आदर शब्दाशब्दांतून डोकवायचा. तो म्हणे उत्कृष्ट नटही होता. मला वाटायचं.... ही घटस्फोटिता आहे की आपल्या इकडे उघड भाषेत जिला 'टाकलेली' म्हणतो तशी आहे?

बऱ्यापैकी ओळख झाल्यानंतर एकदा मी तिला गमतीने म्हटलं 'चल! आज आपण तुझ्या घरच्या टॅडी बेअर्सची शिरगणती करू!' ती तत्परतेनं सारा संच गोळा करू लागली. वेगवेगळ्या साईजच्या मोजून बेचाळीस टॅडी बेअर्सचे ते गेट टुगेदर पाहून मला हसू आवरेना. माझ्या हसण्यात ते दोघेही सामील झाले. हळूच माझ्याजवळ बसत फ्रेडरिक म्हणाला, "आंटी, तुमचे फोटो दाखवा नं!"

"अरे कितीवेळा बघणार आहेस?"

त्याच्या गालावर टप्पल मारून त्याच्या हातात फोटोचे कव्हर देत मी विचारलं. कारण एव्हाना पंधरा-वीस वेळा तरी त्यानं फोटो बघितले होते. तरी अजून काय बघायचंय याचं मला नवल वाटत होतं. "इतकं काय बघतोस हे तू?" माझे नवल ओठी आले.

"आंटी-" फ्रेडरिक चाचरत म्हणाला, 'तुझ्या मुलांना एकाच वेळी मम्मी पप्पा दोघेही कसे? या सगळ्यांची तू कॉमन मम्मी आहेस? त्यांचे डॅडीही कॉमन आहेत?'

त्याच्या प्रश्नाचं मी फक्त मान डोलवून होकारात उत्तर दिले. त्याच्या डोळ्यांत अमाप आश्चर्य उमटलं. "असं कसं?" तो चाचरत पुटपुटला. मला उत्तर देणं जमेना. क्लॉड माझ्या मदतीस धावली. "अरे त्यात काय इतकं? आपल्या क्लेरच्या मुलांना मम्मी-पप्पा आहेतच की!"

"हो ! पण इझाबेल म्हणत होती, तिचे डॅडी हल्ली निघून जायची धमकी देऊ लागले आहेत."

फ्रेंच भाषेत काहीबाही सांगून क्लॉडनं त्याला वाटेला लावलं. विवश स्वरात ती म्हणाली, "त्याला त्याचे डॅडी फार हवेत गं ! पण मी कुठून देऊ सांग !" यापूर्वी क्लॉडचा सूर कधी इतका हळवा लागला नव्हता. कुणी कधी लागट बोललं तर ती वाघिणीसारखी चवताळायची हेच मी बघितलं होतं. भांडकुदळ क्लॉडचा फक्त 'त्याच्या' विषयी बोलताना स्वर किंचित थरथरल्यासारखा वाटायचा. तरी तो आजच्या इतका हळवा कधी वाटला नव्हता. तशी जवळीकही साधली गेली होती म्हणून मी न राहवून विचारून बसले. . "इतक्या सगळ्या प्राण्यांशी जुळवून घेण्यापेक्षा...."

आणि ती 'हॉरीबल' विशेषण ओढवून घेतलेली स्त्री अक्षरश: मोडून पडली. इतकी हमसाहमशी रडू लागली, की वाटलं ही खरंच 'टाकलेली' असावी. उगीच दुखवलं तिला. पण असं वाटत असूनही जाणवत होतं, रडणं ही तिची मानसिक गरज आहे. तिनं मुक्त मनाने रडायलाच हवंय. मनात दडलेली काऊन्सेलर स्वत:च्याही नकळत कामाला लागली. आणि 'त्या' रात्री तिनं माझ्या जवळ मन मोकळं केलं. तिच्या चमत्कारिकपणाचं, विचित्र वागणुकीपाठचं कारण गवसलं. त्या हॉरीबल वूमन मागे दडलेली नव्हे दडपलेली कमालीची संवेदनाक्षम स्त्री नजरेस पडली. आणि मनात अपार व्यथा दाटली. तिच्या उद्ध्वस्त संसाराची कथा व्यथा काहीशी अशी होती.

'तो' उत्तम नट होता. आपल्याकडे ले. दि. प्र.भू' सारखी चौफेर व्यक्तिमत्त्वं असतात तसा ! लेखन, दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिकेलाही समर्थपणे न्याय देऊ शकणारा कलंदर ! त्याची आईही म्हणे स्टेज आर्टिस्ट होती. क्लॉड कलावती नसतानाही एका हळव्या क्षणी हा तिच्या प्रेमात पडला. सहा वर्षांनी लहान असूनही मुळी लग्नासाठी हटूनच बसला. त्याच्या आईला हा संबंध मंजूर नव्हता.

"म्हणजे काय ? इथेही मोठी माणसे लग्नाला विरोध-बिरोध करतात ?" माझ्या प्रश्नात ठासून आश्चर्य !

"खेड्यात विरोधच काय ? छळही करतात." तिचं कडवट उत्तर !

इथेही सासूचा छळ वगैरे प्रकरण असतं हे मला नव्यानंच कळत होतं. तरीही लग्नाला तीन-साडेतीन वर्षं होईतो सारं नीट चाललं होतं. हिला वाटलं, कधी भांड्याला भांडं लागलं तरी आता गाडी रूळाला लागली आहे. म्हणून हिने आई होण्याची हौस भागवून घ्यायचं ठरवलं. फ्रेडरिकचा जन्म झाला आणि हा जसा बदललाच. रात्र रात्र घरीच येईना. त्यात पुन्हा आईची फूस ! तिच्या राजबिंड्या मुलाला शोभेल अशी सून नाहीच हा तिचा खुलेआम आरोप ! त्याच्या वरच्या प्रेमामुळे त्याचा बाहेरख्यालीपणाही चालवून घ्यायला क्लॉड तयार असूनही सासूने घर मोडण्यासाठी कंबरच कसली. हे सांगत असताना क्लॉड व्यथित स्वरात म्हणाली, "घर मोडणं इथे नवलाचं नाही गं ! घटस्फोट इथे सर्रास दिले- घेतले जातात. पण पुढे जीवनावरची आसक्तीच नष्ट व्हावी असंच

सारं घडत गेलं.'' गळ्यात दाटलेला आवंढा गिळायला तिला फार जड जात असावं.

''असं काय घडलं गं ?'' तिची काळजाला हात घालणारी मुद्रा पाहून माझाही आवाज थरथरला.

''तो मला सोडून गेला. त्याची गणना गावातील मोजक्या श्रीमंतांत होत होती. माझ्या फ्रेडरिकचे मात्र हाल होत हाते. मला हे सहन होईना. मी 'ॲलोकेसियाल फॅमिलीयाल'कडे धाव घेतली. तुला ठाऊकच आहे की, सरकार तर्फे ही संस्था परित्यक्ता आणि त्यांच्या मुलांच्या अधिकारांचं रक्षण करते; त्यांच्या मदतीने मी त्याला कोर्टात खेचले. निवाड्या-नुसार त्याने त्याला एकरकमी पोटगी द्यावी किंवा फ्रेडरिक सोळा वर्षाचा होईतो दरमहा अमुक रक्कम सुचवावी असं नक्की झालं. त्यानं दुसरा पर्याय स्वीकारला.

''कोर्टाने त्याला आठवड्यातून एक दिवस फ्रेडरिकला भेटायचीही सूट दिली होती. तसा तो दर शुक्रवारी यायचा. त्या दिवशी मी त्याच्या आवडीचं रांधून त्याला आवडणारे कपडे घालून त्याची वाट बघायची. तो माझ्याकडे ढुंकूनही बघत नसे तरीही! पुढे या भेटी अनियमित होत गेल्या. तरी तो पैसे देत होता. दोन-अडीच वर्षं बरी गेली. पण... पुढे पैसेही तो सेक्रेटरीच्या हाती पाठवू लागला. त्यातही नियमितता नव्हती. रक्कमही कमी असे. चार-सहा महिन्यांत हेसुद्धा संपलं.

''त्याची लफडी, त्याचे ड्रिंक्स वगैरेचे शौक साऱ्याच्या चित्तरकथा गॉसिप मॅगेझि-न्समधून कळत इतकंच. बाकी वर्षभरात त्याचं दर्शन नव्हतं की त्याच्याकडून छदामही फ्रेडरिकला मिळाला नव्हता. त्याचे हाल माझ्यानं बघवेनात. याचे सारे छंदफंद निभतात आणि माझ्या लेकराची मात्र आबाळ! तुला खरं सांगते स्मिता आजवर तू त्याचं केलंस तितकंही कौतुक कुणी केलेलं नाही. मला काही करावंसं वाटलं तरी माझा हात नेहमी दगडाखाली! म्हणून मी चिरडीस येत पुन्हा ॲलोकेसियाल फॅमिलियालकडे धाव घेतली. कोर्टाने त्याला जबरदस्त दंड फरमावला. तो भरण्याचं सामर्थ्य त्याच्या खिशात खरंच उरलं नसेल असं मला वाटलं नाही. यात माझं काय चुकलं सांग! त्याने दंड भरला नाही म्हणून कोर्टानं त्याला तुरुंगात डांबलं-''

''मग बरंच झालं की! तुझ्या मुलाच्या हक्काचा प्रश्न होता. कॅश नसेल तर दंड वसूल करण्याचे मार्ग कोर्टाकडे असतात. कोर्टाने त्याला रक्कम द्यायला भाग पाडायलाच हवे. स्वत:च्या मुलाचे हित बघण्यात चूक कसली ?''

''तुलाही तसं वाटतं नं स्मिता ?''

बुडत्यानं काडीचा आधार शोधावा तशी ती आसावल्या स्वरात म्हणाली, ''त्याची आई तुटून पडली माझ्यावर! माझ्या मुलाचा सत्यानाश केलास म्हणत धावून आली ती!''

''ते कशाला मनावर घ्यायचं? कोर्टाने दंड वसूल करून त्याला अद्दल घडवली हे महत्त्वाचं! सासूकडे दुर्लक्ष करायचंस!'' माझं उतावळं मत! ''फ्रेडरिकचं हित महत्त्वाचं!''

"नाही गं! यात कुणाचेही हित साधले गेले नाही. त्याचे तर सारे संपलेच. मीही कोसळले! फ्रेडरिक स्वत:च्या पायावर उभा राहीतो जगायचं इतकंच! बाकी.." तिला हुंदका आवरेना.

मी बुचकळ्यात पडले. ॲलोकेसियाल फॅमिलीयालचा मी क्लॉडच्या मदतीने सखोल अभ्यास केला होता. फ्रेडरिकचं हित विचारात घेऊनच संस्थेनं पावले उचलली असतील या विषयी मनात खात्री होती. तो 'मेला' असेल असंही वाटत नव्हतं. कारण फ्रेडरिकच्या बोलण्यात आपण अधून मधून डॅडीला भेटायला जातो असं आलं होतं. मग... पण एक शब्दही बोलल्याविना क्लॉड धो धो रडत होती. जीवनावरची वासना उडालेली, स्वत:च्या भावना दडपून जगत आलेली क्लॉड रडली तर तिला बरं वाटेल असं मनात दडलेल्या काऊन्सेलरला मनापासून वाटलं. नकळत मी कामाला लागले. माझा आश्वासक हात तिच्या पाठीवर पडला मात्र... माझ्या मिठीत पुन्हा क्लॉडच्या अश्रूंना उधाण आलं. काहीही न बोलता मी तिच्या पाठीवर हात फिरवीत पुराचे पाणी वाहून जाण्याची वाट बघत राहिले.

"तुरुंगात जावं लागलं हा धक्का तो पचवू शकला नाही." संयमाने डोळे पुसून क्लॉड पुन्हा बोलू लागली "दारू आणि बायांनी त्यांच्या खिशाची आणि शरीराची पुरती वाट लावली होती. हे मला खरंच ठाऊक नव्हतं. पाचव्या दिवशी कोर्टातून फर्मान आलं- गव्हर्मेंट त्याला काम देईल. त्यातून परस्पर फ्रेडरिकचं हित बघितले जाईल. अथवा त्याने त्याच्या पुस्तकांची रॉयल्टी फ्रेडरिकच्या नावाने लिहून द्यावी...."

"बरंच झालं की! मग तू का उगीच हळवी होतेस?" माझा उतावळा प्रश्न!

"नाही गं!-" पुन्हा तिला रडू आवरेना. अडखळत्या स्वरात ती म्हणाली, "यात कुणाचंही बरं झालं नाही. या धक्क्यानं त्याचा समतोल संपूर्णपणे ढासळला. तो ठार वेडा झाला."

"माय गॉड! मग- ?"

"मग काय? त्याच्या व्यथा वेदना तिथेच संपल्या; पण माझ्या नशिबी लाजिरवाणं जिणं जगणं उरलं. नवऱ्याला वेड लावणारी भांडकुदळ बाई म्हणून लोक माझ्याकडे बघू लागले. रॉयल्टी पेपर्सवर सही होण्यापूर्वीच हे घडलं. त्यामुळे आर्थिक चणचण जन्माची पाठी लागली. त्याचा सारा मालमलिदा चरतेय सासू! तरी त्याला मेडिकल ट्रीटमेंट मात्र देत नाही. फार हाल होतात ग त्याचे! आठवडा आठवडा शरीराला पाण्याचा स्पर्शही नसतो. दिवसच्या दिवस शून्यात नजर लावून हा उपाशी राहतो. डोकं म्हणजे उवांचं घर! पण त्याच्या आईला काही वाटत नाही. मी कधीतरी जाते त्याला स्वच्छ करते. नवा कपडा नेते. तेव्हाही ती कटकट करीत असते... वाटोळं करून वर मानभावीपणा करायला येत जाऊ नकोस असं म्हणते. तरी मी जाते गं! फ्रेडरिकला कधीतरी बाप दिसायला हवा न? पण परतते तेव्हा आंबून जाते. वाटतं, आपणही अंघोळ करू नये. जेवणावरची तर वासना उडूनच जाते गं! काही करावंसं वाटत नाही. खरं सांगायचं

तर जगावंसंही वाटत नाही. पण हा फ्रेडरिक आहे नं...''

बोलून बोलून थकलेल्या क्लॉडनं लोडावर मान टाकली. तिच्या मिटल्या डोळ्यांकडे बघताना जाणवलं थकली असली तरी आज तणावमुक्त वाटतेय ही! इतक्यात डोळे उघडून तिने अत्यंत विसंगत प्रश्न टाकला. ''तुमचं ज्योतिषशास्त्र काय परफेक्ट आहे गं स्मिता! तुला कळतं का त्यातलं काही?''

तिला काय म्हणायचंय ते मला कळेना. तीच पुढे म्हणाली, ''अग या न्यू इयर डेच्या सेलिब्रेशनसाठी मी पॅरिसला गेले होते. तिथे एक भारतीय माणूस भेटला. माझा हात बघून तो म्हणाला, 'चार-सहा महिन्यांत तुझ्याकडे एक भारतीय पाहुणी येईल. तुझ्या काळजात सलणारा काटा ती हळुवार हातानं दूर करील. तुला नवी शक्ती देईल.' आणि स्मिता त्याप्रमाणे खरंच तू आलीस. तुझ्या सहवासात फार बरं वाटतं मला. तरी मला एक सांग - इतर सर्वांप्रमाणे तुलाही वाटतं का? मी त्याला तुरुंगात डांबलं नसतं तर तो वेडा झाला नसता?''

क्लॉडचा प्रश्न काळजात कळ उठविणारा होता. इथल्याही अनेक कलंदरांच्या जीवनाचे चढते आलेख आणि नंतर करुण व्यसनाधीन अंत आठवले. वाटलं, आपल्या देशातलीच वाटतेय ही! यात नवं काय दिसलं आपल्याला? खरंच आपल्याला नवं वाटावं असं काहीच नव्हतं. नवं होतं ते या फुलपाखरी वृत्तीच्या देशात क्लॉडचं कासावीस होणं. आपल्यामुळे 'त्याचं' वाटोळं झालं का? हा प्रश्न विचारीत मन नावाचा पोलिस तिची पाठ पुरवतोय ते! माझ्या भेटीला ती वेडी कुण्या एका कुडबुड्या ज्योतिष्याच्या ज्ञानाची पावती समजत होती. पण स्वत:बद्दल अवास्तव कल्पना माझ्या मनात नव्हत्या. तिला शक्ती देणं माझ्या सामर्थ्यापलीकडचं होतं. तरीही वाटलं...

अलिप्तवाद हाच जीवनमंत्र असलेल्या देशात मनातील व्यथा दडवून जगत आलीय ही! फ्रस्ट्रेशन झाकायच्या प्रयत्नांत उगीच दयनीय ठरत आली आहे बिचारी! हॉरीबल विशेषण दयनीय ठरण्यापेक्षा अधिक पसंत केलंय तिनं! पण त्यामुळे काय मनावरच ओझं नष्ट होतं? तिचे दु:ख दूर करणे मला शक्य नसले तरी माझ्याशी केलेली मनमोकळी बातचीत तिच्या मनावरचं ओझं नक्की उतरवू शकणार होती. मी विचारांच्या भोवऱ्यात भोवंडत असताना क्लॉडनं पुन्हा आसावल्या स्वरात विचारलं... ''सांग नं? माझ्यामुळेच तो वेडा झाला असं तुलाही वाटतं का? मी त्याला कोर्टात न खेचते तर....''

त्याच्या पायात बेड्या पडल्या नसत्या तर तो वेडा झाला नसता असं मलाही वाटत होतं. तरी अपराधाच्या जाणिवेखाली चिरडल्या गेलेल्या क्लॉडला अगदी भुईसपाट करायचं क्रौर्य माझ्यापाशी नव्हतं. तिचा खांदा थोपटत मी सहज स्वरात म्हटलं, ''छे ग! कदाचित तो मुळात मनाने दुबळा असेल. नियतीने त्याच्या नशिबी हे भोग लिहिले असले तर तू तरी काय करणार? कलाकार लोक मनस्वी असतात. अगं आमच्या तिकडेही उमेदवारीच्या काळात हे लोक पत्नी कलावती आहे की नाही, कलेची कदर करणं तिला जमेल की नाही याचा विचार नाही करत, मग निराशा दारूत बुडवण्याचे

निष्फळ प्रयत्न करतात. अग आमच्या तिकडे पत्नी तू झालीस तितकी कठोर होत नसते; तरीही कलाकार पतीचा या ना त्या अर्थाने समतोल ढळत असतोच. कलाकारांच्या जीवनाचे करुण अंत आमच्या तिकडेही नजरेस पडतात. तू उगीच अपराधी भावनेचं कुबड बाळगतेस त्या ओझ्याखाली स्वत:ला आणि अप्रत्यक्षपणे फ्रेडरिकलाही चिरडून टाकतेस. त्याचं आयुष्य व्यवस्थित घडवायचं काम फक्त तुझं आहे हे कळत असूनही का उदासपणे जीवनाला सामोरी जातेस? तुझ्या अशा वागण्यामुळे तो निराशावादी बनला, सॅडीस्ट झाला तर हा मात्र तुझाच अपराध ठरेल. कलाकार लोकांच्या स्वभावातील मनस्वीपण कधी कधी त्यांच्या समतोल ढळण्यास कारण ठरतं हे लक्षात घे. उगीच का स्वत:ला कुरतडत जगतेस? केला नाही त्या अपराधाच्या ओझ्याखाली चिरडून घेतेस स्वत:ला! स्वत:ला आणि त्या निष्पाप लेकरालाही! त्यामुळे का त्याचा वेडा बाप माणसात येणार आहे?''

''तुला... तुला खरंच असं वाटतं नं स्मिता?''

''होय तर!'' मी डोळा वटारून खोट्या रागानं म्हटलं, ''मला खोटं बोलायची सवय आहे असं वाटतं का तुला?''

''नो स्मिता नो! यू कांट स्पीक लाईज!'' (नाही स्मिता, तुला खोटं बोलता येतच नसणार) क्लॉडच्या रडव्या डोळ्यात हसू प्रगटलं. त्या सफरचंदी गालावर अजूनही असलेले आसू मला दवांत नाहणाऱ्या गुलाबाची आठवण करून देत होते. आवेगाने मला बिलगून माझं चुंबन घेत ती तणावमुक्त हसली. आणि माझा खोटेपणा मला मनापासून भावला.

'त्या' रात्री दिसलेला तिचा नॉर्मल चेहरा मला आजही आठवतोय. त्या मानसिक बोजाखाली दबलेली क्लॉड मला कमालीची भारतीय वाटली होती. तीच का? फ्रान्समधली खेडीसुद्धा! उगाचच दुसऱ्याला बोचकारून विकृत आनंद मिळवणारी! विघ्नसंतोषी! छळवादाला सुख समजणारी!!

त्या कुणा एका ज्योतिष्याचं भाकीत खरं ठरविण्यासाठी नव्हे तर माणुसकीचं नातं जपण्यासाठी मी माझं मत ओठी आणलं नाही 'यू कांट स्पीक लाईज' हे क्लॉडचं मत खरंच असलं - सहसा खोटं बोलत नसले तरी स्वत:ला श्रीमती सत्यवादीही म्हणवीत नाही. सत्याचे अमानुष प्रयोग करण्यापेक्षा मला खोटं बोलणं कधी कधी अधिक योग्य वाटतं. यालाच कदाचित तिकडचे लोक 'हिपोक्रसी' म्हणत असावेत. तरीही क्लॉडच्या चेहऱ्यावर उमटलेलं समाधान पाहून माझं ढोंग मला पाप वाटलं नाही. माझ्या उत्तरानं प्रसन्न झालेले तिचे डोळे आणि कधी नव्हे ते आई प्रसन्नपणे हसतेय ते पाहून आनंदलेला फ्रेडरिक आजही माझ्या डोळ्यांसमोरून हालत नाही. क्लॉडच्या जीवनरणांत ओॲसिस निर्माण करू शकणारं माझं असत्य वचन मला मनापासून शिव आणि सुंदरही वाटलं.

◆◆

# ५ / चकवा

'आज असोसिएशनचा कार्यक्रम संपला की, मंडळी आपण क्लेरकडे कॉफीपानासाठी जाणार आहोत.' क्लॉडनं सकाळी चहाच्या टेबलवर जाहीर केलं. सकाळी नऊ वाजता असोसिएशनचे कार्यक्रम सुरू होत. ते संपेतो साडेपाच-सहा वाजत. त्यानंतर क्लॉड माझ्यासाठी आणि इतर होस्ट मंडळींनी त्यांच्या गेस्टच्या व्यक्तिगत आवडी-निवडींना प्राधान्य देऊन छोट्या-मोठ्या कार्यक्रमांची योजना केलेली असे. जो कार्यक्रम असे त्याविषयी क्लॉड मला सकाळी चहाच्या टेबलवर कल्पना देई. कुणाला भेटायचंय याची मला कल्पना असली तर मी प्रश्नांची आखणी करू शकेन या उद्देशानं जमेल तशी विस्तृत माहिती देण्याचा तिचा प्रयत्न असे.

त्याच हेतूनं क्लॉड सकाळीच मला क्लेरविषयी सांगत होती. क्लेर युनियन लॉयर आहे. लेबर प्रॉब्लेम्स सोडवण्यात तिचा हातखंडा आहे. मॅनेजमेंट आणि कामगार उभयपक्षांना राजी करण्याचं कौशल्य तिच्या जवळ आहे. कामगारांचं शोषण टाळून मॅनेजमेंटच्या फायद्याचं प्रमाणही संभाळणं तिला छान जमतं. संतुलित वाटाघाटींसाठी ती प्रसिद्ध आहे. म्हणूनच तिला पॅरिस, एव्ह्युर, मार्सालीस, लुव्रसारख्या ठिकाणीही खास पाचारण करण्यात येतं. तुझ्या दृष्टिकोणातून विचार करता अजूनही एक मुद्दा महत्त्वाचा आहे.

"काही विशेष ? क्लेर बहुरंगी प्रतिभा असणारी सर्वगुणसंपन्न स्त्री आहे का ?"

"तू ज्या अर्थानं सर्वगुणसंपन्न म्हणतेस तसं कदाचित् नसेल. पण आमच्या मते तिच्या करियरपेक्षा तिचं अभंग लग्नजीवन हेवा करण्याजोगं आहे. तिच्या करियरच्या यशाच्या मुगुटात ते अनोख्या तुऱ्यासारखं शोभतं. अठरा वर्षं झाली त्यांच्या लग्नाला तरी काल लग्न झालं असावं असं गुटरगू चालतं त्यांचं! चार्ल्सचं फार प्रेम आहे क्लेरवर! त्यांचा प्रणय इथे आयफेल टॉवरपेक्षा अधिक आश्चर्यजनक घटना समजण्यात येते."

"अरे वा! छान!" मी आनंद व्यक्त केला.

"फ्रान्समध्ये आल्यापासून एकही अभंग कुटुंब बघायला मिळालं नाही ही रुखरुख आहे तुझ्या मनात! मला ठाऊक आहे. म्हणून म्हटलं, तुझ्यालेखी क्लेर विशेष महत्त्वाची व्यक्ती ठरेल. या भेटीसाठी क्लेर विशेष आतुर नव्हती. तरी मी आग्रहानं ही मुलाखत जुळवून आणलीय. खास तुझ्यासाठी."

"मेर्सि! मेर्सि बोकू !!" म्हणत मी उठले. असोसिएशनच्या कार्यक्रमासाठी वेळेवर पोहोचणं भाग होतं. मी आणि क्लॉड आपापल्या कामाला लागलो.

संध्याकाळी क्लेरकडे पोहोचलो ती सुरेख सनी संध्याकाळ होती. आपल्याकडे घड्याळात न बघताही आपण वेळेचा अंदाज करू शकतो. साधारण किती वाजले असतील ते कळतं आपल्याला. पण इथे सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्र अशा चार भागांत दिवस विभागता येत नाही. उजाडलं की दिवस आणि अंधारलं की रात्र! बस! मे महिन्यात सकाळी सातपासून रात्री आठ-नऊपर्यंतही उजेड असतो. सारखाच! उन्हाची तीव्रता कमी-जास्त होत नाही. क्षणार्धात सूर्यास्त होतो. रात्र आणि दिवस यात संध्याकाळ नसतेच. का तर सूर्यप्रकाश असतो किंवा वादळी हवा असते. सूर्यप्रकाश असेल तेव्हा वातावरण प्रसन्न असतं. पण वादळी हवा गुदमर दाटवते. त्या दिवशी हवा छान होती. माझं स्वागत करताना क्लेरनं छान वातावरणाचा उल्लेख केला.

"मादाम स्पिंडलर क्लॉडनं सांगितलं होतं....स्मिता सूर्याच्या देशातून आलीय. येताना सूर्य आणलाय तिनं! खरंच तू आल्यापासून छान वातावरण आहे."

मी माफक हसण्याचा उपचार पाळला. क्लेर अत्यंत सुंदर स्त्री होती. तिचा उंच सडसडीत बांधा विलक्षण मोहक होता. पाश्चिमात्य लोकांच्या गोरेपणात क्वचितच आढळणारं गुलाबीपण तिला लाभलं होतं. नाजूक सुरेख क्लेर पारिजातकाच्या फुलासारखी लोभस आणि टवटवीत दिसत होती. तिची बोलण्याची शैली अत्यंत प्रभावी होती. तिचं ज्ञान आणि कौशल्य सहज जाणवावं अशी! मुलांशी तिचं वर्तन सौहार्दपूर्ण होतं. पण...पण मुलांच्या वागण्यात ताळतंत्र दिसत नव्हतं. इझाबेलच्या चेहऱ्यावर तिरस्कार दिसत होता. मुलाचं वर्तनही उद्धट आणि तुसडंच वाटत होतं. कदाचित क्लेरची मुलं 'टीन एज कॉम्प्लेक्स' ची शिकार असावीत. इझाबेल कुठेतरी जायला तयार झालेली होती. 'हाय हॅलोचा' उपचार संपवून तिनं निरोप घेतला. मुलाची बेचैन अवस्थाही लपत नव्हती.

फोन खणखणला. क्लेर फोनकडे धावली. कुणी कामगार नेता बातचीत करीत होता. क्लेर फोनवर बोलत होती तोवर क्लॉड मला क्लेरच्या सुखी संसाराविषयी काही बाही सांगत होती.

'चार्ल्स इलेक्ट्रिकल इंजिनिअर आहे. त्याच्या क्षेत्रात यशस्वी आहे. त्याला क्लेर भारी आवडते. एक क्षण तिच्याशिवाय चालत नाही त्याला. ती नसली की विलक्षण बेचैन असतो तो...क्लेरचं वेड आहे त्याला!...'

क्लॉड थांबतच नव्हती. मला वैताग येत होता. पण क्लॉडचं दांपत्य जीवन नासलं होतं. तिच्या मनात अभंग संसाराचं अप्रूप असणं स्वाभाविक होतं म्हणून वैताग दडवून मी ऐकत होते. तरीही माझी नजर आसपास भिरभिरत होती. तिच्या उद्धट मुलाच्या खटपटी चालूच होत्या. खुद्द नाजूक साजूक क्लेरही मला स्वस्थ वाटत नव्हती. तिच्या करियरविषयी संदेह उत्पन्न होत नव्हता. तिचे डोळे विलक्षण तेजस्वी दिसत होते. पण

ती यशस्वी गृहिणी आहे हे स्वीकारायला मन तयार नव्हतं. अर्थात् या वाटण्यामागे सघन कारणाचं अधिष्ठान नव्हतं. कदाचित् धूम्रपानाची मनात विलक्षण नावड आहे आणि ती चेन स्मोकर असल्यामुळे उगीच असा पूर्वग्रह होत असावासं वाटलं. म्हणून मी स्वत:लाच झापलं. 'यांच्या देशात धूम्रपान नवलाईचं नाहीय. उगीच फालतू गोष्टींना मोठं स्वरूप देऊ नकोस. कधी नव्हे ते सुखी कुटुंब बघायची संधी लाभतेय. विनाकारण पूर्वग्रह बांधून गैरसमज करवून घेऊ नकोस.'

तरीही... तरीही मनाचा कोपरा स्वत:चं सोडत नव्हता. सुरेख कोरीव काम केलेलं लाकूड आणि वाळवीनं पोखरलेल्या लाकडाची आठवण करून देत होता. पोखरलेलं लाकूड उत्कृष्ट कारागिरीचा नमुना ठरत नाही तसा हिचा संसार हेवा करण्याजोगा किंवा आदर्श वाटण्याजोगा नाही; असं वारंवार वाटत होतं. अर्थात या वाटण्याला तार्किक धोरणाच्या कसोटीचं पाठबळ नव्हतं. माझ्या तर्काला पुष्टी मिळावी असं काही घडलं नव्हतं. कॉफीपानासारख्या कमी वेळात संपू शकणाऱ्या कार्यक्रमात काही घडायला अवधीच मिळणार नव्हता. तरीही मनात अस्वस्थतेचं प्राबल्य वाढत होतं.

"मला वाटतं आपण सुरुवात करावी." फोन संपवून क्लेर म्हणाली, "कदाचित चार्ल्सला उशीर होणार असेल." अभिप्राय मागत असल्यागत तिनं क्लॉडकडे बघितलं.

"तुला योग्य वाटेल तसं करू." डोळे नाचवत क्लॉड म्हणाली, "तुझा मोलाचा नवरा आमच्या नजरेस नसेल पडू द्यायचा तर आमचा आग्रह नाही."

ती खळखळून हसली. क्लेरनं डोळे वटारून लटका राग प्रदर्शित केला. फ्रेंच पद्धतीचं ते लाजणं असावं. क्लेरनं कॉफी आणि नाष्ट्याची व्यवस्था केली. सतत तिच्या तोंडात सिगरेट होती. हसताना, बोलत असतानाही स्मोकिंग चालू असल्यामुळे तिचं बोलणं अस्पष्ट असे. आधीच तिचं इंग्रजी आणि माझं फ्रेंच भयानक असल्यामुळे कळून घेणं अवघड होतं. बोबडे बोल समजून घेण्यात माझी दमछाक होत होती. दोन-तीनदा परत परत विचारल्यावरही धडपणे कळलंय अशी खात्री वाटत नव्हती.

आम्ही सुरुवात करतो न करतो तोच चार्ल्स आला. तो खूप जाडा, ठेंगणा आणि टकल्या होता. तो कुठूनसा चिडून आला असावा. रस्त्यात त्याच्या इझाबेलशी सामना झाला होता. तो तिला फरफटत घरी घेऊन आला होता. म्हणून तीही गुरगुरत होती. क्लेर त्या दोघांना रिझवण्याचा प्रयत्न करीत होती. पण चार्ल्सचा तिरसटपणा कमी होत नव्हता. लोकभाषेचे अस्सल कंगोरे असणारं त्यांचे हेल काढून चाललेलं संभाषण मला जराही कळत नसलं तरी या आपल्या- तुपल्या गप्पा नसून कुरबूर आहे याची जाणीव नक्कीच होत होती. चार्ल्सचा संताप त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. टिपेस पोहोचणारा त्याचा स्वर सूचक वाटत होता. तो आणि इझाबेल दोघांच्या कचाट्यात क्लेर भरडली जात होती. वातावरणात असह्य तणाव होता. क्लेरच्या चेहऱ्यावर ओशाळा खजिल भाव फार केविलवाणा दिसत होता.

अचानक पाहुणचाराची आठवण होऊन क्लेर भराभर आमच्या प्लेटमध्ये काहीबाही

वाढू लागली. पण अशा वातावरणात खाणं दूर... पाण्याचा घोटही घशाखाली उतरवायला प्रयास पडत होते. आता इथे थांबण्यात अर्थ नाहीसं वाटून मी भूक नसल्याचं सांगून दिलगिरी व्यक्त केली. क्लॉडकडे बघून 'आता निघू' असं आग्रहपूर्वक सुचवलं.

"हे काय ? माझ्याशी अजून बोललाच नाही तुम्ही" चार्ल्स कृत्रिम खेदानं म्हणाला. मिशीत हसत त्यानं विचारलं, "माझी बोलण्याची पद्धत आवडली नाही" म्हणून तर जात नाहीयं नं ? तसं असेल तर सांगतो, आमच्या बोलण्याचा तुमच्याशी संबंध नाहीयं. आमचं हे रोजचं 'जुगलगान' आहे. भारतीयांसारखी फ्रेंच स्त्री शोषण न बोलता स्वीकारत नाही म्हणून. खरं नं डार्लिंग ?"

प्रश्न अर्थात् क्लेरसाठी होता. ती कसंनुसं हसली. नेमकी त्याच वेळी माझी नजर तिच्या मुलीक्डे वळली. तिच्या संतापल्या नजरेत विखार मावत नव्हता. मला आश्चर्य वाटलं. इतक्या थोड्या वेळात तिरस्कारापाठचं रहस्य कळू शकणार नव्हतं. आम्हाला अजून एका ठिकाणी जायचंय. उशीर होईल असं कारण समोर धरून आम्ही उठलो. आम्हाला थांबणं जमण्यातलं नाही हे कळल्यावर चार्ल्सनं औपचारिक खेद प्रगट केला. भारतीयांविषयी काहीही माहिती नसताना त्यांच्याविषयी तोंडाला येईल ते बरळणारा चार्ल्स ! दुसऱ्यांची मनं संभाळण्यासाठी आपण गिळलेले मूग ह्यांच्या लेखी हिपोक्रसी ठरतात तर मग नको असलेले पाहुणे उठल्यावर यांच्या खेद व्यक्त करण्याच्या उपचाराला मॅनर्स का म्हणायचं ? मी मनात तणतणत होते. चार्ल्सचं अघळपघळ बोलणं चालूच होतं. मनात किळस दाटत होती. नापसंती दडवणं मला जमेना.

"खरंच भारतीयांविषयी मनात कुतूहल असलं तर अवश्य आमच्या देशात या. शोषण आणि ढोंग या शब्दांचे संदर्भ आणि मॅनर्स पाठची तुमची हिपोक्रसी उघड अर्थानं जाणवेल. ऐकलेल्या चित्तरकथांत मीठ मसाला घालण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव घ्या. म्हणजे आदरातिथ्याची संकल्पनाही स्पष्ट होईल. निदान तेव्हढ्यासाठी तरी अवश्य या." गाडीचं दार जरा जोरातच बंद झालं. मी किंचित खजिल झाले.

क्लॉडच्या मनात चार्ल्स विषयी निरतिशय आदर होता. माझा कडवट सूर तिला बोचला असावा. खुलासा देण्यासाठी ती किंचित हसली. चार्ल्सकडे बघून म्हणाली, "ती इथे थांबत नाहीय हे आवडलंय तुला ! मला ठाऊक आहे, तू क्लेरला कुणाशी शेअर नाही करू शकत."

"यू आर व्हेरी थ्रुड !" चार्ल्स खळखळून हसला. हसताना त्याचं थुलथुलीत पोट कुरूप रीतीनं हलत होतं. माझ्या गळ्यात उमासा दाटला. मी नजर फिरवली ती परत नेमकी इझाबेलचंच दर्शन घडवणाऱ्या बाजूला वळली. तिच्या चेहेऱ्यावरच्या तंग रेषा मला बुचकळ्यात पाडत होत्या. मनात असीम आश्चर्य दाटत असताना क्लॉडनं गाडी सुरू केली.

"आमच्या ग्रूपमध्ये फक्त जॅकलीन आणि क्लेरच संसारसुखाचा उपभोग घेतायत." क्लॉड कौतुकानं म्हणाली, "पण जॅकलीनची तुलना क्लेरशी होऊ शकत नाही." कुठे

जॅकलीनचं अवघ्या सात वर्षांचं सहजीवन आणि कुठे क्लेरची अठरा वर्षांची अभंग यशस्वी वाटचाल. इतकी वर्षं झाली लग्नाला तरी ते एकमेकांना आसुसून भेटतात. चार्ल्स घरी आला की त्याला कुणी घरी नसणं आवडतं. क्लेरनं सतत त्याच्याभोवती रुंजी घालावी असंच वाटतं त्याला! परक्याशी काय? मुलांशी सुद्धा तो तिला शेअर करू शकत नाही. त्यांनी मुलांना जन्म दिला त्या वेळी आमच्या या खेडेगावात 'होम'ची सोय नव्हती. असती तर त्यानं मुलांना कधीच घरात ठेवलं नसतं. त्यांना 'होम' ची वाट दाखवली असती."

क्लॉडच्या शब्दांत, स्वरात क्लेरच्या संसारसुखाविषयीच्या आदराचं आणि हेव्याचं बेमालूम मिश्रण होतं. खरं म्हणजे सुखी फ्रेंच घर बघण्याची माझ्या मनात तीव्र लालसा होती. मोठ्या उत्साहानं मी बुद्धिमती, करियर करणाऱ्या स्त्रीचा सुखी संसार बघायला आले होते. पण.... सुखी संसाराच्या नावावर खपणारं घरसंसाराचं विकृत रूप नजरेस पडलं होतं. मन विलक्षण बेचैन होतं. क्लॉडच्या बडबडीत ते रमत नव्हतं. तिच्या बोलण्याकडे माझं लक्ष होतं आणि नव्हतंही! मिटकी मारीत ती म्हणाली, "सांगते काय तुला? क्लेर फार आवडते त्याला!!" "स्वाभाविक आहे! क्लेर आहेच लोभस!!" मी संमत झाल्याचं पाहून ती खुश झाली. खरं म्हणजे मला म्हणायचं होतं...'आवडेल नाहीतर काय? ही पारिजातकाचं फूल. नाजूक, सुंदर आणि हा लडदू माजलेला रेडा! राक्षस मेला! या हामणगोळ्याला सुंदर पत्नी आवडायचीच!...'

पण मनातील एकही शब्द ओठी आणायचं सामर्थ्य माझ्याजवळ नव्हतं. एक तर भिडस्त स्वभाव काही बोलू देत नव्हता. शिवाय- लडदू, माजलेला रेडा, हामणगोळा असल्या शब्दांसाठी फ्रेंच वा इंग्रजीत कुठचे प्रतिशब्द आहेत ते कुठे ठाऊक होतं मला? ठाऊक असते तरी अशी असंस्कारी भाषा मनात बोलणंही सहसा नाहीच जमत. ती तोंडानं कशी बोलणार? कदाचित पाश्चिमात्य यालाच हिपोक्रसी म्हणत असतील का? मन विचित्र प्रश्नात भिरभिरत होतं.

घरी आले तर फोन खणखणत होता. क्लेरची मुलगी सांगत होती, "घरी आल्यापासून डॅडींचं काहीतरी बिनसलं होतं, रात्री त्यांनी 'भेटण्यापूर्वी' त्याच्या नाईटसूटचं बटन तोडून आत सोडलं. मग ते जबरदस्तीनं मम्मीला भेटले. व्हजायना फाटल्यामुळे मम्मीला दवाखान्यात ठेवावं लागलं आहे."

सारं माझ्या कल्पनाशक्तीला मागे टाकणारं होतं. संसारात रमलेल्या रूपमती-बुद्धिमती पत्नीशी असा क्रूर खेळ? मनात तिरस्कार दाटत होता. वाटत होतं. वर्कर्सच्या समस्यांना हिरिरीनं वाचा फोडून न्याय मिळवून देणाऱ्या क्लेरला हे सहन व्हायचं नाही. बरी होताच ती त्याला कोर्टात खेचणार, फारकत घेणार. असं वाटत असतानाही क्लेरच्या काळजीनं मन अस्वस्थ होत होतं. कार्यक्रमापूर्वी क्लेरला भेटायला हवं या विचारात मी सकाळी लवकर खाली आले. तिच्या मुलीशीही दोन शब्द बोलावेसे वाटले. फोन जोडून विचारलं, "मम्मी कशी आहे गं आता?" माझा कातर स्वर.

"कोण जाणे!" ती निरीच्छ स्वरात म्हणाली. संध्याकाळी तिची 'डेट' होती. उद्या कदाचित ती तब्येत बघायला जाणार होती. ते न जमलं तरी बिघडत नव्हतं. परवापर्यंत क्लेरला डिस्चार्ज मिळणार होता. बापाच्या क्रूर वर्तनाची तिला सवय असावी. आईचा बोटचेपेपणा तिला मंजूर नव्हता. त्या दोघांच्या वर्तनावर प्रच्छन्न टीका करण्याइतकी ती मोठी सडेतोड होती. तिरस्कारानं ती म्हणाली, "आता महिनाभर तरी ते लांगूलचालन करतील. मम्मीही हुलारेल. माझं विचाराल तर, आय हेट देम!"

म्हणजे मी रात्रभर उगीच तळमळले होते म्हणायची. मनात येणारा हा विचार दाबून मी सकाळीच क्लेरकडे जाण्याचा आग्रह धरला. आश्चर्य म्हणजे क्लेर मजेत सिगरेट फुंकत होती. तिचा जाडगेला नवरा तिचे पाय चेपत होता. मी त्याकडे रोषानं बघताच खाली मान घालून तो निघून गेला.

"या वाघोबाची शेळी झालेली दिसते!"

क्लॉड मिस्कीलपणे म्हणाली.

"तर गं!"

क्लेर लाजऱ्या स्वरात म्हणाली,

"माझ्यावर इतकं प्रेम आहे त्याचं की कुणी डोळा वर करून माझ्याकडे बघितलं तरी खवळतो तो! त्या युनियन लिडरशी मी प्रेमानं वागते या संशयानं तोल गेला गं त्याचा! आणि असा खुळेपणा करून बसला...."

क्लेरच्या स्वरात नापसंती तर औषधालाही नव्हती. उलट त्याच्या पझेसिव्ह स्वभावाविषयी अभिमानच दिसत होता. हे काय चाललंय त्याचं आकलनच होईना. रात्रभर हिच्या काळजीनं माझा जीव कासावीस झाला होता. तळपायाची आग मस्तकाला भिडली होती. खरंच क्लेरचं वर्तन मला बुचकळ्यात पाडीत होतं.

"याचं इतकं काय वाटतंय तुला?"

तीच मला नवलानं विचारीत होती. "प्रणयांत पीडन आवश्यक अंग असतं. त्यामुळे प्रेमाची लज्जत वाढते याचा तू कधीच अनुभव घेतला नाहीस का? आता एक-दोन महिने असे सपाटून लाड करील म्हणून सांगू? ही जखम काय दोन-तीन दिवसांत भरून येईल..."

क्लेर बोलतच होती. क्लॉड काहीशा असूयेनं तिच्याकडे बघत होती. माझ्या डोक्यात भलताच गोंधळ माजला. त्या दोघी एखाद्या अजाण बालकाकडे बघावं तशा दयार्द्र दृष्टीनं माझ्याकडे बघत होत्या.

चकवा माझी पाठ सोडीत नव्हता. नवरा जरा वरच्या सुरात बोलला तरी रान उठविणाऱ्या भारतीय स्त्रिया मी बघितल्या होत्या. स्वत:ची चूक कबूल असणारे भारतीय पुरुषही पाहिले होते. तरीही तणतणणाऱ्या स्त्रिया आपल्याकडे दिसतात. असं असूनही लग्न टिकवायला भारतीय स्त्री वाटेल त्या शोषणाला सामोरी जाते असा इकडे समज! नवऱ्याचं क्रूर वर्तन 'प्रणयात पीडन' म्हणत नावाजणारी क्लेर मग काय करते म्हणायचं?

ही क्लेर जी कामगारांच्या शोषणाविरुद्ध झगडून यश खेचून आणते तीच क्लेर या भलत्या शोषणाचा स्वीकार का करते? संस्कृत भाषेत शृंगाररसाची महती गाताना प्रणयांत पीडन शृंगारातील अविभाज्य अंग म्हणून स्वीकारलं आहे. पण याचा अर्थ 'असलं' पीडन म्हणजे का शृंगार? या रासवट वर्तनाचं कौतुक का व्हावं? प्रणयाची लज्जत चाखली नाही म्हणत पुरंध्रीनं चक्क माझ्याकडे दयार्द्र नजरेनं पाहावं? याला बोटचेपेपणा म्हणावा की विकृती? लग्न टिकविण्यासाठी सारं सहन करण्याइतकं मन क्लेरजवळ असेल तर आपले अडाणी लोक जेव्हा पत्नीला मारझोड करतात, तेव्हा हे लोक का म्हणून अन्याय, शोषण... बोटचेपेपणा यांसारख्या शब्दांचं मोहोळ उठवितात? शोषणाची मात्रा भारतापेक्षा इथे खरंच कमी आहे की, फक्त शब्दबंबाळ निर्माण करून ती दडपली आहे?

खरंच चकवा पाठ सोडीत नव्हता. प्रश्नचिन्हं फेर धरून नाचत होती. त्यांची उत्तरं सापडणार नव्हती. मन मनास उमगत नाही.... हेच साऱ्या प्रश्नांचं उत्तर. मी थकून मागे डोकं टेकलं. प्रश्नांच्या भोवऱ्यात भोवंडणाऱ्या मनाला सावरणं आवश्यक होतं. क्लॉड वेगानं गाडी हाणत होती.

असोसिएशनच्या कार्यक्रमात 'विझिट टू अ होम' छापलं होतं. 'होम' शब्दाशीही मन ठेचकाळत होतं. तरीही 'होम' येईतो थोडी झोप काढावी. रात्रभर जागले होते. थकून मी डोळे मिटले.

◆ ◆

# ६ / अज्ञान ज्ञानी लोकांचं !!

सकाळी क्लेरच्या भेटीनं मला अस्वस्थ केलंच होतं. त्यानंतर घडलेल्या 'होम' च्या दर्शनानं मी सैरभैर झाले. संध्याकाळचा क्लॉडनं ठरवलेला कार्यक्रम मी रहित केला. जबरदस्त थकले होते. 'फक्त लॉंग ड्राईव्ह घेऊ म्हणजे तुला बरं वाटेल' या क्लॉडच्या सूचनेवर उत्तर देण्याचं त्राणही माझ्यात उरलं नव्हतं. तिचं मन राखायला मी होकारात मान हलवली होती इतकंच.

दिवसा भरातील क्लेशदायक आठवणी प्रयत्नपूर्वक दूर सारून मी रात्री लवकरच झोपले होते. सकाळी चहाच्या टेबलवर माझी विचारपूस करून क्लॉडनं संध्याकाळी मादाम लुट्झकडे डिनरला जायचं असल्याचं सांगितलं. मी होकारात मान डोलवली. माझा मूड परत आलेला नाहीसं वाटून वातावरणातील तणाव कमी करायला तिनं किंचित हसत विचारलं, "भावार्थ कळला ?" मी फक्त प्रश्नार्थक मुद्रेत तिच्याकडे बघितलं. त्याच्या उत्तरात तीच पुढे म्हणाली "याचा अर्थ, आज तरी तुझ्यावर माझ्या हातचे बेचव पदार्थ खाण्याचा प्रसंग नाहीयं" स्वत:च्या विनोदावर तीच खळखळून हसली.

"इतका काही तुझा स्वयंपाक वाईट नसतो." मीही हसले.

"डोंट टेल लाईज !" (खोटारडेपणा नकोय.) म्हणत डोळे वटारत कुरकुरली "कालची रात्र मी विसरले नाहीय."

तिचं म्हणणं खरं होतं आणि मीही खोटं बोलले नव्हते. क्लॉडला स्वयंपाकाची, घरकामाची हौस नव्हती. डोक्यावरचा भार खांद्यावर टाकण्याची तिची रीत होती. सारा उरकाउरकीचा प्रकार. हे खरं असलं तरी सुगरण म्हणवणाऱ्या स्त्रियांनी हौशीनं केलेले पदार्थ तरी मला कुठे आवडत होते ? त्यांचे पदार्थ भलतेच सुंदर आणि कमालीचे बेचव वाटतात आपल्याला. नेत्रसुख देणारे; पण जिभेला नाखुश करणारे पदार्थ खाऊन मी कंटाळले होते. म्हणून आदल्या दिवशी घरी आल्यावर मी स्वयंपाक करणार आहेसं मी तिला सांगितलं होतं.

पण क्लेरचं दांपत्यसुख ( ?) आणि होम बघून उत्साह ओसरला होता. उपाशी राहून परक्या परदेशात प्रकृती बिघडवून घेणं परवडणारं नव्हतं आणि बेचव पदार्थांची याद गळ्यात उमासे आणत होती. आपल्यापेक्षा त्यांच्याकडे स्वयंपाक प्रकरण कमी त्रासाचं असतं. क्लॉडच्या फ्रीजमध्ये भरपूर बटाटे आणि वाटाणे उकडून ठेवलेले होते.

जोडीला टमाटेही होते. वाटलं, झणझणीत रस्सा करावा. त्या बरोबर ब्रेड चालेल. माझ्याजवळ आपले मसाले होतेच. भूक जागृत होईल असं काही हवं होतं.

राहून राहून मला 'होम' आठवत होतं. 'होम' नाव दिलेल्या त्या प्रशस्त इमारतीत लहान-मोठी मिळून ९६ मुलं राहत होती. घराचा दर्जा प्राप्त व्हावा असं काहीच नव्हतं तिथे! अनाथ आश्रमातील मुलं पोरकी असतात. त्यांचे जन्मदाते त्यांना आश्रमाच्या दाराशी टाकून पसार झालेले असतात. खर्च कुणा दानशूर व्यक्ती करीत असते किंवा सामाजिक संस्थांनी खर्चाची जबाबदारी उचललेली असते. त्या उलट इथल्या मुलांना त्यांचे आई-बाप कोण ते ठाऊक होतं. मुलांचा खर्च त्यांचे जन्मदातेच करीत असत. म्हणून या मुलांना म्हणे अनाथ म्हणायचं नाही.

इथल्या मुलांच्या तरुण माता-पित्यांच्या मनात म्हणे क्रिएशनच्या (निर्मितीच्या) आनंदाविषयी कुतूहल असतं. कुतूहलपूर्तीसाठी ते मूल जन्माला घालतात; पण त्यांच्या अनिर्बंध जीवनात त्यांना मुलाचं संगोपन अडचणीचं वाटतं. असे जन्मदाते मुलांच्या खर्चाची जबाबदारी उचलून मुलांना 'होम' मध्ये ठेवतात. माझ्या मनात प्रश्नांचं वारूळ फुटत होतं... यापेक्षा आपली हॉस्टेल्स बरी! मुलं निदान सणावारी, व्हेकेशन्समध्ये घरी येतात. हक्कानं लाड करून घेतात. संगोपन म्हणजे काय फक्त खर्चाची जबाबदारी? अनाथालय नसलेली प्रत्येक इमारत घराचा दर्जा प्राप्त करू शकते? घर नाव दिल्यानं का वाटेल त्या इमारतीच्या भिंतीला वात्सल्य.चे धुमारे फुटतात? आपुलकीची भावना भिंतीतून झिरपू लागते? शेक्सपीयरनं 'नावात काय आहे?' म्हटलं होतं ते फार वेगळ्या अर्थानं इथे का सतावतंय आपल्याला?

मनात उठणाऱ्या प्रश्नांची उत्तरं दूर पण उलट मला क्लेरच्या प्रेमाच्या (?) संदर्भात क्लॉडनं सांगितलं होतं तेच आठवत होतं....क्लेरला मुलं झाली तेव्हा आमच्या या खेडेगावात 'होम' ची सोय नव्हती म्हणून नाहीतर....जिथे जन्मदात्यांना मुलांच्या उपस्थितीची अडचण वाटते तिथे मुलांच्या मनात जन्मदात्यांविषयी तिरस्कार असणं स्वाभाविकच नाही का? सोळा वर्षांचं वय होईतो स्वतंत्र होण्याला कायद्यानं मान्यता नाही म्हणून इझाबेल बळेच क्लेरबरोबर राहतेय. तिचा भाऊसुद्धा झटपट मोठं होता आलं तर...याच विचारात दिवस कंठतोय....वारंवार मन क्लेर आणि होमच्या संकल्पनेभोवती रुंजी घालत उदास होत होतं. साऱ्यातून मुक्त व्हायला पदर बांधून मी क्लॉडला विचारलं होतं, "तू चाखणार?"

"नाही ग बाई!" नाक उडवून ती म्हणाली, "तुमचं ते एक्झॉटिक फूड मला अजिबात खपायचं नाही. तू तुझ्या पुरतंच कर." तिनं खांदे उडवले तरी मी पुन्हा खुंटा हलवून बळकट केला.

"तुला खरंच माझी भाजी नकोय?" पुन्हा विचारून मी मूठभर वाटाणे दोन बटाटे आणि एक टमाटा फ्रीजमधून काढला. भाजी फोडणीस टाकून मी ग्रेव्ही तयार केली. झणझणीत रस्सा उकळू लागला. त्या सुगंधानं मनाची मरगळ दूर पळाली. वाटलं, वॉश

घेऊन यावं तोवर ग्रेव्हीत मसाला छान मुरेल. क्लॉडला जेवायची तयारी करायला सांगून मी बाथरूमकडे वळले.

"आंटी काय केलंयस गं तू!" नाक फेंदारून श्वास घेत फ्रेडरिक कौतुकानं म्हणाला. "नुसता सुगंध दरवळतोय."

"तू थोडं चाख म्हणजे तुला कळेल एक्झॉटिक फूड ही काय अफलातून चीज आहे ते." म्हणत मी माझ्या खोलीकडे वळले. फार दिवसांनंतर स्वत:च्या हातचं खाणार होते. त्या खुशीत कपडे बदलण्याऐवजी मी स्नान करून खाली उतरले.

"हाऊ स्वीट ऑफ यू आंटी!" म्हणत फ्रेडरिक माझ्या गळ्यात पडला. या खुशीचं मला कारण कळेना. इतक्यात चबक चबक आवाज करीत बोटं चाटत क्लॉड आली.

"ओह स्मिता! ते काय तू करून ठेवलं होतंस ते याला इतकं आवडलं म्हणून सांगू? मीही चाखलं थोडं, पण फार थोडं उरलं होतं. मी पातेलंही चाटून पुसून साफ केलं."

मी अवाक्! या स्तुतीबद्दल आभार मानायचीही शुद्ध नव्हती. माझा कसनुसा चेहरा पाहून क्लॉड म्हणाली, "काळजी करू नकोस. माझा स्वयंपाक शिल्लक आहे नं! पोट भरेल आपलं!"

'आज मला पोट भरायची नव्हे तर चवीनं जेवायची इच्छा होती.' निरर्थकपणे मान हलवीत मी मनात डाफरले.

'तरी तुला आधी विचारलं होतं. तेव्हा मारे नाक उडवून नापसंती दर्शवलीस. वर माझ्या भाजीचा चट्टामट्टा करून तुम्ही मायलेक मोकळे झालात म्हणजे काय?'

अर्थात् उघडपणे काही बोलणं मला जमणार नव्हतंच. खसकन फ्रीज उघडून मी चांगले ओंजळभर वाटाणे आणि चार बटाटे बाहेर काढले. फ्रेडरिकनं तत्परतेनं टमाटे धुतले. पुन्हा रस्सा रटरटू लागला. त्याचा झणझणीत वास दरवळू लागला आणि माझं उकळणारं मन शांत होऊ लागलं.

फ्रेडरिकनं खुशीनं डायनिंग टेबलवर बाऊल्स मांडले. मला आवडणारं योगर्ट काढून 'हे तुझ्यासाठी' म्हणत त्यानं प्रेमानं माझ्याकडे बघितलं. तिघं मजेत जेवलो. क्लॉडनं माझ्या हजेरीचा मुलाहिजा न बाळगता आवाज करून बोटं चोखली होती. मग मीच कशाला मॅनर्सची पत्रास बाळगावी? स्वत:ला प्रश्न विचारीत मी बिनधास्तपणे तृप्तीचा ढेकर दिला.

"आंटी तू रोज असा स्वादिष्ट स्वयंपाक करतेस? भलतीच सुगरण आहेस की गं!" फ्रेडरिक कौतुकला. सुगरण ही पदवी मिळवायला मला सात समुद्र पलीकडे यावं लागलं या कल्पनेनं मी मजेत हसले. आदल्या रात्रीचा प्रसंग आठवून मी पुन्हा हसले. चेष्टेच्या स्वरात मी तिला म्हटलं, "आज मादाम लूट्झकडे जेवायला जायचं नसतं तरी मी तुझ्या हातचं जेवणार नव्हतेच. आज माझा छोलेपुरी करण्याचा बेत होता."

"छोलेपुरी? व्हॉट्स दॅट?" फ्रेडरिकचा उत्सुक प्रश्न!

"ओह ! इट्स सिंपली डेलिश्यस ! इट कॅनॉट बी टोल्ड बट इज टू बी टेस्टेड अँड एंजॉई-ड !" खरंच छोलेपुरी म्हणजे काय ते कसं सांगणार होते मी ? पण माझ्या चेहेऱ्यावरून आणि आपोआप उमटलेल्या मिटकीवरून फ्रेडरिकला ते अलगद उमगलं.

"उद्या...उद्या करशील ?"

त्याच्या उत्सुक प्रश्नानं मला खूप हसवलं. रंगात येत मी क्लॉडला म्हणाले, "मादाम लूट्झ विषयी सांगणार आहेस की एक्झॉटिक फूडच्या आठवणीत फक्त मिटक्याच मार-णार आहेस ?"

"सांगते नं..." क्लॉड उत्साहानं सांगू लागली, "मादाम लूट्झ घटस्फोटित आहे. चार मुलांची माता आहे. फ्रान्समधील मोजक्या सधन कुटुंबांत तिची गणना होते. वस्तुत: दहा वर्षांचं तिचं दांपत्यजीवन दृष्ट लावण्याजोगं छान होतं. तीन मुलांनंतर थांबली असती तर घटस्फोटाचं संकट आलं नसतं. पण मुलीचा सोस होता नं ? त्या सोसानं सत्यानाशाला आमंत्रण धाडलं."

"म्हणजे आमच्या तिकडे मुलींच्या आईवर अन्याय होतो तसं हिला चौथ्या मुलाच्या जन्मामुळे झालं ?"

"नाही. चौथा मुलगाच झाला म्हणून नव्हे, पण तो मंगोल चाईल्ड असल्यामुळे मिस्टर लूट्झनं तिला टाकली. तिचं आर्थिक नुकसान होऊ दिलेलं नाही त्यांनी ! पण ते तिच्या बरोबर मात्र राहू शकत नाहीत."

मंगोल मुलाच्या जन्मासाठी मातेला गुन्हेगार समजणं योग्य नाही. हा उघड उघड अन्याय आहे असं म्हणावंसं वाटत होतं. पण उशीर होत होता. असोसिएशनच्या कार्य-क्रमांसाठी वेळेवर पोहोचणं आवश्यक होतं. म्हणून मी गप्प बसले. क्लेरच्या सुखी (?) संसाराचा तमाशा बघितला होता. दु:खी लूट्झबाईकडून मनात कसलीही अपेक्षा नव्हती. विषादपूर्ण वातावरणाचा सामना करायचा आहे यासाठी मानसिक तयारी करूनच मी तिच्याकडे गेले. तर.... वातावरण भलतंच खुश्नुमा होतं.

आमच्या गाडीची चाहूल लागताच पोक्त जोडी आमच्या स्वागतासाठी बाहेर आली. माझ्या हाताचं चुंबन घेत कॅथरीन म्हणाली, "मीट माय एक्स हजबंड मिस्टर लूट्झ !" चंदेरी केसांचे उंच बांधेसूद मिस्टर लूट्झ प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे होते. कॅथरीनशी त्यांचं वागणं अत्यंत सौजन्यपूर्ण होतं. त्यात औपचारिकतेपेक्षा सहजता अधिक होती. जे मला क्लेरच्या घरी अपेक्षित होतं ते मला डिव्होर्सी मादाम लूट्झकडे दिसत होतं. यांच्याकडे लपवाछपवीविषयी नावड दिसते; केवळ म्हणूनच हे आता 'जोडपं' नाही असं खुल्लेआम सांगितलं होतं. बाकी एकमेकांत रमलेलं, लग्नाची रजत जयंती उजवलेलं हे दृष्ट लागण्या-जोगं दांपत्य आहे असंच कुणालाही वाटलं असतं. कॅथरीन घटस्फोटित आहे हे सकाळीच क्लॉडनं सांगितलं होतं. कॅथरीननंही तिच्या पुरुषाचा परिचय करून देताना 'एक्स' हजबंड असाच उल्लेख केला होता. मि. लूट्झना चांगलं इंग्लिश येत होतं. स्वभावही अघळ पघळ बोलणाऱ्यातला ! नाहीतरी फ्रेंच माणूस ब्रिटिश माणसाइतका शिष्ट नाहीच. म्हणून मी

मोकळेपणे विचारलं, "एक दुजे के लिये असणारं सुरेख दांपत्य बघण्याचा आनंद लाभत असताना हे 'एक्स हजबंड वाईफ' आहेत याची जाणीव होते आणि मनात विषाद दाटतो. छान मुरलेलं सहजीवन जगला असालसं वाटत असतानाच तो अतीत आहे, वर्तमान नाही याची जाणीव दाहक वाटते. तुम्हाला नाही कधी वाईट वाटत ? जोडी तुटली हे सहजपणे स्वीकारलंत तुम्ही ? तरीही इथे इतक्या सहजपणे कसे वावरू शकता ? माझ्या मनात फार कुतूहल आहे. नवल वाटतंय मला तुमचं वर्तन पाहून...."

मि. लूट्झ किंचित गांगरले. तरी त्यांनी उत्तर टाळलं मात्र नाही. "कम वीथ मी..." म्हणत ते वेगानं चालू लागले. दालनामागून दालनं ओलांडून ते एका बंद दालनाशी आले. हे दालन त्यांच्या मंगोल मुलाचं होतं. मंगोल मुलांविषयी खूप वाचलं असलं तरी इतक्या जवळून कधी मंगोल मुलाला बघितलं नव्हतं चौदा-पंधरा वर्षांचा, अत्यंत विचित्र अंग-लट असणारा तो मुलगा वागण्यात दोन-तीन वर्षांच्या मुलासारखा वाटत होता. त्या निष्पाप पोराकडे पाहून पोटात तुटलं. माझ्याकडे बघून तो खदखदून हसला. माझ्या अंगा-वर शहारा आला. मी मान फिरवली. मिस्टर लूट्झ छद्मी हसले. जणू ते विचारत होते, 'का नजर फिरवलीत ?' तरी मी नेटानं बोलू लागले.

"हा तर प्रारब्धयोग! दुःखद प्रसंगात माणसं मनानं अधिक जवळ यायला हवीत. संकटांनी सुखाला ग्रहण लावण्याऐवजी सुखाला गहिरं करावं; असं का वाटलं नाही तुम्हाला ? तुम्ही कॅथरीनला धीर द्यायचा. मनोबळ पुरवायचं."

"तिला आर्थिक बळ पुरवलं मी! जमेल तसा मनोबळही पुरवतो मी. पण जिच्या गर्भाशयात 'असं' मूल वाढलं त्या कॅथरीनच्या निकट येताच मला शक्तिपात झाल्यासा-रखं वाटतं. पौरुष पार कोमेजतं माझं. माझा नाइलाज आहे." ते खेदानं म्हणाले.

"जेनेटिक्सनं सिद्ध केलंय, जीन्समधील विकृतीमुळे मंगोल मूल जन्माला येतं. मुलाच्या जनीन बंधारणात आईकडून आणि बापाकडून मिळालेल्या जीन्सचा सारखा सहभाग असतो. शिवाय विकृत जीन्स ठीक नरबीजातून आले की स्त्रीबीजातून ते खात्री-पूर्वक सांगता येत नाही आणि जीन्स गर्भाशयात तयार होत नसतात याचीही जाण तुम्हाला असेलच."

मी देत होते ती माहिती त्यांच्यासाठी नवी नाही हे त्यांच्या अस्वस्थ मुद्रेवरून स्पष्ट जाणवत होतं. कळतं पण वळत नाही अशी त्यांची गत झाली असावी. चूक पदरात घेण्यात अहं दुखावला जात असावा म्हणून जे पटत होतं ते कबूल करावंसं वाटत नव्हतं. म्हणून ते काहीशा उद्दाम बेदरकार स्वरात म्हणाले, "विकृत जीन्स कुठून आले हे ठामपणे सांगता येत नसलं तरी तर्काला नक्की स्थान आहे. या पूर्वी वा यानंतर मी मंगोल मुलाचा पिता झालो नाहीयं."

"कॅथरीनही असं म्हणू शकते की..."

"हो पण..." त्यांचा कोरडा स्वर अधिकच निर्ढावला. सहज वाटणाऱ्या कठोर स्वरात ते म्हणाले, "कॅथरीन त्यानंतर आई झालेली नाही. माझं तसं नाही. फारकतीनंतर दोन मुलं

माझ्या नावावर जमा झाली आहेत."

सौजन्यशील, संस्कारी वाटणाऱ्या लूट्झ साहेबाच्या स्वरातला दर्प मला न रुचणारा होता. जेनेटिक्स हा माझा कुतूहलाचा म्हणून आवडीचाही विषय होता. औपचारिक शिक्षण संपवल्यावरही मी मनापासून ज्ञानकण गोळा करीत असे. परीक्षेसाठी नव्हे तर कुतूहलापोटी केलेलं काम असल्यामुळे ते कधी निरर्थक वाटलं नव्हतं. तरीही वाटत होतं- आपल्याजवळ माहिती आहे त्यापेक्षा - विकसनशील देशातून येणाऱ्या व्यक्तीपेक्षा विकसित देशातील व्यक्ती अधिक जाणकार असेल. तर्कावर आधारलेली बेजबाबदार विधानं इथे ऐकू येणार नाहीत. पण...

मंगोल बालकाच्या जन्माचं खापर पत्नीच्या डोक्यावर फोडणं हा उघड उघड अन्याय आहे असं मी म्हणताच मिस्टर लूट्झच्या सौजन्याच्या धांदोट्या उडाल्या. आपल्या देशातही अशा प्रकारचा अन्याय फक्त मुलींना जन्म देणाऱ्यांवर होतोच याचा त्यांनी उल्लेख केला. मी थक्क! बहुसंख्य लोक अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत आहेत अशा देशांतील लोकांकडे बोट दाखवून हा ज्ञानी माणूस स्वत: केलेल्या अन्यायाचं समर्थन देत होता. मनात दाटणारा तिरस्कार दडवायला मला अक्षरश: प्रयत्न करावे लागले. तोल सावरत मी संयत सुरात बोलू लागले-

"अज्ञानी माणसाकडून घडलेला अन्याय चूक या सदरात खपू शकतो मिस्टर लूट्झ. पण ज्ञानी माणसानं केलेल्या अन्यायाला अपराध म्हणायला हवं असं नाही वाटत तुम्हाला? अज्ञान हेसुद्धा पांगळंच समर्थन आहे हे मी स्वीकारते. भारतीयांनी केलेल्या अन्यायाला योग्य ठरवत नाहीत मी! पण तुमचं काय? पांगळं समर्थनही देऊ शकणार नाही तुम्ही." त्यांनी अस्वस्थ मनानं खांदे उडवले. म्हणून मी हळुवार स्वरात म्हटलं, "-खरं सांगू तुम्हाला? आमच्या देशात आता बालकाचं सेक्स पुरुषबीज नक्की करतं हा विचार शिक्षित लोकांनाच नव्हे तर काही अंशी अशिक्षित स्तरातही पोहोचला आहे. पूर्वीइतका आता मुलाचा ध्यास घेतला जात नाही. मुलाविषयीचं क्रेझ संपलंय असा दावा मला करायचा नाही. तरीही हल्ली बरीच शिक्षित दांपत्यं दोन मुलींच्या जन्मानंतर पूर्णविराम ठेवू लागली आहेत. मुलामुलींच्या प्रगतीची समान संधी मिळू लागली आहे. शिक्षित समाजात मुलींच्या मातेला अपमानित जिणं जगावं लागत नाही. भारतातील अशिक्षित भुकेकंगाल, अर्धनग्न पुरुष आणि फ्रान्सच्या ज्ञानी करोडपती मिस्टर लूट्झना एका ताजव्यात कसं तोलता येईल?"

"पण... पण कॅथरीन'जवळ' गेलो की..." नजर चुकवीत ते करुण स्वरात म्हणाले "खरंच गलितगात्र होतो मी! हातपाय, धड आणि मस्तक यांची असंबद्ध रचना असलेलं पोरच नजरेसमोर तरळत राहतं. पौरुषाला ओहोटी लागते. मन पौरुष सिद्ध होईल अशा जागेचा शोध घ्यायला कासावीस होतं. बेदरकारपणाचा आव आणला तरी अपराधी भावनेचा सल बोथट होत नाही. म्हणून. . कदाचित म्हणूनच कॅथरीनशी मी कमालीचा हळुवार बनतो. तिच्या प्रत्येक शब्दाचा अधिकार मी स्वीकारतो. तसं नसतं तर आज इथे

येण्याची तिची विनंती धुडकावली असती मी! पण...पण कुठेतरी मलाही कन्फेशनची गरज भासत होती. तशी संधी मिळेल अशी खात्री नव्हती. पण शक्यता दिसली म्हणून आलो. आणि कॅथरीनचं मन जपायलाही आलो. बाकी आज माझ्या पत्नीचा वाढदिवस आहे. आजच्या डिनरचा आमचा कार्यक्रम फार आधीच ठरलाय. तुम्हाला डिनरसाठी कंपनी देणार नाहीय मी! इथे येऊ शकलोय- येणं जमवलं आहे तरीही...'' लांबच लांब बोलून ते क्षणभर थांबले. कुठेतरीच नजर लावत खेदानं म्हणाले, '' 'कॅथरीनसाठी' मी वाटेल ते करू शकतो. माझे प्राण गहाण टाकू शकतो; पण तिला शरीर नाही देऊ शकत मी! तिचा पुरुष बनणं जमत नाही मला.''

''कदाचित इतर पुरुषांनाही तसंच वाटत असेल. कॅथरीनसाठी म्हणून पुरुषाचा सह-चार अप्राप्य ठरत असेल. कदाचित म्हणून या मुलानंतर अव्यंग पोर जन्माला घालून तुमचं तोंड बंद करायची संधी तिला मिळाली नसेल. अंतरात ज्ञान न उतरलेल्या - पुराणातली वांगी पुराणात ठेवणाऱ्यांना आमच्या समाजात 'पोपट' म्हटलं जातं. 'पढतमूर्ख', 'पोंगा पंडित' अशा शब्दांत त्यांची संभावना होते.''

''तुम्ही म्हणता ते सारंच पटतं मला. पण....''

पण नावाचा पत्थर ओलांडणं त्यांना जमेना. त्यांची अवस्था समजून घेत मी 'आय अंडरस्टँड' असं हळुवार शब्दात म्हणाले. त्यांना दुखवण्याचा वा त्यांच्या मुखवट्याच्या चिरफळ्या उडवण्याचा माझा अजिबात हेतू नव्हता. त्यांनी जर आपला - भारतीयांचा अन्याय समोर धरून स्वत:च्या वागण्याचं समर्थन दिलं नसतं तर मी विषय तिथेच संप-वला असता. अजाणता माझ्याकडून ते घायाळ झाले असतील तर...माझ्या वागण्याचं समर्थन देऊन मी दिलगिरी व्यक्त केली.

त्यांनी अस्वस्थपणे खांदे उडवले. टोकाच्या बेचैन अवस्थेचा अंत कसा आणावा हे त्यांना सुचत नसावं. इतक्यात इंटरकॉमचा बझर वाजला आणि त्यांची विचित्र कोंडीतून सुटका झाली. दिलगिरी प्रदर्शित करून त्यांनी फोन घेतला. 'कमिंग हनी! प्लीज वेट!' फोन ठेवून ते माझ्याकडे वळले. ''ती आलीय मला निघायला हवं. माफ करा.''

ते घाईनं चालू लागले. त्यांच्या पाठोपाठ मीही! आम्ही परतलो तेव्हा एक आधुनिक तरुणी मिस्टर लूट्सची वाट बघत होती. तिचं वय त्यांच्या मुलांच्या- निदान मोठ्या मुलाच्या वयापेक्षा नक्कीच कमी होतं. तिचा वाढदिवस आहे हे मला आधीच कळल्यामुळे मी तिचं शुभचिंतन केलं. मिस्टर लूट्झच्या नजरेत आश्चर्य, अवघडलेपण आणि आनंद याचं अजब रसायन तरळलं. मी मंद हसले.

''आज या भवानीला कशाला बोलवलंत?'' कॅथरीनचे डोळे पाणावले. तिला त्यांच्याकडून उत्तर मिळण्यापूर्वी ती फटाकडी फटकळ स्वरात म्हणाली, ''दोन महिन्यां-पासून आमचा कार्यक्रम ठरलेला होता. तरी ते आले नं इथे? तुझा फोन आला म्हणून मीही तडजोड केलीच की. पूर्ण दिवस कुठे मागितला मी?''

''तू थोडं समजुतीनं घे कॅथरीन...'' ते अजिजीनं म्हणाले.

"तिचा वाढदिवस आहे नं?" त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत क्लॉड तुसड्या स्वरात म्हणाली, "लेट्स डाईन टुगेदर. आपण इथेच केक मागवू. पहिला तुकडा स्मिताला दे."

"कँडल लाईट डिनरचं काय? आणि डान्स काय मी स्मिता बरोबर करू?" लूट्झ-साहेबांवर आग पाखडत ती गुरगुरली, "हवं तर तू थांब इथे. मी निघते."

केविलवाण्या नजरेनं ते दोघींकडे बघत होते. त्यांचं दोन पात्यांत माझ्यामुळे भरडलं जाणं मला नको होतं. माझा आदरसत्कार नीट व्हावा, यासाठी सर्वांनी स्वत:चे कार्यक्रम रद्द करून माझ्यासमोर हात जोडून उभं राहावं अशी माझी अपेक्षा नव्हती. तिच्या खांद्या-वर हात ठेवत मी सलगीच्या स्वरात म्हणाले, "खरं सांगायचं तर मादाम लूट्झ मला तुम्हालाही निचितीनं भेटायचंय. अर्थात् त्यासाठी आजचा दिवस, ही वेळ वा हे स्थान योग्य नाही हे पटतं मला. तुम्हाला आणि मला अनुकूल असेल अशी वेळ देता येईल तुम्हाला?"

"खरंच?" तिच्या डोळ्यांत बालिश आनंद अवतरला. माझ्या हाताचं चुंबन घेत ती आवेगानं म्हणाली, "आय होप, यू रीयली मीन इट. तुम्हाला खरं वाटणार नाही; पण मलाही तुम्हाला भेटावंसं वाटत होतं. ते जमणार नाही याचं वाईटही वाटत होतं. मला भेटणं तुम्हाला आवडणार नाहीसं वाटून मी मिस्टर लूट्झ जवळ उसासले होते. असं पहा, परवा ते पॅरिसला जायचेत. मी त्यांच्याबरोबर जाणार नाही. त्याऐवजी आपली भेट ठरवू. तुम्ही सांगाल तिथे संध्याकाळी मी तुम्हाला घ्यायला येईन आणि सकाळी तुमच्या पिक-अप पॉईंटवर पोहोचवायला येईन. चालेल? जमवाल माझ्यासाठी एव्हढं?"

कॅथरीन, क्लॉड आणि लूट्झसाहेब...तीन दुणी सहा डोळे थक्क होऊन चिवचिवणाऱ्या फटाकडीकडे बघत होते. क्लॉड ही योजना हाणून पाडू बघतेयसं वाटून तिला तशी संधी मिळण्यापूर्वीच मी घाईनं होकार दिला. संध्याकाळी मला कुठून पिकअप करायचं तेही तिला सांगून मी मोकळी झाले. तिच्या आभारवश नजरेत शब्दातीत आनंद उसळत होता. मिस्टर लूट्झच्या विस्फारल्या डोळ्यांत आश्चर्य मावत नव्हतं. क्षणभर नि:शब्द शांतता दाटली. त्यावर शब्दांचा चरा पाडीत मी म्हणाले, "कॅथरीन, त्यांचं जाणं आवश्यक आणि उचित आहे. मला वाटतं आता आपण त्यांना निरोप द्यायला हवा." कॅथरीननं होकार भरला. भरल्या अंत:करणानं त्यांनी मला निरोप दिला.

"मेर्सि! मेर्सि बोक्कु सर! फॉर स्पेअरिंग युअर प्रेश्यस टाईम फॉर मी!" मी मनापासून म्हणाले.

'इट वॉज नॉट स्पेअरिंग टाईम मादाम भागवत! अनप्रेडिक्टेबल जॉय यू हॅव ऑफर्ड अस! थँक्स!! थँक्स अ लॉट.'

"त्यांच्या भावनेशी मी सहमत आहे." मादाम लूटस् तिच्या छम्मकछल्लो आऊटलू-कला न शोभेशा हळुवार स्वरात म्हणाली, "खरंच या भेटीनं आम्हाला अनपेक्षित आनंद दिलाय."

त्यांना निरोप देऊन आम्ही डायनिंग टेबलवर आलो तेव्हा कॅथरीन उदास होती. तिला

आश्वासन देत मी म्हटलं, "छोट्या-मोठ्या तडजोडी कराव्याच लागतात गं! त्याचं काय वाईट वाटून घेतेस?" तिनंही तोल सावरत हास्याचा मुखवटा चढवून दु:ख मागे दडपलं.

"मी म्हणत होते".... कॅथरीनचा स्वर भलताच गोड वाटला. "स्मिताबरोबर क्लॉड तुला लूट्झ साहेबांच्या बंगल्यावर जायचं असेल तर फ्रेडरिकसाठी टाळू नकोस. त्याला बेबी सीटरवर सोपवू नकोस. माझ्याकडे सोडलंस तरी चालेल. उगीच स्मिताला एकटं वाटायला नको."

कॅथरीनच्या गोड वागण्यापाठचं कारण न उमगण्याइतकी मी दूधखुळी नव्हते. त्या पोरीच्या मनात मला एकांतात भेटावं अशी इच्छा आहे हेही मला उमगलं होतं. म्हणून मी चेष्टेच्या स्वरात विचारलं, "भारतातून इथे येताना मला कुणाची साथ सोबत कुठे होती? माझ्यासाठी कुणी रूटीन बदलू नये असं मला मनापासून वाटतं."

"त्या छम्मकछल्लोनं हिलाही भुरळ घातली वाटतं...." क्लॉडच्या कडवट स्वराचा माझ्यावर परिणाम शून्य!

वृद्ध वा मध्यमवयीन पुरुष आणि कोवळ्या पोरी अशा बऱ्याच जोड्या तोवर दिसल्या होत्या. आपल्या इथे जसा वाटेल तो नवरा पत्करण्यासाठी काही ठिकाणी मुलीला भरीस घालण्यात येतं तसं इथे असणार नाही. हे कळत होतं आणि मनात नवल दाटत होतं. भारतातही पंधरा-सोळा वर्षांनं मोठ्या पुरुषाशी तुरुणींनी प्रेमलग्नं केल्याचं बरेचदा बघितलं होतं. या पोरींच्या मनातील आंदोलनं जाणून घेण्यात मला रस होता. सहचर अनुरूप नव्हे तर अनुगुण असावा हे माझं प्रांजळ मत होतं तरीही! तरीही वयातील अंतरामुळे दांपत्यं विजोड वाटत होती मला. क्लॉडची नापसंती माझ्या निर्णयात बदल करू शकणार नव्हती. तरीही तिला दुखवणंसुद्धा मला रुचणार नव्हतं.

"मी आले तेव्हापासून माझ्याच आसपास असतेस तू" मी मृदू स्वरात म्हटलं. "सारे होस्ट पाहुणीसाठी आपल्या रूटीनला तिलांजली कुठे देतायत? पाहुणचार वगैरे सारं ठीक आहे. पण मधून मधून एकांत हवासा वाटतोच की. मला वाटतं, एखादी मुक्त संध्याकाळ ही तुझी गरज आहे. तुला रीलॅक्स होता यावं असं मनापासून वाटतं मला. माझ्यामागे भिंगरीसारखी भिरभिरतेयस. माझ्या गैरहजेरीत थोडी विश्रांती घे."

माझं म्हणणं खोटंही नव्हतं. पाहुण्यांना असोसिएशनमध्ये सोडून इतर होस्ट मंडळी कामावर जात होती. ह्या खुळीनं मात्र तिचा साराच वेळ मला दिला होता. मनाच्या कोपऱ्यात यासाठी चुटपूट होती. माझी इच्छा तिला खटकी वाटली नाही. तिला न दुखावता मिस्टर लूट्झच्या पत्नीला एकांतात भेटण्याचं नक्की झालं याचा मलाही आनंद झाला.

◆ ◆

मराठी ग्रं... राज्य ... क्र. प्रवास ७८८ २८९६२ २५४७५

# ७ / फ्रेंच 'शारदा'

मादाम लूट्झकडे मिस्टर लूट्झ सपत्नीक भेटले होते. त्यांची कोवळी पत्नी पाहून मला 'शारदा' नाटक बघतेयसं वाटलं होतं. इतका मोठा नवरा 'शारदे' प्रमाणे तिच्यावरही काही लादला असणार नव्हता. म्हणूनच मनात अधिक कुतूहल दाटत होतं.

ठरल्याप्रमाणे सौ. लूट्झ मला घ्यायला आली. ती नवऱ्याबरोबर आली होती त्यापेक्षा तिचा जामनिमाच नव्हे तिची वागणूकही वेगळी होती. मी खरंच येतेय हे पाहून तिच्या चेहऱ्यावर बालिश आनंद पसरला. गाडीचा दरवाजा उघडून धरत ती अदबीनं म्हणाली, "बोंझूर मादाम! प्लीज सीट!" तिचं शुभचिंतन करून मी गाडीत बसले. गाडी चालू करीत ती प्रसन्न हसत म्हणाली, "वाटत होतं, तू येतेस की नाहीस! तू आलीस याचा मला खूप आनंद झालाय!" तिच्या स्वरात औपचारिकतेचा लवलेश दिसत नव्हता.

"मी येणार असं आपलं ठरलंच होतं की!" तिच्या मनात मादाम लूट्झविषयी संशय असणार हे कळूनही मी वेड घेऊन पेडगावला जाणं स्वीकारलं!

"मनात भय होतं. वाटलं, 'ती' तुला येऊ द्यायची नाही. निदान त्या हॉरिबल वुमनची ब्याद तरी पाठी लावून देईल."

मी किंचित हसले. मनात म्हटलं.

'वा! हुशार आहेस!' खरंच मादाम लूट्झनं क्लॉडला म्हटलं होतं 'तुला पाहुणीबरोबर जायचं असेल तर फ्रेडरिकसाठी टाळू नकोस. बेबी सीटरचा खर्चही करू नकोस. मी सांभाळेन त्याला!'

मादाम लूट्झ मला आवडली होती. जेनेटिक्स हा माझा अत्यंत आवडीचा विषय असल्यामुळे मंगोल मुलाच्या जन्मामागे आईतील उणीवच असते हा गैरसमज आहे हे मला कळत होतं. मादाम लूट्झच्या दांपत्य जीवनाच्या चिरफळ्या उडविणारं हे खोटं कारण मला नक्कीच आवडलं नव्हतं. मनात तिच्याविषयी सहानुभूती असूनही मला क्लॉडला बरोबर न्यायचं नव्हतं. मोठ्या मनानं (?) फ्रेडरिकची जबाबदारी लूट्झबाई का स्वीकारतेय हे न कळण्याइतकी मी दूधखुळी नव्हते. त्या दोघींचा आग्रह...अगदी 'तू ही त्या छम्मकछल्लोच्या जाळ्यात अडकलीस वाटतं?' असं कडवटपणे क्लॉड म्हणाली तरी मी तिकडे दुर्लक्ष केलं होतं.

मी गप्पच होते. चेहरा किंचित हसला असावा. ती माझ्याचकडे बघत होती. तिची

नजर अस्वस्थ झाली. मी एकटीनं यावं ही तिचीही इच्छा असल्याचं मला जाणवलं होतंच. "तू गप्प का? बोल नं?" तिचा अस्वस्थ स्वर!

"बोलाचयंस तू! काउन्सेलरनं बोलण्यापेक्षा ऐकण्याचं काम अधिक करावं! सांगणारे खूप असतात. ऐकणारं कुणी भेटत नाही. म्हणून तर काउन्सेलरची गरज उभी होते."

"तुमच्याकडे असं असेलही! आमच्या इथे कुणी सांगतही नसतं आणि कुणी ऐक-तही नसतं! काउन्सेलर असतात. त्यांचे सल्ले संपूर्णपणे रॅशनल असतात. मन नावाच्या अदृश्य अवयवाचं अस्तित्व हल्ली आम्ही नाकारू इच्छितोय!"

"इच्छा आणि वस्तुस्थितीत बहुतेक अंतर असतं."

"इथेही आहे. मनाचं अस्तित्व नाकारून संपूर्णपणे अलिप्त होता येत नाहीय म्हणून तुला भेटावंसं वाटलं. तुझी भेट मागून घेतली मी! तरी मनात भय दाटतंय!"

"भय?" मी नवलानं विचारलं,

"प्लीज, गैरसमज करून घेऊ नकोस! थोडं मोकळेपणी मनातलं भय सांगू?" तिचा स्वर थरथरला. मी नुसताच तिचा खांदा थोपटला. तीच-पुढे म्हणाली "वाटलं, काउन्सेलर झाली तरी फॉर्टीजमधली आहे. संकुचित विचारांच्या देशांतून येतेय. केव्हाही तिच्या मनात मादाम लूट्झविषयी सहानुभूती असणार. माझ्या 'शू' मध्ये पाय घालणं तिला जमेल का? माझ्या 'शू' मध्ये स्टेप ठेवून बघायची तिच्या मनात इच्छा तरी असेल का? हा प्रश्न मला भेडसावीत होता. ऐकलं होतं, भारतीय मंडळींना भोंगळ उपदेश करायची सवय असते. आणि हेही ऐकलं होतं की, तिथल्या कुटुंबसंस्थेत वडिलांना आदर आणि छोट्यांना मायेचं छत्र लाभतं. यातील काय खरं असेल? तू येशील की नाही या प्रश्नाभो-वती मीच अनेक प्रश्न बनून रुंजी घालीत होते..."

तोवर आम्ही तिच्या घराच्या वळणावर आलो होतो. गाडी पार्क करून तिनं अदबीनं माझ्यासाठी दार उघडलं. तिथल्या समृद्ध घरात अभावानं दिसणारं नोकराचाकरांचं सुख इथे होतं. मालकिणीची चाहूल लागताच तिची मेड दरवाजा उघडायला आली. प्रशस्त दिवाणखान्यात आम्ही प्रवेश केला. सोफ्यावर विसावत तिनं मेडला काही सूचना दिल्या. माझ्याकडे वळून ती अजिजीनं म्हणाली, "तुझ्याविषयी जे बोलले ते तुला दुखविण्यासाठी नव्हतं हे कळेल नं तुला? मला माझ्या मनाचीही नीट कल्पना येत नाहीय. तुझ्याविषयीचे अंदाज मी कसे बांधणार? मी माझ्याच शोधात अडखळतेय. हा शोध घेणं एकटीला जमेना म्हणून तुला भेटावंसं वाटलं. मला मदत करणं आवडेल नं तुला?"

बघता बघता तिचे भावूक डोळे भरून आले. मनाचं अस्तिस्व झुगारून द्यायची इच्छा व्यक्त करणाऱ्या व्यक्तीच्या मनाचं ते दर्शन होतं. तिला आश्वासन देऊन मी तोल सावरायला थोडा अवधी दिला. "कुठचं ड्रिंक आवडेल तुला?" तोल सावरून तिनं विचारलं,

"कोक किंवा गरमागरम क्रीम कॉफी!" स्वत:ला आवडेल अशी कॉफी हवी असेल तर क्रीम कॉफी मागायची हे मला तोवर उमगलं होतं. पांचट कॉफी टाळणं जमू लागलं होतं.

"एखादं माईल्ड पेय घे नं! रेड वाईन, बिअर, निदान जीन विथ स्वीट लाईम वा..."

"नको!" ड्रिंक्सची यादी तोडत मी म्हटलं, "मला अल्कोहोलची ॲलर्जी आहे."

"ओऽ!" ती अस्वस्थ स्वरात म्हणाली.

"तू ठेवलेले काजू आणि चीज क्युब्ज मी कोक पिता पिताही खाणार बरं का!" तिची अस्वस्थता कमी करायला मी किंचित हसत म्हटलं, "माझ्या ग्लासात रेड वाईनच आहे असं समजून तू निश्चित मनानं तुझ्या आवडीचं ड्रिंक घ्यायचंस!"

ती कसंनुसं हसली. ड्रिंक घेत असताना प्रकर्षानं जाणवलं....ही पोर थिल्लर नाही मनात विचारांचा डोंब उसळलाय; पण सुरुवात कशी करावी हे कळत नाहीय हिला. कारण कधी बोलायची- मनातलं बोलायची संधीच मिळालेली दिसत नाही तर सवय कुठून असणार? आपल्या इकडे लोक काट्याचा नायटा होईल या भयानं बोलत नाहीत असं म्हटलं तरी कुठेतरी मन मोकळं करायला जागा सापडू शकते. निदान फालतू बडबड करूनही माणसं मनावरचा ताण हल्का करू शकतात. पण इथे? इथला प्रत्येक संबंध औपचारिक! अंतरापर्यंत न भिडणारा! पेरीफेरल! सरकारनं काळजीपूर्वक नेमलेले काउन्सेलर इथे असतात. ते सल्लेही देतात. पण त्यांचा सल्ला रॅशनल! मनाचं अस्तित्व नाकारून मजा करावी हा पहिला सल्ला! अलिप्ततावाद हाच जीवनमंत्र! साधा सोपा वाटणारा हा शब्द खऱ्या अर्थानं विचार केला तेव्हा 'संवाद' तोडणारा क्रूर मंत्र वाटला मला! वाटलं, या क्रूर मंत्राची शिकार समोर बसली आहे. मनात शक्यतांविषयीचे विचार गर्दी करीत होते.

नजर तिच्या अस्वस्थ हालचालींचा वेध घ्यायच्या प्रयत्नात होती. तिचं गोंधळलेपण टिपत होती. वाटलं, सुरुवात करणं जमणार नाही तिला! ते काम आपणच करायला हवंय. म्हणून मी हळुवार स्वरात म्हटलं, "तुझ्यासारख्या मुलीशी मला बातचीत करायची आहे असं मीच तुला म्हटलं होतं. तेव्हा माझ्या हेतूविषयी संदेह नको. मला एकटीला भेटायची तुझी इच्छाही तू ओठी आणली आहेस खरं नं?" तिनं मानेनंच होकार दिला. "म्हणजे आजच्या भेटीचा हेतू मनमोकळ्या गप्पा हाच आहे. मनाचं अस्तित्व आम्ही झुगारत तर नाहीच; पण कधी कधी शरीराच्या अस्तित्वापेक्षा ते अधिक समजतो. अस्तित्वाचा धनी हे पद आम्ही मनाला बहाल करतो. तेव्हा तू नि:संकोचपणे बोल."

"एक विचारू?" तिचा अस्वस्थ प्रश्न!

"एक का? खूप विचार. माझ्याजवळ उत्तर असलं तर मी टाळणार नाही याविषयी खात्री ठेव."

"मी गेल्यावर तुला 'ती' माझ्याबद्दल काही बोलली?"

"मादाम लूट्झच्या मनात तुझ्याविषयी आकस आहे असं तुला वाटतं, खरं नं? या प्रश्नात तेच ध्वनित होतंय!"' ती गप्पच. "याला मी गिल्टी कॉन्शास प्रिक्स द माईंड (खाई त्याला खवखवे) म्हणू का?" तरीही ती गप्पच. तिला मोकळं व्हायला जमावं म्हणून मी मादाम लूट्झ माझ्यामागे क्लॉडला कशी लावून देत होती ते सांगून

म्हटलं, "मला एकांतात भेटायची तुझी इच्छा मला उमगली होती म्हणून मी टाळलं तिला. आपण दोघीच असणं हा आपण चातुर्यानं घडवून आणलेला प्रसंग आहे. तेव्हा त्याचा उपयोग करून घे!"

"पण..."

"पण आणि परंतुच्या गुंत्यात अडकू नकोस. तुझ्यात आणि तुझ्या नवऱ्यात किती अंतर आहे ते मला ठाऊक नाही. पण अंदाज येऊ शकतो. शिवाय असं विजोड जोडपं मी इथे पाहिलंच नाही" असं नाहीय. पाहणं आणि जाणणं यांतला फरक कळावा म्हणून ही भेट मी मागून घेतली. आमच्याकडे पूर्वी 'अशी' लग्नं होत. त्यापाठी मुलीच्या आई-बापाचा स्वार्थ असे. जुलूम असे. इथे जुलूम अभिप्रेत नाही म्हणून मला सांग, राजीखुशीनं इथल्या मुली अशी लग्नं कशासाठी स्वीकारतात? तुझं कथन व्यक्तिगत कमी आणि प्रातिनिधिक अधिक असलं तरी चालेल! मला तुझं नवल वाटतं."

"कसलं नवल आणि कुठची राजीखुशी? गरजा भागवण्यासाठी स्वीकारलेली ही सोयरीक असते. माझ्याच बाबतीत नव्हे तर तू म्हणतेस तसं - विजोड जोड्यांविषयी प्रातिनिधिक विधान करतेय मी! यावर तू जो प्रश्न विचारशील त्याचं थोडक्यात उत्तर देणं जमेलसं वाटत नाही. फार खोलात शिरले तर तू कंटाळशील याचं भय वाटतं. वाटल्यास जांभया देत ऐक. पण प्लीज ऐकून घे!" तिच्या स्वरात कमालीची आजिजी दाटली.

"ए खुळाबाई! तुमच्या इतकं आम्ही पटकन बोअर होत नाही बरं का! शिवाय अधूनमधून दुसऱ्याला बोअर करणं आणि स्वत:ही होणं आम्हाला आवडतं. तू आता बोल बरं!"

"तू म्हणतेस तसं माझं व्यक्तिगत कथनही बरंचसं प्रातिनिधिकही असेल. जी व्यथा माझी ती माझ्या वर्गातील बहुतेक पोरींचीही आहे...."

आई-वडिलांनी काडीमोड घेतला तेव्हा हिचं वय होतं सहा वर्षांचं! ॲलिमनी आणि मुलीची कस्टडी आईला मिळाली होती. वीक एंडला बापानं मुलीला न्यावं असं ठरलं होतं. हाती पुरेसा पैसा होता. सोबतीला आई होती. म्हणायला सारं साजरं गोजिरं होतं. पण...पण नावाचा पत्थर ठेचकळायला लावत होता, मुलीच्या भरणपोषणासाठी बापानं दिलेली रकम आई स्वत:वर खर्च करीत होती. कारण दुसरा 'बकरा' पकडायचा तर आकर्षक राहणं भाग होतं. शनिवारी सकाळी बाप मुलीला घ्यायला आला की, उनाड मैनेगत उंडारायला आई मोकळी व्हायची. बापाच्या मनातही कधी वात्सल्य डोकावलं नाही. साराच जुलमाचा राम राम! त्याच्या घरी जावं तर बापाच्या बाईचा जळफळाट ठरलेला! तिथे हिच्या आईचा उद्धार! 'स्वत: शनिवार - रविवार मजा मारते आणि माझ्या उरावर सवतीचं कार्टं!' म्हणत तिची बापाबरोबर भांडण जुंपायची. फारकतीच्या धमक्या दिल्या-घेतल्या जायच्या. नंतरच्या शनिवारी बापाकडे नवी बाई! दोन-तीन भेटी ती सवतीच्या पोरीबरोबर आनंदानं जेवायचं नाटक वठवायची. मग धुसफूस आणि

मोठा भडका हे रूटीन झालं! वस्तुत: फक्त जेवणाच्या टेबलवरच भेट व्हायची. पण तेही असह्य ठरायचं. बापाच्या नजरेत हिचं स्थान असून अडचण नसून खोळंबाच असायचं. म्हणून एकदा मनाचा हिय्या करून बापाला विचारलं, ''या शनिवारी मी नाही आले तर चालेल?''

'हो! चालेल की!' या उत्तरात कधीच न आलीस तरी चालेल हेच अभिप्रेत होतं. ती येणार नसल्याचं कळताच बापाच्या उत्फुल्ल नजरेत आनंदाचं कारंजं उसळलं. सुंठीवाचून खोकला जातोय ते त्याला आवडलं. ही विदारक जाणीव सारी कल्पना असूनही घायाळ करणारी होती.

तोवर-बारा तेरा वर्षांची उमर झाली होती. बेबी सीटर वाचून स्वत:चं स्वत:ला करता येत होतं. बापाकडे जाणार नसल्याचं तिनं आईला कळवलंच नाही. शनिवारी 'बाहेर' जाताना आई औपचारिक स्वरात विचारायची, ''मी निघू बेबी? डॅडी येईतो एकटी राहू शकशील नं?'' ही समजूतदारपणे आईला जाऊ द्यायची. वर्ष-दोन वर्षांत ही क्वचितच बापाकडे गेली. पुढे आईला वस्तुस्थिती कळली तेव्हा तिनं रान उठवलं ''आठवड्याभर मी सांभाळते. मुलगी काय फक्त माझीच आहे? दोन दिवसांची जबाबदारी हिच्या बापानं घेऊ नये?'' मित्रासमोर आई तणतणत होती.

''आठवडाभर संभाळतेस म्हणजे काय करतेस ग तू?'' ही चिरडीस येत ओरडली. ''मी कितवीत आहे? माझी प्रगती कशी आहे? माझे कुठचे कपडे तोकडे झाल्यामुळे निकालात काढायला हवेत हे तरी ठाऊक आहे तुला? मी तुझी एकटीची कशाला? मी कुणाचीही नाही हे कळतं मला!''

कधी नव्हे ते पोर उन्मळून रडत होती. पण मित्रासमोर झालेला अपमान आईला सहन होईना. तिचा हात उठला आणि पोर भेलकांडली. तोकडे कपडे अधिकच अस्ताव्यस्त झाले आणि...क्षणार्धात आईचा मित्र पुढे झाला. 'पिंकी बेबी'ला कवेत घेऊन गोंजारू लागला. या गोंजारण्याची जात वेगळी तरीही हवीहवीशी वाटली. ती ऊब त्याला 'अंकल' म्हणू देईना. काय घडतंय याचं ठीक आकलन होण्यापूर्वी आईनं आकांत मांडला- ''माझ्याच मुळावर आली गं तू? आधी बापाला माझ्यापासून दूर केलंस! आता माझे मित्रही तू बळकावतेस काय?''

दात-ओठ खात आई कपाळ बडवू लागली. तिच्या नज़रेत उमटणारे हिंस्र भाव 'आई' या पदवीला शोभत नव्हते. कमालीचं भेदरलेपण चहुबाजूंनी घेरत होतं. पण.....- पण नावाचा दुसरा पत्थर जीवघेणी कळ उठवायला उभाच होता. सोळा वर्षं पूर्ण केल्याविना घर सोडता येत नव्हतं. तारुण्याची चाहूल लागली तो काळ खरंच 'काळ' भासला. पोरीला स्पर्धक समजणारी आई आणि वेगळ्याच मायेनं सुरुवात करून दाहक अनुभवाकडे खेचणारे तिचे मित्र! आई आणि तिच्या मित्रांत पोरगी भरडली जात होती. डिवोर्सी स्त्रियांच्या पोरींच्या कपाळी 'या' प्रकारचं 'चाइल्ड ॲब्युज' असणं इथे नवलाचं नाहीच. स्वत:च्या पायावर उभं राहून घर सोडलं तेव्हाची मन:स्थिती तर विलक्षण

विदारक होती. सोळाव्या वाढदिवसाच्या केकचा स्वाद जिभेवरून उतरला नव्हता. त्याच रात्री आईनं अलिप्त स्वरात विचारलं, "उद्यापासून कुठे राहणार आहेस ? माझ्या डायरीत पत्ता नोंदून ठेव!"

शनिवारी ही येणार नाही हे कळताच बापाच्या नजरेत उमटलेला सुटकेचा भाव आणि पत्ता नोंदायला सांगणारी मानभावी आई! कशातही प्रेम नावाची अनुभूती नव्हतीच. चरकात भरडलं जात असताना कुठे 'घर' करावं याचा विचारही ग्लानीभरल्या मनानं अजून केला नव्हता. पण....घर सोडणं अटळ होतं.

त्या प्रसंगाचं वर्णन तिच्याच शब्दांत करायचं तर.... "वर आकाश, खाली जमीन यात मी एकटी! एकाकी सोळा वर्षांचं वय! स्वातंत्र्याला मुभा देणारं तरीही कुणाचातरी आधार हवा वाटणारं, स्वप्नातही न दिसलेल्या 'पॅरेंटल केअर'साठी आसुसलेलं! भोवती होते फक्त लांडगे! मनाचं अस्तित्व नाकारून बाईचं फक्त शरीर बघणारे! वयाच्या दृष्टीनं 'गुड मॅच' ठरू शकणारेसुद्धा पॅरेंटल केअरच्या अभावानं अमली पदार्थांच्या गर्तेत कोसळत होते. त्यांची उतरण रोखण्याची आवश्यकता त्यांच्या जन्मदात्यांना वाटत नव्हती की त्यांना स्वत:ला! असे मित्र- ज्यांना स्वत:चा तोल सावरणं जमत नाही त्यांच्या सहवासात माझं मन रमेना. वर्किंग विमेन्स हॉस्टेलमध्ये माझ्यासारख्या 'पोरक्या' मुलींचा कळप! कुणी 'ब्रा मुक्ती' आंदोलनात गर्क तर कुणी ड्रग्जच्या नशेत आधार शोधणाऱ्या! काही माझ्यासारख्या! मनाचं अस्तित्व झुगारून देऊन बेदरकार जीवन जगणं जमत नसलेल्या! मुळं उचकटलेल्या; पण आधार शोधणाऱ्या! वयाच्या दृष्टीनं 'गुड मॅच' ठरणाऱ्या मुलांना वैचारिक खोली विचारात घेऊन 'लिलिपूट' ठरविणाऱ्या! कदाचित म्हणूनच कर्तृत्ववान, निर्व्यसनी प्रौढांकडे, क्वचित वृद्धांकडेही झुकणाऱ्या! मादाम लूट्झ सारख्यांना वाटतं, आम्ही वृद्धांना पैशाच्या मोहानं पत्करतोय. पण आमच्या मनाची पडझड इथे कुणाला कळत नाही. इथे काउन्सेलर्स असतात हे व्यावसायिक! कदाचित म्हणूनच कोरडे! रूक्ष! मिस्टर लूट्झसारख्यांचा सहवास म्हणजे कधीतरी बापाचा सुखद आधार देणारा त्याबरोबरच 'पुरुषा'च्या सहवासाचीही तहान भागवणारा वाटतो आम्हाला! पण हे कळून घेत नाही कुणी! आमच्या मनांतील एक कोपरा निदान 'त्यांच्या' परित्यक्त स्त्रियांसाठी रडत तरी असतो. पण या स्त्रियांच्या मनात मात्र आमच्याविषयी निखळ आकसच असतो बघ!"

धबधब्यासारखे कोसळणारे शब्द क्षणभर थांबले. हा ब्रेक मला अपेक्षित नव्हता. मी नुसतीच तिच्याकडे बघत राहिले. बघता बघता तिच्या टपोऱ्या डोळ्यांत सागर हेलावला. माझे दोन्ही हात हाती घेत ती म्हणाली, "मला सांग स्मिता, यांचा आमच्यावर इतका राग का ? मादाम लूट्झचा दोष नसूनही त्यांना घटस्फोट घ्यावा लागला हे मला कळतं. मग माझ्यामुळे काही हे घडलं नाही हे तिला का कळू नये ? माझी त्यांची भेट तर त्यांच्या फारकतीनंतर दहा वर्षांनी झाली. मादाम लूट्झनंतर त्यांच्या तीन मैत्रिणी झाल्या. मी चौथी! पत्नी मात्र दुसरीच. मला लूट्झ दोन्ही अर्थांनी आवडले हा माझा

गुन्हा नाही. हे त्या प्रौढ बाईला का कळू नाही ?'' ती कळवळून विचारीत होती.

''तुझं म्हणणं कदाचित खोटं नाही'', मी समजुतीच्या स्वरात म्हटलं, ''तरीही मला विचारावंसं वाटतं, आज मि. लूट्झ तुला बापाचा आधार आणि पुरुषाचा सहवास दोन्ही देऊ शकत असले तरी हे कुठवर निभेल ? माझ्या समाजात पूर्वी लोभी आई-बाप बिजवर तिजवरच्या घरात द्यायचे. पुढे फरपटच व्हायची ग त्यांची ! वैधव्य काय आणि बदनामी काय ? सारंच दु:खद ठरायचं. म्हणून हल्ली असे विवाह टाळतात ! मिस्टर लूट्झच्या वृद्धत्वाविषयी विचार केलास तू ? आणि मुलं ? तुझा विचार तुझ्या जन्मदात्यांनी केला नाही. तूही तेच करणार का ?''

''लूट्झ वृद्ध होतील वा 'जातील' तेव्हा मी तारुण्याच्या भरात असेन, हे कळतं ग मला...पण...तरीही 'लिलिपूट'शी संबंध नाही रुचला मला ! पुढचं पुढे बघू. आज तरी मी इतका विचार केला आहे- माझं झालं तसं माझ्या मुलांचं होऊ नाही. हल्ली आम्ही 'नन् इज फन !' हा जीवनमंत्र स्वीकारलाय !''

''अलिप्ततावाद काय आणि नन इज फन काय ? एकच एक जीवनात असायला सर्वांचं जीवन एकसारखं का असतं ? हातपाय, धड आणि मस्तक असलेला प्रत्येक माणूस वेगळा असतो नं ? त्याला जीवनमंत्रांत कसं जखडता येईल ?''

उत्तर न सुचून तिनं मात्र खांदे हलवले. मला आठवत होती डेनिस ! तिचा चौसष्ट वर्षांचा नवरा आणि त्याची बावीस वर्षांची मैत्रीण ! पत्नी नव्हती ती त्याची ! डेनिस अंजूनही कौतुकानं सांगत असते, ''घर, पत्नी म्हटलं की, त्याला मीच अभिप्रेत असते. मुलींची आबाळ होऊ नये म्हणून त्यानं भरपूर रक्कम दिली. पण ती 'ॲलिमनी' नव्हती. आम्ही घटस्फोट घेतलेला नाही. 'घरी' यावं वाटलं की तो अजूनही इथेच येतो. मीही पॅरिसला गेले की भेटते त्याला !''

तरीही....तरीही डेनिसचा सातत्याने सहवास त्यानं टाळलाच होता. मादाम मारीसची कन्याही अठरा वर्षांच्या वयाला चोपन्न वर्षांच्या पुरुषाबरोबर 'तशीच' राहत होती. हल्ली घटस्फोटानंतर बाईचं पुनर्लग्न या कार्ट्यांनी अशक्य करून सोडलंय म्हणत क्लॉडची एक मैत्रीण तणतणत होती. ''कोवळ्या पोरींना म्हातारा नवरा गमतीला मिळतो. पुरुषही तरुणी आपल्यावर अजून मरतात या भ्रमात 'अजून यौवनात मी म्हणत हुलारतात.''

साऱ्या परिस्थितीचं कार्यकारण इथे छम्मकछल्लो म्हटली जाणारी लूट्झची छोटी पत्नी देत होती ! पोक्त विचार ओठी आणणारी मुलगी आणि वाढल्या वयातही उथळपणानं वागणाऱ्या घटस्फोटिता ! कोण सुखी झालं यात ? यालाच 'स्लो पॉयझनिंग (मंद विष) म्हणायचं ? लहान मुलांची उपेक्षा करून पार्टनर बदलत राहण्याची मागच्या पिढीची चूक नवी पिढी निस्तरतेय का ? वृद्धांच्या सहवासात पोरी बाप आणि पुरुष शोधतायत. हिरवट मनाचे प्रौढ स्वत:साठी योग्य वयाची साथ न शोधता पोरींबरोबर मदाऱ्याच्या अस्वलागत नाचतायत. प्रौढा टॅडी बेअर्स आणि प्राण्यांच्या सहवासात पोकळी भरून काढायची धडपड करतायत. मुलं जरा मोकळी होतात आणि आपणही

वृद्ध झालेले नसतो. त्यामुळे आपल्या स्त्रिया ज्या वयात जीवनाचा उत्तमपणे आस्वाद घेतात. त्यांचे छंद जोपासतात त्याच वयांतील इथल्या स्त्रीचं जीवन कमालीचं भकास बनलंय. फावला वेळ हा विक्राळ यक्ष प्रश्न बनतोय इथे!

मग काय प्रौढ पुरुष तरी मजेत आहे? कोवळ्या पोरींचा सहवासही वरवरचा वाटतो तेव्हा धाव घ्यायची 'एक्स वाईफकडे.' तरुण मुलं अमली पदार्थांमागे! मनाचं अस्तित्व नाकारतात तितकं मन अधिकच तरल बनतंयसं वाटतं! ज्या तरुणी प्रौढ पुरुषांबरोबर राहत नाहीत त्या अंतिमवादी 'स्त्री मुक्ती' आंदोलनाचा भाग म्हणून 'ब्रा' जाळण्यासारखे कार्यक्रम राबवतात. व्यायाम करून ब्राची आवश्यकताच उभी राहू नये. बनियन वापरता यावी यासाठी खुळचट प्रयत्न करतात. एकेकाळी फ्रेंच मदनिकांची 'फेमिनाईन फिगर' जगप्रसिद्ध होती. तो फॉर्मच त्या नष्ट करू बघतायत. असल्या प्रयोगांनंतरही एकटेपणा जाणवतो. तेव्हा अपरिहार्यपणे समलिंगी आकर्षणाचा भोग बनतायत. मुक्त व्हायच्या ध्यासात भलत्याच खोड्यांत का बंदिस्त होतायत हे लोक? हे सारं टाळायचंय; पण वाट सापडत नाही. बुडत्यानं काडीचा आधार शोधावा, तशी मग पौर्वात्य काऊन्सलरकडे मदत मागायची केविलवाणी धडपड होतेय. दुरूनच डोंगरांनी साजरं दिसावं याचंच नाव का जीवन? मुक्तीच्या हव्यासापायी बंधनचक्रात गरगरतच चितेवर चढणं म्हणजेच का जीवन? दुसऱ्याची चाकोरी आकर्षक वाटते; कारण तिचे कंगोरे आपल्याला टोचत नसतात. म्हणूनच प्रत्येकाला वाटतं 'त्याचं बरंय हो...' पण हे काही खरं नाही.....

नजरेसमोर निसर्ग मुक्त मनानं सौंदर्य उधळत होता. ज्यासाठी मुंबईत निसर्गप्रेमी मन सतत झुरत असतं ते सारं हात जोडून समोर उभं होतं. पण मला वाटतं, नजरेचं पारणं वगैरे फिटण्याची प्रक्रिया क्षणिक असते. पुढे नजरेला स्वर्गीय सौंदर्याचीही सवय होत असावी. अप्रूप काही उरत नाही मग! कदाचित म्हणूनच सुरेख मस्त प्रवासाची संधी मिळाली होती; तेव्हा सृष्टिसौंदर्य पाहून नजर निवण्याऐवजी मन क्लिष्ट विचारांच्या गुंत्यात गुंतत होतं. छोट्या - मोठ्या घटनांचे धागे विणून सैरभैर होत होतं.

◆ ◆

# ८ / सुंदर तिचं घर

शनिवार उजाडला जॅकलिनकडे जायचं होतं; सुटीचा दिवस! फ्रेडरिकला कुठेतरी ठेवायला हवं का? या विषयी क्लॉडनं माझं मत विचारलं. जॅकलिनलाही दोन मुलं होती. मला हरकत असायचं कारण नव्हतं. ब्रेकफास्ट उरकून आम्ही तिघं निघालो. अंतर बरंच होतं. रस्त्यात क्लॉड जॅकलिनच्या सुखी संसाराविषयी सांगत होती. तिच्या नवऱ्याच्या प्रेमळपणाचे, सुगरणपणाचे गोडवे गात होती. त्याच्या सफरचंदाच्या बागांविषयी आसुसून सांगत होती. इतक्यातच मी क्लेरच्या सुखी दांपत्यजीवनाची तऱ्हा बघितली होती. जॅकलिनकडे काय बघावं लागेल याची कल्पना करणं जमत नव्हतं. क्लॉडचं गुणगान चालूच होतं....

"जॅकलिनचा नवरा पॅट्रिक स्वत: कॅलव्हाडोस तयार करतो बरं का स्मिता!" ती कौतुकली. काहीतरी बोलायचं म्हणून मी विचारलं

"हे कॅल्व्हाडोस काय प्रकरण आहे गं? फार कौतुक ऐकतेय त्याचं!"

"कौतुक करण्याजोगच पेय असतं ते!" मिटकी मारत क्लॉड म्हणाली, "नॉर्मंडीच्या दोन गोष्टी जगभर ख्याती मिळवून आहेत. सशक्त गायी म्हणून दुधाचे पदार्थ आणि इथल्या खास प्रकारच्या ॲपल्समधून तयार होणारी कॅलव्हाडोस! जॅकलिनकडे ताजी प्यायला मिळणार म्हणून मी जाम खुशीत आहे. तू चाखच!"

तोवर गाडी जॅकलिनच्या बागेच्या परिसरात शिरली होती. हिरव्या वृक्षांवर लालबुंद सफरचंदं पाहून मन प्रसन्न झालं. हिरव्यागार वनराजीच्या कुशीत जॅकलिनचं घरही मोठं सुरेख दिसत होतं. गाडीची चाहूल लागताच सफरचंदी गालांची दोन गुटगुटीत मुलं धावत बाहेर आली; त्यांच्या पाठोपाठ जॅकलिन आणि तिचा पती पॅट्रिकही आले. हसतमुख आणि तरतरीत! पश्चिमेत अभावानंच दिसणारं धूम्रपान न करणारं प्रसन्न जोडपं! तणावमुक्त वातावरणात वाढलेली गोड पोरं!

फ्रान्सला जाऊन तिथलं जनजीवन जवळून बघायची इच्छा बाळगून आले होते. पण तोवर घराचा, मुलांचा निरोप घेतल्याला महिना उलटला होता. सतत बघत होते. घटस्फोटित स्त्री-पुरुष! फक्त आई वा बापाजवळ अथवा 'होम' मध्ये राहणारी गुटगुटीत तरीही बिचारी वाटणारी बाळं! सुरेख कवितेची इकडे तिकडे विखुरलेली कडवी! नॉर्मल कुटुंब बघायला मन कमालीचं आसुसलं होतं. अशा वेळी जॅकलिनचे नैसर्गिक लाल

ओठ, तिच्या पॅट्रिकची स्वच्छ पारदर्शक नजर आणि बिचारी न वाटणारी खोडकर मुलं पाहून मी जाम रंगात आले. उत्स्फूर्तपणे पुढे झेपावत मी छोट्याला कडेवर घेतलं-मृदुमुलायम मुठीत भेटवस्तू सरकवीत त्याच्या गोबऱ्या गालांवर ओठ टेकले. औपचारिक-पणे नव्हे तर मनापासून! त्याला फार वेळ मिठीत ठेवणं वाईट दिसेल म्हणून जड मनानं त्याला खाली ठेवलं. सहज समोर नजर गेली तर...जॅकलिन आश्चर्यमिश्रित विचित्र नजरेनं माझ्याकडे बघत होती. तिची माझी नजरानजर होताच ती घाईनं क्लॉडला काहीतरी म्हणाली. क्लॉड खळखळून हसली, मी चक्रावले. चाचरत क्लॉडला म्हणाले , "काय बोलली गं ती? फारच भराभर बोलली. मला काहीही कळलं नाही."

"तिलाच विचार!" क्लॉड हसत म्हणाली. त्यावर जॅकलिननं मात्र डोळे वटारले म्हणून तीच पुढे म्हणाली, "जॅकलिन म्हणतेय, फिगरवरून 'आई' वाटतेय ही! मग वांझ स्त्रीसारखी का मुलाला आसुसून मिठी मारतेय?" काय उत्तर देणार होते मी? कसंनुसं हसून वेळ मारून नेली. बागेत फेरफटका मारून आलो. ताजी सफरचंदं उतरविली. आमच्याशी जुजबी बोलून पॅट्रिक स्वयंपाकघराकडे वळला. स्वच्छ हिशेब! पाहुणी तिची होती म्हणून स्वयंपाक त्यानं करायचा. अर्थात त्यांच्याकडे स्वयंपाकाचा राडा कमी असतो अधून मधून बाहेर येऊन गप्पा मारत मध्येच स्वयंपाकघराकडे मोहरा वळवत पॅट्रिक मजेत स्वयंपाक करीत होता. आता आपल्याकडेही पुरुष स्वयंपाकघरात मदत करू लागले आहेत; पण काम करणाऱ्या पुरुषाच्या चेहेऱ्यावर तणाव आणि स्त्रीच्या चेहराभर ओशाळाभाव दिसतो. किंवा त्याच्या भागाचं काम पाहुणे येण्यापूर्वी उरकून टाकण्याची - गुन्हा (?) झाकण्यासारखी वृत्ती दिसते. काही ठिकाणी मैत्रिणीला स्वयंपाकघरात बोलवून गप्पा मारता मारता काम करण्याची कसरत करणंच बाईला अधिक बरं वाटतं; या पार्श्वभूमीवर गप्पा आणि स्वयंपाक दोन्हींचा समतोल संभाळणारा हसतमुख पॅट्रिक आणि त्याची जॅकलिन मला मनापासून भावले, गप्पाही छान रंगत होत्या. नवख्या वातावरणात मी आधी 'माईक' हाती घेण्याचं टाळते. त्यांच्याही मनात आपल्या विषयी कुतूहल, समज, गैरसमज असतात. समोरच्याचं मत आणि रोख नीट कळला की बोलण्यात अधिक आत्मविश्वास येतो असं माझं अनुभवसिद्ध मत!

"तुझं सेक्स लाईफ कितव्या वर्षी सुरू झालं?" जॅकलिनचा बिनधास्त प्रश्न! "किती वर्षं तू हा अनुभव घेत आहेस?"

'आमच्याकडे बहुतांशी लग्नानंतरच कामजीवन सुरू होतं. लग्नात मी २१- २२ वर्षांची होते. माझ्या लग्नाला वीस वर्षं झाली.'

"सध्याचा तुझा नवरा किती जुना आहे?" इति पॅट्रिक. माझी बावळट मुद्रा! प्रश्न मला अजिबात कळला नाही.

"म्हणजे असं की..." मला गप्प पाहून एक एक शब्द सुटा पाडीत तो प्रश्न स्पष्ट करीत म्हणाला, "हे तुझं कितवं लग्न? या नवऱ्याच्या सहवासात तू कधीपासून आहेस?'

"हा माझा पहिला आणि शेवटचा नवरा!"

"काय सांगतेस?" त्याचे चकित प्रश्न "आणि त्याचं काय?"

प्लेन क्रॅश वगैरे झाला तरची गोष्ट वेगळी; पण बाकी नजीकच्या भविष्यात मी गचकण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे त्यालाही दुसरीचं सुख मिळेल असं वाटत नाही असं सांगावंसं वाटत होतं; पण त्याच्या भाषेत हे सांगणं मला जमणार नव्हतं म्हणून मी एकाच वाक्यात उत्तर दिलं "त्याचीही मी पहिली आणि बहुतेक शेवटचीच!"

"मग तू फेमिनिस्ट कशी?" चक्रावल्या स्वरात पॅट्रिकनं विचारलं. मी त्याला उत्तर देण्यापूर्वीच क्लॉड नापसंती दर्शक स्वरात फसफसली. "अरे ही कसली फेमिनिस्ट? लंडनहून त्याचा फोन आला की, ही धावत येते तिच्या भाषेत काय बोलते ते कळलं नाही तरी त्याच्याशी भांडत नाही इतकं नक्की जाणवतं मला!"

क्षणभर निःशब्द वातावरण! ते दोघं थक्क आणि सख्ख्या नवऱ्याशी खेळीमेळीनं बोललं तर टीका होते हे पाहून मी हतबुद्ध! त्या निःशब्द वातावरणाला ओरखडा पाडीत जॅकलिन काहीशा कुत्सितपणे म्हणाली, "अगं यांच्यात भांडण व्हायला हे लोक म्हणे फारसे एकमेकांच्या सहवासात येतच नाहीत. नवं लग्न झालेलीही बाहेर फिरायला जायला निघतात. पण नसतो कंबरेला विळखा की नाही हातात हात! कधी कधी तर हे मागे-पुढेही असतात म्हणे. सारं जीवनच बेचव आणि बुळबुळीत! नाही त्यात तारुण्याची गरमी की रोमान्सची लज्जत! सारी हिपोक्रसी-"

जॅकलिन बोलतच होती; तिच्या म्हणण्यात तथ्य होतं आणि नव्हतंही! शिवाय प्रश्नचिन्ह नसलेल्या संभाषणाला उत्तर द्यायचं कसं? मी गप्प होते तरी माझा चेहरा हसला असावा. पत्नीच्या बोलण्याचा परिणाम माझ्या चेहऱ्यावर निरखणारा पॅट्रिक जॅकलिन थांबेल याची वाट बघू शकला नाही. "हसलांतशा?" त्यानं एका शब्दात विचारलं.

"छे! कुठे काय?" मी सारवासारव केली.

"नाही कसं?" जॅकलिन उत्तेजित स्वरात म्हणाली "तू हसतेस हे मलाही जाणवलं. निखालसपणे कारण सांगण्याऐवजी नाकबूल करण्याला आम्ही हिपॉक्रसी म्हणतो."

"आम्ही याला पेशन्स म्हणतो" माझ्याकडून आक्रमणाची अपेक्षा असताना शांत उत्तर आलेलं पाहून पॅट्रिक गोंधळला. "काय म्हटलंस ते कळलं नाही."

"समोरची व्यक्ती काय म्हणतेय ते नीट जाणून घेतल्यावाचून आक्रमण करण्याला आम्ही घाई म्हणतो. चित्रकारानं पहिली रेषा काढताच तो माणूस काढतोय की वानर हे स्पष्ट होत नाही. चित्र पूर्ण झाल्याशिवाय स्तुती वा टीका करणं आम्ही उचित समजत नाही. ज्याला तू निखालसपणा म्हणतेस, त्याला मी घाई समजते."

"म्हणजे काय?" जॅकलिन रागानं म्हणाली, "भारतात जाऊन आलेल्या माझ्या मैत्रिणीनं जे पाहिलं ते मला सांगितलं ती मला खोटं का सांगेल?"

"नाही सांगणार पण तिला जे दिसलं ते खरं असेलच असं नव्हे. माझ्या मते काहीही

शंभर टक्के खरं वा खोटं असत नाही. चक्षुर्वैसत्य ही सत्याची अंतिम परीक्षा आहे असं आम्ही समजत नाही. म्हणूनच म्हणते दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं. तुझ्या मैत्रिणीला जे दिसलं ते तिला कळलंच असेल अशी खात्री कुणी द्यावी ?''

''म्हणजे काय म्हणायचं आहे तुला ? मॅनर्सचा बाऊ करून खुलासा टाळू नकोस. मॅनर्ससाठी गुळमुळीत बोलायला आम्ही इंग्रज थोडेच आहोत ?'' पॅट्रिकनं हळुवारपणे म्हटलं.

''जॅकलिनच्या मैत्रिणीनं जे दिसलं ते सांगितलं ते खोटं नाहीच. पण यावर मी म्हणेन आमच्या संस्कृतीत प्रेम ही आमची अत्यंत व्यक्तिगत बाब असते. चार लोंकांत तिचं प्रदर्शन आम्ही उथळपणाचं लक्षण समजतो. दुसरं, आम्ही 'अति सर्वत्र वर्जयेत्' मानणारी माणसं. शृंगारातही अतिरेक टाळणं आम्हाला आवडतं''

''हातांत हात घेण्यात कसला आलाय शृंगार ? तो कलंदरपणा म्हण वाटल्यास, शिवाय मागे-पुढे होण्यात तरी कुठे मजा आहे ? पति-पत्नींनी बरोबर चालण्यात गैर काय ?''

''काहीच नाही; पण आमच्याकडे वस्ती जास्त आहे. रस्त्यांत गर्दी असते. सतत बरोबर असणं जमत नाही, त्यांत थोडं मागे-पुढे झालं तर बिघडतं कुठे ? शिवाय...''

बोलू की नको या द्विधेत मी क्षणभर अडखळले तरी स्वर मिस्कील झाल्याचं मलाही जाणवलं, मी थांबताच पॅट्रिकनं अधीर स्वरात विचारलं, ''शिवाय काय ?''

''टीका करायची नाही मला तरी विचारते...कंबरेला विळखा नि हातात घट्ट धरलेला हात ! इतका आटापिटा केल्यावरही तुमचा विळखा सैलावतो. हातातील हात सुटतो. का ? आम्ही मागे-पुढे झालो तरी एकाच घरात शिरणार आहोत याविषयी आमच्या मनात खात्री असते.''

''तुम्ही शोषण बिनशर्त स्वीकारलंय म्हणून तुमचं घर एक असतं असं आम्ही समजतो'' जॅकलिन म्हणाली.

''भारतात स्त्रियांचं शोषण होत नाही असं मला म्हणायचं नाही. शिवाय माझा अभ्यास सुशिक्षित मध्यमवर्गापुरता सीमित आहे याचीही मला जाणीव आहे. तरीही सांगते मला वाटतं, त्याच स्तरांतील इथली स्त्री अधिक समस्याग्रस्त आहे. माझ्या वर्गातील स्त्रिया ज्या प्रमाणात भारतात प्रगती करू शकतात, त्या प्रमाणात इथे होत नाही. प्रश्न क्षमतेचा नसून कौटुंबिक पद्धतीचा आहे.''

''असं तुला वाटण्याचं कारण ?'' जॅकलिनची भुवई रोषानं चढली.

''कारणं खूप आहेत; पण शॉर्टकट शोधणाऱ्या तुमच्या मनोवृत्तीला ती क्लिष्ट वाटतील. उमजतील की नाही ते मला कळत नाही !''

''तू बोल तर खरी !'' पॅट्रिकचं आश्वासक आव्हान.

''प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. जमेची आणि खर्चाची बाजू. कसला स्वीकार करायचा ते ज्यानं त्यानं ठरवायचं. सोळाव्या वर्षी तुम्ही स्वातंत्र्याचं सुख प्राप्त करता.

आमच्या मते अर्ध्या-कच्च्या वयात तुमचं जन्मदात्यांचं छत्र हरवतं. डोक्यावर पोटाची जबाबदारी नसलेली आमच्या कुटुंबांतील सुरक्षित मुलं जितकं शिक्षण घेऊ शकतात तितकं काम करून शिकणाऱ्यांना जमत नाही. दुसऱ्या 'कामा' बद्दलही. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच तुमचं कामजीवन सुरू होतं; त्यामुळे करियरकडे दुर्लक्ष होतं आणि माझ्या मते तर त्यामुळे सेक्सही निश्चिंत मनाने तुम्ही उपभोगू शकत नाही. त्यात चिडचिडेपणा आणि संबंध तुटणं अपरिहार्यपणे येतंच. मुक्ती मुक्ती म्हणत तुम्ही नवऱ्यापासून, मुलांपासून मुक्त होता. का? त्यापेक्षा सहचराच्या स्वभावातील खुबी आणि खोडी जाणून त्याप्रमाणे मोहरा नक्की करून आम्ही आमचं दांपत्यजीवन दिवसेंदिवस अधिक रंगतदार बनवतो. अतिरेक टाळतो म्हणून एकमेकांना कंटाळत नाही."

"जीवन रंगतदार बनवायचं म्हणजे सतत बाईनं पड खायची हेच नं?"

"असं म्हणू नकोस जॅकलिन! माझ्या वर्गातील स्त्रीच्या प्रगतीचा तिचा नवरा फक्त साक्षीदार नसतो; तर प्रगतीला पूरक ठरणारा मित्रही असतो. माझंच बघ. ही संधी चालून आली तेव्हा सिद्धार्थ लंडनला.. मी मुंबईत! काय करावं? हा प्रश्न फोनवर विचारताच तिकडून ठणकावून उत्तर आलं..." काय करू म्हणजे? आमंत्रण स्वीकारायचंच!"

"तेच म्हणते मी!" उत्तेजित स्वरात क्लॉड म्हणाली. "तो म्हणाला म्हणून तू आलीस. गेली वीस वर्षं तू त्याच्या परवानगीनं श्वास घेतेस हेच खरं!"

"छे! आम्ही उभयतांच्या सहकार्यानं श्वास घेतो. त्यांची लंडनला बदली होणार होती. स्वीकारण्यापूर्वी त्यांनीही मुंबईसारख्या नवख्या गावात मुलांची जबाबदारी पेलणं एकटीला जमेल? मी जाऊ?" हा प्रश्न विचारला होता.

"तरी तुमच्याकडे सासर-माहेरच्या नातेवाइकांचा फारच लबेदा असतो म्हणे. सारे पाय खेचतातच बाईचे!" इति पॅट्रिक.

'छे रे. तुला सांगू? सिद्धार्थ संधी सोडू नको म्हणाले तरी मी नव्हतेच येणार. पण माझा भाऊ आला. ऐन परीक्षेच्या दिवसांत त्यानं मुलांची जबाबदारी घेतली. परीक्षा संपताच मुलांना बडोद्याला नेलं त्यानं! त्याच्या पत्नीनंही हा बोजा वाटू न देता मुलांचं स्वागत केलं. म्हणून मी निश्चिंत मनानं आले. माझ्यासाठी त्यानं पंधरा-वीस दिवसांची रजा वापरली. ती फुकट जातेय असं वहिनीलाही वाटलं नाही. अशा नातेवाइकांना लबेदा समजायचं?"

"मुलाचं वय काय तुझ्या?"

"अठरा आणि सोळा वर्षांच्या मुली आणि तेरा वर्षांचा मुलगा."

"या वयांतील मुलांनी एकटं राहायचं. त्यांची काय काळजी?" पॅट्रिकच्या प्रश्नात भारोभार नवल!

"याच वयात आम्ही मुलांची अधिक काळजी घेतो. कळणं-नकळणं या उंबरठ्यावर त्यांची पावलं अडखळत असताना ती ठेचकाळू नयेत, यासाठी संभाळत राहतो. कारण कळ्यांवर कीड पडण्याचा संभव अधिक असतो. फुलांहून अधिक मशागत कळ्यांची

करायची असते हे कळतं आम्हाला. त्यालाच तुम्ही स्वातंत्र्यावर केलेला वार समजता. कारण तुमच्या लेखी दिसतं तेच सत्य असतं. चक्षुर्वैसत्य ही सत्याची अंतिम परीक्षा नसते हे कळलं त्यांना तर नवऱ्याशी गुलूगुलू गोष्टी करणारी स्मिता फेमिनिस्ट नाहीच अशी प्रच्छन्न टीका करावीशी वाटणार नाही.''

कदाचित माझा स्वर चढला असावा. माझे हात हाती घेत जॅकलिन हळुवारपणे म्हणाली, ''रुसू नकोस स्मिता! तुझ्या संस्कृतीविषयी आमच्या मनात कुतूहल आहे. आदर असला तरी आमच्या मनात काही ग्रहही आहेत. त्याचा खुलासा तुझ्याकडून व्हावा असं वाटलं आम्हाला. आपली भाषा एक नाही. त्यामुळे कदाचित वावगं काही बोलले असेन तर...''

''छे गं! तसं काही नाही.'' मी मनापासून म्हणाले, इतक्यात पॅट्रिकनं पानं मांडली असल्याचं सांगितलं. ''तुझ्या सुगरणपणाविषयी फार ऐकलं आहे आणि भूकही छान लागली आहे.'' असं मी म्हणताच पॅट्रिकनं खुशीत शीळ घातली.

थेट संध्याकाळपर्यंत ते कुटुंब माझ्या आसपास चिवचिवत होतं. निरोपाच्या क्षणी हातावर ओठ टेकत जॅकलिनला 'ऑरवा मादाम', म्हटलं तेव्हा तिचा स्वर जडावलेला जाणवला. तिच्या पाठीवर हात ठेवत मी विचारलं, ''काय झालं गं?''

''स्मिता, तुला जे विचारायचं मनात होतं ते संकोचापोटी विचारू धजले नाही.''

''मग याला मी हिपोक्रसी म्हणायचं?'' मी मिस्कील स्वर लावला.

''खरं सांग स्मिता, सिद्धार्थशी कधीच का भांडावंसं वाटलं नाही तुला?'' जॅकलिननं घाईघाईनं विचारलं. तिला काय म्हणायचं आहे ते मला कळेना. मला गप्प पाहून ती हिरमोड झाल्या स्वरात म्हणाली, ''मला काय म्हणायचंय ते तुला नीट सांगणं जमत नाहीय मला.'' किंचित लाजत ती म्हणाली, ''हा पॅट्रिक मला भारीच आवडतो. त्यालाही मी खूप आवडते. तरी हल्ली त्याच्या डोळ्यांत नाराजी डोकावू लागली आहे. मला भीती वाटते स्मिता, आमचं भांडण होईल आणि आम्ही सुटे पडू.''

जॅकलिनचे डोळे भरून आले. पॅट्रिकनं तिचा खांदा थोपटत तिच्या कानाशी खुसखूस केली, तोल सावरत जॅकलिन म्हणाली, ''ऐकलं होतं. भारतात मृत्यूवाचून जोड्या तुटत नाहीत. त्याबरोबरच स्त्रीशोषणाविषयीही ऐकलं होतं. तुझ्याशी बातचीत झाली... कदाचित बोचरं वाटेल असंही काही मी बोलले. त्यामागे एकच हेतू होता. शोषण न स्वीकारता तिथली स्त्री अभंग दांपत्यजीवन कसं जगते ते जाणून घ्यावं. तुझ्याजवळून 'मास्टर की' हवी होती मला. तरीही....निदान प्रेम ही बाब तुम्ही अत्यंत खाजगी समजता हे तू सांगितल्यावरही तुला इतका खाजगी प्रश्न मी विचारायला नको होता. सॉरी! या प्रश्नांचं उत्तर तू देऊ नकोस!''

''ए खुळाबाई!'' तिच्या पाठीवर चापट मारीत मी म्हटलं, ''मी गप्प होते तुझा प्रश्न कळला नाही म्हणून. मला उत्तर द्यायचं नव्हतं म्हणून नव्हे.''

''म्हणजे...म्हणजे तू मास्टर की...आय मीन उत्तर देशील?''

पॅट्रिकचा उत्सुक प्रश्न मलाच नव्हे तर जॅकलिनलाही भावला. कारण त्याच्या उत्सुक प्रश्नात त्याच्याही मनात अभंग दांपत्यजीवनाची आस आहे; हेच प्रतीत होत होतं.

"थोडं कंटाळवाणं वाटेल तुम्हाला तरी विस्तृतपणे सांगावंसं वाटतं...मास्टर कीचं अस्तित्व कुठे असेल असं मला वाटत नाही. पिंडे पिंडे मतिर्भिन्ना, रुचिर्भिन्ना म्हणतात. तसे एकाचे अनुभव दुसऱ्याच्या अनुभवांशी जुळणारे असत नाहीत. सुरुवातीस मनापर्यंत पोहोचण्यासाठी जोडीदाराला समजून घेण्याकडे कल असतो. गुणांचं कौतुक आणि दोषांवर पांघरूण उभयतांनी घालायचं असतं याचा आमच्याकडं शब्दांवाचून स्वीकार होतो. पतिपत्नीचं नातं मोरावळ्यासारखं मुरतं. त्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात असंही मला वाटत नाही. एकमेकांना आपलं म्हटलं की ते आपोआप घडतं."

"ओह!" जॅकलिननं खेदानं मान हलविली. मास्टर की न मिळाल्याचं दु:ख त्या उद्‌गारात होतं.

"बोअर होणार नसलात तर अजून थोडं सांगू?" त्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता वाचत मीच पुढे म्हणाले,

"मी जे सांगतेय ते सरसकट माझ्या वर्गातील स्त्रियांविषयी बरं का! समग्र भारतीय स्त्रीविषयी नव्हे. तरीही सांगते, तू जे तुझ्या संबंधांविषयी म्हणालीस नं? तसं आमच्या तिकडेही होऊ लागलं आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे संयुक्त कुटुंबं दिसेनाशी होत आहेत. कदाचित म्हणून छोट्या कुटुंबात पतिपत्नी एकमेकांना नको इतके प्राप्य ठरतायत. त्यात व्यक्तिस्वातंत्र्याच्या भन्नाट कल्पना आणि सहचराकडे बघण्याचा संशययुक्त दृष्टिकोण यामुळे लग्नाला पाच-सात वर्षं झाली की खूप जणांचं दांपत्यजीवन बेचव आणि शिळं होऊ लागलं आहे. तरीही चतुर दांपत्यं रूटीनमध्ये बदल घडवून आणून संबंध ताजे करू बघतात. इथेही प्रत्येकजण स्वत:च्या गरजेप्रमाणे, कुवतीप्रमाणे प्रयत्न करणार. प्रत्येकाची 'की' वेगळीच असणार! आता तुझ्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर देऊ?"

"खरंच देशील?" पॅट्रिकच्या स्वरात अपार उत्सुकता "कारण तो प्रश्न खरंच फार खाजगी आहे."

"कसला खाजगी नि कसलं काय?" मी हसत म्हटलं "कधी भांडावंसं वाटलं नाही काय? कधी तसं वाटलं तर दिवसातून दोन-चारदाही जुंपली असेल आमची."

"काय म्हणतेस? तरी तुम्ही?..." चकित जॅकलिनला शब्द सुचेना तिचा प्रश्न समजून मी म्हटलं

"हो! तरी आम्ही बरोबर राहतो. कारण... जुंपण्याला आम्ही मतभेद म्हणतो. माझ्याच बाबतीत नव्हे तर प्रत्येक ठिकाणी जिथे दोन विचारक्षम व्यक्ती एकत्र येतात त्यांचे विचार सर्वच बाबतींत तंतोतंत जुळणं शक्य नाही. याला पतिपत्नी तरी अपवाद कसे असणार? हे आम्ही सहजपणे स्वीकारलेलं असतं. आम्ही लोक वादविवादाला भीत नाही. उलट तुम्हाला गंमत सांगते, बहुतेक जोड्या एका वादविवादात पुढच्या

वादविवादाचे मुद्दे तयार करतात.''

''म्हणजे काय ? मला कळलं नाही.'' इति जॅकलिन

''म्हणजे असं की...आत्ता असं मत व्यक्त केलं आहेस...पुढे कधी या विरुद्ध बोललात तर बच्चमजी माझ्याशी गाठ आहे. अशी मनात नोंद ठेवतात. संधी मिळताच शब्दात पकडायचीही एक मजा असते. उभयपक्ष कडाडून हल्ला करायला मागे-पुढे पाहत नाहीत, कारण....''

''कारण काय ?'' पॅट्रिकचा कमालीचा अधीर प्रश्न

''कारण येत्या भांडणासाठी तरी आपण नक्कीच बरोबर असणार आहोत याविषयी मनात खात्री असते. मनभेदापर्यंत न पोहोचणारे मतभेद आम्ही सशक्त संबंधांचं द्योतक समजतो. जसे आम्हाला स्वयंपाकात मसाले हवेसे वाटतात.. गोडाचंच जेवण नकोसं वाटतं; तसा निव्वळ अनुनयही उबग आणणारा वाटतो. वादविवादांनी संसाराची लज्जत वाढते. हे कळतं आम्हाला म्हणून असेल किंवा लग्नाच्या फॉर्मबरोबरच आमच्याकडे घटस्फोटाचे फॉर्म द्यायची प्रथा नाही म्हणूनही असेल. पण आम्ही भांडणाला भीत नाही हे खरं ! तुम्हीही कधीतरी झकास भांडून बघा. एकदम हलकं...मोकळं वाटेल. संबंधांतील गोडवा वाढेल'' मी हसत म्हटलं.

''यू आर रियली अ ग्रुड गाय !'' पॅट्रिक मिशीत हसला (कुणी 'गाय' म्हटलं की माझ्या नजरेसमोर मातृभाषेतील गायच उभी राहते. साधी नव्हे तर मारकुटी. डोक्यावर शिंगं तर उगवली नसतील या भयानं मी उगीचच हैराण होते.)

''तुला मुलगी हवी आहे नं ?'' पॅट्रिकला मी मनापासून म्हटलं.

''पुन्हा भेटू तेव्हा तुम्ही पाचामुखी परमेश्वरासारखे चिवचिवत असणार यासाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !'' भेटीची पूर्णाहुती करीत मी गाडीत बसले.

दरवाजा बंद करणारा माझा हात परत खेचत जॅकलिन आर्जवी स्वरात म्हणाली, ''मुलांना पप्पी कर नं !'' मी खळखळून हसले. तिची दोन्ही पोरंही खट्याळपणे हसत होती. सूचक नजरेनं हसत मी पॅट्रिकचा निरोप घेतला. गाडीच्या घरघराटांतही त्याचे घोगऱ्या आवाजातील भावूक शब्द माझ्या कानी पडले, ''ऑरवा स्मिता ! ऑरवा...''

जॅकलिनचं सुंदर घर...खऱ्या अर्थानं पाहिलेलं एकमात्र घर आणि कुटुंब नजरेत सामावत मी तृप्त हसले.

◆ ◆

# ९ / गोंधळात गोंधळ

बेर्ने या छोट्या गावातील मुक्काम संपला. शुक्रवारी संध्याकाळच्या गाडीनं पॅरिसला रवाना व्हायचं होतं. त्याप्रमाणे आम्ही स्टेशन गाठलं. आम्हाला निरोप द्यायला स्टेशनवर होस्ट आणि इतर स्नेहीजनांची गर्दी उसळली होती. संपूर्ण दोन आठवडे इथे राहणं झालं होतं. स्वाभाविकच भावनिक नातं जुळलं होतं. इथे येताना मनात अनोळखी वातावरण आणि भाषेच्या तोकड्या ज्ञानामुळे हुरहूर दाटली होती. पण या प्रेमळ लोकांनी सारं व्यवस्थित निभवून नेलं होतं. गुड फॉर नथिंग म्हणजे निश्चित काय याची खऱ्या अर्थानं जाण इथेच झाली होती. माणसांसाठी भाषा असते. भाषेसाठी माणसं नसतात हे त्यांनी त्यांच्या वर्तनानं सिद्ध करून दिलं होतं. ऊर भरून येत होता.

त्यांच्या अनेक कथाव्यथा मनात रुतल्या होत्या. त्यांच्या आनंदानं कधी ओठी हास्य फुललं होतं; तर कधी त्यांची गळचेपी पाहून डोळ्यांत दवबिंदू साकळले होते. साऱ्यांवर मात करायची त्यांची जिद्द पाहून मन थक्क झालं होतं, कधी आदरानं झुकलंही होतं. सुख शोधताना त्यांनी चोखाळलेल्या वाटांविषयी मनात कधी नापसंती दाटली होती, तरीही लढत झगडत नवे मार्ग शोधण्याच्या प्रयत्नातलं सच्चेपणही मनाला समर्थपणे स्पर्शलं होतं. त्यांच्या लढाऊ वृत्तीविषयी अमर्याद कौतुक मनात होतं. या संमिश्र प्रामाणिक भावनेचा परिपाक म्हणून की काय, पण मतभेद मनभेदाचं स्वरूप धारण करू शकले नव्हते.

कधीतरी खोलवर विचार करताना प्रकर्षानं जाणवलं होतं, यांच्या समस्यांचं भरतवाक्यही अश्रूंनी लिहिलं जातं. फक्त 'नो इंटरफिअरन्स' हाच जीवनमंत्र असलेल्या या भूमीत अश्रूंना कोरडे राहण्याचा शाप आहे. फिरून फिरून- युगामागून युगं फिरत राहूनही त्याच त्याच ठिकाणी असणाऱ्या पृथ्वीच्या परिभ्रमणासारखंच काहीसं वाटत होतं. सातासमुद्रापलीकडे संपूर्णपणे भिन्न जीवन जगू बघणाऱ्या या लख्ख गोऱ्या लोकांच्या व्यथांचं काजळकाळं रूप काळ्या माणसांच्या व्यथांसारखंच काळंकभिन्न आहे हे जाणवलं. मग तर परकेपणाची भावनाच गळून पडली होती. निरोपाची घडी येईतो मनं इतकी जुळली होती, की निरोपाचे क्षण खाऱ्या पाण्यात वाहून गेले. क्लॉडच्या कंठातून तर धडपणे 'ऑरवा' हा शब्दही उमटेना.

गाडीनं बेर्ने स्टेशन सोडलं. आता पॅरिसला नवी सिटी नवं राज्य! हे नवं राज्य कसं

असेल? हा प्रश्न मनात सुखद हुरहूर दाटवत होता. त्या बरोबरच बेर्नेतील वास्तव्याच्या आठवणीही गर्दी करीत होत्या. डेनिस, क्लॉड, क्लेरसारख्या झुंजार स्त्रियांच्या आठवणीत फ्रेडरिक, इझाबेल इत्यादी पोरांच्या जीवनातील उणिवांच्या आठवणी मिसळत होत्या. मध्येच पॅरिसच्या वास्तव्याबद्दलचे विचार त्यात घुसत होते. असोसिएशनकडून नवं होस्ट दांपत्य विवाहित जोडपं (हे थोडं नवलाचंच) असल्याची जाण करण्यात आली होती.

घटस्फोटित स्त्री-पुरुषांचं जीवन जवळून जाणून घेता आलं होतं. खेड्यांतलं दांपत्यजीवनही दिसलं होतं. आता पॅरीशियन संस्कृती बघायची होती. पत्ता वाचून बेर्नेच्या कुणा एका जाणकारानं सांगितलं होतं, घर पॅरिसपासून बरंच दूर आहे. मी एकटी होते, नव्या अनुभवांना सामोरं जाण्यायोग्य धडाडी होती, तरीही अनोळखी वातावरणात असुरक्षिततेची शक्यता मनात किंचित भयप्रद थरथरही निर्माण करीत होती. नवं हवंसं वाटत असताना कदाचित म्हणूनच मन जुने दोरही घट्ट धरायच्या मोहात अडकलं होतं. राहुल-संध्याशी छान गट्टी जमली होती. त्यांना धरून ठेवायच्या मोहात मन सुरक्षितता शोधत होतं. वाटत होतं, 'आपली' घरं जवळपास असली तर बरं!-

गाडी 'गार सेंट लझारे पॅरिस' च्या प्लॅटफॉर्मला लागली. गार म्हणजे मोठं उपनगर, टर्मिनससारखं! पॅरिस अनेक मुख्य उपनगरांत विभागलं गेलेलं महाकाय शहर! आपल्या इथल्या चर्चगेट; व्ही.टी., किंवा विरार, ठाणे इत्यादींसारख्या पाच टर्मिनसमध्ये नऊ चॅनल्समध्ये धावणाऱ्या मेट्रोंचा बुजबुजाट असलेलं! या प्रमुख उपनगरांच्या नावाची सुरुवात 'गार'नं करायची पद्धत! इथेही होस्ट मंडळी स्वागतासाठी जमली होती. भिरभिरती नजर त्यातील 'आपले' होस्ट कोण असतील याविषयीची कल्पना करण्यात गुंतलेली!

नावांमागून नाव पुकारत ऑर्गनायझर होस्टना गेस्ट सोपवत होती. माझं नाव पुकारताच मध्यम उंचीचा, आपल्याकडे गोरा ठरावा; पण त्यांच्यात सावळ्यात गणना व्हावी, असा एक दाढीवाला भेदरल्या नजरेनं पुढे आला. ऑर्गनायझरनं परिचय करून देत म्हटलं, 'पास्कल लूट्झ!'

'बोन्झूर!' म्हणत मी किंचित हसले. उत्तरादाखल तो मोकळं हसत अभिवादन करीत पुढे झाला. माझे दोन्ही हात हातांत घेत तो कंबरेत झुकला. अडखळत्या स्वरात म्हणाला, 'स्मिता, आय सॅड!'

मी कोण दचकले! सटकन माझे हात सोडवून घेत मी आजूबाजूला बघितलं. सलामीलाच 'सॅड' शब्द जिव्हारी झोंबला. बुडत्यानं काडीचा आधार शोधावा तशी मी भेदरल्या स्वरात राहुलला साद घातली. माझा हात पुन्हा हाती घेण्याची झटापट करीत पास्कल घाईनं म्हणाला, "स्मिता, आय ग्लॅड!" स्वत: केलेल्या गोंधळाची कबुली देत असल्यागत तो म्हणाला, "आय नो इंग्लिश...नो...नो..." एका हातानं नो म्हणजे नकार आहे हे सुचवीत तो खुळ्यासारखा नाचत सुटला. दुसऱ्या हातात माझा हात मला कळ

लागावी इतका घट्ट धरलेला! मी अधिकच बावरले. हात सोडवून घेण्याचा प्रयत्न निष्फळ ठरलेला पाहून मी याचनाभरल्या नजरेनं संध्या-राहुलकडे बघितलं, "राहुल तुमचं घर माझ्या घरापासून किती दूर आहे रे?" मी कळवळून विचारलं.

शुद्ध गुजरातीत मी राहुलला विचारलेला प्रश्न पास्कलला कळणं शक्यच नव्हतं. पण माझ्या बावरलेपणावरून त्याच्या डोक्यात जी कल्पना आली तीमुळे त्यानं माझ्या हातावरची पकड अधिकच घट्ट केली. माझ्याकडे झुकत तो "आय वाईफ... आय वाईफ" करीत ओरडू लागला. मी फार रडकुंडीस आले, गोंधळ उडाला. इकडे काही तरी गडबड झाली आहेसं जाणवून ऑर्गनायझर आमच्याकडे वळली. त्या वेळी मी माझा हात सोडवून घेण्याच्या आणि पास्कल हात न सोडण्याच्या खटपटीत!

ऑर्गनायझरला इंग्लिश भाषेची चांगली जाण होती. तिनं मी, पास्कल आणि राहुल यांच्याकडून काय झालं ते जाणून घेतलं. आमच्याजवळ आम्हाला कळेल त्या भाषेत खुलासा केला. पास्कलला वाटलं होतं, एकटा पुरुष पाहून ही साडीवाली बाई बुजली आहे. म्हणून ती हात सोडवून घेतेयसं वाटून तो स्वत:ला पत्नी असल्याचं जीव तोडून सांगत होता. ऑर्गनायझरनं तसं काही नसल्याचं सांगताच त्यानं आपणहून माझा हात सोडला. त्याच्या चेहराभर दिलगिरी पसरली होती.

"या पास्कलला अजिबात इंग्लिश येत नाही." ऑर्गनायझर समजुतीच्या स्वरात खुलासा करू लागली. "तू येणार म्हणून तो जुजबी शब्द शिकलाय म्हणून त्याचा ग्लॅड आणि सॅडमध्ये घोटाळा झाला. कृपा करून ते तू मनावर घेऊ नकोस. मिशेल- याची पत्नी दोन वर्षे अमेरिकेत राहिलेली आहे. तिचं इंग्लिशवर छान प्रभुत्व आहे. तिला स्टेशनवर येणं जमलेलं नाहीय. पण ती तुम्हाला 'ऑपेरा' या उपनगरात भेटणार आहे. पास्कल तुला मेट्रोनं (भुयारी रेल्वे) तिथे नेईल. याच्याबरोबर तुला निश्चिंत मनानं जाणं जमेल नं? नाहीतर माझ्याबरोबर चल!"

जमणार नाही हे शब्द तोवर कधी ओठी चढले नव्हते, तेव्हाही चढले नाहीत. भेदरल्या नजरेनं मी पास्कलकडे पाहिलं. परीक्षेतील पहिलाच पेपर कोरा ठेवावा लागावा असा त्याचा अपराधी चेहरा पोरागत भाबडा वाटत होता. त्याही परिस्थितीत मला हसू फुटलं. (त्या आठवणीनं आत्ताही ओठ हसतायत). माझं हास्य पाहून त्याचाही चेहरा सैलावला. मी न सांगताही त्याला मी त्याच्याबरोबर जायला तयार आहे ते उमगलं. त्याच्या पारदर्शक चेहऱ्यावरचे भाव मी अलगद टिपले. ग्लॅड आणि सॅडच्या घोटाळ्यापेक्षा 'ही' भाषाच अधिक सोपी आहेसं वाटून मी मोकळं हसले. पास्कलबरोबर जायला मी राजी झाले तरी ऑर्गनायझरनं तिचा फोन नंबर असलेलं कार्ड माझ्या हाती देत आवर्जून म्हटलं, "यांच्या घरी राहणं तुला गैरसोयीचं वा त्रासाचं वाटलं.तर केव्हाही फोन कर! मी स्वत: येऊन तुला घेऊन जाईन. काळजी करू नकोस!"

"छे! इतकी काही मी बावरले नाहीय!" म्हणत मी उसनं अवसान आणलं. तरीही सेंट लझारे स्टेशनचं अवाढव्य स्वरूप आणि अजिबात इंग्लिश येत नसणाऱ्या पास्कलब-

रोबरचा तासाभराचा प्रवास! कल्पनेतही मनावर दडपण येत होतं. राहुल-संध्याचा निरोप घेताना, माहेरून प्रथम सासरी जायला निघाले, त्याहीपेक्षा अधिक वेळा मी मागे वळून पाहिलं.

माझी अवजड बॅगच नव्हे तर हॅंड बॅग आणि व्हॅनिटीसुद्धा अवघ्या (?) दोन हातांत घेऊन पास्कल तुरुतुरू चालू लागला. त्याच्या गतीशी ताल जुळविताना माझी दमछाक होत होती. पण त्याच्या ते गावीही नव्हतं. हेच का? त्याच्या काहीही गावी नव्हतं. या पाहुणीशी आपला परिचय नाहीय. तिला पॅरीसियन फ्रेंचचा अजिबात सराव नाहीय. आपलं इंग्लिश महाभयंकर आहे. याची कसलीही जाणीव त्याला नव्हती. (खरं म्हणजे याचा त्याला बाऊ वाटत नव्हता. अर्थात् मला हे पुढच्या वास्तव्यात उमगलं!) इंग्लिश-फ्रेंचचं विचित्र मिश्रण अव्याहतपणे त्याच्या ओठांतून सतत पाझरत होतं. हातांतील अवजड सामानाची तमा न बाळगता तो हातवारे करीत मला काही बाही सांगायचा प्रयत्न करीत होता. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही मला ओ म्हणता ठो कळत नव्हतं. जे कळलंय असं वाटत होतं त्या विषयीही खात्री वाटत नव्हती. लांबच लांब भुयारी मार्गातले एकामागून एक प्लॅटफॉर्म मागे टाकत तो पुढे जात होता. त्याच्या मागे मी धावत होते. विलक्षण बावरलेपण मनाचा कब्जा घेत होतं.

पिक अवर्सच्या गर्दीत पटकन गाडीत चढायला हवं हे तो मला सांगत असावा. इंडियात येऊन गेलेल्या त्याच्या कुणा मित्रानं म्हणे त्याला सांगितलं होतं. भारतात गाड्यांचे दरवाजे उघडे राहतात, तसं इथे नसतं. पटकन आता शिरलं नाही तर दरवाज्यात अडकायला होईल, म्हणून तू आधी चढ. मी तुझ्या मागे असेन, असं काही तरी सांगतोयसं मला त्याच्या हातवाऱ्यांवरून आणि शब्दांवरून वाटत होतं. मुंबई नावाच्या महानगरातील भयाण लोकल्सशी ज्यांचा संबंध येतो त्यांना भरल्या गर्दीत स्वतःला चित्त्यासारखी झेप घेऊन गाडीत चढता येतं हे त्याला कुणी सांगितलं नसावं! त्यामानानं इथं सारं सोपं होतं. मी सहजपणे मेट्रोत चढले. माझी चपळाई पाहून पास्कल कौतुकानं हसला. गाडीच्या गर्दीतही त्याची अखंड बडबड चालू होती. मी बहुतांशी नकारात तर क्वचित कधी होकारात मान हलवीत होते. एव्हाना डोकं विलक्षण ठणकू लागलं होतं. कुणी आपल्याशी भडाभडा बोलत असावं आणि आपल्याला अजिबात कळत नसावं अशी स्थिती कधी अनुभवली नव्हती. डोक्यात नुसता गुंता वाढत होता. त्यातच इच्छित ठिकाणी पोहोचण्यासाठी एकदा चॅनल बदलून दुसऱ्या मेट्रोत चढावं लागलं. पुन्हा तेच सोपस्कार! पास्कलच्या बोलण्यात खंड नव्हता. गाडी अत्यंत वेगानं धावत होती. त्याहीपेक्षा अधिक वेगानं पास्कल त्याच्या मनातील भावना माझ्यापर्यंत पोहोचवायला जिवाचा आटापिटा करीत होता. त्यात मी सरपटत होते. वाटलं, याच अवस्थेत याच्याबरोबर अजून एक तास काढावा लागला तर नक्की वेड लागेल किंवा डोकं फुटेल आपलं. पण सुदैवानं उतरायची वेळ झाली. 'ऑपेरा' शब्द मला भलताच मोहक वाटला. म्हटलं, हाश! सुटले याच्या तावडीतून! इथेच मिशेल आम्हाला भेटणार होती. स्टेशनपा-

सून जवळच असलेल्या रेस्टारंटमध्ये ती आमच्या आधीच पोहोचली होती.

मला बघताच ती आसुसून झेपावली. मला मिठीत घेत तिनं स्वागताचं चुंबन घेतलं. अपराधी स्वरात पास्कल तिच्याशी काहीबाही बोलला. मिशेल खळखळून हसली. लटक्या रागानं त्याच्याकडे बघत ती कौतुकली. "याला घरून इतकं पढवून पाठवलं होतं तरी पालथ्या घड्यावर पाणी! तुला यानं पुरतं घाबरवून सोडलं नं?" मी कसनुसं हसले. तिनंच पुढं विचारलं, "रस्त्यात हा जे काही बोलला ते तरी तुला कळलं का?" मी नकारात मान हलवून संपूर्ण हार स्वीकारली. ती पुन्हा खळखळून हसली. "त्याला वाटलंच होतं!"

"क..काय?" मी चाचरत विचारलं. खरं म्हणजे मला विचारायचं होतं, "काय वाटलं त्याला? मी अगदीच ही...म्हणजे बावळट आहे? असंच नं?"

"हेच गं!" मिशेलनं सहज स्वरात म्हटलं. "तुला कळलं नसावं असं त्याला जाणवलं. कारण त्यानं तुला सांगितलं, तुमच्यात ऊठसूट चुंबनं घेण्याचा रिवाज नाही असं मिशेल म्हणाली. वेलकम किस घेऊन तुला वॉर्म वेलकम दिला नाही, म्हणून तू रागावली आहेस का?" तर तू होकारात मान हलवलीस. यावर त्यानं 'तुला आता किस करून त्याची भरपाई करू का?' असं विचारलं तर तू नकार दिलास. या चुकीबद्दल मिशेलजवळ तू तक्रार करू नकोस. असं त्यानं तुझ्याजवळ वचन मागितलं, तर वचन देण्यासाठी तू नकारच देत सुटलीस. त्याच्या सौजन्यशील वागण्याचाही तू सतत विरोध केलास. यावरून त्याला वाटलं, आपण काय म्हणतोय ते हिला कळत नसावं!'

"ओह गॉड!" जबरदस्त थकवा अंगावर धावून येत असल्यागत थकल्या स्वरात मी म्हणाले, "माझी नकारात हलणारी मान त्याला नकार देत नव्हती तर तो काय म्हणतोय ते मला अजिबात कळत नाही, हे मी सुचवू बघत होते. अगं, सुरुवातीस निदान तो जरा सावकाश बोलत होता. म्हणून मला थोडा तरी उमज पडत होता. पुढं तर काहीच कळत नव्हतं. त्याच्या अखंड बडबडीतून मला फक्त इतकंच कळलं (?) की, तू दाताच्या समस्येसाठी सल्ला घ्यायला गेली आहेस. म्हणून तुला स्टेशनवर येणं जमण्यातलं नाही. दवाखान्यातून तू सरळ ऑपेराला येऊन आम्हाला भेटशील!"

कपाळावर हात मारून मिशेल पुन्हा खळखळून हसली. मी अधिकच गोंधळले. तिच्याकडे बघत असताना अचानक माझी नजर समोरच्या भिंतीवरच्या आरशावर पडली. बावळटपणाची दाट साय चेहराभर पसरलेली दिसली आणि मी कमालीची नर्व्हस झाले. अभावितपणे माझी नजर पास्कलकडे वळली. त्याच्या चेहऱ्यावरही 'तीच' दाट साय पाहून त्याही स्थितीत मला गंमत वाटली. थोडं बरंही वाटलं. मग मात्र मिशेलला आमची दोघांची दया आली. माझ्या हातावर ओठ ठेवत ती हळुवार स्वरात म्हणाली, "सॉरी स्मिता! तुला समजेल असं काहीही सांगणं या खुळ्याला जमलेलं दिसत नाही. पण आता आपण बरोबर राहणार आहोत तेव्हा तुला सारं व्यवस्थित कळेलच. मला छान इंग्लिश येतं हे तुला जाणवलंच असेल. तेव्हा अजिबात काळजी करू नकोस.

प्रवासात थकली असशील. याच्या सहवासात भरपूर गोंधळलीही आहेस. सगळा गोंधळ दूर सारून आता आपण मस्त जेवण घेऊ. तू निःसंकोचपणे हात मार. आता तुला फक्त इतकंच सांगते, मी पेशंट नसून डॉक्टर आहे. दातांच्या समस्येवर उपचार करण्यासाठी मी दवाखान्यात जाते. मी डेंटिस्ट आहे. माझी असिस्टंट काल अचानक खूप आजारी झाली म्हणून दवाखान्यात जाणं टाळता आलं नाही. याला पाठवावं लागलं."

माझा हात धरून ती गोडसं हसली. तिनं आधीच टेबल रिझर्व्ह केलं होतं. चिअरअपच्या नजरेनंच इशारा देत तिनं ज्यूसच्या ग्लासचा माझ्या ग्लासवर हल्कासा प्रहार केला. तिचं अनुकरण करीत पास्कलही किंचित हसला. प्रयत्नपूर्वक आठवत असल्यागत तो प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाला, "वेल कम टू पॅरिस ! फॉर हॅपी स्टे. चिअर्स !!"

"दॅट्स फाईन ! कीप इट अप !!" त्याच्याकडे मिश्कील नजरेनं बघत मिशेल कौतुकली.

तिला खरंच छान इंग्लिश येत होतं. बोलण्याची पद्धतसुद्धा आश्वासक आणि अनौपचारिक होती. त्यामुळे माझ्या जिवात जीव आला. यथेच्छ जेवून आम्ही घरी जायला निघालो. आता कार होती, म्हणजे मेट्रोच्या लांबलचक भुयारात पायपीट करावी लागणार नव्हती. चुईंगगम चघळत आम्ही बाहेर उभ्या राहिलो. पास्कल पार्किंग स्पेसमधून गाडी घेऊन आला. झाल्या प्रकारानं तो इतका नर्व्हस झाला होता, की परतीच्या वाटेवर तो गप्पच होता. कदाचित मिशेल त्याच्याहून अधिक बडबडी होती म्हणूनही असेल, पण तो रस्त्याच्या रहदारीवर नजर ठेवून शांतपणे गाडी चालवीत होता. बोलण्याचं बरंचसं काम मिशेलच करत होती. माझ्यावरही बोलण्यापेक्षा अधिकतर ऐकण्याचीच जबाबदारी होती. मिशेलचं घर खरंच खूप दूर होतं. या संदर्भात मिशेल मला सांगत होती. इकडच्या पद्धतीविषयी माहिती देत होती. आपल्या इथल्या ईस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशनला समांतर 'परस्पेक्टिव असियेन' नावाची तिथे संस्था आहे. आपल्याकडून तिकडे जाणाऱ्या पाहुण्यांचं यजमानपण त्यांच्याकडे असतं. गंमत म्हणजे मिशेल या संस्थेची सदस्य नव्हती.

आपल्या इथं ईस्ट वेस्ट कल्चरल असोसिएशन मेंबरचा बायो डेटा आणि छंद, आवडीनिवडी तसेच फ्रान्सला जाण्यापाठचा हेतू याविषयी लिखित माहिती मागवते. ती माहिती 'तिकडच्या' वृत्तपत्रात छापून येते. पाहुण्यांचं स्वागत करायला जनतेला जाहीर आव्हान देण्यात येतं. बायोडेटा वाचून ज्या व्यक्तीविषयी वाचकांच्या मनात कुतूहल वा रस उत्पन्न होईल त्या व्यक्तीचं होस्ट होणं वाचक स्वीकारतात. बहुतांशी हे होस्ट परस्पेक्टिव असोसिएशनचे सदस्य असतात. क्वचित कुणी इतरही होस्ट होणं पसंत करतात. उरलेल्या पाहुण्याचं वाटप सदस्य-मंडळी आपसांत सामंजस्यानं करून घेतात.

तिथलं हे प्रोसिजर मला ठाऊक नव्हतं. ठाऊक असायचं कारणही नव्हतं. पण घरी

जाताना मिशेलनंच हे सारं मला सविस्तर सांगितलं. तिथली पद्धत सांगून ती पुढं म्हणाली, 'तुझी माहिती वाचून माझ्या मनानं घेतलं, ही पाहुणी आपल्याला हवी. पण माझं घर दूर! थेऽऽट सेंट सेर्जि ख्रिस्तोफला! पेपरमध्ये जाहीर झालेल्या ठिकाणी मी लाँग ड्राईव्ह करून गेले. पण ऑर्गनायझर माझं नाव होस्टच्या यादीत घ्यायला नकार देत सुटली. मला म्हणे कशी? "वाटल्यास एखादं कपल घे. ही पाहुणी तुला मिळायची नाही."

"का?" मीही ठामपणे विचारलं. "मला हवी असलेली पाहुणी नाकारून तू वाटेल ते कपल माझ्या माथी काय म्हणून मारतेस? मला हीच पाहुणी हवी."

"थोडं समजुतीनं घे तू, होस्ट होच असा माझा आग्रह नाही." ती अलिप्त स्वरात म्हणाली, "या तीसही पाहुण्यांना आम्ही एकत्र जमवून पॅरिसची सहल करवितो. त्यासाठी त्यांना एका ठिकाणी जमवावं लागतं. रोजचा 'मीटिंग पॉईंट' वेगळ्या ठिकाणी असतो. जे दाखवायला न्यायचं असतं त्या दृष्टीनं सोयीचा ठरेल असा! संस्थेची दोन माणसं- एक स्त्री आणि पुरुष- साऱ्यांना हिंडवतात. पण या मीटिंग पॉईंटपर्यंतचा प्रवास प्रत्येकाला स्वत:च्या जबाबदारीवर करावा लागतो. तू राहणार सेंट सेर्जि ख्रिस्तोफला! कुठच्याही मीटिंग पॉईंटवर पोहोचायचं तर किमान एक रेल्वे आणि दोन मेट्रोइतका प्रवास अनिवार्य ठरेल. तुला ज्या गेस्टचं होस्ट व्हायची इच्छा आहे ती स्त्री एकटी आहे. अनोळखी ठिकाणी इतका प्रवास एकट्या व्यक्तीनं तेही स्त्रीनं, भारतीय स्त्रीनं करावा असं मी कसं सुचवू शकेन? तिच्याबरोबर तिचा नवरा असता तर मी हरकत घेतली नसती पण..."

पण मी तिच्या पणला भीक घालण्याजोगी लेचीपेची नव्हते. तिचा स्पष्ट नकार वा कपलचा पर्याय दोन्ही मला मंजूर नव्हते. आलेच आहे तर कपलचं का होईना होस्टपण स्वीकारावं असा माझा स्वभाव नाही. मी चिरडीस येत तिला म्हटलं, "भारतीय स्त्री असली तरी एकटी प्रवासाला निघालीच आहे की! भारत ते फ्रान्स एकटीनं येणारीनं अंतराचा बाऊ करू नये. या पाहुणीच्या नावासमोर होस्ट म्हणून माझंच नाव टाक." मी तिला ठणकावून सांगितलं. तर तीही विचारात पडली.

"हे बघ मिशेल", माझ्या ठामपणापुढे माघार घेत समजुतीच्या स्वरात ऑर्गनायझर म्हणाली, "शनिवार आणि रविवार गेस्ट आणि होस्टचा परिचय व्हावा यासाठी मोकळे ठेवण्यात येतात. शुक्रवारी रात्री तू तिला तुझ्या घरी नेशील तेव्हा तिला अंतराची कल्पना येईलच. तो संपूर्ण प्रवास तू कारनं करायचा नाहीस. ऑपेरा आपला एक मीटिंग पॉईंट आहे. तिथं कार घेऊन तुझ्या नवऱ्याला येऊ दे. लझारे पॅरिस ते ऑपेरा तिला मेट्रोनं ने! मेट्रोचा हिसका तिला अवघड वा असह्य वाटला तर सोमवारी तू तिला संस्थेच्या हवाली करायचंस. हे तुला मंजूर असेल तर आणि तरच मी ही पाहुणी तुझ्या नावावर टाकते."

"अर्थातच मी होकार दिला. पण काल थोडा घोटाळा झाला. माझी मदतनीस दवाखान्यात असतानाच तापानं फणफणली. दवाखान्यात जाणं टाळता येईना. रात्री

आणि सकाळी पास्कलला इंग्लिश शिकवत राहिले. त्याच्या माझ्या कामाची उलटापालट केली. मी कार घेऊन ऑपेराला आले आणि याला स्टेशनवर पाठवलं. मनात थोडी भीती होती. ही बया मी गेले नाही त्याचं भांडवल करून पाहुणी नाकारते की काय! म्हणून सकाळी तिला फोन करून सारं कळवलं. म्हटलं, उगीच गोंधळ नको. तरी गोंधळ झालाच म्हणा...''

घरी जाताना वाटेतच सारा पाढा वाचून मोकळी होणारी मिशेल खळखळून हसली. स्वत:ला हवं तेच करण्यासाठी तिनं ज्या संघर्षाचा सामना केला होता, जे यश खेचून आणलं होतं, त्याविषयी बोलताना तिचा ऊर अभिमानानं भरून येत होता. त्याचा आनंद तिच्या हिरव्या कंच डोळ्यांत चमचमत होता. मी अनिमिष नेत्रानं तिच्याकडे बघत होते. धबधब्यासारखे शब्द कोसळत होते. अस्खलित भाषेत तिची शौर्यगाथा ऐकण्यात मला अनुपम सुख मिळत होतं. पास्कलच्या भेटीत मनात उमटलेले संदेहाचे तरंग तर तिच्याशी चार वाक्यांची देवाणघेवाण होताच शमले होते. जेवण्यापूर्वीच मन शांतवलं होतं. मनात उरलासुरला संदेहही तिनं सांगितलेल्या कहाणीनं उडवून दिला. आपण इथं 'अनवॉंटेड गेस्ट' नाही. उरलेल्या पाहुण्याचं वाटप होतं तशा वाटप झालेल्यांत आपण नाही. हिनं आपल्याला मागून घेतलंय, याची जाणीव माझ्यासारखा भिडस्त आणि अलूफ व्यक्तीसाठी फार मोलाची होती. शांतवलेलं मन इतकं सुखावलं, की कुठल्याही मीटिंग पॉईंटविषयी काहीही माहिती नसताना मी हिच्याकडं राहायचं, हा निर्णय घेऊन मोकळी झाले.

माझा निर्णय माझ्या चेहऱ्यावर उमटला असावा. माझा हात हाती घेत ती म्हणाली, ''तुम्हा भारतीयांत जो 'टॉलरन्स' असतो तो माझ्याजवळ नाही. 'चालेल' ह्या शब्दाशी माझी ओळखच नाही. तू नहीं, और सहीं, हे तत्त्व मला साफ नामंजूर आहे. अर्थात याचा अर्थ, माझ्या हौशीसाठी मी तुला वाऱ्यावर सोडेन असा नाही उद्या मी तुला मॅप वाचून चॅनेल्स समजावेन. एक ठिकाण पसंत करून तिथे आपण तुझ्या मॅप रीडिंगप्रमाणे जाऊ. म्हणजे तुला कॉन्फिडन्स येईल आणि मी निश्चिंत होईन.''

''तू निश्चिंत अस!'' मी उत्साहानं म्हटलं, ''लंडनच्या मॅपप्रमाणे मी तिथल्या सगळ्या चॅनल्सवर एकटी मनसोक्त भटकलेय. इथं थोडा भाषेचा प्रश्न भेडसावतो, पण पाट्या वाचत गेलं, की उच्चारातला फरक अडचण उत्पन्न करणार नाही.''

मिशेलच्या नजरेत कृतकृत्यता आणि कृतज्ञतेचं मोहक मिश्रण दिसलं. मीही खुशीत हसले. गप्पाष्टकांत रस्ता केव्हा संपला ते कळलंसुद्धा नाही. तिथल्या प्रथेनुसार मी गेल्यागेल्याच आणलेल्या भेटी त्यांच्यासमोर धरल्या. मिशेलनं ट्राऊझर्सवरच माझ्याकडून इरकली साडी नेसवून घेतली. पास्कलनंही लगेच हॅंडलूम हाऊसमधून आणलेला भरतकाम केलेला झब्बा घालून बघितला. 'समर कॉस्च्युम' म्हणून हा छान आहे असा निर्वाळाही दिला. मला बरं वाटलं.

मिशेल इरकली साडीचा भपकेदार पदर नाचवीत आरशासमोर ठुमकत होती.

आरशातील प्रतिमेत मलाही खेचून घेत तिनं विचारलं, "ॲम आय लुकिंग लाईक यू ?" मी कौतुकानं होकार भरला. पण ती गाल फुगवून निष्पाप रुसक्या स्वरात म्हणाली, "बट माय स्कीन कलर ? मला तुमचा रंग इतका आवडतो म्हणून सांगू!", पास्कलचा हा सर्वांत मोठा प्लस पॉईंट वाटला मला. "बिलिव्ह मी, आय रियली एन्व्ही युअर टॅन कॉपर कलर!"

मला हसूच आलं. माझ्या रंगाचा तोवर (पुढेही) कुणी कधी हेवा केला नव्हता. काळ्यात वा गोऱ्यात कशातही जमा न होणारा, भारतात पावलोपावली दिसणारा निमगोरा रंग! त्याचं अप्रूप आपल्याकडं ते काय? अशा रंगाचं कौतुक सातासमुद्रांपलीकडे आल्यावरच व्हायचं! मी मजेत हसले.

मिशेलनं मला खोली' दाखवली. एक टेबल-खुर्ची, एक सोफा, सिंगल बेड आणि प्रशस्त टब असलेली ॲटॅचड् बाथरूम. एका माणसाच्या गरजा भागवणारी, सेल्फ कंटेंड खोली आरामशीर होती. गुड् नाईट किस घेत मिशेल हळुवार स्वरात म्हणाली, "स्मिता, आज थकली होतीस, थोडी बावरलेलीही होतीस, म्हणून सारा वेळ माईक मी माझ्या हाती ठेवला. पण उद्यापासून हे चालणार नाही बरं का! मला तुझ्याशी खूप बोलायचंय, तसंच तुझ्याकडून खूप ऐकायचंही आहे. छान झोप घेऊन ताजीतवानी हो! उद्यापासून आपण 'माईक'ची देवाणघेवाण करायची. पास्कलही त्यात सामील होईल. दुभाष्याचं काम मी आवडीनं करीन. ओ.के. ? गुड नाईट ॲंड स्वीट ड्रीम्स टू..."

मिशेल गेली. थोडावेळ डायरी लिहून मी उठले. हातपाय ताणून झकास जांभई दिली. गरम पाण्याच्या टबमध्ये थकली गात्रं झोकून दिली. स्नान उरकून बिछान्याला पाठ लावता लावता मी घड्याळाकडं पाहिलं, दोन वाजून दहा मिनिटं झाली होती. गंमत म्हणजे रात्री नऊ वाजता अतीव ठणकणाऱ्या मस्तकात वेदनेचा लवलेश उरला नव्हता. समाधानानं रजईत शिरत मी बेडस्वीचनं दिवा मालवला. छान संवाद जुळण्याची शक्यता निर्माण झाली होती. सुखस्वप्नं बघायला मी आनंदानं डोळे मिटले.

◆ ◆

# १० / म्हाताऱ्यांच्या मेळाव्यात

पॅरिससाठी मला मिळालेलं होस्टदांपत्य मोठं झकास होतं. सर्वार्थानं निराळं होतं. ॲलोकेसियाल फॅमिलियाल या संस्थेच्या कार्यतत्परतेमुळे घटस्फोटित स्त्रिया आणि बिनबापाचं जीवन जगावं लागणाऱ्या मुलांच्या आर्थिक हक्कांची काळजी घेतली जाते. त्यामुळे हल्ली तिथल्या फुलपाखरी वृत्तीच्या पुरुषांनी वेगळाच बूट काढलाय, लग्नच नको. म्हणजे घटस्फोटाचा, पर्यायानं ॲलिमनीचा (पोटगी) प्रश्नच नाही. त्यामुळे लग्न न करता नुसतंच सहजीवन जगणाऱ्या दांपत्यांचा सुळसुळाट झालाय. गेली सात-आठ वर्षे या प्रकारचं दांपत्यजीवन जगणारी अविवाहित जोडपी बरीच भेटली. त्या पार्श्वभूमीत दोन वर्षांपूर्वी विवाहबद्ध झालेले पास्कल आणि मिशेल मला फार वेगळे वाटले. याच कारणामुळे नव्हे तर त्यांची 'लव्ह स्टोरी' ऐकून मी थक्कच झाले. मिशेलनं माझ्या रंगाचं कौतुक केलं तेव्हा मला थोडं ते औपचारिक वाटलं होतं. पण पास्कलच्या प्रेमात पडण्यापाठी त्या मध्यम रंगाचं, टॅन कॉपर कलरचं आकर्षण होतं हे कळलं, तेव्हा मी अवाक् झाले. वाटलं, हिला या रंगाची क्रेझ आहे. पण भुरळ पडल्या अवस्थेतही पाय जमिनीवर घट्ट रोवण्याचं कौशल्यही साधलंय तिनं! कारण-

मिशेल डेंटिस्ट! म्हणजे उच्च विद्याविभूषित! पॅरिसच्या मोठ्या उपनगरांतील सुखवस्तू सुशिक्षित कुटुंबात जन्मलेली आधुनिक मुलगी! पास्कलच्या शब्दांत सांगायचं तर सर्वार्थानं प्युअर ब्रीड! त्या विरुद्ध पास्कल! दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांनी फ्रान्सला तोंफेतोंडी दिलं, त्या वेळच्या परिस्थितीचं मिशेलनं फार करुण शब्दांत वर्णन केलं होतं. फ्रान्सच्या धरतीवर अक्षरश: तरुण पुरुष दिसणं अवघड होऊन बसलं होतं. वस्ती होती स्त्रिया, म्हातारे आणि मुलं यांचीच! (तिच्या वर्णनात मला कुठेतरी पानिपतच्या युद्धानंतरच्या महाराष्ट्राच्या परिस्थितीशी साम्य दिसलं) कदाचित त्यामुळे असेल, पण चारित्र्याविषयीच्या संकल्पनांचा फ्रान्समध्ये छेद उडाला. जगण्यासाठी धडपड हेच जीवन बनलं. नाहीतरी खूपदा संस्कृती, संस्कार, चारित्र्य यांचं स्तोम भरल्यापोटी शिळोप्याच्या गप्पांसारखं माजवण्यात येतं. फ्रेंच लोकांच्या सैल चारित्र्याविषयीच नव्हे तर आनंदी वृत्तीसाठीही दुसऱ्या महायुद्धाचा हवाला देत मिशेल म्हणाली होती, "अगं नाणसानं रडायचं तरी कुठवर? आहे त्यात आनंद शोधत, ते क्षण चघळत जगण्यातली मजा शोधली गेली असावी. मग तेच स्वभावाचं अंग बनून गेलं असणार!"

मिशेलचा पास्कल अशाच सरहद्दीवर होरपळ झालेल्या नॉर्मंडी भागातला! मोलमजुरी करताना, पोटाची खळगी भरण्यासाठी मदतरूप होणाऱ्या इटालियन पुरुषाशी त्याच्या फ्रेंच आईचा संग अनिवार्य ठरला. इकडचं काम संपताच त्या इटालियन पुरुषानं फ्रान्सचा निरोप घेतला, पण आईच्या ओटीत त्याच्या लालवट वर्णाचा पास्कल! परिस्थितीशी सतत संघर्ष करताना शिक्षणाचा विचारही डोक्यात न आलेला! गरजेच्या आणि काळाच्या प्रवाहात भरकटत पॅरिस गाठलेल्या पास्कलचा धंदा बुचरचा - स्वच्छ शब्दात म्हणायचं तर कसाईच की! या कसायाच्या गिऱ्हाइकांत मिशेल! त्याच्या ताम्रवर्णाच्या आकर्षणापायी खुळावली! पण-

पण इथे कसायाला धार्जिणी ठरलेली गाय मात्र तिला व्हायचं नव्हतं. तिनं चक्क कसायालाच गायीच्या कळपात खेचून आणण्याचा पराक्रम केला. परिस्थितीमुळे शिक्षणास वंचित ठरलेल्या पास्कलला तिनं शिकवायला सुरुवात केली. शिक्षणात प्रगती होत असूनही मिशेल स्वत:ला आवडली आहे असं म्हणण्याचं धाडस पास्कलपाशी नसणं स्वाभाविक होतं. डेंटिस्ट, शिवाय अमेरिकारीटर्न पोरगी पटवायचे शेखचिल्ली विचार पास्कलच्या डोक्यात नव्हते. मनात होता मिशेलविषयी नितांत आदर! तिचा प्रत्येक शब्द अस्तित्वाची ओंजळ करून झेलायचा हेच त्याला ठाऊक! ती जे म्हणेल त्याला होकार देण्याची क्रिया प्रतिक्षिप्त क्रियेसारखी सहजपणे व्हायची. पास्कल पदवीधर झाला. त्या आनंदात त्यानं मिशेलला झकास पार्टी दिली. या यशाचं कौतुक म्हणून किंवा विद्यार्थ्यासाठी भेट म्हणून मिशेलबाई एंगेजमेंट रिंग (अंगठी) आणून मोकळ्या झाल्या. ''अंगठी माझ्याकडून घालून घेणं तुला मंजूर आहे नं?'' या प्रश्नाला पास्कलनं सवयीप्रमाणे होकार दिला. यावर मिशेलनं विचारलं, ''माझ्यासाठी अशी अंगठी कधी आणशील?'' तेव्हा कुठे तिच्या पहिल्या प्रश्नाचं पास्कलला खऱ्या अर्थानं आकलन झालं. त्याचे डोळे पाणावले. जे स्वप्न कधीही सत्यात उतरणार नाही ते पडूच नये म्हणून झोपही टाळणारा पास्कल मिशेलची निरागस मुद्रा पाहून हेलावला.

''कमाल गं बाई तुझी!'' तिची ही विजयगाथा ऐकून मी कौतुकानं म्हणाले, ''हा कसाई आहे म्हणून त्याच्याकडे तू पाठ फिरवली नाहीस, अशिक्षित आहे म्हणून त्याला कमी लेखलं नाहीस, तो पदवीधर होईतो मनातील भावना ओठी आणली नाहीस. हे सारं मला फॅटसीसारखं अकल्पनीय वाटतंय!''

''मग?'' मिशेलच्या स्वरात सार्थ अभिमान होता. ''तुला म्हटल नं मी? माझ्या कोशात चालेल हा शब्द नाही, तसाच 'जाऊ दे' हा ही शब्द नाही. पूर्ण विचारांती घेतलेल्या माझ्या निर्णयावर माझा पूर्ण विश्वास असतो. हल्लीच्या ट्रेंडप्रमाणे यालाही लग्न नको वाटेल. तो 'गरज सरो आणि वैद्य मरो' असं वागेल. अशी माझ्या मैत्रिणी मला भीती घालीत होत्या, पण मी डरले नाही. पुरुष लग्न नको म्हणतात ते घटस्फोटाच्या भयानं! ते भय पास्कलच्या मनात कधी नसेलच. मग त्यानं लग्न का टाळावं?''

तिचा रोकडा प्रश्न! त्यातून निथळणारा आत्मविश्वास अजोड होता. पास्कल

कौतुकानं तिच्याकडे बघत होता. त्या नजरेत तिच्या उपकाराखाली दबलेल्या ओशाळ-वाण्या वाटणाऱ्या पुरुषाची लाचार भावना नव्हती. त्या नजरेत होतं, अस्सीम आदर आणि अनोख्या प्रीतीचं विलोभनीय मिश्रण! 'खरंच मेड फॉर इच अदर' वाटावं असंच ते कपल होतं.

"याक्षणी तू कुठे आहेस ठाऊकाय तुला?" भारावल्या अवस्थेत मी गटांगळ्या खात असताना मिशेलनं विचारलं. माझ्याकडून उत्तर अपेक्षित नव्हतंच. क्षणभर थांबून तीच म्हणाली, "आत्ता आपण आहोत वृद्धाश्रमाच्या इमारतीत!"

ती काय म्हणतेय ते मला कळेना. रात्री उशिरा इथे पोहोचलो तेव्हा इमारतीची पाटी वगैरे बघितली नव्हती. घराबाहेर पडणं अजून झालं नव्हतं. कारण ब्रेकफास्ट घेताना सुरू झालेली परस्परांच्या परिचयाची प्रक्रिया अजून संपली नव्हती. मला गप्पं पाहून ती म्हणाली, "खरंच स्मिता! या 'ओल्ड पीपल्स होम'चा पास्कल संचालक आहे. त्या नात्यानं हे घर आणि तू आहेस ती आणि अजून एक अशा दोन गेस्ट रूम्स आम्हाला वृद्धाश्रमाकडून मिळतात, म्हणजे आपण मिशेलच्या नव्हे तर पास्कलच्या घरात आहोत, तुला कळलं? माझं बोट धरून पास्कलनं सुरुवात केली असली तरी संधी मिळताच कर्तृत्वाचा आलेख आकाशाला भिडविण्याचा पुरुषार्थ त्याचा आहे."

मिशेल तिच्या सवयीप्रमाणे खळखळून हसली. मी आदरानं पास्कलकडे पाहिलं. मिशेल बोलतच होती. "तू इथे राहणारच आहेस. थोडी रुळलीस, की आपोआप याला काय म्हणायचंय ते तुला कळू लागेल. तो तुला सारं दाखवेल. मीही फेमिनिस्ट आहे बरं का! आमची संस्था दाखवेन तुला. पण आज सुट्टी आहे. आम्ही खूप भटकायचा बेत केलाय. तू पटकन तयार हो. आपली कॅम्पिंग कार आहे. ती घेऊन आपण भटकू!"

होकार देत मी उठले. तयार होतानाही विचारचक्र फिरत होतं. कलमद्वारा काऊन्से-लिंग सुरू केलं. तेव्हापासून कौटुंबिक समस्यांचा सखोल अभ्यास आपोआप घडत होता. मुंबईतच नव्हे तर समग्र देशात औद्योगीकरण आणि मोठ्या शहरातील जागेचा अभाव विक्राळ प्रश्न बनताना दिसला होता. कुटुंबाचा आकार लहान आणि जागाही छोट्या. मनं मोठी असणाऱ्या छोट्यांच्या घरातही मोठी अडचण बनत असल्याचं दिसत होतं. छोट्यांची लाचार स्थिती आणि परिस्थितीसमोर वाकताना मोठ्यांना घेरणारं फ्रस्ट्रेशन फार जवळून दिसलं होतं. उभयपक्षांचा तटस्थ मनानं विचार करताना वाटलं होतं, खरंच वानप्रस्थाश्रमाची संकल्पना मोडीत जायला नको होती. वृद्धाश्रम म्हणण्यापेक्षा या व्यवस्थेला वानप्रस्थाश्रम म्हणून स्वीकारलं तर याला येणारं अनाथाश्रमासारखं दयनीय स्वरूप टाळता येईल. नाकारलेपण टाळायचं असेल तर स्वत:च्या पायानं वानप्रस्थाश्र-माची वाट धरावी. उभयपक्षी गोडी असताना निवृत्त व्हावं. हा निश्चय निर्णयाचं रूप घेत होता. साठी झाली की वृद्धाश्रमात जायचं असं म्हणणारी मी नाकावर चाळिशी स्वार होण्यापूर्वीच अलगद वृद्धाश्रमात आले होते. इकडच्या वृद्धाश्रमांचं स्वरूप बघायची इच्छा मी माझ्याविषयीच्या माहितीत व्यक्त केली होतीच. त्याचं फॉलो अप आपल्या

आणि यांच्या संस्थेनं इतक्या छान रीतीनं केलेलं पाहून दाद दिल्याविना राहवेना.

रविवारीच मला त्या दोघांनी त्यांच्या वृद्धाश्रमात हिंडवलं. इथल्या वास्तव्यात वृद्धाश्रमात मुक्त संचार.करायची परवानगीही बहाल केली. त्यामुळे तेरा दिवस मी वृद्धाश्रमात पाहुणचार झोडत होते. मनात सतत 'इथे' 'तिथे'ची तुलना होणं स्वाभाविक होतं. आपल्याकडे दिसणारी वृद्धांची चिडचिडी वृत्ती वा तरुणांविषयीचा खदखदणारा असंतोष इथे दिसला नाही. अलिप्ततावाद हाच जीवनमंत्र असल्यामुळे इथे वर्चस्व गाजवणं, वडिलकीचा अस्वीकार हे मुद्देच नाहीत. कदाचित या कारणांमुळे इथे संध्या-छायांचे रंगही मनोहर वाटले.

आपल्या इथून तीन आठवड्यांत सात (कमी-अधिक) देश बघायला व्यावसायिक टुरीस्ट कंपनीबरोबर लोक जातात. मॅनर्सच्या नावाखाली इथली मंडळी त्यांच्याजवळ आपल्या कुटुंबसंस्थेचं कौतुक करतात. इतक्याच भांडवलावर आपण त्यांची स्थिती दयनीय आहे या निष्कर्षावर येऊन पोहोचतो. त्यांच्या बेजबाबदार वर्तनावर टीकेची झोड उठवतो. ते किती खोटंय हेच या तेरा दिवसांच्या वास्तव्यात प्रकर्षानं मला जाणवलं. आपल्या कुटुंबसंस्थेचे पोवाडे गाताना आपला आतला आवाज दाबून टाकायचा प्रयत्न असतो, याची या अशा 'फॉरिन रीटर्न्ड' लोकांना कल्पनाच नसेल, असंही वाटत नाही. आपल्या इथे विसंवाद नाही, असं म्हणताना संवादच नाही तिथे सुसंवाद वा विसंवादाचा प्रश्नच उभा राहत नाही, हे त्यांनाही पटत असणार. संस्कृतीच्या नावाखाली ढोंगीपणानं कौटुंबिक ताणतणाव दडपायची आपली मनोवृत्ती आहे हे कटू वाटलं तरी सत्यच! त्या पार्श्वभूमीवर पास्कलच्या वृद्धाश्रमातलं वातावरण खूपच खेळीमेळीचं वाटलं.

या वृद्धाश्रमातही दयनीय वृद्ध होते, पण ते फ्रेंच नव्हते. भौतिक समृद्धीच्या मोहानं तरुण असताना इथे आलेले, पण इतकी वर्षे इथे राहिल्यावरही स्वत:ची वृत्ती न बदलणारे ते आशियन वृद्ध होते. 'बी रोमन व्हेन यू आर इन रोम' हे तत्त्व डावलून पाण्यात राहून कोरडे राहिलेले हे वृद्ध मात्र आपल्या इकडच्या वृद्धाश्रमात भेटणाऱ्या वृद्धांसारखेच वाटले. तरुणांवर वर्चस्व गाजवता न आल्यामुळे पराभूत वाटणारे! डिटॅच्ड-मूळ उचकटल्यासारखे! पण इतर मात्र मजेत होते.

पास्कलच्या वृद्धाश्रमाचं स्वरूप विशाल वसतिगृहासारखं आहे. फ्रान्समध्ये निवृत्तीच वय पासष्ट असल्यामुळे सारे पासष्टच्या पुढचे! इथलं सरकार वृद्धांना १२५० फ्रँक्स ओल्ड एज अलाऊन्स देतं. त्यात वृद्धांच्या गरजा भागतात. बचतीचा बाऊ जो आपल्याला नेहमीच करावा लागतो ती बचत यांच्यासाठी अनिवार्य नसते. इथे तीनशे फ्रँक्स मोजले, की संपूर्ण महिना जेवण मिळतं. वृद्धांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या 'पॅरीशिअन लिबेर' या साप्ताहिकात कुठच्या वृद्धाश्रमात किती जागा आहेत, याची माहिती प्रसिद्ध होते.

मी राहिले त्या वृद्धाश्रमात ८५ ॲपार्टमेंट्स होती. त्यात वृद्धांना पसंतीसाठी भरपूर वाव होता. म्हणजे यातील काही जागा दोन खोल्या, स्वयंपाकघर; काही एक खोली,

स्वयंपाकघर असलेल्या होत्या. काही सेल्फ कंटेंड खोल्या दोघांसाठी तर काही सिंगल एकट्या राहणाऱ्या वृद्धांसाठी होत्या. स्वत: स्वयंपाक न करू इच्छिणारे अशा सेल्फ कंटेंड जागा पसंत करू शकत. म्हणजे निवृत्तीतही त्यांना घरासारखं जीवन मिळू शकत होतं.

या प्रचंड इमारतीच्या तळमजल्यावर मेस होतं. रोज इथेच जेवणाऱ्यांसाठी डायनिंग हॉलही होता. रोज हाताने स्वयंपाक करणाऱ्यांना कधी कंटाळा आला तर पूर्वसूचना देऊन जेवण्याची सोय होती. डायनिंग हॉलला जोडून क्लब होता. इथे टेबलटेनिस, कॅसिनो, ब्रिज, रमीसारखे हलके फुलके खेळ खेळण्याची सोय उपलब्ध होती. जवळच 'हॉबी रूम्स' मध्ये चित्रकाम, वाद्ये वगैरेंसाठी खच्चून साधनं होती. कॉमन रूममध्ये टी.व्ही. सेट तसेच व्ही.सी.आर. चीही सोय होती. वृद्धमंडळी वाईनचे मजेत घुटके घेत कार्यक्रमाची मजा लुटताना आढळली.

वृद्धाश्रमात दोन रात्रपाळीचे आणि दोन दिवसपाळीचे डॉक्टर सतत होते. वृद्धांच्या प्रकृतीच्या तक्रारी न कंटाळता ऐकणं व त्यांवर योग्य तो इलाज करणं हेच त्यांचं काम! काही तक्रार नसलेल्या वृद्धाचेही संपूर्ण चेकअप वर्षातून एकदा होतं. एकूणच फ्रेंच माणूस प्रकृतीच्या वा जीवनातील इतर अंगांच्या तक्रारींना भीक न घालता खुमारीनं जीवन जगणारा कलंदर वाटला. वृद्धावस्थेतही जीवन बेचव होऊ न देण्याची कला त्यांना खरंच साध्य झालीय.

सुमारे सव्वाशे वृद्धांना इथे भेटता आलं. साऱ्यांनाच काही इंग्लिश येत नव्हतं. पण गप्पांची दांडगी हौस होती. थोडं फार इंग्लिश येणारी मंडळीही हावभावांची मदत घेत, थोडे शब्द पेरत संवाद साधायचा आटोकाट प्रयत्न करीत होती. ज्यांचं इंग्लिशवर प्रभुत्व होतं ते आपणहून दुभाष्याचं काम करीत होते. अघळपघळ गप्पा मारणं, इतर देशांविषयी जाणून घेणं. समोरच्या व्यक्तीला सतत बोलतं ठेवणं या वयातही आसुसून करणारी ही वद्ध मंडळी मला मनापासून भावली. इथलं वाचनालय तर दृष्ट लागण्याजोगं देखणं आहे. फ्रेंच, इंग्लिश पुस्तकांचा अफाट सागर इथे दिसला. फ्रेंच तत्त्वचिंतक द लरी यांनी तुकारामाची गाथा फ्रेंचमध्ये आणली आहे. म्हणून तुकारामाचे चाहतेही इथे भेटले; दुर्दैवानं मुंबईतच सहसा ते तसे भेटले नाहीत.

या समस्त वृद्धसमाजाला नव्या पिढीची मदत वा लुडबूड दोन्ही नको असलेली दिसली. समवयस्क मंडळी स्वत:चं जीवन समृद्ध करताना बघणं हा खरंच सुखद अनुभव होता. गात्रं शिथिल झाली तरी स्वातंत्र्यावर घाला त्यांना नकोसा वाटत होता. स्वत:चं आणि नव्या पिढीचं स्वातंत्र्य अबाधित राहावं असं त्यांना मनापासून वाटत होतं.

या साऱ्या वृद्धांच्या रंगांत मी नखशिखान्त रंगले. त्यांतही खऱ्या अर्थानं भावनिक जवळीक साधता आली ती शहात्तर वर्षाच्या जॅकलीनशी आणि ॲस्ट्रिड डॅनियल या दांपत्याशी! कारण त्यांच्याशी बोलताना भाषेचा प्रश्न आडवा येत नव्हता.

जॅकलीनचं घर म्हणजे उत्साहाचा झराच! छोट्या सुबक स्वयंपाकघरात ती अनभि-

षिक्त सम्राज्ञीसारखी भासे. छान छान पदार्थ करायचा आणि इतरांना खाऊ घालण्याचा तिला जबरदस्त सोस! बाल्कनीतल्या छोट्या जागेत तिनं तिची सुरेख बाग तयार केली आहे. या फुलांच्या ताटव्यात उभी राहून जॅकलीन माझी वाट बघायची. नित्य नवा पदार्थ रांधून सुबक रीतीनं प्लेटमध्ये सजवून माझ्यासमोर धरायची. नव्यानं स्वयंपाक शिकत असलेल्या पोरीच्या उत्साहानं मला विचारायची, 'आवडलं?' त्यांचे सारेच पदार्थ आपल्याला विलक्षण सुंदर आणि तितकेच बेचव वाटतात. पण तिच्या निळ्या डोळ्यांत उसळणारा आनंद, उत्साह झाकोळून टाकणं मला आवडण्यातलं नव्हतं. 'व्हेरी टेस्टी!' 'मार्व्हलस!' 'डेलिश्यस' वगैरे शब्दांची आपोआप उधळण व्हायची. हा आनंद तिच्या लुकलुकत्या निळ्या डोळ्यांत गहिरा बनायचा, चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांत मंद हसायचा. तिच्या घरात पाऊल ठेवताच 'सुंदर तुझं घर!' हे बोल मनात रुंजी घालायचे.

डॅनियल ॲस्ट्रिडचा खाक्या जॅकलीनहून अगदी निराळा! ॲस्ट्रिडला स्वयंपाकाचा तर डॅनियलला भांडी घासायचा (भांडी घासण्याचे काम तिथे नवऱ्याचंच असतं). अतोनात कंटाळा! कधी काही विशेष इच्छा झाली तरच ॲस्ट्रिड तो पदार्थ घरी करायची. बाकी जेवण मेसमध्ये! अगदी चहा-कॉफीसाठीही मेसचाच आधार! तरी इथे त्यांना कुणी नावं ठेवताना दिसलं नाही. ज्याची त्याची आवड हा स्वच्छ सरळ हिशेब!

ॲस्ट्रिडच्या मनात वैविध्याची जबरदस्त ओढ! आपल्या देशात भाषांपासून भौगोलिक रचनेपर्यंत वैविध्याची रेलचेल! म्हणून ॲस्ट्रिडनं पाच वेळा आपल्या देशाचा दौरा केलाय. प्रवासाचा तिला जितका सोस तितकाच डॅनियलला कंटाळा! त्याची दोस्ती पुस्तकांशी! तुकारामाचा तो फॅन! म्हणून मराठी भाषेशीही त्याची झटापट! बोलणं जमलं तरी मुळाक्षरं येत नाहीत ही चुटपूट! ॐ काढताना पेनशी चाललेली त्याची झटापट पाहून मी खूप हसले होते. मला ॐ काढता येतो का हे त्यानं आवर्जून विचारलं होतं. इतकं अवघड अल्फाबेट लीलया लिहिणाऱ्या माझ्याकडे कौतुकानं बघत त्यानं पटकन मी विद्वान (?) असल्याचं सर्टिफिकेट बहाल केलं. मला अक्षरशः हसू आवरेना.

त्याच्या 'योगा' क्लबात हिंदुधर्माविषयी व्याख्यान द्यायला तो मला आवर्जून घेऊन गेला. मी काही या तयारीनं तिथे गेले नव्हते, म्हणून मी टाळतच होते. तरी त्याचा आग्रह चालूच. मनात म्हटलं, 'सुदैवानं विद्याप्रेमी घरात जन्म मिळालाय. 'चौथ्या कमऱ्या'ची जन्मजात भेट देताना वडील माणसांनी प्रत्येक गोष्टीचा तार्किक दृष्ट्या विचार करायची सवयही लावली आहे. या भांडवलावर जमेल ते सांगू, म्हणून मी गेले. तर यानं कार्यक्रम व्याख्यानाऐवजी फ्लोअर डिस्कशनचा (वार्तालाप) ठेवला. मी थोडी गडबडले. माझ्या प्रत्येक वाक्याचं अर्थघटन (फ्रेंचीकरण म्हणू का?) करण्याचा त्याचा उत्साह आणि बरेचदा 'ठाऊक नाही' असं सांगण्याची येणारी वेळ मला विलक्षण थकवून गेली.

हा अवघड कार्यक्रम प्राणपणानं लढवून थकल्या अवस्थेत मी परतले. ॲस्ट्रिडला

तक्रारीच्या स्वरात म्हटलं, "मी नको म्हणत होते तरी नेलं त्यानं मला! याच्या प्रत्येक कन्फ्युजनसाठी माझ्याजवळ खुलासा असायला मी काय वेदशास्त्रनिपुण आहे? पांच कार्यक्रमांची शक्ती एका कार्यक्रमात प्रश्नांच्या भडिमारांत संपली."

"पण कार्यक्रम किती छान झाला! सारे खूश होते की!"

"छान?" मी डोळे वटारून म्हटलं., "खूश होते म्हणून मला इतके प्रश्न विचारून भंडावलं? फजिती केली माझी!"

"तसं नव्हतं गं!" डॅनियल निखालस स्वरात म्हणाला, "तुला जरा जास्तच प्रश्न विचारले, हे मी नाकारत नाही. पण काय आहे? आमच्या इथे तुमच्या संस्कृतीविषयी, आचारसंहितेविषयी, धर्मग्रंथांविषयी खूप कुतूहल आहे. तुमच्याकडून कुणी आलं, की आम्ही त्यांना आवर्जून बोलवतो. आमचाही स्वत:चा अभ्यास आहे, पण खुद्द त्याच देशांतून येणारे तुम्ही 'ओरिजिनल' म्हणून आसुसून तुमच्याशी बोलायला बघतो. पण त्यांचं ज्ञान फार पेरीफेरल वाटतं. आमच्याहूनही तोकडं! ते मोकळेपणानं कबूल करण्याऐवजी आमच्या प्रश्नांना दडपून खोटी उत्तरं दिली जातात. दिशाभूल करण्याचे हे प्रयत्न वा हिपोक्रसीचा मनात तिटकारा असूनही आम्ही मॅनर्स म्हणून गप्प बसतो. तुझ्या बाबतीत तसं झालं नाही. म्हणजे तू प्रकांड पंडित आहेस असं तोंड देखलं नाही, पण तुला जे ठाऊक नव्हतं तिथे ते कबूल करण्याचा मोकळेपणा तुझ्याजवळ दिसला. म्हणून तुला विश्वासानं प्रश्न विचारले. उत्तर मिळालं तर ते खरं असेल हा विश्वास तू निर्माण केलास म्हणून!"

मला मजाच वाटली. 'आय डोंट नो!' या उत्तरात अज्ञान अभिप्रेत होतं. ते विश्वासाला जन्माला घालणारं ठरेलसं वाटलं नव्हतं.

"काय सांगू तुला?" ॲस्ट्रिड गोड तक्रार करीत म्हणाली, "याचा हा छांदिष्टपणा आणि अंगात आळस मुरलेला! प्रवास नकोच याला! पण इंडियातून परतताना माझी बॅग यानं मागवलेल्या पुस्तकांनी तटतटायची बघ! पुस्तकं आणि कडक तंबाखूच्या विड्याच असायच्या सामानात!"

तिला हातानं थांबायचा इशारा करीत मी खोलीकडे धावले. गिफ्ट आर्टिकल्सपैकी अवघा एक पितळी ॲश ट्रे आणि विड्यांचं एकच बंडल उरलं होतं. ॲस्ट्रिडला द्यायला जवळ काही उरलेलं नाही याची चुटपूट मनात होतीच. ॲश ट्रेत, फुलदाणीत फुलं ठेवल्यागत मी विड्यांचा झुबका ठेवला. डॅनियलसमोर तो धरून मी म्हटलं, "अंकल, हिअर इज समथिंग स्पेश्यली फॉर यू!"

जाड भिंगाच्या चष्म्यातही त्याचे डोळे आनंदानं चमकल्याचं मला जाणवलं. टुणकन् उडी मारून तो माझ्या दिशेला झेपावला. (अवघे चौऱ्याऐंशी वयमान) माझे दोन्ही हात घट्ट दाबून धरत म्हणाला, "मेर्सि! मेर्सि! बोक्कु!! यू स्वीट गर्ल!..." आणि काय होतंय हे मला कळण्यापूर्वी त्यानं पटकन मला उचललं (वजन फक्त अठ्ठावन किलो) आनंदानं गरागरा फिरवून त्यानं मला परत जमिनीवर उभं केलं. त्याच्या या अघोरी

गाऱ्यागाऱ्या भिंगोऱ्यासाठी मी मानसिकरीत्या तयार नव्हते. त्यानं खाली ठेवताच मी हेलपाटले.

आनंद व्यक्त करायची यांची अशी रीत! मानभावीपणा, भावना लपवून चेहरा मख्ख ठेवणं वगैरे नाहीच. भेट स्वीकारून आपण भेट देणाऱ्यावर उपकार करतोय असे तिरसट भाव तोंडावर आणणं नाही. सकस आहार आणि तणावमुक्त जीवन जगण्याच्या पद्धतीनं आरोग्य इतकं छान राहिलेलं की चौऱ्याऐंशी वय असताना उणंपुरं अठ्ठावन किलो वजन उचलणंच नव्हे तर लीलया फिरवणंही जमावं. पण त्याच्या या अनपेक्षित आक्रमणानं मला मात्र भोवळ आली. माझी अवस्था पाहून ॲस्ट्रिड डॅनियलवर ओरडली, "ए धुसमुसळ्या! तुझा दांडपणा कधी कमी व्हायचा रे? पोर भोवंडली नं!"

माझ्या ओठी जिंजरेलचा ग्लास लावत ॲस्ट्रिडनं अपराधी मुद्रेनं बघितलं. पण डॅनियल? पत्नीच्या दटावणीचा त्याच्या आनंदावर किंचितही परिणाम नव्हता. ॲस्ट्रिड बिचारी, "मी म्हणून खपवून घेते सारं! सगळ्यांना का छळतोस?" असं काहीतरी कुरकुरत होती. पण हा मजेत विड्यांच्या कौतुकात मग्न! एक विडी काढून त्यानं जोरदार झुरकाही घेतला. 'अय्या! हे अगदी आपल्या सारखंच की!' त्या भोवंडल्या अवस्थेतही माझं 'इथे तिथे' मध्ये रमणारं मन पुटपुटलं. विडीचा जोरदार कश घेत डॅनियल विचारत होता, "ए, तू बरी विड्या घेऊन आलीस ग? अशी भेट मला कुणीच दिली नव्हती. क्यूट भारतीय पोरीकडून ही भेट मिळाली. इतकी वर्षे जगल्याचं सार्थक झालं."

मी स्वत:शीच हसले. इथे असोसिएशनच्या मीटिंगच्या वेळी बाबूभाई कराणी की.डी.डी. परांजपे सहज म्हणाले होते, तिकडच्या खूप जणांना आपल्या देशी विड्या आवडतात. ज्यांच्याकडे भेटायला जाणार त्यांना द्यायला टोकन गिफ्ट म्हणून भाराभर देशी वस्तू आणल्या होत्या. त्यात मी सिन्नर बिडीच्या डझनभर बंडलांची भर घातली. प्रवास संपत आला होता. ॲस्ट्रिडला काय देणार? या प्रश्नात गुदमरत असताना डॅनियलची आवड कळली. मी आनंदले. कडक तंबाखूचा वास मला सहन होत नाही. पण तंबाखूनं हरवलेलं बालपण मला परत आणून दिलं होतं. 'क्यूट गर्ल!' 'स्वीट गर्ल!' या फार वर्षांत ऐकायला न मिळालेल्या शब्दांची माझ्यावर उधळण केली होती. तंबाखूच्या सहाय्यानं कधी भावनिक सेतू बांधणं जमेल अशी कल्पनाही केली नव्हती मी! अर्थात् तो संपूर्ण काळच कल्पनातीत सुखात चिंब भिजण्याचा होता.

भारतात वारंवार येऊन गेलेली ॲस्ट्रिड इथल्या वृद्धांच्या संदर्भात रोकठोक स्वरात म्हणाली होती, "वार्धक्य ही काही अनपेक्षितपणे कोसळणारी आपत्ती नव्हे. निवृत्तीनं यांना बावरायला का होतं? विशेष तर तुमचे पुरुष निवृत्त होताच हतबल का होतात? आधीपासून निवृत्त जीवनाची योजना का करीत नाहीत? स्वत: शून्यावकाश निर्माण करायचा, त्या पोकळीत गुदमरायचं आणि आपल्या बच्छड्यांना त्यात गुदमरायला लावायचं यात काही अर्थ आहे का?"

वृद्धांचं काऊन्सेलिंग करताना थोड्या फार अंशी हेच विचार मी मृदू शब्दांत मांडत

होते. निवृत्तीची तारीख नोकरीला लागतानाच नक्की झालेली असते. तीस-पस्तीस वर्षे जे ठाऊक असतं, त्याविषयीचं प्लॅनिंग निदान शेवटच्या पाच वर्षांत तरी करायला नको का? पण कुणी आततायीपणे म्हणायचं, 'तुमच्यावर वेळ येईल तेव्हा कळेल.' माझ्या आचार-विचारांत एकवाक्यता आहे की नाही ते सिद्ध व्हायचं बाकी होतं. पण ॲस्ट्रिड 'आधी करून सांगत' होती. त्यामुळे तिच्या सांगण्याला वजन होतं, ते माझ्या म्हणण्याला आज तरी नसणारच. माझी 'पुराणातली वांगी पुराणात' राहणार की...हे काळच दाखवून देणार. तरीही वाटलं...जीवनाचे टप्पे तीन! पायाभरणीचं बाल्य! कर्तृत्वाची इमारत सजविण्यासाठी तारुण्य! आणि तारुण्यात बांधलेल्या देखण्या वास्तूकडे कृतकृत्य नजरेनं बघण्यासाठी, त्यावर फिनिशिंगचा हात फिरवायला वार्धक्य! निवृत्त, तरीही प्रवृत्त जीवन जगावं वाटावं असं!

ॲस्ट्रिड तेव्हा म्हणाली होती, "सोळा वर्षांची झाले आणि मी स्वतंत्र झाले. मी का माझ्या मुलांकडून अपेक्षा करू? माझ्या समस्यांशी मीच झगडले. मग माझ्या मुलांनी का माझ्या मदतीची अपेक्षा करावी? का माझा पांगुळगाडा त्यांना हवा असेल? आमचं सरकार आमची जरूर ती काळजी घेतं. तरुणही सन्मानानं वागवतात. पिक अवर्समध्येही आम्ही चिरडले जात नाही. ते आम्हाला बसायला जागा देतात. याहून आमची अधिक अपेक्षा नसते. त्यांनी मागितला तर आम्ही त्यांना सल्लाही देतो. पण त्यांनी त्याप्रमाणे वागलं पाहिजे, असा आग्रह आमच्या मनात नसतो. मला वाटतं, तुमच्या बुजुर्गांचा तो हट्टाग्रह असतो, म्हणून ते चिडचिडे होतात."

फार पटलं मला ते! खरंच! हा वृद्धाश्रम, इथलं वातावरण फार आवडलं मला. निवृत्तीतही प्रवृत्तींनी बहरलेलं! धकाधकीच्या जीवनात जे छंद जोपासता आले नाहीत ते जोपासायची संधी मिळाली असावी अशा थाटात इथे वृद्ध त्यांच्या 'छांदिष्टपणा'ला खतपाणी घालत होते. कुणी मेंडोलीनच्या तारा पिरगळताना संधिवातानं वाकड्या झालेल्या बोटांवर कुरघोडी करत होतं. कुणी हातात ब्रश घेऊन रंगाच्या जगात रमलं होतं. कुणी स्वत:ला साहित्याच्या महासागरात झोकून दिलं होतं. कुणी सोळावं वर्ष लागल्यागत पृथ्वी पादाक्रांत करायचं स्वप्न बघत होतं. कुणी अध्यात्मात रमतानाही तार्किक विचारांच्या बैठकीपासून फारकत न होण्यासाठी धडपडत होतं. खेळ खेळताना या सुरकुतल्या चेहऱ्यांच्या वृद्धांच्या डोळ्यांत बालकांची लुच्चेगिरी चमचमताना पाहिली आणि मी थक्क झाले.

ब्रिटिश माणसाहून फ्रेंच माणूस बोलघेवडा! अनौपचारिक बंधनांविषयी नावड असलेला, रंगेल आणि कलासक्त! प्रत्येक क्षण आसुसून जगू पाहणारा! साहित्य, संगीत आणि कलांचा निश्चितीनं आस्वाद घेणारी ही पिढी मला भलतीच मोहक वाटली! ढसाढसा दारू ढोसणं इथं नाही. फ्रेंच वाइनच्या प्रत्येक थेंबाचा आस्वाद घेत हे लोक जीवनही कणाकणानं स्वानंदात रममाण होत उपभोगत असताना दिसले. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगळी! त्याप्रमाणे ज्यानं त्यानं आपलं जीवन फुलवलेलं! त्यांना

वृद्ध म्हणायचं, ते त्यांची जन्मतारीख जुनी म्हणून! बाकी त्यांच्या रसरसत्या वृत्तीला वृद्धत्वाचा शाप नाही. शरीर सुरकुतलं तरी मन ताजं! कुरकूर करण्यापेक्षा आनंदाच्या नव्या वाटा शोधत पुढं सरकायचं, हेच यांच्या जीवनाविषयीचं तत्त्वज्ञान! साधं! आणि सोपं! कोण काय म्हणेल याचं भय नाही. कुणी म्हातारचळ लागला असं म्हटलं तर? हा प्रश्न नाही. कारण इथे खरंच कुणी काही म्हणत नाही. हेवा वाटला मला या पिढीचा!

आपल्या वृद्धांनीं 'तसं' जगावं असं वाटत असतानाच आपल्या इथल्या त्रुटीही नजरेआड होत नव्हत्या. आपल्या वृद्धांना आर्थिक दृष्ट्या खात्रीनं सुरक्षित वाटेल अशी काळजी आपलं सरकार घेत नाही. त्यामुळे धकाधकीच्या जीवनात बचत ही मोठी जबाबदारी ठरते. पुरेशी बचत म्हणजे काय? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. वाढत्या महागाईनं 'पुरेशी' हा शब्द निरर्थक ठरवलाय हे कसं विसरायचं? त्यात भरडला जाणारा तरुणवर्गच जिथे अकाली वृद्ध होतोय तिथे वृद्धांना सहानुभूती कुठून आणायची? आर्थिक अडचणी आणि अपुरी जागा असंतोषाची ठिणगी टाकतात. बघता बघता मग वणवा नजरेस पडतो. पास्कलच्या वृद्धाश्रमाच्या वर्तुळाकार प्रशस्त इमारतीवर नजर फिरत असताना, मधल्या मोकळ्या जागेत डुलणारा बगिचा बघत असताना मन आठवत होतं, मुंबईचेच नव्हे तर विकसनशील शहरात वाढीस लागलेले सिमेंटच्या जंगलांचे बगिचे! नजरेपासून दूर दूर जाणाऱ्या हिरवळीचं वास्तव! आर्थिक आणि सांस्कृतिक कात्रीच्या दोन पात्यांत भरडली जाणारी आपली पिढी आणि त्यांचे दाहक प्रश्न, फालतू समजणारे हताश वृद्ध...खरंच वणवा भडकत होता, तो अनाठायी नक्कीच नव्हता. पण म्हणून काय वणवा विझवायचा नाही? सारं बेचिराख होईल याची वाटच बघायची? वाटलं, आपणही जीवनावर भरपूर प्रेम केलंय. आनंदाचे क्षण मिळवायला अलोट संघर्षाला सामोरं गेलोय! आशावाद आपल्या रक्ताच्या कणाकणांत वाहतोय. योजक स्वभावामुळे कधी 'प्लॅनिंग मास्टर' हा टोमणाही हसत पचवलाय आपण! त्यात या नव्या अनुभवाची शिदोरी आणि स्मृतींच्या शिंपल्यांत जपलेल्या मोती-पोवळ्यांच्या तोलाच्या आठवणी आपल्याला नक्की मार्गदर्शन करणार आहेत. पुरणांतली वांगी पुराणात ठरायची नाहीत. रूळ बदलताना क्षणभर खडखडाट जाणवला तरी दुसऱ्याच क्षणी गाडी नव्या रुळावर रुळतेच की! सैरभैर न होता संध्या-छायांचं स्वागत करणं नक्की जमेल आपल्याला! अर्थात् या झाल्या पुढच्या गोष्टी! या अनुभवाच्या कथा सांगून आजही जीवनसंस्थेचं स्वागत करायला बुजुर्ग मंडळींसमोर मदतीचा हात धरता येईलच की! संध्या-छायांच्या मनोरम उधळणींची याद जिवाच्या करारानं स्मृतिमंजुषेत जपायला हवी! जपायलाच हवी!

◆ ◆

# ११ / चित्तरकथा स्पर्म बँकेची

असोसिएशनच्या कार्यक्रमांत 'तो' दिवस 'ला डिफेन्स' साठी मुक्रर झाला होता. मीटिंग पॉईंटवर सारी जमताच असोसिएशनच्या कार्यकर्तीनं सांगितलं, 'ला डिफेन्स'चा परिसर बघून झाला, की डॉक्टर्ससाठी एक विशेष कार्यक्रम नियोजित केलाय...' मी डॉक्टर नसल्यामुळे हा प्रश्न आपला नाही म्हणत मी (unusing line) 'ला डिफेन्स' विषयी माहिती पुरविणाऱ्या ब्रोशर्सकडे मोहरा वळवला. आपल्या इकडच्या धारावी, माहीम झोपडपट्टीशी स्पर्धा करू शकेल अशा ४९ एकरांच्या गलिच्छ परिसराचा त्यांनी कायाकल्प करण्याचा सफळ प्रयत्न केलाय. 'तेव्हा' आणि 'आत्ता' या शीर्षकाखाली समोरासमोर फोटो छापलेले होते. ते बघत असताना कार्यकर्तीचे शब्द कानांवरून सरकत होते. ऐकू येत होते आणि नव्हतेही! पण, 'स्पर्म बँक' शब्द कानी पडला आणि मी कान टवकारले... निकालात निघालेली बाब पुन्हा विचारात घेता आली तर? या प्रश्नानं मनात हुरहूर दाटवली. स्पर्म बँक बघायची संधी आपल्याला नाही हे सतत टोचत होतं.

"डबा उघडलायस, तरी का तोंड बंदच?" बडोद्याच्या सौ. (डॉ.) नेने विचारीत होत्या. नेने दांपत्याशी छान सूर जुळले होते. बेर्नेला जाण्यापूर्वी चार्ल्स-द-गॉलवरच ही जोडी बडोदा ग्रूपची असावीसं वाटलं होतं. पण ती वस्तुस्थिती ठरण्यापूर्वीच ते 'मार्सालिस'ला जाण्यासाठी निघून गेले होते. बडोद्याच्या संध्या, राहुलकडून ते डॉक्टर नेने ऊर्फ दादूमिया असल्याचं कळलं. शालेय जीवनात या बुजुर्ग दांपत्याशी दाट परिचय होता. पण मध्ये २०-२५ वर्षांत गाठभेट नव्हती. माझं तर संपूर्ण नाव बदललेलं! त्यांनी मला ओळखणं अपेक्षित नव्हतंच. पॅरिसला भटकंतीसाठी संपूर्ण संच एकत्र झाला. पहिल्याच दिवशी मी ओळख देऊन परिचय ताजा केला होता. लोकसत्तेच्या वाचकांशी 'दादूमिया' या नावानं परिचित असलेल्या डॉक्टरांनी आणि त्यांच्या डॉक्टर पत्नीनं आनंदानं मला त्यांच्यांत सामावून घेतलं होतं. मी पूर्वीसारखी त्यांना दादा-वहिनी म्हणू लागले होते. माझं गप्प असणं त्यांना जाणवणं स्वाभाविक होतं. लटकं हसून मी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. तरी मी उगीच गप्प आहे हे त्यांना पटेना.

"कधी काळी डॉक्टर व्हायची इच्छा होती", मी उदास स्वरांत मन मोकळं केलं. "ते जमणार नव्हतं म्हणून जीवशास्त्रात पदवी घेतली. परीक्षेचे झेंगट नसूनही जेनेटिक्स-विषयी हाती आलेलं प्रत्येक अक्षर आसुसून वाचते. मी मेडिकल सायन्सविषयींचे टी.व्ही.

कार्यक्रम आणि लेख वाचूनच थांबले नव्हते. या क्षेत्रात आगळं-वेगळं करून ज्यांनी स्वत:ची पाऊलखूण उमटवली आहे अशांच्या मुलाखती मी हौशीनं घेत आलेय. माझ्या अल्प ज्ञानाच्या मदतीनं सामान्य माणसांच्या मनांतील शंका त्यांना विचारून त्यांची उत्तरं सामावणारे लेख मी आवर्जून लिहिलेत. पण त्याचं इथं काय ? स्पर्म बँकेविषयी माझ्या मनात कितीही कुतूहल असलं तरी मला संधी नाही. मी डॉक्टर कुठेय ? त्यासाठी प्रयत्नही अशक्य ! संध्याकाळपर्यंतच काय, या जन्मी यापुढे मी डॉक्टर होऊ शकणार नाहीय. 'ती बस' चुकलीच !''

''त्यात काय ? तू चल नं !'' वहिनी म्हणाल्या, तरी डॉक्टर नसताना जाणं मला पटत नव्हतं. ''पत्रकार म्हणून येतेस ?'' त्यांनी विचारलं.

''त्यांनी पत्रकारांना कुठे बोलावलंय ?'' मी चडफडत म्हटलं.

''बोलावण्याचा प्रश्न नसावा.'' दादा समजुतीच्या स्वरांत म्हणाले, ''नॉन मेडिकल लोकांना त्यांत स्वारस्य नसणार. त्यांच्यासाठी कार्यक्रम कंटाळवाणा ठरेलसं वाटून त्यांनी डॉक्टर्सनाच बोलावलं असणार. इतर कुणासाठी ते हरकत घ्यायचे नाहीत.'

''हा तर्क झाला !'' मी कुरकुरले.

''तू आमच्याबरोबर यायचंस ! कसं करायचं ते मी बघतो. ओ. के. ?'' दादांनी निर्वाणीचा स्वर लावला. मला विरोध करणं जमेना. जाण्याची इच्छा होतीच. फक्त गुपचूप डॉक्टरांच्या कळपात शिरणं चोरट्यासारखं वाटत होतं. पण वहिनी सतत माझी पाठ धरून होत्या. त्यांच्याबरोबर स्पर्म बँकेच्या इमारतीत प्रवेश केला तरी मन अस्वस्थ होतं, पण दादांनी अत्यंत सहजपणे ही निरगाठ ठरवली. बुजुर्ग डॉक्टर या नात्यानं स्पर्म बँकेच्या कार्यकर्त्यांशी त्यांनी भारतीय डॉक्टर्सचा परिचय करवून दिला. शेवटी माझी ओळख करून देत मी जर्नालिस्ट म्हणून आल्याचं सांगितलं आणि फसवणुकीची भावना नष्ट झाल्यानं मी तणावमुक्त झाले. मनापासून सारं बघू लागले.

काऊन्सेलिंग करताना स्वत:त न्यून नसूनही वांझ ठरलेल्या बऱ्याच स्त्रियांच्या सहवासात येणं झालं होतं. अशा स्त्रियांना मातृत्व प्राप्त करून देण्याच्या संदर्भात स्पर्म बँकेविषयी मनात प्रचंड कुतूहल आणि आकर्षण होतं. ते शमण्याची संधी आयतीच चालून आली म्हणून मी खुशीत होते. स्पर्म बँकेत काम करणाऱ्या निष्णाताच्या सहकार्यानं मी सारं बघत होते. भाषेचं तोकडं ज्ञान आणि वैद्यकशास्त्रांतलं अज्ञान - तरीही टिपण घेत होते. मिशेल डॉक्टर असल्यानं मनातील संदेह तिच्याकडून फेडता येतील याची खात्री होती. प्रचंड कोल्ड स्टोरेजमध्ये केशनलिकांत शुक्राणू गोठवून ठेवले होते. केशनलिकांच्या जुड्यांत सांभाळलेले हे शुक्राणू वर्षानुवर्षे टिकू शकतात. स्पर्म बँकेत २० वर्षांपूर्वीचे शुक्राणूही असल्याचं तिथल्या निष्णातानं अभिमानानं सांगितलं. शुक्राणू संग्रहित (Preserve) करताना ग्लीसेरॉल, ग्लुकोज युट्रेटच्या रासायनिक मिश्र-णांचा उपयोग करतात. या द्रावणाला Milicu-D-Ackreman (Preservative solu-tion) असे म्हणतात. 100 M.L. द्रावणात 23 M.L. सीमेनचं प्रमाण असतं. ते केशनलि-

कांत भरून कोल्ड स्टोरेजमध्ये १९६°c तापमानात सांभाळण्यात येतं. या पद्धतीनं सीमेनमधील शुक्राणू वर्षानुवर्षे टिकवता येतात.

दात्याचं नाव गुप्त ठेवण्यात येतं. कुणाचे शुक्राणू बँकेत जमा करायचे याविषयी निश्चित धोरण नक्की केलेलं आहे. दाता ४० फार तर ४५ वर्षांचा असावा. तो ड्रग एडिक्ट नसावा. सर्व दृष्टींनी अव्यंग असलेला, विवाहित, निदान एक औरस मुलाचा बाप असलेला पुरुष वीर्यदान करू शकतो. या धोरणांच्या कसोटीवर योग्य ठरलेली व्यक्ती स्वेच्छेनं वीर्यदान करू शकते.

आपल्याविरुद्ध फ्रान्सची परिस्थिती आहे. त्यांची वस्ती झपाट्यानं कमी होतेय. 'नन इज फन' हे जीवनाचं तत्त्वज्ञान ठरू पाहतंय. मुलांचं झेंगट तरुण पिढी टाळू बघतेय. घटणारी वस्ती चिंतेची बाब ठरतेय. त्यासाठी जी पावलं उचलली जातायत ती नक्की करताना एका सुपीक (?) डोक्यात भन्नाट कल्पना आली. 'दात्याचं नाव गुप्त ठेवलं तरीही घेत्याच्या निवडीचा हक्क डावलू नये. म्हणजे शुक्राणूंच्या संग्रहात वर्गीकरणाची पद्धत असावी. वैज्ञानिक, लेखक, पत्रकार, कवी, शिल्पकार, चित्रकार, गायक, वादक वगैरे माहिती घेऊन शुक्राणू कुणाचे ते जाहीर न केलं तरीही कशा व्यक्तीचे आहेत हे घेत्यासाठी स्पष्ट व्हावं. कुणाचं बाळ पोटी वाढवायचं या निवडीचा हक्क स्त्रीला द्यावा. तसं केल्यामुळे 'फेमिनिस्ट स्त्री' खूश होईल.'

याचं फलित म्हणून आपलं मूल डॉक्टर... इंजिनिअर वा... व्हावं या इच्छेनं झपाटलेल्या स्त्रिया हौशीनं इथं येतात. स्वतःच्या आवडीचे शुक्राणू पसंत करतात. कोल्ड स्टोरेजमधून काढलेल्या द्रावणाचा १०-१५ मिनिटांत उपयोग करावा लागतो. ज्या स्त्रियांना इथवर येणं गैरसोयीचं वाटत असेल त्यांच्यासाठी विशेष प्रकारच्या थर्मासमध्ये शुक्राणू तीन दिवस तग धरू शकतात. गरजेनुसार आणि निवडीनुसार बँकेतून शुक्राणू घेऊन स्त्री इच्छित अपत्याचं मातृत्व मिळवू शकते. सुमारे १५० दात्यांचं वीर्यदान ५०० स्त्रियांसाठी पुरेसं ठरतं...'

कोल्ड स्टोरेजची झाकणं उघड-बंद करीत अनेक साधनं दाखवत निष्णात डॉक्टर माहिती देत होते. ज्या सहजतेनं मनानं ब्लड बँकेची, स्कीन बँकेची कल्पना पचवली होती, किडनीदान समजून घेतलं होतं, त्या सहजतेनं स्पर्म बँकेचा ॲप्रोच पटत नव्हता. संकल्पना पटली तरीही वारंवार 'निवडीच्या हक्काचा' होणारा उल्लेख खुपत होता. कधीतरी बहुधा बर्नार्ड शॉच्या संदर्भात ऐकलेल्या आख्यायिकेची याद मनात उसळ्या मारीत होती. सुमार रूपाच्या लेखक महाशयांना एका रूपसीनं मागणी घालून म्हणे म्हटलं होतं, 'माझं रूप आणि तुमची बुद्धी घेऊन जन्माला येणारं मूल अनुपम असेल.' यावर हसून त्यांनी उत्तर दिलं होतं, "या उलट झालं तर? अर्थात् मूल अनुपम ठरेलच!" यातील विनोदाचा भाग वगळला तरी मूल नक्की कुणासारखं होईल हे छातीठोकपणे कुणाला सांगता आलंय का? गहू, तांदूळ, ज्वारी इत्यादींचं पीक काढतात तसं वैज्ञानिक, कलाकार वगैरेंचं पीक का काढता येणार आहे? मनात उठलेल्या प्रश्नांना शब्दरूप देण्याइतकं

फ्रेंच शब्दधन जवळ नव्हतं. स्पर्म बँक बघायची इच्छा पूर्ण झाली तरी मन अस्वस्थ होतं. मनातील उद्वेग मिशेलजवळ ओठी येऊ शकणार होता ही जमेची बाजू आश्वासक वाटत होती.

नेहमीपेक्षा २॥-३ तास उशीर झाला होता. घर खूप दूर होतं. "नीट जाशील नं ?" दादा-वहिनींनी आस्थेनं विचारलं. होकार देत मी भुयारी रेल्वेचा आराखडा पसरून माझा मार्ग त्यांना दाखवला. ही संधी त्यांच्यामुळेच मला मिळाली होती. त्यासाठी कृतज्ञता व्यक्त करून मी त्यांचा निरोप घेतला. तीन मेट्रो आणि एक रेल्वे इतका प्रवास करून मी लॅच कीनं मिशेलचं दार उघडलं तेव्हा साडेदहा वाजून गेले होते. फोनवर काही ऐकत असलेली मिशेल मला पाठमोरी होती. दारात मला बघताच भूत बघितल्यागत पास्कलनं डोळे विस्फारले. 'यू...यू..हाऊ यू...' म्हणत तो ओरडला. तो का ओरडला हे बघायला मिशेलनं मागे वळून पाहिलं. तिच्या हातचा रिसीव्हर निसटलाच. क्षणभर उघड्या तोंडानं विस्फारल्या डोळ्यानं ती बघत राहिली. दुसऱ्याच क्षणी "ओह स्मिता!..." ओरडत ती माझ्याजवळ आली. मला मिठीत कवटाळून ती अनावर होत रडायला लागली. या अनपेक्षित आक्रमणानं मी कोलमडले. तिच्या रडण्यानं गोंधळले.

"काय झालं पास्कल ? मिशेल का रडतेय ?" मी हळुवार स्वरात विचारलं, पण त्याला शब्द सुचेनात. इतक्यात लटकणाऱ्या रिसीव्हरमधून येणाऱ्या चित्रविचित्र आवाजांकडे त्याचं लक्ष गेलं.

"माय गॉड!" डोक्यावर हात मारत तो फोनकडे धावला. "ती आलीय!" तो घाईनं म्हणाला, "मला काही ठाऊक नाहीय. तिच्याशी बोलून मिशेल अर्ध्या तासानं तुला फोन करील." फोन ठेवून पास्कलनं आमच्या दोघींसाठी कोकाकोलाचे ग्लास भरले. डोळे पुसून कोकबरोबर आवंढा गिळत मिशेलनं विचारलं, "काय झालं स्मिता ?" मी थक्क!

"अग बाई, जो प्रश्न मी तुला विचारायचा तो तू मला का विचारतेस ? रडून तू गोंधळ घालतेयस की मी ?"

आता थक्क होण्याची त्यांची पाळी होती. दोघंही चकित नजरेनं माझ्याकडे बघत होते.

झालं असं, की परतायची वेळ उलटली म्हणून मिशेल आत बाहेर करीत होती. ते पाहून पास्कल म्हणाला, "आजचा कार्यक्रम लांबला असेल. तू ऑर्गनायझरला फोन कर." फोन करताच कळलं, की आज तर पाहुणे मंडळी रोजपेक्षा दोन तास आधीच मोकळी झालीत. पाहुणी चुकली की काय ? मिशेलनं परतीचा मार्ग मेट्रोच्या मॅपमध्ये दाखवला होता असं म्हटलं तरी ऑर्गनायझर चक्रावली. म्हणाली, "तू संपूर्ण रूटवर माहिती दे. मीसुद्धा प्रयत्न करते. तुला माहिती मिळाली, की मला फोन कर. मला मिळाली तर मी फोन करीन."

पण 'ला डिफेन्स' ते सेंट सेर्जि ख्रिस्तोफपर्यंतच्या मार्गावरच्या गाड्या, प्लॅटफॉर्म

सारं विंचरून काढलं तरी पत्ता लागेना. क्राईम ब्रँचलाही कळवलं. परिणाम शून्य ! साडेदहा वाजता ऑर्गनायझरनं संतापून फोन केला, "तरी तुला सांगत होते, तू पाहुणी घेऊ नकोस म्हणून..."

मिशेलजवळ उत्तर नव्हतं. इतकी रात्र झाली तरी पाहुणी परतली नसताना कुठच्या तोंडानं विरोध करणार ? ती जे बोलेल ते ऐकून घेणं भाग होतं. मनात काळजीही दाटत होती. पास्कल हाती फोटो घेऊन खोळंबला होता. टी.व्ही. वर 'आपण यांना पाहिलंत का ?' या कार्यक्रमात माझा फोटो ? मला हसू आवरेना, पण मिशेल हसण्याच्या मूडमध्ये नव्हती. असह्य टेन्शनचं दडपण मनावर असताना दोघांची दयनीय अवस्था झाली. माझ्यामुळे त्यांना मनस्ताप झाला, याचं मला वाईट वाटलं. दिलगीर स्वरात मी काय झालं ते सांगितलं.

"फोन तर करायचास !" मिशेल वैतागली.

"ते बरीक चुकलंच बघ ! पण खरं सांगू ?" मी अपराधी स्वरात म्हटलं, "माझ्या घरी मी भुलभुलावणीतूनही परत येईन असा विश्वास असतो. इतरही लोक, 'ही भवानी सिंहाच्या गुहेतूनही सुरक्षित परतेल' असं खवचटपणे म्हणतात. कधीकाळी माझ्या आईनं माझी काळजी केली असेल, पण मी हरवलेय असं वाटून कुणी माझी काळजी करील याची आता सवयच उरली नाही ग ! शिवाय... मनात शंका होती."

"कसली शंका ?"

" 'मी डॉक्टर नाही", हे कळताच मला कुणी हाकलून दिलं तर मी वेळेवर परतेनसं वाटलं."

"का ? काही जाणावंसं वाटणं हा काही गुन्हा आहे ?" इति पास्कल.

मिशेलनं निरर्थकपणे मान हलवली. अचानक दडपण दूर झाल्यानं ती आणि अपराधी भावनेनं मी नि:शब्द झालो. आमच्यासमोर लटक्या नम्रतेनं झुकत पास्कल म्हणाला, "स्मिताला पाहून तुझं आणि स्पर्म बँक पाहून स्मिताचं पोट भरलं असलं तरी हा गुलाम उपाशी आहे. दोन फेमिनिस्ट बायांच्या अडकित्त्यांत त्याची सुपारी झाली आहे."

"चल चावट कुठचा !" म्हणत मिशेलनं त्याला चापट मारली.

डायनिंग टेबलवर खेळीमेळीचं वातावरण निर्माण झालं. मनात डाचणारा 'निवडीचा हक्क' आपोआप ओठी आला. 'त्या' जोडी विषयीचा विनोद सांगून मी बेचैन स्वरात म्हटलं, "असल्या प्रयोगात काही अर्थ आहे का ? अशा पद्धतीनं काय साहित्यिकांचे, वैज्ञानिकांचे... कारखाने काढायचं यांच्या मनात आहे ? निवडीचा हक्क मान्य करण्याचा हा मानभावीपणा म्हणजे मला निसर्गाची छेड वाटते. अपत्य-सर्जनाच्या नैसर्गिक प्रक्रियेवर कुरघोडी करायचा प्रयत्न मला मनापासून आवडला नाही."

"कमाल करतेस तू !" मिशेल हसत म्हणाली, "जननक्षम पत्नी पतीच्या वैगुण्यामुळे वांझ ठरू नये; यासाठी तुला स्पर्म बँकेची निर्मिती मंजूर आहे. टेस्ट ट्यूब बेबीत तुला निसर्गाची छेड वाटत नाही. स्त्री तिच्या आयुष्यात ३०-३५ वर्षे जननक्षम असते. तरी

दो या तीन नंतर पूर्णविराम ठेवण्यात तुला निसर्गावर कुरघोडी केल्यासारखं वाटत नाही. मग निवडीचा हक्क तुला का टोचतो ?''

''अग पण...'' माझा गुळमुळीत विरोध.

''निसर्गावर कुरघोडी करायचा मानवाचा प्रयत्न नवा का आहे ? दाहक उन्हापासून, गोठवणाऱ्या थंडीपासून संरक्षण मिळवायला वस्त्रांची निर्मिती करणं काय आहे ? पायानं चालण्याच्या क्षमतेवर मात करायला गाड्या, विमानं शोधली म्हणजे तरी काय केलं ?''

''मिशेल, त्याची तुलना स्पर्म बँकेत होणाऱ्या वर्गीकरणाशी कशी करतेस तू ? गरजेपोटी प्रयोग आणि संशोधन करणं वेगळं. हा तर संपूर्ण प्रवाह बदलण्याचा चक्रमपणा आहे.''

''अक्षरश: प्रवाह बदलण्याचं काम का घडलं नाहीय ?'' मिशेल हिरिरीनं म्हणाली, ''खळखळत्या नद्यांवर तुझ्या कृषिप्रधान देशात धरणं बांधली आहेत नं ? त्यांचा प्रवाह सोयीस्कर दिशेला कधीच का वळवला नाहीय ? प्रत्येक ठिकाणी निसर्गावर मात होतेय हल्ली. मग इथेच तू त्याला कुरघोडी हे कर्णकर्कश नाव का देतेस ?''

''अग पण या प्रयोगानं खरंच 'उलट' घडून अपयश दिसलं तर ?''

''तर ते पचवायचं !'' मिशेल कणखर स्वरात म्हणाली, ''प्रयोग करणाऱ्याचं मन यश-अपयश पचवण्यासाठी तयार हवं. यशानं हुरळून जायची वा अपयशानं नामोहरम व्हायची तरल वृत्ती इथे निकामी ठरते. मला सांग, आपल्या मुलानं डॉक्टर व्हावं ही इच्छा तुझ्या देशातील आई-वडील मुलांच्या संवेदनक्षम मनात रुजवतात की नाही ? मग इथे असं वाटणारी दांपत्ये त्यापुढे एक पाऊल टाकतात. डॉक्टरांचे (वा जी इच्छा असेल तसे) स्पर्म मिळवून इच्छा-पूर्तीची शक्यता बँकेतून वाढवतात. तुला वाटतंय तशा पतींत उणीव असलेल्या स्त्रियाच स्पर्म बँकेची मदत घेतायत असं नाहीय.''

''माय गॉड ! काय म्हणतेस तू ? मला तर गरगरायला लागलंय.''

''खुळी आहेस तू !'' मिशेल म्हणाली, ''मला वाटलंच होतं, मी तुला असं सांगताच तुझा चेहरा बॉम्ब शेल पडल्यासारखा होईल. सर्वच 'असं' करतात असं नव्हे. माझ्या संदर्भात मी माझं मूल पास्कलचंच असावं अशी इच्छा करत असले तरी इतरांच्या मनात मुलानं नवऱ्याची गादी चालवू नये असं आलं तर ते मी गैर समजणार नाही.''

''काही बाबतींत मला तुमचं वागणं फार कॉंट्राडिक्टरी (परस्परविरुद्ध) वाटतं बघ !'' मिशेलच्या प्रश्नार्थक मुद्रेकडे बघत मी म्हटलं, ''मध्यंतरी आम्ही बासष्ट मजल्यांचं एक प्रचंड कॉम्प्लेक्स पाहिलं. त्यात प्रसूतिगृह, शाळा, निरनिराळ्या कचेऱ्या, कॉलेजिस, चर्चेसच नव्हे तर स्मशानही असल्याचं आम्हाला सांगण्यात आलं. एखाद्याला जन्मापासून मृत्यूपर्यंत जमिनीला पाय न लावता याच कॉम्प्लेक्समध्ये संपूर्ण आयुष्य जगता येईल असं अभिमानानं सांगण्यात आलं. एकीकडे तुमचं सरकार पर्यटकांना उत्तेजन देतं, दुसरीकडे तेच सरकार असल्या कॉम्प्लेक्सचंही कौतुक करतं. एकीकडे तुमच्या फेमिनिस्ट पुरंध्री 'नन इज फन'चे नारे लगावून आसमंत हादरवतात, दुसरीकडे आपल्या

पसंतीप्रमाणे मातृत्व घ्यायला स्पर्म बँक गाठतात. पण त्याचं संगोपन करताना त्याच्या छोट्यामोठ्या प्रगतीचा आनंद त्यांना लुटावासा वाटत नाही. ती जबाबदारी टाळून मुलांना 'होम' मध्ये टाकतात. बेर्नेसारख्या छोट्या गावचं 'होम' बघितलं मी! खर्च कुणा दात्याच्या दानावर निभत नसून मुलाच्या जन्मदात्यांच्या 'फी'मधून निभतो, म्हणून त्याला ऑर्फनेज न म्हणता होम म्हणायचं? सुबत्ता नजरेत भरत असूनही मला ती पोरं अनाथाश्रमातील मुलांहूनही केविलवाणी वाटली. वाटलं, यापेक्षा यांच्यात जननक्षमता नसतीच तर बरं झालं असतं. या स्पर्मबँकांतलं 'धन' सुद्धा 'होम'ची समृद्धी वाढवणार नं? या विचारानं मी कोण बेचैन झाले.''

''तुमच्या विचारसरणीपेक्षा इथला ॲप्रोच खूप वेगळा आहे, म्हणून असं वाटलं तुला!'' मिशेल हळुवार स्वरांत म्हणाली, ''थोडा विचार केलास तर इतकं उद्ध्वस्त वाटणार नाही तुला. असं पाहा, ज्याला प्रवासाची हौस आहे त्याला आणि ज्याला कुठेच जाणं नकोसं वाटतंय त्यालाही आमचं सरकार एकाच तराजूत तोलतं. इथेही प्रजेचा निवडीचा हक्क सरकार स्वीकारतं. प्रत्येक प्रकारच्या मनोवृत्तीचा इथे विचार होतो. कुठचीही मनोवृत्ती गैर म्हणून झिडकारली जात नाही.''

''शिवाय तू समजतेस तितके हे आई-बाप रूक्ष नसतात.'' माझी असीम बेचैनी बघून पास्कल म्हणाला, ''मुलाच्या ॲप्टीट्यूड टेस्ट घेतल्या जातायतनं हे ते चौकसपणे बघतात. सवडीनं त्यांना भेटायलाही जातात.''

''सवडीनं?'' मी उपहासानं म्हणाले, ''आमच्या मुलांच्या काका, मामा वा मावशी, आत्याही याहून अधिक सवड काढू शकतात. ॲप्टीट्यूड टेस्टनं काय सारंच कळतं? फक्त जीन्सवरच मुलाचं भवितव्य अवलंबून असतं? संगोपनाला महत्त्वच नाहीय? होम्समधलं संगोपन आणि स्पर्म बँकेनं केलेली निर्मिती नरांतून वानर निर्माण करायची नाही का? प्रयोगाची सुरुवात निश्चितपणे कुठे नेईल हे सांगता येईल का?''

''नाही सांगता येणार'' मिशेल ठाम स्वरांत म्हणाली. ''प्रयोगात यश अपयशाबरोबर काही तिसरंच प्रकरण निर्माण होईल याचीही तयारी ठेवावी लागते. भारत शोधायला निघालेला कोलंबस अमेरिकेच्या किनाऱ्याला लागल्यामुळे त्याचा प्रयत्न हिणकस ठरत नाही. प्रयोगाचं उद्दिष्ट एक असणं आणि दुसराच परिणाम हाती येणं यात अनपेक्षित काय आहे? त्यामुळे संशोधकाचं वा संशोधनाचं महत्त्व घटत नाही.''

माझ्या तोंडून जडभारी नि:श्वास निसटला. सारं माझ्या आकलनशक्ती- पलीकडचं ठरत होतं. तार्किक दृष्ट्या मिशेल जे म्हणत होती त्यावर विरोध करता येत नव्हता. तरी मन कडवटपणे म्हणत होतं, हुशार वकील खुनाच्या केसमध्येही खुन्याची बाजू मांडण्यात यशस्वी होतोच की! म्हणून काय खून करणं योग्य समजायचं? मनाची कुरकूर चेहऱ्यावर उमटली असावी. मिशेलनं समजुतीचा स्वर लावला, ''जे चाललं आहे ते योग्यच आहे असा आमचा दावा नाही स्मिता! पण ते अयोग्य आहे हे सिद्ध होईतो ते योग्य असण्याच्या शक्यतेवर पडदा पडणार नाही. प्रयोग सुरू झाले, की ते थांबवता

येत नाहीत. पायी चालणारा बैलगाडीचा शोध लागल्यावर थांबला का? घोडागाडी आली, मोटर आणि त्यांतही अभिजात यांत्रिक करामती आल्या, रेल्वे, विमान, आगबोटी सारं सुधारणेचे मार्ग शोधत नाहीय का? कुठच्याही मैलाच्या दगडाकडे नजर धावाय-चीच. वांझ स्त्रीला मातृत्व प्रदान करण्याच्या उद्देशानं सुरू झालेली स्पर्म बँक स्त्रीला अधिक चांगल्या अपत्याचं, आवडीच्या अपत्याचं मातृत्व द्यायचा प्रयत्न करणार. ते आपल्याला पचलं न पचलं तरी आपल्याला न पचणाऱ्या वस्तूंचं अस्तित्व नाकारता कसं येईल कुणाला? चॉईसची संकल्पना तुला न आवडली तरी ती आवडणाऱ्या व्यक्तीचं अस्तित्व नसेल असं कसं म्हणणार?...''

डोक्यावर घणाचे घाव पडत असल्यागत घड्याळात एक वाजण्यापूर्वीचे सोळा ठोके पडले. मेंदूवर कोसळणाऱ्या विचारांसारखेच असह्य वाटणारे! गप्पा आवरत्या घेणं आवश्यक होतं.

बिछान्यात तळमळत असताना मला सारखी काकांची - वसंतराव कमानांची याद येत होती. आमच्या व्यक्तिविकासाच्या प्रक्रियेत समरस होणाऱ्या काकांनी एकदा आवर्जून म्हटलं होतं, ''चांगलं आणि वाईट हे फार फसवे शब्द आहेत विजू! कारण चांगल्या वस्तूंचं चांगुलपण नक्की करताना स्वत:च्याही नकळत चांगुलपणाचं प्रमाण म्हणून प्रत्येकजण स्वत:चीच स्थापना करीत असतो.''

''त्यात गैर काय आहे? आपण वाईट आहोत?'' माझा बालिश प्रश्न!

''नम्रतेचं ढोंग करून स्वत:कडं कमीपणा घ्यायची जरुरी नसते. आपण चांगले आहोत. पण आपणच चांगले आहोत हे खरं नाही. आपल्या पलीकडेही चांगलं काही असू शकतं हे स्वीकारायचं असतं. म्हणूनच आपल्याला न पटणाऱ्या गोष्टीला वाईट न म्हणता, 'वेगळी' म्हणायचं असतं...''

चॉईसची कल्पना मला पटण्यातली वा पचण्यातली नाही. चाळिशी ओलांडल्याचा हा प्रताप का? न पटणाऱ्या संकल्पना पटवून घ्यायची क्षमता घटतेय? नकारात्मक प्रश्नांत गुदमरणाऱ्या मनाला मी बळेच वर काढलं. चॉईसच्या संकल्पनेत सैरभैर होण्यापेक्षा ती वेगळी म्हणणं अधिक सुखावह ठरेलसं वाटलं. या संकल्पनेची योग्यायो-ग्यता काळच ठरवील. ते काम आपलं नाहीय म्हणत मी स्वत:लाच झापलं. भरकटणाऱ्या विचारांवर पूर्ण विराम ठेवायला मी निग्रहानं डोळ्यांवर पापण्यांची झाकणं झाकली.

◆◆

# १२ / मुंगी उडाली आकाशी

खरं म्हणजे तिच्याकडे जायचा कंटाळा आला होता. एक तर फ्रान्समध्ये जाऊन भारतीय होस्ट मिळवण्यात मला स्वारस्य नव्हतं आणि मिशेलला छान इंग्रजी येत असल्यामुळे तिच्याशी सूत जमलं होतं. त्या दिवशी असोसिएशनच्या कार्यक्रमांना सुटी होती. काही भरीव काम न करता मिशेलशी गप्पा मारीत विश्रांती घ्यावीशी वाटत होती. थातुर मातुर थाप मारण्याचा विचार ओठी आणताच मिशेल म्हणाली, "खरं म्हणजे तीच तुझी होस्ट व्हायची. ती भारतीय असल्यामुळे ऑर्गनायझर तिला झुकतं माप देणार होती. पण मी तिला म्हटलं... भारतीय व्यक्तीला जवळून बघायचा अनुभव तुझ्यासाठी नवा नाही. मला त्याचं अप्रूप वाटेल. ही संधी मलाच हवी. माझं म्हणणं तिला पटलं. तरीही तिनं विनंती करून माझ्याजवळून एक दिवसाचं होस्टपण मागून घेतलं. ती हक्क सांगती तर मी तिला जुमानलं नसतं. पण तिची विनंती टाळणं मला जमलं नाही."

आलीया भोगासी... म्हणत मी निघाले. आणि... आणि वाटलं, हिची भेट टाळली असती तर फार मोठ्या आनंदाला मुकले असते मी! म्हणजे मोठी गंमतच झाली...

तिनं सुचविलेल्या मीटिंग पॉईंटवर मी तिची वाट पाहत होते. लाडका शोल्डर कट झुलवीत एक देखणी तरुणी माझ्या समोर आली. स्वागताचं स्मित करीत तिनं मला गाडीत तिच्या शेजारी बसवलं. झोकदार वळण घेऊन गाडी रस्त्याला लागली. आमच्यात एका शब्दाचीही देवाण घेवाण झाली नव्हती. तरी क्षणभर वाटलं... हिला आपण खूप बघितली आहे. शिक्षिका, लेखिका आणि कुटुंबवत्सल गृहिणी या तिपेडी भूमिकेमुळे खूप लोकांना भेटणं होतं. साऱ्यांची नावं लक्षात राहत नसली तरी चेहरा मी विसरत नाही. भेट होताच आदल्या भेटीचे काही संदर्भ आठवतात. पण हिच्या बाबतीत तसं घडत नव्हतं. संदर्भ आठवत नसूनही मनं बघितलीच आहे मधील 'च' सोडायला तयार नव्हतं. कार मिररमध्ये तिची प्रतिमा बघत मी स्मरणशक्तीला चिमटे काढीत होते. अर्थात तिच्या नकळत निरीक्षणाचा खटाटोप चालू होता. पण एका गाफील क्षणी तिच्या प्रतिमेनं कार मिररमध्येच माझ्या नजरेचा झेल घेतला. मी ओशाळले आणि ती मजेत हसली.

"तुम्हाला वाटणाऱ्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत." ती मिश्कील स्वरात म्हणाली, "तुम्ही मला बघितलं आहे. पण आपण कधीच एकमेकींना भेटलो नाहीय." मी सर्द!

"म्हणजे?" मी घायकुतीस येत विचारलं. म्हटलं, "बाई गं! तुझ्या नजरेशी टक्कर

झाली तेव्हाच मी लाजेनं गपगार झालेय. या उखाण्याचं उत्तर शोधणं मला जमणार नाही. कोडी न घालता तूच नीट सांग बरं... मी तुला बघितलं तेव्हा आपली भेट का झाली नाही ? हे काय गौड बंगाल आहे ?''

''म्हणजे असं की...'' ती मजेत हसत म्हणाली, ''आमच्या गावी तुम्ही वार्तालापाच्या कार्यक्रमासाठी आला होतात. तेव्हा ज्यांच्याकडे उतरला होतात त्यांच्याकडे मी स्वयंपाक करीत असे. म्हणून खूप बघितलंत मला; पण आपण बोललो नाहीय एकमेकींशी ! एका अर्थानं सांगायचं तर तुमच्या पोटात शिरणं झालंय पण मनात शिरायचं बाकी आहे. खूप खूप सांगायचंय तुम्हाला. म्हणून आजचं होस्टपण आग्रहानं घेतलं मी !''

मी चक्रावले. हे फ्रेंच इंडियन कपल आहे असं मिशेल म्हणाली होती. स्वयंपाकाचं काम करणारी ही फ्रेंच माणसाची पत्नी कशी झाली हे कळेना. तरीही आपली स्मरणशक्ती अजून आपल्याला दगा देत नाहीय याची जाण मला आनंदित करीत होती. पुढे तर आनंदाचा महासागर हिंदकळत होता. त्या भेटीत ती फक्त मनात शिरली नाही तर तिथे ठाण मांडून बसली. तिची संघर्षकथा ऐकून मी थक्क झाले. वस्तुत: भारावणं, थक्क होणं, चकित झाल्यामुळे अवाक् होणं मला फार आवडतं. पण वाढत्या वयानं अनुभवाचं संचित इतकं जबरदस्त वाढवलंय की थक्क होण्याची संधी आताशा उंबराचं फूल ठरू लागली आहे. तो अप्राप्य अनुभव त्या दिवशी मी मनसोक्त लुटला.

वस्तुत: प्रत्येकाचं जीवन काही अंशी कादंबरीच असते.. गुजरातीत कादंबरीला 'नवलकथा' म्हणतात. ती मला चालती बोलती कादंबरी वाटली. जिवंत नवलकथा वाटली. तिचं नाव होतं वसुधा ! गुजरातेतील सामान्य खेडेगावात प्राथमिक शाळेत मास्तरकी करणाऱ्या ब्राह्मणाची ही पोर, बिनचेहऱ्याची सामान्य मुलगीच. पण वेळ येताच जिनं स्वत:चं असामान्यत्व सिद्ध केलं अशी ! भारतीय स्त्री म्हणजे तेजाची ठिणगी असं म्हणायचा रिवाज आहे. ही ठिणगी स्नेहाच्या ओलाव्याला भिडली तर स्वत:चं अस्तित्व पुसून टाकण्याचा त्याग करू जाणते. पण अन्यायाच्या वाळल्या गवतावर पडली, तर वणवा पेटवून सारं बेचिराख करू शकते हेच सिद्ध केलं वसुधानं !

वसुधा तिच्या जन्मदात्यांची ज्येष्ठ कन्या ! गावात ब्राह्मणांची संख्या बोटावर मोजता यावी इतकी ! दारिद्र्याला ठिगळ लावण्याच्या उद्देशानं मास्तर फावल्या वेळात भिक्षुकी करीत. पिंडदानासाठी मुलगा हवाच या आग्रहामुळे मास्तर पाच पोरींचे बाप झाले. सहाव्या वेळी त्यांचा पुरुषार्थ (?) कारणी लागला. पुत्रमुख दिसलं; पण तोवर महागाई आकाशाला भिडली होती. आठ तोंडांत मण नव्हे तरी कण अन्न पडायला हवं तेही जमेनासं झालं. म्हणून वसुधाची आई पोळपाट लाटणं घेऊन घराबाहेर पडली. स्वाभाविकच घरकाम ही मोठ्या मुलीची जबाबदारी ठरली.

घरकाम गळ्यात पडलं तरी हसतमुख वसुधा निराश झाली नाही. धाकट्या भावंडांचं संगोपन करताना तिच्या डोळ्यांत आशेचं फूल उमलत होतं. भराभर कामं संपवून ती

मैत्रिणींच्या पुस्तकांची मदत घेऊन अभ्यास करीत फावला वेळ सत्कारणी लावी.

वाऱ्याच्या गतीनं कॅलेंडरची पानं उडत होती. वसुधानं 'बाहेरून' एस.एस.सी.ची परीक्षा दिली. गुणही चांगले मिळाले. इतर भावंडं आता मोठी झाली होती. घरकाम पूर्ण वेळ मागत नव्हतं. पण... आई अकाली थकली होती, वृद्ध होणाऱ्या आईसमोर परत वसुधानं मदतीचा हात धरला. गावच्या पटेलांकडे आई काम करीत होती. पटेल म्हणजे मातब्बर आसामी! आंबा-चिकूच्या मोठ्या बागांचे बागाईतदार! मुलगी सासरी आणि मुलगा परदेशात. घरचे पटेल पटलाणी दोघंच! पण बागाईतदार असल्यामुळे कामाच्या लोकांचा राबता भरपूर! आईला मदत करता करता वसुधा घरचीच झाली. जबाबदारीनं सारं एकटी करू लागली.

पटलाणी स्वभावानं मोकळी! खूप बडबडी! वसुधाचा उरक दांडगा! काम संपलं की त्यांच्या आपल्या तुपल्या गप्पा रंगत. पटलाणी वसुधाकडून मुलाची - परेशची पत्रं वाचून घेई. पत्रात विखुरलेले इंग्रजी शब्द सराईतपणे वाचणाऱ्या वसुधाचे पटलाणीला भारी कौतुक! कौतुकाच्या भरात एकदा तिनं परेशच्या पुस्तकाच्या कपाटाची चावी वसुधाला बहाल केली. परेशनं फार चोखंदळपणे पुस्तकं जमवली होती. वसुधाला अलिबाबाची गुहा उघडल्याचा आनंद झाला. हेलन केलर विषयी वाचून मन विलक्षण आशावादी बनलं. वाटलं, बहिऱ्या मुक्या हेलनपेक्षा आपली स्थिती फार चांगली आहे. गरिबीशी दोन हात करायला धडधाकट शरीर आहे आपल्याजवळ! अपंग झालेल्या मेरी वर्गीसनं केलेल्या ऑपरेशन्सविषयी वाचून ती थक्क झाली. मेरी वर्गीसचं 'टेक माय हँडस्' वाचून अक्षरश: भारावली. त्या झपाटल्या अवस्थेत तिनं बी.ए. करायचा निर्णय घेतला. साधा सुधा नव्हे तर इंग्लिश लिटरेचर हा विषय घेतला तिनं. बी.ए. चा किल्ला सर केला. ती जे वाचत असे त्याविषयी जाणण्याची पटलाणीच्या मनात उत्सुकता असे. या वाचन-प्रक्रियेनं वसुधाच्या ज्ञानाला आगळी खोली प्रदान केली.

तशात पटेल दांपत्याच्या आग्रहाला मान देऊन परेश भारतात आला. वसुधाच्या मनात परेश विषयी अपार कृतज्ञता होती. त्याच्या पुस्तकाच्या मदतीनंच ती पदवीधर झाली होती. त्याला आवडणारे पदार्थ करण्याचा तिनं सपाटा लावला. पाश्चिमात्य संस्कृतीत रूळलेला परेश वसुधानं रांधलेले पदार्थ मार्व्हलस.. डेलिशियस... म्हणत नावाजू लागला. पटलाणीच्या बरोबरीनं तो वसुधालाही तिकडच्या गंमती जंमती सांगत गप्पात सामील करून घेई. जाणता-अजाणता भक्तीच्या भावनेत प्रीतीची कोमल भावना मिसळू लागली. सकाळी निघताना आरशाला 'सांग दर्पणा कशी मी दिसते?' हा प्रश्न अनायासे विचारला जात होता. पारा उडालेला आरसाही तारुण्याची मोहक झळाळी दाखवून तिला खूश करू लागला.

यंदा परेशला चतुर्भुज करूनच सोडायचं असा पटलाणीनं धोशा लावला. परदेश म्हणताच खुळ्यागत धावत सुटणाऱ्यांची आपल्या देशात उणीव नाहीच. असंख्य वधूपिते खेटे घालू लागले. शंभर तोळे सोनं, विमानाचं तिकीट आणि कसली कसली

आमिषं दाखवीत मुलींना आणू लागले. परेशाचं मुलींमागून मुली नाकारणं वसुधाला उगीचच आवडत होतं.

रोजचे नकार ऐकून एकदा पटलाणी वैतागली. तिनं परेशला फैलावर घेतलं, "अरे विचार तरी काय आहे तुझा ? मुलगी पसंत करून तुला लग्नाला उभा करीन." पटलाणीची टकळी चालू होती; पण परेश चकार शब्द बोलत नव्हता. शांतपणे त्यानं सिगरेट शिलगावली. शून्यात नजर ठेवून तो कश घेत राहिला. पटलाणी अधिकच चिरडीस आली. आदल्या दिवशी सांगून आलेली मुलगी तिच्या डोळ्यांत भरली होती. परेशला 'तिथे' घर देण्याचा त्यांचा मानस होता. शिवाय मुलीच्या अंगावर हिऱ्याचा सेट नि पन्नास तोळे सोनंही घालणार होते ते! साऱ्याची उजळणी करीत पटलाणी म्हणाली, "इतकं असून मुलगी फार सोज्वळ आहे. तुझा मामाच सांगत होता..."

"बस कर बा..." अनपेक्षितपणे परेश विव्हळला, "मला विकत घेणारा सासरा नकोय मला! त्याची सोज्वळ मुलगी मला बोटावर नाचवील. तसं नाचायला मी तुला दरवेशाचं अस्वल वाटतो का ?. ." परेशाचा स्वर चढू लागला.

परेशचं तांडव पटलाणीला थक्क करणारं होतं. तिनं चाचरत विचारलं, "अरे आपल्यात मुलीकडले आपणहून सारं देतात. मी काय कुणाकडे मागायला गेले होते ? रिवाजच आहे तसा... सांगून येतानाच काय देऊं तेही..."

"तुझे रिवाज घाल चुलीत! मला नको सांगू आपल्या तुपल्या गोष्टी! माझ्या डोळ्यांत जी मुलगी भरली आहे तिचा बाप इतका कंगाल आहे की नारळ आणि मुलगी द्या म्हटलं तर नारळही मला आणायला सांगेल. शिवाय जातीबाहेरची मुलगी म्हणजे तुमच्या अब्रूचे धिंडवडे! पण ती सोडून इतर साऱ्या माझ्या लेखी मायबहिणी आहेत. यापुढे घरात माझ्या लग्नाचा विषय नको!"

निर्वाणीचं बोलून देवदास छाप तोंड करून फकाफका धूर काढीत तो मुळी उठूनच गेला. पटलाणी अवाक् झाली; पण पटेल मुलाचं मजनूस्वरूप पाहून अनपेक्षितपणे रंगात आले. तोवर त्यांच्या घराण्यात कुणी प्रेम करण्याचा पराक्रम केला नव्हता. प्रेमळ मुलाचं पितृत्व आपल्याला प्राप्त झालंय या विचारानं ते खुलले. खूप वर्षांपूर्वी त्यांनी एक सिनेमा बघितला होता; त्याची त्यांना आठवण झाली. गरीब मुलगी आणि श्रीमंत मुलगा! मुलाचा बाप सुटकेसभर पैसे मुलीसमोर धरून क्रूर आवाजात विचारतो... 'क्या किमत होगी तुम्हारे प्यार की ?' मुलगी श्रावणसरी ओघळवीत धावत सुटते. तिच्या मागे तिचा प्रियकर! खूप उंच कड्यावर पोहोचलेल्या प्रेयसीला विरोध करताना दोघंही खाली नदीत कोसळतात. दोन दिवसांनंतर एकमेकांच्या घट्ट मिठीत असलेले त्यांचे देह किनाऱ्याला लागतात.

तो करुण सीन आठवताना पटेलांचे डोळे आनंदानं चमकले. कामाच्या दगदगीत कित्येक वर्षांत सिनेमा बघणं जमलं नव्हतं तरी इतकी जुनी घटना तंतोतंत आठवतेय हे पाहून त्यांनी स्वत:च्या स्मरणशक्तीला दाद दिली. आपण 'त्या' मुलाच्या बापासारखे

कठोर नाहीसं वाटून मनात स्वत:च्या समजूतदारपणाविषयी कौतुक दाटलं. प्रेमळ पुत्राच्या प्रेमळ पित्याची भूमिका करायला ते कमालीचे आतुरले. त्या झपाटल्या अवस्थेत ते प्रेमानं पटलाणीकडे झुकले. तिच्या खांद्यावर हात ठेवून मधाळ स्वरात म्हणाले, "वहाली, (लाडके) मुलाची जिंदगी आणि पैसा यात काय प्यारं आहे तुला?"

पटलाणी बिचारी आधीच परेशच्या थैमानानं बावरली होती. त्यात पटेलांचं हळुवार स्वरात वहाली म्हणणं तिला बुचकळ्यात पाडणारं ठरलं. मग्रूर स्वराऐवजी पटेल मर्दाच्या कंठात लाघव? काळजीनं तिच्या मनाचा ठाव सुटला. 'अहो असं विचूक का बोलताय? खायचं प्यायचं भान विसरून उन्हातान्हात राबत असता. ताप भरलाय का? वातात बरळल्यागत काय चाललंय तुमचं?' त्यांच्या कपाळाला हात लावून अंदाज घेत पटलाणी बडबडत सुटली. "पोरापेक्षा का मला पैसा प्यारा आहे? अतिकामानं डोक्यावर परिणाम होतोय तुमच्या. वय वाढलंय तर कामं कमी करा जरा. अगं वसुधा यांना जरा सुंठेची गोळी दे की आलं-लिंबाचा रस घेताय?"

पटलाणीची लगबग आणि तिच्या कल्पनेची छोटी झेप पटेल क्षमाशील नजरेनं बघत राहिले. त्यांच्या मानेवरचं लव्हेरियाचं भूत उतरायला तयार नव्हतं. डफ्फळ विद्यार्थ्याला कौशल्यानं ज्ञानदान करणाऱ्या गुरूच्या तोऱ्यात त्यांनी पटलाणीला जवळ बसवलं. मनीचे विचार तिला सांगून ते म्हणाले, "अगं, आपलं एकुलतं एक पोर लग्न टाळून विरक्तपणे जगेल वा मरणाला मिठी मारेल, त्यापेक्षा होऊ दे त्याच्या मनासारखं."

"मी कुठे विरोध केलाय?" पटलाणी तत्परतेनं म्हणाली, "पैशाचं काय? एक वर्ष आंबा नाही पिकला असं समजू."

आई-बापाचा हा 'पटेल वेगळा' पवित्रा पाहून परेश थोडा गोंधळला. चाचरत त्यानं वसुधाचं नाव घेतलं. पटलाणीच्या चेहऱ्यावर किंचित नापसंती उमटली. पण पटेल? पोरगा बामणाची पोर गटवतोय हे पाहून भलतेच चेकाळले. आईकडे बघत परेश उदास स्वरात म्हणाला, "नको बापू! लग्न करून मी निघून जाईन आणि जातवाले तुम्हाला वाळीत टाकतील. जन्मदात्यांना तोंफेतोंडी देणारा कुपुत्र व्हायचं नाही मला. त्यापेक्षा जन्मभर ब्रह्मचारी राहीन मी."

परेशच्या दु:खी स्वरात पटलाणीचा दुबळा विरोध वाहून गेला. ती समजूतदारपणे म्हणाली, "लोकांचं काय रे? चार दिवस बोलतील नि गप्प होतील. आमचं सुख तुझ्या सुखाहून वेगळंय का? तुझ्या विरागी जीवनाची कल्पनाही सहन होणार नाही मला."

पण समाज आई-बापाला धारेवर धरेल या भयानं परेश नकार देत सुटला. पटेल मात्र निर्णय घेऊन मोकळे झाले होते. खूप पैसा कमवला होता. आता त्यांना कीर्ती हवीशी वाटू लागली. जातिभेद न मानणारा उच्च विचारांचा माणूस म्हणून लोक आपलं नाव घेतील या कल्पनेत ते वारा प्यायलेल्या वासरागत उधळले. छातीवर हात ठोकून म्हणाले, "मला वाळीत टाकायला कुणाची माय व्यायली आहे ते बघतोय मी. जन्मभर काय? लग्नानंतर एक दिवसही सक्तीचं ब्रह्मचर्य तुला पाळावं लागलं तर मिशी उतरवून देईन."

पटेल खरंच बोलले तसं वागले. गावानं कधी बघितला नव्हता असा थाट उडवून दिला त्यांनी! तीन दिवसांचा लग्न सोहळा संपताच त्यांनी काश्मीरची तिकिटं सुनेच्या हाती देत जड स्वरात म्हटलं, "खूश थाओ बेटा! जिंदगी माणो." (खुशीनं जीवनाचा उपभोग घ्या.) हनीमून संपवून मुलं परतली तर प्रेमळ बापाच्या भूमिकेतील क्लायमॅक्सचा सीन वठवायला पटेल पुन्हा हजर! वसुधाचा पासपोर्ट, व्हिसा आणि तिकीट परेशच्या हाती देत ते दिमाखानं म्हणाले, "तुमचा हनीमून साजरा होत असताना मी मुंबईला 'दक्षिणा' वाटत फिरत होतो. व्हिसा घेऊनच परतायचा निश्चय होता माझा! मिशी उतरवणं आवडणारं नव्हतं नं?" प्रश्न विचारून खळखळून हसणाऱ्या नवऱ्याकडे पटलाणी कौतुकानं बघत राहिली. आणि वसुधा?

पटेल दांपत्याविषयी तिच्या मनात आधीच हळवा भाव होता. अशा वागण्यानं तिला जन्माचं ऋणाईत झाल्यासारखं वाटलं. निरोपाच्या क्षणी मनात माहेर सुटल्याचं दु:ख नव्हतंच. असे सासू-सासरे पुन्हा कधी दिसतील हा प्रश्नच घायाळ करीत होता.

जड मनानं पटेल दांपत्याचा निरोप घेऊन परेशच्या हातात हात गुंफून ती निघाली. काल परवापर्यंत खेडवळ वाटणाऱ्या वसुधेचं मोहक रूप पटेल कौतुकानं बघत होते. परेशच्या भरदार हातात वसुधाचा हात भलताच नाजूक वाटत होता. अजाणता पटेलांचा हात पटलाणीच्या खांद्यावर विसावला. व्यकूळ स्वरात ते म्हणाले, "संसार मांडला. समृद्धी खेचून आणण्याचा पुरुषार्थ केला. मुलं-बाळंही झाली. पण प्रेम करायचं राह्यलंय गं! हे शेतीचं कामच सालं गांडू! प्रेम करायला फुरसत न ठेवणारं!"

पटेलांच्या घोगऱ्या स्वरात जाणवणारी कोवळी भावना पटलाणीला आपोआपच उमगली. तिनं तिरप्या नजरेनं नवऱ्याकडे बघितलं. खेडवळ पोशाखात या वयातही पटेलांचं कणखर तारुण्य जाणवत होतं. अनपेक्षितपणे पटलाणीच्या मनात त्या मर्दानी रूपाचा मोह दाटला. भलत्या ठिकाणी मनात दाटणाऱ्या इच्छेची तिला विलक्षण लाज वाटली. तोच दूरवर पोहोचलेल्या परेश वसुधानं मागे वळून हात हलवला. भरल्या अंत:करणानं 'आवजो दीकरा!' म्हणत पटलाणीनं हात हलवला. तिचे भरले डोळे टिपणाऱ्या पटेलांच्या खांद्यावर तिनं नकळत मान ठेवली. वसुधा-परेश दिसेनासे झाले.

रनवेवर वेग वाढवीत विमान आकाशात झेपावलं. वसुधाच्या छातीत धडधड दाटली. काल परवापर्यंत आकाशात घरघर दाटली की हातातील काम टाकून ती विमान बघायला बाहेर धावायची. ज्या वसुधानं कधी विमानात बसायचं स्वप्नही बघायचं साहस केलं नव्हतं तीच का मी? तिनं स्वत:ला प्रश्न विचारला. उत्तरात तिच्या ओठावर स्मित फुललं.

आकाशात झेप घेताच विमानाचा जमिनीशी असणारा संपर्क तुटला होता. वसुधाला वाटलं, आपल्याही सरावाची जमीन मागे राहिली आहे. आता नवं स्थान! नवं धाम! नवा संसार! सारं कोरं करकरीत! मनात 'नवं' शब्दासाठी अपार प्रेम होतं. आजवर सारं कुणी दिलेलं, जुनं-पानंच मिळालं होतं. त्यातल्यात्यातही बरं असेल ते छोट्यांच्या

वाट्याचं असायचं. मी मोठी आहे. मला काहीही चालेल या समजूतदारपणाला पर्याय कुठे होता ? लादलेलं प्रौढपण तारुण्यावर मात करायचं. स्वप्नं पडलीच तर बिजवराचीच असायची. उतरलेले कपडे, उरलं सुरलं अन्न आणि झिजलेले, लोकांचे लहान झालेले जोडे वापरणारीला नवराही वापरलेलाच मिळणार असं वाटायचं. लादलेलं प्रौढपण झुगारून द्यायची इच्छा झाली तरी वाटायचं... दुसऱ्या पत्नीचे फार लाड होतात म्हणतात. शिवाय दुसरेपणाचा झाला तरी नवरा फक्त माझा असेल. त्यात भावंडांची भागीदारी नसेल. पण अनपेक्षितपणे ही तपस्या संपली होती.

तपस्याच नाही तर काय ? वसुधा स्वत:शी गुणगुणली. बालपणाचा आनंद कळण्यापूर्वीच 'ताई' व्हावं लागलं. लाडाचे हक्कदार छोटे आणि मोठी ताई म्हणून माझ्या समोर कर्तव्यांची न संपणारी रांग ! कामच काम ! एक संपलं की दुसरं नि पाठोपाठ तिसरं ! रात्र व्हायची म्हणून थोडा 'इंटरव्हल' मिळायचा. त्यातही अभ्यासाचं हौशीचं काम होतंच. सारी तपश्चर्याच ! म्हणूनच 'वरदान' मिळालं का ? स्वत:च्या प्रश्नानं वसुधाला खुद्कन् हसवलं. अभावित नजर परेशकडे वळली. माझा परेश ! माझाच परेश ! ती आनंदानं गुणगुणली. यानंच माझं प्रौढपण दूर करून मला तरुण बनवलं. ज्या शरीराकडे आजवर फक्त कष्ट करण्याचं साधन म्हणून बघितलं होतं त्या शरीराचे महिनाभर कोण लाड झाले होते. पारा उडालेल्या फुटक्या आरशात जे सौंदर्य जाणवलं नव्हतं ते परेशच्या डोळ्यांच्या दर्पणात सुखवून गेलं. तारुण्याच्या आरोग्यप्रद सौंदर्याला सौंदर्य प्रसाधनांनी झळाळी प्राप्त करून दिली. पायाचं सौंदर्यही जपायचं असतं हे महिनाभरातच कळलं होतं. तिची अनावर नजर पावलांवर विसावली. पॅडीक्युअर केलेल्या नाजूक गोऱ्या पायांच्या नखावर गडद कॉफी रंगाचं नेलपेंट शोभत होतं. सुरेख पावलं दीड इंच उंची वाढवणाऱ्या गादी असणाऱ्या मुलायम सँडल्समध्ये विसावली होती. तिऱ्हाईताच्या नजरेनं वसुधा 'आज आणि काल' मधल्या फरकाची नोंद घेत होती.

कुणीतरी दिलेल्या पितळ्याच्या बांगड्या स्वयंपाकातून उरलेला चिंचेचा कोळ घासून ती चकचकीत ठेवायची. त्याच वसुधाच्या देहावर साक्षात सोनं झगझगत होतं. सोनंच का ? मंगळसूत्रात पटलाणीनं हौशीनं सत्तावीस हिरे जडवले होते. असलं वैभवी मंगळसूत्र कधी दुरून बघताही नसतं आलं. मंगळसूत्रच का ? पटलाणीनं सारंच हौशीनं, प्रेमानं अंगावर चढवलं होतं. बाकी आपली शक्ती अशक्ती म्हणण्याच्या लायकीची ! अशा प्रेमळ सासूची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळेल की आपण 'दूर' असू ? पटलाणीच्या शेवटच्या दिवसांत आपण नसण्याची कल्पना वसुधाला दु:खी करणारी होती.

नकळत तिनं परेशच्या हातावर हात ठेवला. सुखाचा अनमोल नजराणा देणाऱ्या परेशसाठी काय करू आणि काय नाही असं झालं होतं तिला ! अस्तित्वाचं अर्घ्यदान त्याच्या ओंजळीत ओतायला ती आतुरली होती. त्याच्या मिठीत कणाकणानं विरघळली होती. परेशला आवडणारा देहाचा नैवेद्य तिनं भक्तिभावानं त्याच्यासमोर धरला होता.

७८८

काश्मीरला हाऊसबोटमध्ये सुखाची बरसात होत असताना तिनं अनावर होत विचारलं होतं, "असं काय आहे माझ्यात? शंभर शंभर तोळे सोनं घेऊन वधूपिते तुझ्याकडे खेटे घालत होते. अनमोल आमिषं समोर ठेवत उंबरठा झिजवत होते. माझ्या बापूंना तर शकुनाचे अकरा रुपये देतानाही पोटात कळ आली होती. लग्नामुळे माझा पगार बंद होणार हेच जाणवलं त्यांना. आणि तू मात्र..."

"त्यांच्या माझ्या नजरेत फरक आहे राणी!" तिला मिठीत घेत त्यानं लाडात येत विचारलं होतं, "अशी सोनपुतळी मिळवण्याऐवजी सोन्याच्या मोहात पडायला मी मूर्ख आहे का?" प्रश्नापाठोपाठ स्वत:च्या सोनपुतळीवर चुंबनांच्या शिक्क्यांची उधळण करून त्यानं वसुधाला गुदमरवून टाकलं होतं.

"मी सोनपुतळी कधीच नव्हते रे!" त्याच्या छातीवरच्या केसांशी खेळत ती लाजऱ्या स्वरात म्हणाली होती. "परेश नावाच्या परिसाचा स्पर्श होताच माझ्या देहाचं सोनं झालं. तू भेटला नव्हतास तोवर बेगर मेडसाठी सिंहासन सोडणारा राजा मला स्वप्नरंजन वाटे. मुक्या बहिऱ्या राजकुमारीनं राजकुमाराच्या सहवासात बोलू लागणं मला अवास्तव वाटे. पण राजा, तुझ्या सहवासात मला प्रेमशक्तीचं सामर्थ्य कळलं. जीवनाला जिणं समजणाऱ्या माझ्या मनात तू जगण्याची लालसा उत्पन्न केलीस..."

"गप गं!" आक्रमक चुंबनानं तिचं तोंड बंद करीत परेशनं म्हटलं होतं. "हिंदीत म्हणतात - जिसकी छाती पर हैं बाल वो है हरिका लाल! तुझं सौंदर्य शापित असलं तरी त्याचा उद्धार 'हरीचा लाल' करू जाणतो बरं का!"

"हो का?" त्याला वेडावत वसुधा रंगात आली होती, "मला चूप म्हणत आता कोण बोलत सुटलंय?"

"यू नॉटी गर्ल!" म्हणत वसुधा विव्हळण्याइतपत जोरानं त्यानं तिला मिठीत आवळली होती.

हनीमूनच्या आटवणीत हरवल्या वसुधानं परेशाकडे बघितलं. पुश बॅक चेअर मागे झुकवून तो आरामात झोपला होता. चॉकलेटी रंगाच्या थ्री पीस सूटमध्ये तगडा परेश रूबाबदार दिसत होता. त्याच्या बंद डोळ्यांकडे, कपाळावर झेपावणाऱ्या काळ्या कुरळ्या लड्यांकडे वसुधा अनिमिष नेत्रानं बघत होती. पाहता पाहता त्याच्या मिठीत शिरायची ओढ अनावर झाली. अजून सारा महिनाही झाला नाहीय लग्नाला! तरी याच्या मिठीची इतकी सवय व्हावी? वसुधाच्या मनात लाजरा प्रश्न गरगरत होता. तिनं हळूच परेशचा हात कुरवाळला. "यस हनि?' अर्धजागृत अवस्थेत परेशनं विचारलं. तिला मिठीत घेऊन थोपटत तो पुटपुटला, "स्लीप माय लव्ह!"

आज्ञाधारक पत्नीप्रमाणे वसुधानं डोळे मिटले. पण तरीही बंद डोळ्यांत झोप उतरली नाही. मनात अजूनही मदभऱ्या हनिमूनच्या आठवणी रेंगाळत होत्या. त्या आठवणीत पॅरिसची स्वप्नं मिसळत होती. पॅरिस! मुक्त प्रणयासाठी प्रसिद्ध असणारं रंगेल शहर! मनोहर भविष्य आणि मादक हनिमूनच्या आठवणींनी वसुधाला चेतविण्याचं काम केलं.

उद्यापासून मुक्त प्रणय का ? कालचा हनिमून आणि उद्या सुरू होणारं सहजीवन यांतील संधिकाल सुगंधित करायला काय हरकत आहे? या प्रश्नांनी तिला पुरतं झपाटलं. परेशच्या मिठीत शांत झोपण्याऐवजी तिनं त्याच्यावरची पकड घट्ट करीत परेशच्या ओठांवर ओठ ठेवले. ओठांवर रेंगाळणारा डनहीलचा वास तिला भलताच मोहक वाटला. अनावर वसुधाचं प्रेमळ आक्रमण परेश काहीशा आश्चर्यानं आणि बरंचसं आनंदानं उपभोगत राहिला.

वसुधाची कथा इथे सुखांतानं संपायला हवी होती. पण ही कथा नाहीच. या नवलकथेची नायिका सौ. वसुधा पटेल नसून मादाम वसुधा होती. तिच्या नवलकथेचं एक प्रकरण इथे संपलं. पण जीवन हा प्रकरणात बांधता येण्याजोगा तलाव कुठे ? जीवन म्हणजे असीम प्रवाह! वसुधाच्या संदर्भात तो शांत प्रवाह ठरला नाही. भरती-ओहोटीच्या वेगवान लाटांनी अक्षरश: त्याला सागराचं रूप प्रदान केलं होतं.

सुखाचे क्षण विमानाच्या गतीनं उडाले आणि सुखस्वप्नासारखा वाटणारा प्रवास संपवणारी सूचना कानी पडली. 'फासन युअर बेल्टस्...' विमान सुंदरीनं विमान चार्ल्स-द-गॉल विमानतळावर उतरत असल्याची माहिती दिली. बेल्ट बांधून वसुधानं परेशकडे बघितलं. तो अस्वस्थ वाटला. कदाचित खेडवळ पत्नीमुळे आता मान खाली घालण्याचा प्रसंग येण्याची शक्यता आहेसं वाटून तो अस्वस्थ झाला असावा. समजूतदारपणे त्याच्या खांद्यावर हात ठेवत वसुधा म्हणाली, 'मला इथे नीट वागणं जमेल का या प्रश्नात गुदमरत असलास तर निश्चिंत रहा. तुझ्या पोझिशनला बट्टा लागेल असं मी वागणार नाही.'

वसुधाच्या ओठावर गोड स्मित होतं. पण तिचा आश्वासक स्वर वा मंद स्मित कसलाच परिणाम झाला नाही. परेशच्या अस्वस्थतेत भरच पडली. बावरल्या मनानं तो सिगरेट आणि लायटरसाठी खिसे चाचपडत सुटला. त्याच्या कपाळावरची शीर टरटरून फुगली. परेशच्या अस्वस्थ अवस्थेची चहाडी करणारी ही शीर आता वसुधासाठी परिचित होती. तरीही ती शांत, स्वस्थ होती. शब्दांपेक्षा वर्तनाचं सामर्थ्य मोठं! माझं वर्तन त्याला नक्कीच आश्वासक वाटेल. या खात्रीनं ती गप्प राहिली.

विमान थांबताच स्वत:ची हँड बॅग घेऊन परेश चालू लागला. बाकीचं सामान हाती येईतो त्याची उत्सुकता शिगेस पोहोचली. वसुधाकडे न बघता तो भरभर चालू लागला. उंच टाचेच्या सँडलसचा वसुधाला खूप सराव झाला नव्हता. शिवाय परेशला लाजिरवाणं वाटू नाही यासाठी आब संभाळत चालणं गरजेचं होतं. परेशच्या उतावळ्या चालीशी तिचा ताल जुळेना. संथ पण रूबाबदारपणे ती परेशच्या मागे चालत राहिली. बघता बघता विझिटर्स लाऊंजचं काचेचं तावदान दृष्टिपथात आलं. परेश जेमतेम दरवाज्याबाहेर आला तोच एक गोरं गुटगुटीत पोर त्याच्याकडे झेपावलं. 'हाय डॅड!' म्हणत परेशला बिलगलं, परेशनंही प्रेमानं त्याला उचलून घेतलं. वसुधा डोळे विस्फारून बघत राहिली. त्या पोरापाठोपाठ धीम्या चालीनं वसुधापेक्षा चार इंच उंच असणारी पुरुषी थाटाची

गोरी बाईही आली. परेशला मिठीत घेत तिनं प्रदीर्घ चुंबन घेतलं.

क्षणार्धात वसुधाला परिस्थिती उमजली. फसवणुकीची जाण तिच्या मस्तकात रोषाची आग पेटवू लागली. पण.... तिच्या नजरेत उडणाऱ्या ठिणग्यांकडे कुणाचं लक्ष नव्हतं. खूप दिवसांनंतर एकत्र जमलेलं ते कुटुंब एकमेकांचं कुशल विचारण्यात मग्न होतं. पायाखालची सरावाची जमीन सरकली असताना आपला रोष वांझ ठरणार या जाणिवेनं वसुधा हताश झाली. अनोळखी प्रदेश, अपरिचित समाज आणि निष्कांचन अवस्था! काय करू शकतो आपण? या प्रश्नाचं उत्तर सुखद भासत नव्हतं. असहाय्य लाचार अवस्थेची जाण वसुधाला भुईसपाट करीत होती. त्याच वेळी परेशनं मागे वळून बघितलं. तिच्या डोळ्यांतील नाचऱ्या बाहुल्या थिजल्या होत्या. क्षणभर परेशच्या नजरेत व्यथा डोकावली. पण दुसऱ्याच क्षणी तो कोरड्या स्वरात म्हणाला, 'कम हरीड्ली.'

त्या तिघांमागे फरफटत्या चालीनं जाणाऱ्या वसुधाच्या पावलात क्षणापूर्वीचा रूबाब वा उत्साह उरला नव्हता. पाय बांधून ठेवणारे सँड्ल्स आता मोहक वाटण्याऐवजी काचत होते. आत्मविश्वासाला नख लागून वसुधा निराश झाली होती. अनोळखी वातावरणात विलक्षण असुरक्षित वाटत होतं.

अव्ययावत गाडीत परेश आणि त्याची पत्नी पुढे बसले. 'ये.' मागचं दार उघडून परेशनं वसुधाला बोलवलं. पण तिच्या आधी ते पोर टुणकन् उडी मारून गाडीत शिरलं. मेल्या मनानं वसुधाही बसली. सुंदर मोटरीतून आपली पुन्हा वरात निघेल या स्वप्नात रमणाऱ्या वसुधाला स्वत:ची प्रेतयात्रा निघालीय असं वाटलं. सुखाचा झुला आकाशाला भिडतोयसं वाटतं न वाटतं तोच दोर तुटून ती खोल दरीत कोसळली होती. ही वैफल्यग्रस्त अवस्थाच आता मरेपर्यंत गुदमर दाटवील या कल्पनेनं काळजाचा ठाव सुटत होता. ज्या मुक्त प्रणयाची स्वप्नं वसुधा रंगवत होती त्या प्रणयासाठी प्रेक्षक म्हणून तिची स्थापना झाली होती. व्हील हातात असूनही परेश रंगात आला होता. मागे बसलेलं त्याचं पोर अधून मधून आई-बापांच्या गळ्यात हात घालून खिदळत होतं. जड पुतळीगत वसुधा मेल्या नजरेनं सारं बघत होती.

लवकरच सारं खुलासेवार कळलं. कळलं म्हणजे काय? बेशरम परेशनं सारं निर्लज्ज स्वरात सांगितलं. एअर पोर्टवर परेशला पोर बिलगलं त्याक्षणीच अंदाज आला होता. पण परेशनं मानभावीपणे सारं सांगितलं. काय होतं की...

संकुचित समाजव्यवस्थेतून परेश मुक्त समाजात गेला. वारा प्यायल्या वासरागत उधळलाच तो! शनिवार-रविवारच्या रजेत तो बकिंगहॅम पॅलेस बघायला गेला. त्याच वेळी टुरिस्ट इझाबेल फ्रान्सहून लंडनला आली होती. खेड्यातील आरोग्यप्रद वातावरणात छान तगडा बनलेला परेश तिच्या नजरेत भरला. त्याचा टॅन कॉपर कलर आणि चेहऱ्यावर मग्रूर पटेल भाव तिला भलतेच भावले. जे आवडलं त्यावर झडप घालायची हा स्वभाव असणारी इझाबेल पॅलेस बघणाऱ्या परेशजवळ गेली. गप्पांच्या ओघात बरोबर साईट सीइंग करण्याचा मानस तिनं ओठी आणला. परेशची अवस्था आंधळा मागतो एक

डोळा सारखी झाली. त्या ट्रीपमध्ये प्रेक्षणीय स्थळं बघत असताना तिनं परेशलाही 'खूप काही' दाखवलं. तिचा आक्रमक प्रणय पाहून परेशला गाव आठवायचं. दिवसभर कामाचा रगाडा, रात्री आंबल्या शरीरानं पाप केल्यागत अंधार पडल्यावर दबत्या पावलानं सेक्सला सामोरी जाणारी भारतीय स्त्री! नको नको म्हणणारी! त्या पार्श्वभूमीवर अजून हवं... म्हणणारी फ्रेंच मदनिका त्याला विलक्षण भावली. दिवसा काम नि रात्री 'काम' हे भारतीय वेळापत्रक झुगारून स्थळकाळाचं भान न ठेवता इझाबेलची मागणी पूर्ण करणं त्याच्या पौरुषाला हवंहवंसं आव्हान वाटलं. इझाबेलच्या लंडन वास्तव्याचा काळ कापरागत उडाला आणि ती फ्रान्सला गेली. परेश अस्वस्थ झाला. लंडन-फ्रान्स अंतर अवघं एका खाडीचं! कधी ते प्रणयोत्सुक परेशनं पार केलं तर कधी इझाबेलनं! आकर्षणाची मात्रा तीव्र होत असह्य ओढ बनली. भेटीगाठींनी समाधान होईना म्हणून परेशनं लंडनचा निरोप घेतला. सरळ तो इझाबेलच्या घरात शिरला.

फ्रान्समध्ये फारकतीचं प्रमाण वाढत होतं. जीवन अस्थिर आणि असुरक्षित बनत होतं. खुद्द इझाबेल आईबापाच्या बेबनावात होरपळली होती. तिच्या मनात अभंग दांपत्य जीवनाविषयी ओढ होती. भारतीय संस्कृतीविषयी कुतूहलमिश्रित आदर होता. दुसऱ्याच्या सहचराशी अदबीनं वागणारा समाज लग्न तुटू नये यासाठी आकाशपाताळ एक करतो असं ती ऐकून होती. मनात फ्रेंच सहचराऐवजी भारतीय जीवनसाथी निवडण्याची इच्छा आकार घेत असताना नेमका परेश भेटला. हिरिरीनं तिनं जाळं फेकलं. परेशलाही भारतीय संस्कृतीत रेशनच्या मापानं मिळणारा प्रणय नकोच होता. त्यानं आनंदानं लग्न स्वीकारलं. इझाबेल एकटीच होती. तिला विरोध करणारं कुणी नव्हतं आणि परेशनं आळीमिळी गुपचिळीचं धोरण स्वीकारलं. पटेल-पटलाणीला अंधारात ठेवून लग्न उरकलं.

मुक्त प्रणयरंगात रंगायची स्वप्नं बघताना परेश जमिनीपासून दोन बोट अध्धर चालत होता. लग्न होताच त्याचे पाय जमिनीला लागले. दिवसा काम आणि रात्री 'काम' हे भारतीय वेळापत्रक मंजूर नसणारा परेश पुरुषानं घरकाम करणं अयोग्य ठरवणाऱ्या वातावरणात वाढला होता. फ्रेंच युवतीचा मुक्त प्रणय लग्नाआधी दिसला पण लग्न होताच 'घी देखा पर बडगा नहीं' अशी त्याची अवस्था झाली. पुरुषप्रधान संस्कृतीची साहेबी उपभोगणाऱ्या परेशला पत्नीच्या बरोबरीनं घरकाम आवडेना. घरात सतत बापाचं मग्रूर वर्तन बघितलं होतं. कुणाचंही चुकलं तरी माफी पटलाणीच मागे. पण इथे घरकाम करूनही छोट्यामोठ्या चुकांसाठी वारंवार इझाबेलला सॉरी म्हणावं लागे. जेमतेम घरकाम अंगवळणी पाडलं. तोच.. तोच इझाबेलला दिवस राहिले. बाप बनण्याच्या कल्पनेत पुन्हा परेश हुलारला. फ्रेडरिकचा जन्म होईतो सारं जरा तरी ठीक होतं. पण पुढे घरकामात फ्रेडरिकची नेपी साफ करण्याचं - स्पष्ट शब्दात पोराचं हगलं-मुतलं काढायचं काम वाढलं. कामचोरी तर सोडा; पण जरा नाक मुरडलं तरी इझाबेल वाघिणीसारखी तुटून पडे. 'डोंट बिहेव लाईक इंडियन हबी.' म्हणून झापायला तयार असे.

हे कमी होतं तर फ्रान्समध्ये बेबी सीटिंग भलतंच महाग! फ्रेडरिकसाठी दोघांना

कामाच्या वेळा वेगळ्या घ्याव्या लागल्या. आठ तासांची नोकरी. दोन तास येण्या-जाण्यात, दहा तास तो घराबाहेर. तो घरी येताच इझाबेल नोकरीवर जाई. म्हणजे वीस तासांची फारकत आणि चार तासांचा सहवास! हे चार तासही असंतोष आणि कुरकूर करण्यात संपून जात. म्हणजे मुक्त प्रणयजीवन दूरच राही. फ्रेडरिकच्या जन्माआधी बडगा असला तरी घीसुद्धा दिसे. पण मग नुसताच बडगा! तरी स्वत:चं नाव लावणारा पोरगा हवासा वाटायचा म्हणून सारं निभावलं. फ्रेडरिक बालक मंदिरात जाऊ लागला आणि पुन्हा प्रणय रंगू लागला. पण निखळ सुख नियतीला मंजूर नसावं. इझाबेलला पुन्हा दिवस असल्याची शंका आली आणि परेश हादरला.

पहिल्या वेळी कुरकुरत का होईना कसंबसं निभावलं होतं. आता त्या यातनाचक्रातून पुन्हा जाणं त्याला नको होतं. गर्भपाताला तिथे कायद्यानं मान्यता नाही. नियतीच्या हातचं खेळणं होणं हुशार परेशला पटत नव्हतं. मनात कुठेतरी इझाबेलसारख्या निळ्या डोळ्याच्या कन्येच्या पितृत्वाची आसही होती. परेशनं धूर्तपणानं फासे स्वत:च्या हातात घेण्याचा निर्णय घेतला.

परेश हुशार होताच. स्वत:च्या हुशारीची त्याला जाणीवही होती. गावाहून पटलाणी पत्रांचा वर्षाव करीत होतीच. लग्न नसेल करायचं तरी निदान भेटायला तरी ये असं वारंवार फोनवरही बोलत होती. धूर्त परेशाच्या मनात कपटनाट्याचं बीज रुजलं आणि बघता बघता वृक्षासारखं फोफावलं. इझाबेलच्या प्रेगनन्सीचं कन्फर्मेशनही होण्याची वाट न बघता तो विमानात बसला. विमानाच्या वेगानं धूर्त मनात योजना वाढीस लागली. वाटलं... लग्नाला होकार दिला तर आई-बाप खूश होतील. पण एखादी नाठाळ पटेलकन्या बापाच्या जोरावर डोक्यावर मिरे वाटू लागली तर? त्यापेक्षा एखाद्या गरिबाघरच्या पोरीच्या डोळ्यात प्रेमाचं काजळ घालावं...समर्पण हा तर भारतीय स्त्रीचा अविभाज्य पैलू शिवाय अपरिचित वातावरणात गरीब मुलीच्या समर्पणासाठी पर्याय उरणारच नाही. ती खुशीनं 'दुसरी'चं स्थान पत्करणारच.

गावी आल्यावर लायक प्रणयपात्राचा शोधही घ्यावा लागला नाही. रूपवती, गुणवती वसुधा त्याच्या कल्पनेपेक्षाही अधिक गरिबाघरची होती. शिवाय तिच्या मनात परेशावि-षयी कृतज्ञता होतीच. नाहीतरी पश्चिमेत फ्री सेक्सची सवय लागल्यावर इकडे अगदी कोरडेपणी दिवस काढणं अवघडच होतं. सहजपणे सारा घाट जुळवता आला ते कमी होतं तर लाच-लुचपत स्थायीभाव बनलेल्या देशात पटेल वसुधासाठी व्हिसा मिळवू शकले. व्हिझिटर्स व्हिसावर तिला नेलं असतं तर मर्यादित वेळात तिला परत पाठवावं लागलं असतं. बापाच्या हुशारीनं परेशला अधिकच खूश केलं. मग तर. .

सारा पाढा वाचून परेश मानभावीपणे म्हणाला, "तू काळजी करू नकोस तू मला खरंच फार आवडलीस. संधी शोधून मी तुला अवश्य भेटेन. तुझ्या त्या कष्टमय जीवनापेक्षा इथलं जीवनही आरामदायक आहे. मला कळतंय, परेशाच्या परीसस्पर्शाशिवाचून तू कोमेजशील. पण मी वचनाचा पक्का आहे. तुला कोमेजू देणार नाही."

हताश वसुधा मेल्या मनानं ऐकत होती. वाटलं...लोकांनी वापरलेल्या वस्तू आपल्या वाट्यास येत तेच घडलं इथेही! नवरा कोरा करकरीत नाही हे कसं कळलं नाही आपल्याला? त्याचा रोमान्स नव्या खेळाडूचा नसून सराईताचा आहे हे न कळण्याइतके हुलारलो आपण! खरंच का प्रेम आंधळं असतं? परेश म्हणतो ते खरंच आहे. माझ्या सारखीला 'रिलीव्हरच्या' भूमिकेसाठी पर्याय नाहीच. वैफल्यग्रस्त मनात निराशावादी विचार गरगरत होते.

इथे वसुधाची कथा दु:खांतानं संपायला हवी होती. पण पुन्हा सांगायचं तर ही कथा नाहीच. ट्रूथ इज फास्टर दॅन फिक्शन किंवा स्ट्रेंजर दॅन फिक्शन अशी इंग्रजीत म्हण आहे. सत्याची उंची खरंच कल्पनेहून अधिक ठरू शकते, याची प्रचीती म्हणजेच वसुधाचं जीवन! म्हणूनच वसुधा हताश झाली आणि तिनं समोर आलेल्या जिण्याचा स्वीकार केला असं घडलं नाही. अचानक समोर ठाकलेलं वास्तव धक्कादायक होतंच. त्या धक्क्यानं वसुधा कोसळली. बधिर झाली. मन चेतनाशून्य बनलं हे सारं खरंच. पण...

मनाची असो वा देहाची- मूर्च्छना ही कायमी अवस्था नाहीच. कारण परत्वे नजरेसमोर अंधार दाटला तरी क्षणार्धात नजर अंधार भेदू जाणते. अंधुक का होईना दिसू लागतंच. हे वसुधाला कळत होतं म्हणूनच... म्हणूनच अचेतन बनलेल्या मनातही चेतना धुगधुगत होती. त्या धुगधुगीनं तिच्यासमोर हेलन केलर साकार केली. बधिर बनल्या वसुधाला गदागदा हलवत ती म्हणाली, "अगं जमेच्या बाजूस काहीही नसताना मी जीवनाशी चार हात केले. तू तर सुदृढ आहेस. शिवाय संघर्ष तरी तुला नवा आहे का? पोटाची खळगी भरायलाही जिला परिस्थितीशी दोन हात करावे लागलेत तिनं संघर्षाला का घाबरावं?" मेरी वर्गीस तिला म्हणाली, "टेक माय हँड्स काय वाचण्यासाठीच वाचलंस? त्यातून काहीच मिळवलं नाहीस तू? उठ वसुधा! प्रत्येक काळ्या ढगाला आशेची किनार असतेच हे लक्षात घे. शोधा म्हणजे सापडेल असं उगीच का म्हटलंय? जुल्मासमोर मोडूही नकोस आणि वाकूही नकोस. सशक्त तन आणि मन हेच तुझं भांडवल! फार अनमोल असं! त्याच्या विचारपूर्वक उपयोग कर! आता संपलंच सारं म्हणून खचू नकोस. भुईसपाट होऊ नकोस. उठ वसुधा उठ! तुझ्या आशावादी मनातील आशेची ज्योती परेशच्या धूर्तपणानं विझता कामा नये. फसवणुकीच्या जाणिवेनं निराश होण्यापेक्षा तुझ्यात बंडाची ठिणगी पेटू दे. त्या ठिणगीची अशी मशाल पेटव की पलित्याच्या उजेडात तुलाच नव्हे तर अनेकांना मार्ग स्पष्ट दिसावा...

खरच निराशा झटकून वसुधा उठली. तिची चौकस नजर आसपास फिरू लागली. काहीतरी करायचंच या निर्णयाप्रत पोहोचेतो रूटीनची घडी नीट बसली होती. परेश आणि इझाबेल वेगवेगळ्या ठिकाणी कामाला जात. जाताना परेश फ्रेडरिकला बालकमंदिरात सोडत असे. त्याला परत आणण्याचं काम वसुधाचं असे. फ्रेडरिकला संभाळणं आणि घरकाम ही कामं खरंच वसुधानं बघितलेल्या कष्टमय जीवनापेक्षा फार आरामशीर

होती. भाषा येत नसूनही वस्तू दाखवीत, हावभाव करीत संवाद साधणाऱ्या फ्रेडरिकच्या माध्यमातून तिला बरंच कळू लागलं होतं. वाक्य नव्हे तरी शब्द बोलता येत होते.

फावल्या वेळात वसुधा एकच प्रश्न विचारून स्वत:ला भंडावून सोडी. या घरात माझं स्थान काय ? कोण आहे मी ? मोलकरीण ? छे! तिच्या कामाचं मोल मिळतं. परेशची रखेली ? छे! छे!! रखेलीला तिच्या लायकीप्रमाणे सुबत्ता मिळते. शिवाय सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे...जाणतेपणी त्यांनी हे स्थान स्वीकारलेलं असतं. परेश म्हणतो- तिथेही तू मोलकरीण... स्वयंपाकीण तर होतीस...बी.ए. झालीस म्हणून फार तर कुठे कारकुनी करून कारकून नवरा मिळवू शकली असतीस...हे खरं असलं तरी ते उघड्या डोळ्यानं स्वीकारलेलं वास्तव ठरलं असतं. पण इथे....फसवणुकीची याद येताच वसुधाचा ओठ दाताखाली चिरडला जाई. मोलकरणीला काम सोडायचा हक्क असतो. मी काय करू ? इथून बाहेर पडले तर वर आकाश खाली जमीन अशी अवस्था...

विचार करतानाही नजर भिरभिरत राही. फ्रेडरिकला घ्यायला जाताना तिच्या भिरभिरत्या नजरेत एक कॉम्प्युटर क्लास भरला. त्या वेळी ती स्वत: आणि परेश मधील संबंधाचा शोध घेत होती. परेशची गुलाम असणं वा तो शोषक आणि स्वत: शोषित असणं ही जाण मनात रोषाचा अग्नी फेकणारी ठरली. तिरमिरीत ती क्लासमध्ये शिरली. काय नि कसा तपास करायचा याचा विचारही धडपणे केला नव्हता तरीही!

अनायासे तिथल्या प्रो. पॅट्रिकला बऱ्यापैकी इंग्रजी येत होतं. शब्दांची मदत घेत चौकशी करण्याचा तिचा आटापिटा त्याला आवडला; कारकून होता यावं यासाठी ती टायपिंग शिकली होती. सारं सांगून ती अडखळली. फीचा प्रश्न साधा नव्हता. आर्थिक समस्या तिच्या डोळ्यांत डोकावली असावी. पॅट्रिकनंच तिला मार्ग सुचवला...थोडं टायपिंगचं काम तो देऊ शकेल. बेबी सिटिंगसाठी काही पत्तेही देणं त्याला जमणार होतं. फीसाठी थोडं थांबायची त्यानं तयारी दाखवली आणि वसुधाच्या मनात आशा पालवली.

आठवड्यातून तीन दिवस क्लास असे. 'अर्न अँड लर्न' ची पद्धत पश्चिमेत नवलाईची नव्हती. घरात कुणी नसण्याचे चार तास वसुधाचे असत. एक तास जाण्यायेण्यात खर्च झाला तरी क्लास असेल त्या दिवशीही ती तासभर टायपिंगचं काम करू शके. क्लास नसणाऱ्या दोन दिवसांत बेबी सिटिंगसाठी जाई. कधी टायपिंगचं काम करी. कुठलंच काम नसेल तरी अभ्यासाचं काम होतंच. वसुधानं रूटीनची छान घडी बसवली. 'जशास तसे' करता येण्याची शक्यता निर्माण होताच फसवणुकीची बोच कमी झाली.

क्लास सुरू होण्यापूर्वी परेश इझाबेलचा मुक्त प्रणय तिच्या मनात हनिमूनच्या आठवणी जागवी. त्या आठवणी मादक न वाटता दाहक वाटू लागत. मन उद्ध्वस्त होई. रात्री परेशच्या बेडरूमच्या भिंतीतून सूचक चित्कार झिरपत. फ्रेडरिकच्या खोलीतून कोरडे हुंदके ऐकू येत. सैरभैर होण्याला पर्याय नसे. पण क्लास सुरू होताच परेश-इझाबेल खोलीत गेले की, ती थोडा अभ्यास करी. सहजपणे हे जमलं नाहीच तरी प्रयत्नपूर्वक

तिनं मनाची एकाग्रता मिळवली.

एकदा अभ्यास संपवून ती आडवी झाली. बंद डोळ्यांना कुणाची चाहूल जाणवली. डोळे उघडताच कोरडे हुंदके देत उभा असलेला फ्रेडरिक दिसला. त्याच्या नजरेत कारुण्य होतं. क्षणभर वसुधाच्या मनात राग दाटला. सवतीचं कार्ट आपल्या रात्रीवरही अधिकार गाजवणार या कल्पनेनं ती संतापली. पण दुसऱ्याच क्षणी तिला वाटलं....जे घडलं त्यात या पोराचा काय दोष? यांच्या संस्कृतीनं आई-बापाच्या एकांतावर हक्क सांगण्याचा अधिकार मुलांना दिला नाहीय. मातेच्या गर्भाशयातून बाहेर पडताच ती सरळ नर्सरी रूममध्ये जातात. बेबी कॉटमध्ये कितीही मुलायम टेडी बेअर्स असले तरी त्यात आईच्या कुशीची उब नसणारच. या मुलांना मुळं उचकटल्यासारखं वाटत असलं तरी ते सांगणार कुणाला? आई-बाप असूनही अनाथ होणारी ही मुलं आणि आपल्यात काय फरक आहे? मातेच्या गर्भाशयातील उबदार वातावरण संपवून बाहेरच्या जगात आपण उघडे पडणार आहोत याची त्यांना कल्पना नसते. सरावाच्या जमिनीचा निरोप घेतला त्यावेळी 'असं' घडेल याची कल्पना नसलेली मी! भिन्न अर्थानं असलो तरी आम्ही दोघं अनाथ - समदुःखीच. सहसंवेदनेच्या जाणिवेनं वसुधानं नकळत हात फैलावले. शब्दांची देवाण-घेवाण नसूनही फ्रेडरिकनं तिची भावना अलगद जाणली. हक्कानं तो वसुधाच्या मिठीत शिरला. मग ते रुटीन बनलं. वसुधानं पुस्तक बंद करताच फ्रेडरिक तिचं बोट धरून तिला बिछान्याकडे नेई. अनाथपणाच्या भावनेनं पिडलेले समदुःखी जीव एकमेकांच्या मिठीत ऊब शोधीत. अनाम नात्याचा जन्म झाला आणि एकमेकांची रहस्यं जपण्याच्या आणाभाका न होताही ती वृत्ती स्वभावात भिनली. फ्रेडरिक घरी आल्यानंतर परेश-इझाबेल येईतो वसुधा निर्वेधपणे बेबी सिटिंग करू लागली. क्लासची फी वजा जाता पर्समध्ये थोडी माया जमली आणि आशावादी वसुधा आत्मविश्वासानं तरारली. सारं छान जुळवता आलं होतं.

दिवसांच्या रूळांवरून काळाची गाडी भरधाव पळत होती. महिन्यांची स्टेशन्स मागे पडत होता तसतसं इझाबेलचं शरीर बोजड होत होतं. परेशसाठी ती निकामी ठरत होती. परेशची आसक्त नजर वसुधाकडे वळणं स्वाभाविक होतं. प्रदूषण विरहित थंड हवा आणि सकस आहारामुळे वसुधाच्या मूळच्या सौंदर्याला झिलाई प्राप्त झाली होती. गावी किंचित नारीक फिकी वाटणारी वसुधा इकडे अंगानं भरली होती. गोरेपणात गुलाबी छटा मिसळलेली वसुधा अधिकच आकर्षक बनली होती. परेशला वाटलं- भिकारड्या ब्राह्मणाच्या पोरीची अपेक्षा ती काय? शिवाय भारतीय पत्नी नवऱ्याचे सारे अपराध पोटात घेते. आता शरीरसुखही तिला दिलं तर तिला कसलीच कमतरता उरणार नाही.

स्वतःला शृंगार समजणाऱ्या परेशनं गावी जशी अभावित वाटणाऱ्या योजक स्पर्शाची उधळण आरंभली होती तेच तंत्र त्यानं पुन्हा सुरू केलं. पण गावी त्याच्या स्पर्शानं मोहरणारी वसुधा आता त्या तंत्राला भीक घालीना. अनाहूत स्पर्शानं तिच्या नजरेत संताप दाटे. चाळीस वर्षांत मिळालं नसतं तितकं ज्ञान वसुधाला चार महिन्यांच्या

अनुभवानं दिलं होतं. पण परेशच्या निलाजरेपणाला सीमा नव्हती. रूसल्या पत्नीचा अनुनय करणाऱ्या प्रेमळ नवऱ्यागत तो तिला रिझवण्याचा प्रयत्न करी. इझाबेलच्या रागीट नजरेकडे तो कानाडोळा करी. काळ आपल्या गतीनं सरकत होताच.

वसुधाच्या क्लासच्या इतर पोरी क्लास संपला की कधी ऑपेरा वा सिनेमाचा बेत करीत. कधी साध्या कॉफीपानाचा बूट निघे. वसुधाचा यात सहभाग नसे. फ्रेडरिकला संभाळणं गरजेचं असेच. शिवाय खर्च करण्याची शक्तीही नव्हती. पण फ्रेडरिकच्या सहकार्यानं थोडी गंगाजळी जमली आणि फ्रेडरिकच्या पिकनिकचं निघालं. रोजच्या पेक्षा तो उशिरा परतणार होता. परेशनं घरी येताना त्याला घेऊन यावं असं नक्की झालं. ही संधी साधून वसुधानं तिला कॉफीपान जमेल असं मैत्रिणींना सांगितलं. साऱ्यांनी क्लास संपताच कॉफी शॉपमध्ये जायचं ठरवलं.

फ्रान्समध्ये कॉफी पिणं हे काम नसून आनंदप्रद सोहळा समजण्याची पद्धत आहे. परकोलेटेड गरम कॉफीची लज्जत रमत गमत रंगणाऱ्या गप्पांनी वाढवायची असते. तोवर पॅट्रिक, मैत्रिणी आणि फ्रेडरिकच्या मदतीनं वसुधानं फ्रेंच भाषा आत्मसात केली होती. मस्त गप्पा रंगतीलसं वाटावं अशी ! पण....

बार आणि कॉफी शॉप जोडून असलेल्या ठिकाणी वसुधा तिच्या मैत्रिणींसह भल्या मोठ्या छत्रीखाली बसली होती. कधी नव्हे ते पिकनिक मूड लाभला होता. मिटून गेलेली वसुधा पाकळी पाकळीनं फुलू लागली. कुठल्याशा विनोदावर ती खळखळून हसत असतानाच नेमका बारमधून परेश बाहेर आला. पिऊन तर्रर्र झालेला परेश बारमेडच्या आधारानंसुद्धा धड तोल सावरू शकत नव्हता. आठ हातापायाचं किळसवाणं जनावर वाटावं अशीच दोघांची स्थिती होती. त्या बेभान धुंद अवस्थेतही वसुधाचं मुक्त हास्य झिरपल्यागत मनात उतरलं. तारवटल्या नजरेनं त्यानं हास्याच्या दिशेला बघितलं....जे दिसलं त्यावर विश्वास बसेना. डोळे चोळत त्यानं पुन:पुन्हा बघितलं. मैत्रिणींच्या ताफ्यात पॅट्रिक आणि इतर दोन तरुणही होते. तो मिश्र ग्रूप पाहून परेश रागानं पिसाळला. वेट्रेसला धक्का मारून तो लटपटत्या पावलानं छत्रीकडे धावला. 'हाय वहाली !' वसुधाला मिठीत घेत तो आईच्या भाषेत बरळला. 'भलतीच मादक दिसतेस. माझ्यावरचा राग सोडलास तर तुला जीवनाचे मोहक पैलू दाखवीन. आय प्रॉमिस.'

परेशचे तारवटले डोळे, सुटणारा तोल आणि जिभेच्या विकृत हालचालींमुळे येणारे बोबडे शब्द.. वसुधाच्या मनात किळस दाटली. तरी संयमानं त्याला दूर करीत तिनं जागा बदलायला सुचवलं. कुणी मवाली आहेसं वाटून सारे दुसऱ्या छत्रीखाली गेले. पण परेश लटलटत तिथेही पोहोचला. "यू ड्रंक.. बिहेव युअर सेल्फ" वसुधा संतापून ओरडली आणि परेश पिसाळला. वसुधा सारखी मदनिका नजरेसमोर असून उपाशी राहवं लागत असल्याचा असंतोष मनात होताच. त्यावर ठिणगी पडताच तो बेभानपणे इंग्रजी, गुजराती, फ्रेंच भाषेचं मिश्रण ओकत सुटला. शिव्यांची उधळण सुरू झाली. "साली माझी बायडी असून मला भुखा मारते. यारांचे लाड करते राड. आज तुला

जित्ती नाय सोडणार...'' वसुधाच्या अंगचटीस येत त्यानं मंगळसूत्राला हात घातला. ''हे कुणाच्या नावचंय बोल ? माझ्या आईनं दिलंय तुला. त्याचे असे पांग फेडतेस. . ''

परेशाचं तार सप्तकात किंचाळणं चालू होतं. ते ऐकून बार आणि कॉफी शॉपचा स्टाफ तिथे धावला. त्यांनी परेशला वसुधापासून दूर खेचलं तरी तो ओरडत होता. 'शी ईज माय वाईफ ! सी हर मंगळसूत्र...' दंगा करणाऱ्या परेशला धक्के मारून बाहेर काढण्यात आलं तरी वसुधाचा धीर खचला. दोन्ही हातांच्या ओंजळीत तोंड खुपसून ती हुंदके देत होती. बाहेर काढलेल्या परेशच्या उन्मत्त शिव्या आत ऐकू येत होत्याच. भाषा कुणाला कळली नसती तरी आशय कळण्याइतकी समज सर्वांच्यात होती. शिवाय मैत्रिणींत दोघी भारतीय होत्या. गुजराती नसल्या तरी भारतीय भाषांत आशय कळण्याइ-तकं साम्य नक्कीच आहे याची जाण वसुधाला उद्‌ध्वस्त करीत होती.

पॅरिसमध्ये पाऊल टाकल्यापासून उद्‌ध्वस्तपण अंगावर कोसळलं होतं. व्यथा व्यक्त करायला जागा नव्हती तरी स्वत:च्या जखमांवर स्वत:च उपचार करीत वसुधानं नेटानं जीवनाला वळण लावलं होतं. वैफल्यावर मात करून संघर्ष सुरू केला होता. स्वत:च्या पायावर उभं राहण्याची शक्ती येईतो परेशच्या घरी राह्यचं होतं. पण....मनातील योजना तडीस जाण्यापूर्वी स्वप्नांचा इमला कोसळला होता. स्वप्नांच्या तुकड्यांकडे वसुधा हताश नजरेनं बघत होती. साऱ्यांची नजर आपल्या मंगळसूत्रावर खिळली आहे याची जाण तिच्या निराशेत भर घालीत होती.

पण मंगळसूत्रावर स्थिरावल्या नजरेत चोचरा विचार नव्हता. इथे 'नो इंटरफिअरन्स' हा जीवनमंत्र ! पण इथला अलिप्ततावाद वांझ नव्हता. आपल्याला काय ? हा क्रूर प्रश्नही इथे नव्हता. कुणी मागितला तर सल्ला द्यायचा; पण त्याबरहुकूम समोरच्यानं वागलंच पाहिजे असा आग्रह इथे नसतो. 'ऐकायचं नव्हतं तर विचारलं का ?' असल्या उद्धट प्रश्नालाही स्थान नसतं म्हणून अलिप्ततावादही मोहक बनतो इथे हे वसुधाला नव्यानं कळलं.

रडण्याचा भर ओझरताच परेशच्या निमित्तानं त्यांच्यात चर्चा होणं अपरिहार्य होतं. या चर्चेत तिला खूप काही जाणवलं. भारतीय आणि अभारतीय दोन्ही विचारप्रवाह उमगले. या देशात काडीमोड पटकन् मिळू शकतो. पण भारतातील लग्नाला अर्थ उरत नाही. शिवाय भारतात परतणंही तापदायकच असतं. परत आलेली मुलगी कुणाला नको असते. आई-बापांचा वांझ प्रारब्धवाद आणि सत्तेची सूत्रं भाऊवहिनींच्या हाती गेल्यामुळे बनणारी बिकट परिस्थिती ! सारं चांगलं असलं तरीही बघणाऱ्याच्या नजरेत उमटणारी सहानुभूतीही दाहक ठरते. त्यापेक्षा 'ही तिकडे' असते का ?' या प्रश्नातून निथळणारी असूया सुखद वाटते. मायदेशी जाऊन आपल्या माणसांचे टोमणे खात जगण्यापेक्षा वा दयनीय ठरण्यापेक्षा इकडून गोड गोड पत्रं आणि सुबक संसाराचे, चकचकीत पॉश गाड्यांचे फोटो पाठवून सारं छान छान असण्याचं नाटक वठवणं बरं वाटतं. म्हणून कित्येक भारतीय पोरी लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क आदीसारख्या पाश्चात्त्य शहरांत मोलकरीण,

रखेली वा पत्नी कशातही न बसणारं जिणं जगणं पसंत करतायत. 'रिलीव्हर' चं लाजिरवाणं स्थान त्यांना मायदेशी वाढून ठेवलेल्या अपमानापेक्षा बरं वाटतंय. वसुधाची मैत्रीण तिला म्हणाली, ' तुझे वडील निदान कंगाल तरी होते. माझ्या वडिलांनी तर परदेशचा मुलगा मिळतोय म्हणून सुवर्णतुला करून द्यायचंच बाकी ठेवलं...' चर्चेच्या ओघात तिची पंजाबी मैत्रीण म्हणाली 'तिकीट काढता येण्याजोगी माझी आर्थिक स्थिती आहे. पण तिथे शेजीबाई आणि वहिनीच्या साळकाया माळकाया म्हणतील...मोठी उडत नाचत परदेशी गेली. तिथे मिळाला ठेंगा. साक्षगंधाची अंगठी ज्यानं घातली त्यानंच दाखवला अंगठा. आल्या परत...त्यापेक्षा...'

वसुधाच्या तोंडून उदास नि:श्वास निसटला. वसुधाच्या संगतीनं त्यांनी टिपं गाळल्यामुळे समस्येची उकल मिळणार नव्हती. जड पावलानं वसुधा परतीच्या रस्त्याला लागली. आज परेशनं घराबाहेर काढलं तर ? पंखात पुरेसं बळ येण्यापूर्वीच आता किंचित सरावाची वाटू लागलेली जमीनही पायाखालून सरकली तर ? माथ्यावरचं छप्पर उडालं तर ? या मैत्रिणी पुन्हा कधी दिसतील ? स्वत:च्या पायावर उभं राहण्याचं- खुमारीचं जीवन जगायचं स्वप्न सत्यात उतरेल ? की परेशच्या घरात केरपोतेऱ्याचं लाचार जिणं जगत श्वास संपवावे लागतील ? का ? का ?? जीवनाकडून मी कधी अवास्तव अपेक्षा ठेवली नव्हती. कुठेतरी कारकून वा टंकलेखक व्हावं. अडीअडचणीला पटलाणीला मदत करावी. जीवनाच्या वाटेवर जोडीदार गवसला तर लग्न करावं न पेक्षा खुमारीनं जगण्यावर समाधान मानावं हा साधा उद्देश का भलत्या वास्तवाच्या वादळात उद्ध्वस्त झाला ?

मनात निराश, उदास विचारांचं वादळ उठलं. आता संपलंच सारं असं वाटत असतानाही अशरण मन हार स्वीकारायला तयार नव्हतं. दडपशाहीला शरणच जायचं असतं तर हा क्लास सुरू करण्यापूर्वीही जाता आलं असतं. मी नाही परेशपुढे मान तुकवणार ! मी नाही 'वसुधा' कळपात सामील होणार. मी 'परेश' जमातीला वठणीवर आणीन. पुन्हा 'वसुधा' जमातीतील पोरींना फसवण्याआधी 'परेश' जमातीला दहा वेळा विचार करायला लावणारा वचक निर्माण करीन...निश्चयी विचारांनी वसुधाच्या मरगळल्या पावलांत जोर भरला. कॉफी शॉप मधील चर्चा तिला निराश करण्याऐवजी अधिक धारदार करणारी ठरली. मस्तकात विचारचक्र गतिमान झालं. बंद दारावर धडक देण्याचा प्रयत्न नेटानं चालू झाला आणि जाणवलं, या दाराला 'फट' पाडता येण्याजोगी आहे. उदास वसुधाच्या ओठांवर स्मित फुललं. हे स्मित पारिजातकाच्या फुलागत क्षणजीवी नव्हतं. कॅक्टसच्या फुलासारखं दीर्घायुषी होतं. कारण संघर्षात विजय खेचून आणणाऱ्या जेत्याचं ते स्मित होतं ! घायाळ तरीही विजयाची खात्री असणाऱ्या योद्ध्याचं !

...तोवर इझाबेलविषयी मनात आकस होता. पण आता वाटलं, कदाचित आपल्याप्रमाणे तिचीही फसगत झाली असेल. सुरुंग लावायचा तर किल्लेदाराला फितूर करता आलं पाहिजे. आजवर ती घरी आली की कॉफीचा मग तिच्या समोर ठेवून वसुधा दूर होई. इझाबेलशी जितक्यास तितकं ठेवण्यापेक्षा संवाद साधायचा प्रयत्न केला तर ?

परेश फ्रेडरिकला घ्यायला जाणार आहे. त्याच्या आणि तिच्या येण्यात बरीच सवड सापडू शकेल. या शक्यतेनं वसुधाच्या मनात उत्साह भरला. पटपट पावलं उचलत ती घरी गेली. कामं संपता संपता इझाबेल आली. संध्याकाळसाठी काय करायचंय हे ती सांगण्यापूर्वी वसुधानं फ्रेडरिकच्या गैरहेजरीत कुठल्या इंडियन रेसिपीची तयारी करून ठेवलीय ते सांगितलं. कॉफीचा मग तिच्या समोर ठेवून दूर होण्याऐवजी ती तिथेच थांबली. इझाबेलनं प्रश्नार्थक मुद्रेनं तिच्याकडे बघितलं, ''मादाम, तुम्ही थकला नसलात तर थोडं बोलायचं होतं...'

इझाबेल थकली होती. पण वसुधामुळे तिला आरामशीर जगता येत होतं. फ्रेडरिकचं प्रेमानं करणारी वसुधा परेशच्या माकडचेष्टांना भीक घालत नाही हेही तिला दिसत होतं. कृतज्ञता व्यक्त करण्याची रीत म्हणून तिनं वसुधाला बोलायची संधी दिली. वसुधा बोलू लागली आणि इझाबेलच्या आश्चर्याची मात्रा वाढत गेली. तिचे विस्फारले डोळे वसुधाच्या मंगळसूत्रावर स्थिरावले. भारतीय रीतरिवाजांशी किंचित परिचित असणाऱ्या इझाबेलनं मंगळसूत्राविषयी ऐकलं होतं. वसुधाचा स्वर प्रामाणिक वाटत होता. तिचं कथन इझाबेलला हादरवून टाकत होतं. भारतातून परतल्या परेशनं 'तुझ्या सुखासाठी गावाहून 'मेड' घेऊन आलो' असं सांगितलं होतं. आपल्या सुखाचा इतका विचार करणाऱ्या परेशविषयी तिच्या मनात आदर निर्माण झाला होता. ती जशी पुन्हा त्याच्या प्रेमात पडली होती. इतकी की, ती 'त्या' दृष्टीनं निकामी ठरताच परेश वसुधाचं लांगुलचालन करू लागला तरी तिनं आकांड तांडव केलं नव्हतं. प्रेगनन्सी पूर्ण होताच परेश ताळ्यावर येईल या अपेक्षेनं नापसंती व्यक्त केली असली तरी तिनं क्षमाशील नजरेनं परेशाची वखवखली नजर पचवली होती. पण. .

परेशच्या जाळ्यात अडकलेली भोळी वसुधा आणि पत्नीच्या सुखासाठी झटणाऱ्या- मेड आणणाऱ्या परेशच्या पुन्हा प्रेमात पडलेली इझाबेल! परेशनं फसविलेल्या दोन स्त्रियांच्या फसवणुकीत फरक नाही. या जाणिवेनं ती क्षणभर दुखावली. पण हे दुखावलेपण लैला वा ज्युलिएटचं नव्हतं. तिच्या मनात लपलेली नागीण वसुधाच्या कथनानं दुखावली- चवताळली. बघता बघता तिचे हिरवेकंच डोळे इंगळासारखे पेटले.

''तुमच्या देशापेक्षा इथे घटस्फोटाचं प्रमाण अधिक आहे; कारण आम्ही अन्याय सहन करीत नाही. तुला अन्यायासमोर मान तुकवायची सवय असेल पण मला अन्याय बघायचीही सवय नाही. स्वातंत्र्याच्या रणचंडीचा- जोन ऑफ आर्कचा वारसा चालवतो आम्ही. अन्यायासमोर मी तुलाही मान तुकवू देणार नाही...''

वसुधानं प्रयत्नपूर्वक इझाबेलला शांत केलं. परेशसमोर मान तुकवायची तयारी नसल्याचं सांगून त्यासाठी आपण कशी पावलं उचलली आहेत ते सांगितलं. सारं योजनेबरहुकूम घडत तर प्रश्न नव्हता पण.. .ताज्या घटनेची जाण करवून वसुधानं इझाबेलला विचारलं, ''आजच्या प्रसंगाचं भांडवल करून त्यानं मला घराबाहेर काढलं तर काय करू मी?'

वसुधाच्या विचारानं इझाबेल प्रभावित झाली. क्षणभर अंतर्मुख झालेल्या तिच्या डोळ्यांत कुशल राजनीतिज्ञाची चमक उतरली. मैत्री भावनेनं वसुधाचा हात हाती घेत ती म्हणाली, "तू माझी सवत आहेस हे मला कळलंय याची जाण परेशला होऊ द्यायची नाही."

"मादाम प्रश्न तो कुठेय?" घायकुतीस येत वसुधानं विचारलं "परेशनं घराबाहेर काढलं तर काय करावं हा प्रश्न मला भेडसावतोय."

"होगं माझे बाई! ते कळलंय मला. मला वाटतं, परेशला अंधारात ठेवून आता दोघींनी मिळून असा डाव टाकावा की, कावेबाज परेशच्या तंगड्या त्याच्याच गळ्यात फास आवळतील."

"म्हणजे?" वसुधानं उत्सुक स्वरात विचारलं.

"आत्ता तरी भरीव असं काही करायचं नाही. न कळल्याचं नाटकच वठवायचं. कारण मी त्यानं सवत आणल्याचा दावा मांडला तर कोर्टात तुझं लग्न निरर्थक ठरून तुला गावी जावं लागेल. हरल्या अवस्थेत तुझं परतणं माझ्या मते परेशचा अंशत: विजयच ठरेल. शिवाय आत्ता मला दगदग झेपणार नाही. दोघींची फसवणूक झाली आहे. सवतींनी एकमेकींना शत्रुत्वाच्या नजरेनं न बघता फसवणाऱ्यावर मात करायला मैत्री जुळवावीसं वाटतं मला. चातुर्यानं अशी खेळी खेळू की त्याला जन्माची याद राहील."

वसुधा आणि इझाबेलनं मिळून शठं प्रति शाठ्यम् या न्यायानं झकास व्यूह रचना तयार केली. परेशनं वसुधाला बाहेरचा रस्ता दाखवला तर इझाबेल तिच्या मागे उभी राहणार होती. इझाबेलच्या गरजेला वसुधा माणुसकीच्या भावनेतून ओ देणार होती. इझाबेल तिला मेड न समजता घरकामात जमेल तशी मदत करणार होती. कितीतरी वेळ दोन जिवलग मैत्रिणी असल्यागत त्या आपल्या तुपल्या गप्पांत रंगल्या. परेश परतेतो वसुधाच्या मनात वादळाचे अवशेषही उरले नव्हते. ती शांत चित्तानं कामाला लागली.

वसुधाची शांत मुद्रा पाहून परेश जाम भडकला. कॉफी शॉपच्या चैनीसाठी तिनं घरात हात मारला असावा अथवा देहाचं दुकान मांडलं असावं असा आरोप करताच वसुधा सात्त्विक संतापानं पेटून उठली. भाषा कळत नसूनही उग्र वादावादीचा वास इझाबेलला सहज येऊ शकला. परेशला मिठीत घेत ती समजुतीच्या स्वरात म्हणाली, "शांत हो परेश! घरात बसून कंटाळली होती. खऱ्या अडचणीच्या वेळी पळाली तर असं वाटून मीच तिला पन्नास फ्रँक्स दिले होते. आसपास काम करणाऱ्या बेबी सीटर्सबरोबर मजा करायची परवानगी दिली होती. त्यांच्याबरोबर दोघींचे बॉय फ्रेंड्ज होते हा तिचा गुन्हा आहे का?"

तरीही परेशची धुसफूस थांबेना. कंटाळून इझाबेल म्हणाली "वाटलं तर तिला या क्षणी हाकलून दे. पण मग हगलं मुतलं काढताना नाक चढवू देणार नाही. तुझ्या बाळाचा भार उचलून थकले मी. जन्मानंतर सारं तूच बघायचंस सांगून ठेवते. हे परवडत असेल तर तिला हाकल. न पेक्षा गप्प बस! मला आवाज सहन होत नाहीय. खबरदार रांगड्या

खेडवळ इंडियन नवऱ्यासारखं वागलास तर...''

परेश गप्प बसून चुळबुळत राहिला. वसुधाच्या डोळ्यांतील चमकही त्याला हैराण करीत होती. दात-ओठ खात बसण्याला पर्याय नव्हता. दुसऱ्या दिवशी इझाबेलनं खरंच वसुधाला पन्नास फ्रँक्स दिले. तिला बँकेत खातं उघडायला लावलं. शिवाय फावल्या वेळात उघडपणे बेबी सीटिं . करायची परवानगीही दिली. ती स्वत:ही अधूनमधून तिच्या खात्यात पैसे (फ्रँक्स ?) भरणार होती. सारं छान जुळून आलं. कॉफी शॉपच्या निमित्तानं उठलेलं वादळ माथ्यावरचं छप्पर उडवीलसं वाटलं होतं. पण या वादळानं वसुधाचे पाय अधिक मजबूत केले.

दोन आठवड्यांत वसुधा मुलीची आई झाली. अर्थात् सावत्र मुलीची! आईचा रंग आणि बापाचे केस घेऊन जन्मल्या पोरीचं लोभस रूप आणि मुलायम स्पर्श वसुधाच्या काळजात कळ उठवणारं होतं. मातृत्व! स्त्रीचा निसर्गदत्त अधिकार! नवनिर्मितीची ही संधी कधी मिळेल की जखमा कुरवाळतच चितेवर चढावं लागेल? उदास विचारांच्या भोवऱ्यात भिरभिरणाऱ्या वसुधाचे डोळे भरून आले. पण साऱ्याच आसवांना गाल भिजवण्याचा हक्क मिळत नाही. दुर्दैवी आसवांवर विचारांचा कोरडा विंझण्यात येतो. त्यांना पुन्हा डोळ्यांतच उतरून जिरून जावं लागतं.

पोरीला पाहून वसुधा इझाबेलजवळ गेली तेव्हा मनातील कल्लोळाचे अवशेष चेहेऱ्या-वर शिल्लक होते. तिच्या पारदर्शक नजरेत डोकवत इझाबेल हळुवार स्वरात म्हणाली, ''गेले काही महिने गर्भावर तुझी छाया पडतेय. तुझा दुर्दम्य आशावाद आणि असीम कार्यशक्ती माझ्या पोरीनं मिळवावी. एकाकी अवस्थेतही तिनं ताठ उभं राहावं. निराश न होता यश दिसेतो न डगमगता लढत द्यायचं सामर्थ्य तिला लाभावं.''

वसुधा शहारली. नकळत तिची नजर निजल्या नवजात पोरीकडे वळली. काजळरे-खल्या डोळ्यांच्या कडेवर बोट फिरवून तिनं ते अलगद मुलीच्या गालावर टेकलं. तीट लावल्या पोरीची अलाबला घेत ती लटक्या रागानं म्हणाली, ''भलत्या वेळी भलतंच असतं तुझं! अमंगळ बोलू नकोस. याच सोनुलीला नव्हे तर कुणाच्याही वाट्याला माझं जिणं येऊ नये असंच म्हणेन मी. आणि मी तरी एकटी कुठेय गं? परेशला माझा नवराच मी समजत नसले तर तू माझी सवत कशी? एकमेकींच्या अडीअडचणीला धावून येणाऱ्या आपण जिवाभावाच्या मैत्रिणीच आहोत. म्हणून तर तीट लावून तुझ्या पोरीची अलाबला घेतेय. आता बघ कशी गोड दिसतेय ती!'' वसुधा कौतुकली.

चकित नजरेनं इझाबेल काळ्या ठिपक्यातील स्वच्छ सुंदर भावना बघत राहिली. ही कृतज्ञता, हे सहज सुंदर समर्पण तिच्या फ्रेंच मनासाठी नवं होतं. मनात खळबळ निर्माण करणारं तरीही...मन लुभावणारं!

दारावर नॉकिंग झालं. कामात गुंतलेल्या परेशनं फाईलमधून डोकं वर काढून आगंतु-काला आत येण्याची परवानगी दिली. रजिस्टर पोस्टानं लखोटा आला होता. इझाबेलनं

वकिलामार्फत काहीतरी पाठवलं होतं. परेश खूश झाला. खरं म्हणजे वकिलामार्फत कधीच कागदपत्र यायला हवे होते. कॉफी शॉपमधील प्रकारापासून त्याचे इझाबेलशी असणारे संबंध तुटण्याइतपत ताणले गेले होते. तरी बाळाच्या जन्मानंतर तिचा चिडचिडेपणा कमी होईलसं वाटलं होतं. पण पुढे तर तिनं कहरच मांडला. लहान सहान बाबतीत उखाळ्या-पाखाळ्या काढीत ती हमरातुमरीवर येई. वसुधाचं लंगुलचालन तर दूर पण तिच्याशी रागानं बोललंतरी इझाबेलला खपायचं नाही. इझाबेल तिचा कैवार घेत वाघिणीसारखी तुटून पडायची. कधीतरी वाटायचं.... हिला वसुधाविषयी कळलं असेल ? पण लगेच मन ती शक्यता नाकारायचं. वसुधाशी आपलं लग्न आणि हनीमून झालाय हे कळलं तरी कण्हत कुंथत नवऱ्याबरोबर राहायला ती लाचार भारतीय पत्नी नव्हती. ती कोर्टात जात नाही याचा अर्थ ती अंधारात आहे असाच होतो असंही वाटे.

तरी इझाबेलचं वर्तन अगम्य वाटायचं. अभंग दांपत्य जीवनाची तिला ओढ होती म्हणूनच तिनं भारतीय सहचर निवडला होता हे परेशला ठाऊक होतं. तरीही तिच्या वर्तनानं तो चक्रावला होता. इझाबेल वाकड्यात शिरत होती नि वसुधाही सरळ वागत नव्हती. तिला गुजरातीत काही सांगायचा प्रयत्न केला तरी ती उत्तरं इंग्रजीत- कधी फ्रेंचमध्ये द्यायची. इझाबेल चवताळली की छद्मी हसायची. नजरेतील क्रूर विजयीभाव परेशला हतबुद्ध करायचे. 'फूल बिट्वीन टू गर्ल्स' म्हणत तो स्वत:ची संभावना करायचा. सर्वच अर्थानं गोची झाल्यामुळे परेश वैतागला होता.

या परीनगरीत 'भूक' मारावी लागत नसली तरी सारं महाग वाटायचं. घटस्फोट मागावा तर ॲलिमनीची (पोटगी) जबर रकम भारी वाटायची. कारण 'ॲलोकेसियाल फॅमिलीयाल' ही संस्था सरकारच्या वतीनं घटस्फोटित स्त्रिया आणि त्यांच्या मुलांचे आर्थिक अधिकार जपण्याचं काम इमाने-इतबारे करते. घटस्फोटाचा निर्णय पुरुषानं घेतला तर त्याला कफल्लक करून सोडते. पण तोच निर्णय बाईनं घेतला तर मुलांचा निभावखर्च देऊन सुटका होते. म्हणून कावेबाज परेशनं दुसरं जाळं पसरलं. इझाबेलनं घटस्फोट घ्यावा यासाठी तो बेफाम बनला. घरात पैसे देणं बंद करून त्यानं मन:पूत वागायची सुरुवात केली. पिऊन तमाशा करणं, कधी शुद्धीवर असूनही नशेत असल्याचं नाटक करीत दंगा करणं, प्रसंगी इझाबेलवर धावून जाणं असे अनेक उद्योग आरंभले तरी इझाबेल कोर्टात जाईना. इझाबेलचा संबंध तोडून त्याला वसुधा हवी होती. कारण हनीमून काळात भारतीय पत्नीच्या 'नको नको'त आक्रमक प्रणयापेक्षा अधिक आमंत्रण असतं हे त्यानं अनुभवानं जाणलं होतं. खरखरीत आवाजात बोलणाऱ्या पुरुषी इझाबेल-पेक्षा त्याला अटकर बांध्याची वसुधा आवडू लागली होती. वाटत होतं, इझाबेलचा अडसर दूर झाला की वसुधाचा विरोध मावळेल. भारतीय नवऱ्याची साहेबी आणि पॅरिसमध्ये मुक्त जीवन दोन्ही मिळवता येईल. पण...

इझाबेल जुलूम सहन करीत होती. अभंग वैवाहिक जीवनाचं आकर्षण तिला जुलूम

पचवायला लावत असेल? या प्रश्नाबरोबर वैतागल्या परेशलाही एका गोष्टीचा आनंद होई. नाठाळ फ्रेंच पत्नीच्या नाकात वेसण घालणारा मी पराक्रमी पुरुष आहेसं वाटून त्याचा अहंकार तरारून उठे. तरीही आता सहनशक्ती संपत आली होती. कोंडी फुटणं गरजेचं होतं. नुकताच मुलीचा पहिला वाढदिवस झाला होता. म्हणजे वर्षाहून अधिक काळ परेश विचित्र विकृत वातावरणात जगत होता. या परिस्थितीचं दुसरं टोक हाती यायलाच हवं होतं. म्हणूनच वेळ कामाची असूनही त्यानं तातडीनं लखोटा उघडला. ऐसपैस बसत समाधानानं वाचन सुरू केलं. उत्सुक नजर कागदांवर फिरू लागली आणि...

आणि डोळे फिरायची वेळ आली कागदावर अक्षरं नव्हे तर अग्निफुलं विखुरली होती. उभं जीवन पेटवून भस्मीभूत करण्याचं सामर्थ्य असलेली! बुद्धिमान असण्याची घमेंड बाळगणारा परेश चारी मुंड्या चीत होईल असाच डाव त्या लिफाफ्याच्या रूपात विक्राळ स्वरूप धारण करीत होता.

वर्षभराच्या काळात वसुधा व्यवस्थित रूळली होती. जरूर ते कागदपत्र भारतातून मागवून तिनं लग्न भारतात रजिस्टर झालं असल्याचा पुरावा मिळवला होता. पत्नी या नात्यानंच तिनं व्हिसा आणि पासपोर्ट मिळवल्याचंही सिद्ध झालं होतं. सारी कडिबद्ध हकीगत सादर करून तिनं आणि इझाबेलनं फसवणुकीचा आरोप ठेवून दावा मांडला होता. शिवाय इझाबेलनं एकीवर दुसरी (पत्नी) केल्याचा आरोपही ठेवला होता. घटस्फोटाची साधीसुधी मागणी नव्हे तर झाल्या प्रकारामुळे आलेल्या मानसिक तणावाचं कारण पुढे धरून जबरदस्त कॉम्पेन्सेशन मागणारं ते निवेदनपत्र होतं. त्यानं वसुधाचं केलेलं लांगुलचालन आणि इझाबेलवर कसा जुलूम केला त्याची कल्पना येऊ शकतील अशा ऑडियो कॅसेटही सादर करण्याची तयारी दाखवली होती. दोन सवतींनी संधान साधून पाठविलेल्या त्या संयुक्त पत्रात जबरदस्त रकमेची मागणी होती. ती बघून स्वत:ला हुशार म्हणवणाऱ्या दोन बायल्यांच्या दादल्याचे डोळे पांढरे व्हायची वेळ आली. पूर्व आणि पश्चिमेतील नेमकं हवं ते मिळविणारे आपण चतुर पुरुष आहोत हा परेशचा गोड समज गैरसमज ठरला. ॲलिमनीची रकम कमी करण्यासाठी त्यानं जे प्रयत्न केले ते त्याचा जुलमांचा पुरावा ठरले. पूर्व-पश्चिम दिशांत त्याचं मस्त सॅंडविच झालं होतं. इझाबेलनं त्याच्या अन्यायासमोर मान तुकवणं हा त्याच्या पौरुषाचा पराक्रम नसून वसुधाच्या सहवासात तिनं स्त्रीसुलभ त्यागाचे धडे गिरविल्याची प्रचीती होती हे कळून तो थक्क झाला. सारा प्रपंच पुरेसा पुरावा भारतातून जमण्याइतकी सवड मिळविण्यासाठी होता, हे जाणून परेश हादरला.

तरी हार स्वीकारणं त्याच्याही स्वभावात नव्हतं. कावेबाजपणे त्यानं वसुधासमोर शरणागती स्वीकारली. पटलाणीच्या मिठाची आण घालायचा प्रयत्न मांडला. स्वत: खरंच वसुधाच्या प्रेमात पडला होता हे सांगून विनवणी केली तरी ती बधेना, तेव्हा धमकीची मदत घेतली. इझाबेल केस जिंकली तर वसुधाचं लग्न निरर्थक ठरून तिला

भारतात परतावं लागेल. पुन्हा खातेऱ्यात जाण्यापेक्षा....परेश प्रेमाचा हवाला देत होता पण वसुधाला संसार करता येणं इतकंच यश नको होतं. लग्न झालेलं असूनही देशात येऊन भारतीय पोरींशी लग्न करून त्यांना लाजिरवाणं जिणं जगायला लावणाऱ्या समग्र 'परेश जमाती' समोर तिला बंडाचं निशाण उभारायचं होतं. पतिपरमेश्वर म्हणत त्याची पूजा करण्यापेक्षा नालायक नवऱ्याची खेटरानं पूजा करायचा तिचा निश्चय अफर होता. तिच्या नजरेत उतरणारे खुनशी भाव परेशला गर्भगळीत करणारे होते.

परेशशी झालेलं लग्न रद्दबातल ठरल्यानं वसुधाचं नुकसान होणार नव्हतं. वर्षभराच्या कालावधीत सारा योजनाबद्ध बंदोबस्त झाला होता. इझाबेल तिला स्पॉन्सर करायला तयार होती. पॅट्रिकनं तिला छान नोकरी देऊ केली होती. फक्त इझाबेलची पोर थोडी मोठी होईतो ती दमानं घेत होती याची इझाबेलला जाणीव होती. तिनं वकिलाकडून अपवादात्मक केस म्हणून वसुधाला फ्रान्स सोडावं लागणार नाही यासाठी काय नि कसं करता येईल यासाठी सल्ला मिळविला होता. कॉम्प्युटर क्लासचे प्राध्यापक, प्रोप्रायटर आणि सहकारी सारे वसुधाच्या पाठीशी होते. कडेकोट बंदोबस्त असलेल्या किल्ल्यात वसुधा स्वस्थ आणि सुरक्षित होती.

उलट परेशचं राहतं घरही इझाबेलचं होतं. तो अक्षरश: रस्त्यावर आला. भारतात जाता यावं यासाठी तिकिटापुरतीही रक्कम हाती न उरण्याइतका कफल्लक झाला.

इझाबेलनं स्वत:चा पगार आणि परेशकडून मिळालेली रकम यात समाधान मानलं. पुरुष जातीवरचा विश्वास उडाल्यागत पुनर्लग्नाचा विचार मनाबाहेरच ठेवला. पण वसुधा निराशावादी नव्हती. वैफल्यग्रस्त असताना 'गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी' असे उदास विचार मनात आले होते, पण त्यापेक्षा शोधा म्हणजे सापडेल या तत्त्वावर तिचं अधिक प्रेम होतं. संघर्ष चालू असताना तिला अनेक मदतकर्ते हात दिसले होते. ते सारेच नि:स्पृह नसले तरी सारे वाईटही नव्हते. काही हात गुड फॉर नथिंग हे तत्त्व पटविणारेही होते. सज्जनता, माणुसकी, नीती, न्याय हे सारे शब्द फक्त शब्दकोशात बंदी नसल्याचं तिला जाणवलं होतं. जीवन जगण्यासाठी आहे. ते फुलवण्यासाठी संघर्षाला सामोरं जायला हवं हा धडा गिरवत ती रात्रंदिन युद्धाच्या प्रसंगाला सामोरी गेली होती.

तिनं पॅट्रिकशी लग्न केलं. परेश आणि पॅट्रिक! लव्ह मॅरेज करून मिळवलेले नवरे! पण वसुधा म्हणते 'प्रेमलग्न ही भावना मला 'काफ लव्ह' ची आवृत्ती वाटते. आंधळ्यागत खड्ड्यात उडी घ्यायला लावणारं काफ लव्ह कोकरावस्थेत संपायला हवं. मी आणि पॅट्रिक सहवासानं जवळ आलो. संघर्ष पेलायची माझी वृत्ती भावली तरी पॅट्रिकनं भारावल्या अवस्थेत मागणी घातली नाही. त्याचंही तोंड काफ लव्हनं पोळलं होतंच. आम्ही दोघंही 'ताक फुंकून' पिणाऱ्यांतली! लग्नाचा निर्णय घेण्यापूर्वी आम्ही जरूरीपेक्षा जास्त विचार केला. म्हणून आमचं लग्न ॲरेंज्ड मॅरेज वा लव्ह मॅरेज न ठरवता मी 'ॲरेंजमेंट मॅरेज' ठरवते. साधक बाधक विचारांती केलेली सहजीवनाची कमीटमेंट.

तुमच्याच शब्दांत सांगायचं तर मनभेदापर्यंत न पोहोचणारे निकोप मतभेद आमच्यात आहेतच...'

वसुधाला दोन मुलं! समीर आणि मेघना! या संदर्भात पॅट्रिक म्हणाला, ''मुलं माझं आडनाव लावतात म्हणून मी नावं वसुधाच्या भाषेतील असावीसं म्हटल. भाषा शब्द मी फार समजून वापरतोय कारण मला त्यात धर्म अभिप्रेत नाही. तुकारामाची गाथा आमच्या फ्रेंच तत्त्वचिंतकांनी (द लरी) आमच्यासाठी उपलब्ध केली आहे. तिचा मी चाहता आहे. तुमच्या तुकारामानं फार सोप्या शब्दांत पाप-पुण्याचा अर्थ सांगितलाय. पुण्य पर उपकार, पाप हे परपीडा. फार पटलं मला. म्हणून मी माणुसकीचा धर्म मानतो.''

''बाय द वे, तुमच्या भेटीचा प्रपंच आमच्या यशाची बढाई मारण्यासाठी नाही.'' वसुधा सहज स्वरात म्हणाली. ''परेशनं मला कॉम्पेन्सेशन दिलं. ती रक्कम मला कधीच नको होती. फक्त त्याला धडा शिकवावा म्हणून मी ती घेतली. ते पैसे मी अस्पर्श ठेवलेत. तुम्ही येणारसं कळलं. गावी असताना तुमचे विचार मी आवर्जून ऐकले, वाचले होते. ते पैसे तुमच्या सुपूर्द करावे. तुम्ही गरजू प्रामाणिक संस्थांना उत्कर्षासाठी मदत करावी असा मानस होता म्हणून....''

या अनपेक्षित विचारानं मी भांबावले. इतकी मोठी रकम! मी कसा विनियोग करू ? स्वत:चे पैसे वापरणं आणि दुसऱ्याचे पैसे वापरणं यांत असलेला फरक प्रकर्षानं जाणवला. माघार घेणं, जमणार नाही असं म्हणणं माझ्याही स्वभावात नाही. क्षणभर विचार करून मी म्हणाले, ''तू विचारी आहेस. संघर्ष पेलणारी आहेस. तुझ्या पैशाचा मी विनियोग करण्यापेक्षा तुला काही सुचवणं मला अधिक आवडेल.''

''अनोळखी वातावरणात फसवणुकीची जाणीव होते तेव्हा मनं कसं उद्ध्वस्त होतं ते तुला कळलंय. पण तू जिद्दीची म्हणून नासल्या जीवनाचा 'कलाकंद' करणं तुला जमलं. अशी जिद्द प्रत्येक मुलीत असावीसं म्हणणं स्वप्नरंजन ठरेल. पण फसणाऱ्यांसाठी तुझ्या मनात असणारा हळवा कोपरा वांझ राहू नयेसं वाटतं मला. 'परेश जमाती' विरुद्ध बंडाचं निशाण हाती घ्यायचं होतं तुला. तर मग परेशकडून मिळाल्या रकमेचा उपयोग तू शोषित वसुधांसाठीच करायला हवास.''

''तुम्ही काय म्हणताय ते मला कळलं नाही.''

''म्हणजे असं की तुझ्याप्रमाणे एकांडी लढत देणं साऱ्यांना जमत नाहीच. पण थोडा टेकू मिळाला तर काही करण्याची उमेद बाळगणं बऱ्याच जणींना जमेल. तू हा टेकू व्हावंस. तुझ्या घराला दोन रूम्सचं एक्स्टेन्शन करण्यासाठी तू कॉम्पेन्सेशनची रकम वापरावी. त्याला तू 'घर' नाव द्यावंस. इथे कुणाला कायम राहायला मिळू नाही. 'परेश' च्या घरातून बाहेर पाऊल टाकणाऱ्या 'वसुधा'साठी स्वत:च्या पायावर उभं राहता येईतो हे घर हंगामी व्यवस्था ठरावं. फसलेल्या मुलींसाठी वसुदीदीच्या या 'घरा'चे दरवाजे उघडे असावेत. घराचेच नव्हे तर मनाचेही! इथे दीदीचंच नव्हे तर पॅट्रिक जिजाजीचं मार्गदर्शनही त्यांना लाभावं. वसुधैव कुटुंबकम्ची संकल्पना तू जगावीस. भारतीय

संस्कृती, हेलन केलर, जोन ऑफ आर्क आणि बरंच काही चांगलं मिळवून वसुधा नावाचं लोभस रसायन स्वप्नवत् न ठरता सत्यात उतरावं. लेखिकेचा पिंड जिवंत ठेवून काऊन्सेलिंगचं काम करणाऱ्या काऊन्सेलरनं जागेपणी बघितलेल्या स्वप्नानं तुझ्या 'घराच्या' रूपानं मूर्त रूप धारण करावं. या घरानं वटवृक्षाचा आदर्श जपावा. अधिकाधिक पांथस्थांना त्या रूपानं आधाराची छत्रछाया लाभावी..."

"तथास्तु!", पॅट्रिक उत्स्फूर्त स्वरात म्हणाला. "तुम्हाला एक गंमत सांगतो....हिनं आणि इझाबेलनं परेशाच्या नाकी दम आणला तेव्हा परेश हिला प्रेमाचा दाखला देत म्हणाला 'तुझ्यावर प्रेम होतं म्हणून असं वागलो मी. प्रेमात आणि युद्धात सारं क्षम्य असतं हे समजून घे."

"हो! हे समजून घेतच मी असं वागतेय" हिनं त्याला ठणकावून सांगितलं. "पण माझी प्रेमापेक्षा युद्धाशी अधिक ओळख आहे. संघर्षाविना कधी दोन घास पोटी पडले नाहीत माझ्या! म्हणून हे माझ्या लेखी युद्धच! प्रेमात तू केलेली फसवणूक योग्य ठरत असेल तर युद्धात तुझी पिळवणूक अयोग्य का ठरवतोयस?"

वसुधाच्या आगळ्या वेगळ्या कुटुंबात जगलेला तो दिवस जन्मभर माझ्या स्मृतिमंजुषेत बंदी राहील. पॅट्रिकनं संदर्भ दिला होता म्हणून मी आवर्जून त्याला पंडित भीमसेन जोशींच्या भजनांची कॅसेट पाठवली. त्यात 'पुण्यपरउपकार' हे भजन असणारी!

अनाथालयं, नारीसुधारकेंद्र वा वसुधाच्या घरासारख्या घराची निर्मिती या सुखद घटना नाहीत. कुणी कुणाला फसवू नये. कुणी जबाबदारी झटकून बेगुमान होऊ नये असं वाटणं योग्य असलं तरी सारेच सज्जन असणं निखळ आदर्शवाद-म्हणजेच पर्यायानं स्वप्नवत् स्थिती वाटते मला! दिवास्वप्नं बघत, त्या स्वप्नपूर्तीसाठी झुंज देण्यात जीवन वेचणं आणि शक्तीप्रमाणे स्वप्न पूर्ण करत करत संपून जाणं याचंच नाव जीवन! स्वप्नांची लांबी जीवनापेक्षा अधिक असणं हेच वास्तव! म्हणून कुणी स्वप्नं बघणं सोडणार का?

'परेश जमात' नष्ट करायला प्रत्येक मुलीनं वसुधा व्हावं हे स्वप्नच! या स्वप्न मार्गावरचा एक आवश्यक अनिवार्य टप्पा म्हणून वसुधाचं 'घर' हवंसं वाटलं मला! प्रत्येक मुंगी आकाशात झेप घेऊ लागली तर ती मुंगी उरणारच नाही हे पटतं. पण लो एम इज अ क्राईम असं उगीच का म्हणतात? मुंगीच्या मनात सूर्याला गिळण्याचं स्वप्न निर्माण होणं महत्त्वाचं! स्वप्नांच्या लागवडीसाठी सशक्त बियाणाची पेरणी आवश्यक ठरते. म्हणून फसलेल्या मुलींनी अगतिकपणा झटकून ताठ मानेनं बंडाचं निशाण उभारावं, या स्वप्नमार्गावर वाटचाल करताना वसुधाचं 'घर' मला मैलाचा दगड ठरणारी संकल्पना वाटली.

◆ ◆

# १३ / ऑरवा मादाम !

काही गोष्टींवर दर्शनीच प्रेम जडतं, म्हणून लव्ह ॲट फर्स्ट साईटचं कौतुक आणि अप्रुपही वाटतं आपल्याला. कधी तर प्रेमात पडण्याच्या प्रक्रियेसाठी दर्शनाचीही आवश्यकता नसते. एखादा शब्दही आपल्याला कमालीचा मोहक वाटतो. प्रथम कानी पडणारा अनोळखी शब्द, मनाला विलक्षण भुरळ घालतो. त्याचा नाद कानाच्या पडद्यावर संवेदनक्षम तरंग उठवतो आणि मन लोभावतं. अगदी त्या शब्दाचा नीटसा अर्थ कळलेला नसूनही असं घडतं. एखाद्या शब्दाचा 'फील'च मन जिंकणारा ठरतो. फ्रान्समध्ये फिरताना याची प्रचीती आली.

त्याचं काय झालं, की...निरोप देताना एक फ्रेंच स्त्री माझे दोन्ही हात हाती घेऊन त्यावर ओठ टेकत भावुक स्वरात म्हणाली, 'ऑरवा मादाम!' तिच्या स्वरात इतकं विलक्षण लाघव होतं की, माझ्या अंगावर काटा फुलला. अक्षरश: प्रेमात पडले मी! त्या शब्दाचा नीटसा अर्थ कळलेला नसूनही भारावले. म्हणजे तसा निरोपाचा अर्थ कळला होता. तरी त्या डिक्शनरी मीनिंगपेक्षा खूप काही यात अभिप्रेत आहे असं तिच्या लाघवी स्वरातून जाणवत होतं. मनाच्या गर्भगृहात अनिर्वचनीय तरंग उठत होते. वाटत होतं, 'बाय बाय!' टा टा किंवा 'सी यू अगेन' या भावनेपेक्षा खूप काही अधिक आहे यात! अर्थात् असं का वाटत होतं ते मात्र सांगता येत नव्हतं. कदाचित् भारावणं, झपाटून जाणं हा स्वभावाचा स्थायीभाव असल्यामुळे असं घडलं असेल्सं वाटलं. पण या 'वाटण्या'वर विसंबून मी ठिकठिकाणी 'ऑरवा मादाम' म्हणत राहिले.

माझ्या तोंडी हे शब्द येताच ऐकणारीच्या डोळ्यांत अनोखी खुशी अवतरतेय हे मला जाणवत होतं. म्हणून मी न विसरता मनापासून 'ऑरवा मादाम' म्हणत होते.

लहानपणापासून माझ्या मनात संवाद आणि भाषा या विषयी अलोट प्रेम आणि कुतूहल! त्यामुळे अर्थ न जाणता शब्द राबवणं मनाला पटत नव्हतं. बरोबरच्या फ्रेंच भाषेसाठी 'खरेखॉ' म्हणविणाऱ्यांना विचारून पाहिलं; पण तिथेही रूक्ष उत्तरच मिळालं. 'सी यू अगेन' सारखं हे फ्रेंच एक्स्प्रेशन आहे असं कोरडं उत्तर मिळालं. तरी माझं मन स्वत:चा हेका सोडीना. उलट जसजसा हा विचार टाळण्याचा प्रयत्न होत गेला तसतसं हटवादी मनाला वाटत राहिलं...जबरदस्त ताकदीचं एक्स्प्रेशन आहे हे! उगीच का ऐकणारा आणि बोलणारा भावुक होईल? निरोपाच्या हस्तांदोलनांत या शब्दाच्या

उच्चाराबरोबर विलक्षण थरथर उगीच कशी उमटेल ? तर्कशुद्ध सुसंगत कारण देता येत नसूनही मन आग्रही होत होतं. डोळ्यांत डोकवायच्या सवयीला खतपाणी घालत कारण जाणायचा प्रयत्न करीत होतं.

पण भाषेचं ज्ञान तोकडं ! त्यांच्याकडेही इंग्रज आणि इंग्रजी भाषेविषयीचं ज्ञान आणि आकर्षण बेतास बात ! आपण सारे भ्रमात असावं की साहेबाची भाषा ती जगाची भाषा ! मातृभाषेहून अधिक महत्त्व देऊन आपल्याकडे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवलं जातं. पण बाहेर पडताच हा समज फोल असल्याची जाणीव होते. त्यात दुसऱ्या विश्वयुद्धात 'ऑपरेशन फॉर्टीट्युड' वेळी इंग्रजांनी बळीचा बकरा बनवलं याची बोच आजही फ्रेंच मनात तीव्र आहे. म्हणून त्यांच्या मनात आजही आकस आहे. एकूणच तिथे इंग्रज आणि इंग्रजीविषयी अनास्था बघायला मिळते. ते लोक आपल्या इतकं सहज आणि सुरेख इंग्लिश बोलू शकत नाहीत. थोडी हावभावाची मदत घेत फ्रेंच मिश्रित शब्द पेरत काम धकवून नेतात इतकचं. त्यामुळे व्हायचं काय की दिलखुलास गप्पा मारण्याची हौस अपुरी राहायची. रेशनच्या मापानं होणाऱ्या संवादावर गरज भागविता आली तरी समाधान मात्र चार पावलं दूरच असायचं.

वस्तुत: तिथे जाण्यापूर्वी मी चारी ठाव फ्रेंच भाषेचा अभ्यास केला होता. पूर्ण आत्मविश्वासानं मी चार्ल्स-द-गॉल एअरपोर्टवर उतरले होते. पण काही क्षणांतच माझा भ्रमनिरास झाला होता. मला येत होती ती फ्रेंच भाषा पुस्तकात बंदिस्त होती. इथे होतं ओठावरचं (की ओठातल्या ओठात) फ्रेंच. जे माझ्यासाठी अगम्य ठरत होतं. वस्तुस्थितीची जाणीव विदारक ठरली होती. थोडक्यात म्हणजे माझं फ्रेंच वरील प्रभुत्व (?) आणि त्यांची इंग्लिश भाषेची खोली (?) तोडीस तोड होती. त्यामुळे संवाद साधता येत नव्हता. दोन मनांचं ट्युनिंग झाल्याचं जाणवलं तरी 'जुगलगाना'ची मौज लुटता येत नव्हती. बरंचसं पेरीफेरल लेव्हलवर मर्यादित राहतंय याची जाणीव मन अस्वस्थ करायची.

अशा वेळी मिशेलची भेट झाली. कारणपरत्वे ती दोन वर्षं अमेरिकेत राहिली होती. इंग्रजी उत्तम बोलायची. बडबडीही भरपूर. इतकी की 'कुणाची पत्नी अधिक बडबडी' या विषयावर आमच्या नवऱ्यांनी वितंडवाद घातले होते. (असोसिएशनची मुदत संपल्यावर सिद्धार्थ फ्रान्सला येणार होते. त्या वेळी मिशेल पास्कलनं आम्हाला हॉटेल-मोटेलच्या फंदात पडायचं नाही असं ठणकावून सांगितलं होतं. चार-पाच दिवस आमचा चौकडा त्यांच्या कॅराव्हॅनमध्ये खूप भटकला होता.) त्या दोघांच्या टीकेला भीक न घालता आम्ही बोलतच राहिलो. अनेक विषयांवर! कधी विषयांतर करून तर कधी विषय नसतानाही ! सतत गप्पाष्टकं चालत होती. बेर्नेत गप्पा मारायच्या न भागलेल्या भुकेचं मी तिच्याकडे उट्टं काढत होते. अशाच अनौपचारिक गप्पात माझ्या लाडक्या शब्दाविषयी विचारण्याचा मोह ओठी आला.

'ऑरवा' म्हणजे काय गं ? या एक्स्प्रेशननं पुरती भारावलेय मी. माझ्या कानाच्या

पडद्यावर यानं काटा फुलवलायं. अगदी मी प्रेमात पडलेय म्हणेनास!'

'प्रेमात पडण्याजोगंच एक्स्प्रेशन आहे ते!' मिशेल कौतुकली. हे बोलत असताना तिचे हिरवेकंच डोळे पाचुसारखे चमचमत होते. माझ्या मनात उत्सुकतेची मात्रा वाढली.

"खरंच!" मी आनंदानं म्हणाले, "हे जाणवलं होतं मला. बोलणाऱ्याच्या स्वरातच नव्हे तर स्पर्शातही उमटणारी थरथर, अनामिक हुरहूर आणि ऊबही जाणवत होती मला. पण नीटसा अर्थ मात्र कळला नाही. तुझ्या इतकं इंग्लिशवर प्रभुत्व असलेलं कुणी भेटलंच नाही बघ! तू तरी निवांतपणी कुठे भेटली आहेस! मी असोसिएशनच्या कार्यक्रमात आणि तू तुझ्या व्यवसायात गुरफटलेली असतेस! आताच विचारणं जमलं. भाषेचे बारकावे टिपायचे तर ते दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तीलाच जमायचं.'

"मनात कम्युनिकेशनवरही नितांत प्रेम असायला हवं! ते तुमच्या दोघींच्या मनात दुथडी भरून वाहतंय."

ह्यांनी खवचटपणे म्हटलं. त्यात दडलेलं कौतुक मिशेलनं अलगद टिपलं. दिलखुलास हसत ती म्हणाली, "सखोलपणे सांगणं मला नक्कीच जमेल आणि आवडेलही! परवा तुम्ही पॅरिसचा निरोप घ्याल. तेव्हा मी तुला मनापासून म्हणेन, 'ऑरवा मादाम!' ऑरवा स्मिता! कारण एकाच शब्दात मी माझ्या मनातील असंख्य अव्यक्त भावना व्यक्त करू शकेन."

"असं काय अभिप्रेत आहे ग यांत?" माझा उत्सुक प्रश्न.

"काय नाही ते विचार!" मिशेल उत्साहानं म्हणाली "पण एक अट आहे माझी. कबूल?"

मिशेलच्या चेहऱ्यावर उमटलेले मिश्कील आणि उत्सुक भाव मलाही उत्तेजित करणारे होते. आपोआप माझी मुद्रा प्रश्नार्थक झाली. कान टवकारून मी ऐकू लागले.

"या एक्स्प्रेशनच्या तोडीस तोड असलेलं मल्टी-मीनिंग एक्स्परेशन तू मला द्याय-चंस! अर्थात् तुझ्या मातृभाषेतलं. इंग्रजी नव्हे. कबूल?"

मिशेल उत्सुकतेनं माझ्याकडे बघत होती. पण माझ्या तोंडून होकार उमटेना. क्षणभर मनात काळजी दाटली. मराठीची नाळ तुटल्याला अठरा वर्षं लोटली होती. सराव सुटला होता. इतका पटकन तोडीस तोड शब्द आठवेल अशी ग्वाही मन देईना. उलट नाही आठवणार हाच विचार जोर धरू लागला. पण निराश होणं स्वभावात नव्हतं. आशावादी मनानं समजूत घातली, तिला इंग्लिश शब्द नकोय. भारतीय भाषेतील शब्द अभिप्रेत आहे इतकंच. हिंदी, मराठी, गुजराती कुठल्याही भाषेतला शब्द चालेल तिला. मराठीचा सराव सुटला असला तरी काय झालं? गुजराती भाषा तर आता श्वासात मिसळण्याइ-तकी सरावाची झाली आहे की, नक्की जमेल तुला. पटकन हो म्हणून मोकळी हो. सारं छान जमेल. आणि मी होकार भरला.

"बरं का स्मिता," मिशेल शिक्षिकेच्या थाटात समजावू लागली, "जेव्हा एखाद्या व्यक्तीला निरोप देणं आम्हाला नकोसं वाटतं....तरीही ते टाळता मात्र येत नाही. अशा

वेळी आम्ही गुड बाय म्हणणं टाळतो. त्याऐवजी म्हणतो, 'ऑरवा मादाम!' म्हणजे 'आय डोंट से गुड बाय! फ्रॉम द बॉटम ऑफ हार्ट आय फील, लेट द सर्कमस्टन्सिस परमीट, आय वुड लाईक टू सी यू टाईम टू टाईम, अगेन ॲंड अगेन इन द निअरर फ्युचर...लेट अस सी इच अदर टाईम टू टाईम....' आज निरोप देत असले तरी हा निरोप अखेरचा ठरू नाही असं मला मनापासून वाटतं. निरोप देण्या-घेण्याचे म्हणजेच भेटीचे प्रसंग वारंवार येवोत. आपल्यातील स्नेहबंध अधिकाधिक मजबूत होवोत. आजचा निरोप नजीकच्या भेटीची नांदी ठरो, अशी मी मनापासून इच्छा व्यक्त करते....''

मिशेलचा भावुक स्वर जडावला. स्वत:च्याही नकळत मी तिच्या खांद्यावर हात ठेवून बोलून गेले, ''अय्या हो! तरीच बरं का ही भावना मला बोलणारीच्या थरथरत्या स्पर्शात, भावुक डोळ्यांत आणि लाघवी स्वरात जाणवायची. अगं आमच्याकडे की नाही आम्ही 'आवजो' असंच सर्वार्थानं वापरतो. हा शब्द कुणी, कुणासाठी आणि केव्हा वापरावा यासाठी कुठलीही मर्यादा वा नियम नाही. निरोप देताना 'पुन्हा या बरं का' चे पडसाद यात असतात. 'परत कधी ?' या प्रश्नाबरोबर 'लवकरच' हे उत्तरही ध्वनित होत असतं. इतकंच काय, पण कधीमधी 'चिरीयो' सारखा हलका-फुलका अर्थही यात निनादत असतो. आवजो हा शब्द आमच्या भारतीय भाषांपैकी गुजराती भाषेतला शब्द आहे. आमच्यासारख्या गुजरातेत मुरलेल्या मराठी मंडळींनी तो सहजपणे मराठीत सामावून घेतलाय. गुजरातनं आम्हाला दिलेली अनुपम भेट म्हणून! भाषावार प्रांतरचना झाली असली तरीही राज्य सीमेच्या मर्यादांपलीकडे जपलेल्या आंतरभारती भावनेनं आम्हाला पटवलं आहे की, इतर भाषेतील शब्द आपल्या भाषेत सामावल्यामुळे भाषा विटाळत नाही. उलट भाषेची समृद्धी वाढते. तिला अनुपम खोली प्राप्त होते. ती अशुद्ध होत नाही.''

लांबलचक बोलून मी श्वास घ्यायला थांबले आणि जाणवलं, अरेच्या! 'शब्द देणं जमेल का ?' या काळजीत उगीच गुदमरले म्हणायचं! प्रतिक्षिप्त क्रिया घडावी इतक्या सहज शब्द देणं सहज जमलं की!

हीच खुशी मला मिशेलच्याही डोळ्यांत लुकलुकताना दिसली. ती उत्साहाने म्हणाली, ''छानच की गं! आता परवा तू जायला निघशील तेव्हा माझे दोन्ही हात हाती घेऊन त्यावर ओठ टेकत तू म्हणायचंस, 'ऑरवा मादाम! ऑरवा मिशेल.' यावर मी म्हणेन 'आवजो स्मिता! आवजो!!' ''

मी होकारात मान हलवली. क्षणार्धात माझं बोलण्यातून लक्ष दूर सरकलं. मन अंतर्मुख झालं. त्या नि:शब्द अवस्थेत महिनाभराच्या वास्तव्यात भेटलेल्या अनेक स्त्रिया- ज्या मला व्यक्ती नव्हे तर वहीच वाटल्या होत्या- त्यांचे चेहरे नजरेसमोर तरळले. भाषेच्या अडचणींवर मात करून ज्यांच्या जीवनाचे दृष्टिकोण माझ्या मनानं अलगद टिपले होते; ज्यांच्या जीवनाची संघर्षमय बाजू मला उमगली होती; सात समुद्र पार करून आलेल्या भारतीय पाहुणीची खऱ्या अर्थानं ओळख करून घ्यायला त्यांना आवडणार आहे हे

मला आपसुकच कळलं होतं. अशा अनेक फ्रेंच पुरंध्रीच्या आठवणी मनात गर्दी करू लागल्या. त्यांना निरोप देताना अर्थ कळला नसूनही मी 'ऑरवा मादाम' म्हटलं होतं. जे एक्स्प्रेशन मी यांत्रिकपणे राबवलं होतं. तेच मी मनापासून गुणगुणले. फक्त तेच म्हणून न थांबता मी त्यात माझीही थोडी भर घातली....पुन:पुन्हा भेटू असं म्हणण्यात वास्तवाची जाण दडपून स्वप्नील आशावाद डोकवत असेल. भविष्यात पुन्हा भेट होईल असं वाटत नाही. पण तुमचा निरोप घेणं खरंच नकोसं वाटलं होतं मला. तरीही ते अटळ म्हणून स्वीकारावं लागलं होतं. मनीच्या भावना व्यक्त करणं कुठल्याच भाषेतील शब्दांना संपूर्णपणे नाहीच जमत कधी. तरीही...तुमच्या माझ्या भेटीला मी शब्दरूप देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीन. शब्दांच्या माध्यमांतून तुमच्या भेटीच्या क्षणांचा वारंवार रवंथ करीन. प्रत्यक्ष भेट पुन्हा घडली तर नक्की आवडेल मला. पण तशी शक्यता निर्माण होईतो या क्षणांचा मी पुन:पुन्हा आस्वाद घेईन. तुमच्या वा माझ्या देशात पुन्हा आपली भेट घडावी अशी इच्छा मनात तेवत ठेवीन. तोवर आज तरी ऑरवा मादाम!

◆ ◆

# १४ / ओढ मृगजळाची

लंडन हिथ्रो विमानतळावर सिद्धार्थचा निरोप घेऊन मी पॅसेंजर्स लाऊंजकडे वळले. हातातील सामान जागी लावलं आणि खुर्ची मागे झुकवून ऐसपैस बसले. फ्लाईट-वेळेच्या औपचारिक सूचनांकडे लक्ष नव्हतं. अडीच महिने अव्याहतपणे भिंगरीगत भिरभिरत होते. ते आता जवळजवळ संपलं होतं. परतीचा प्रवास म्हणजे प्रवासाचा शेवटचा टप्पा सुरू झाला. कुठेतरी पोकळी निर्माण झाल्यासारखं वाटत होतं. तरीही दुसरीकडे अमाप आठवणी मनात गर्दी करीत होत्या. मनात अजब रसायन निर्माण होत होतं.

या अडीच महिन्यांत जितक्या लोकांच्या संपर्कात आले होते, तितक्या लोकांना अडीच दशकांत भेटणं झालं नव्हतं. अनेक प्रेक्षणीय वास्तू बघितल्या होत्या. इतिहास घडविणाऱ्या युगपुरुषांचं वास्तव्य असलेल्या इमारती 'त्यांच्या' कशा गजबजत असतील या कल्पनेचे थ्रील अनुभवलं होतं. अर्थात निर्जीव इमारती वा मॉन्युमेंटस्‌पेक्षा मनात जबरदस्त आकर्षण होतं 'माणसं' जाणण्याचं! एक स्टेट पार करून दुसऱ्या स्टेटमध्ये गेलं, कीच नव्हे तर उत्तर गुजरातेतून दक्षिण गुजरातमध्ये उतरलं, किंवा कच्छ - सौराष्ट्रातून मध्य गुजरातकडे वळलं तरी एकदम माणसं बदलल्यासारखी वाटतात हे वार्तालापाच्या कार्यक्रमांसाठी फिरताना टिपलेलं सत्य! महाराष्ट्रात आल्यावर इथेही पुणेरी माणूस मालवणी व वऱ्हाडी माणसाहून वेगळा वाटलेला!. मग हे तर हजारो मैलांचं अंतर! परदेश-सफरीविषयी मनात मोह नसला तरी कुतूहल नक्कीच होतं.

या देशातील प्रगतीची नस बघता आली तर बघायची होती. त्याचं वेगळेपण ठीक कुठे आणि कशात आहे ते जाणण्याची इच्छा होती. मनात भरपूर प्लॅन्स तयार होते. ज्या दिवशी फ्लोअर डिस्कशन्स, वार्तालाप व व्याख्यानाचे कार्यक्रम नसतील त्या दिवशी दिशाहीन उंडारण्याचा बेत होता. वीकएण्डला जोडीनं साईट सीईंग करायचं होतं. माझ्या 'जाती'च्या लोकांशी संवाद साधायचा होता. भरभरून बोलायचं होतं आणि तृप्त होईतो ऐकायचं होतं.

प्रवासाला निघताना हे सारं प्लॅनिंग प्रत्यक्षात आणणं कितपत जमेल याविषयी मनात हुरहूर होती. तसं सारं घडवून आणणं जमलं होतं. पण अडीच महिन्यांतला क्षण अन् क्षण उपयोगात आणण्याच्या धडपडीमुळे उसंत मिळाली नव्हती. निवांत वेळ सापडला नव्हता. परतीच्या प्रवासासाठी खुर्चीत विसावले. सारं संपण्याची जाणीव मनात शून्याव-

काश निर्माण करतोय असं वाटतं न वाटतं तोच मन अनेक आठवणींनी काठोकाठ भरलं. अनेक फ्रेंच, ब्रिटिश, भारतीय चेहरे नजरेसमोर तरळले. त्यांच्याशी घडलेल्या ऐसपैस गप्पांतून जाणवलं होतं जे कुतूहल आणि आकर्षण आपल्या मनात 'त्यांच्या' विषयी आहे. थोड्याफार फरकानं तेच त्यांच्या मनात आपल्याविषयी आहे. ही प्रगतिशील राष्ट्रं त्यांच्या प्रगतीचं श्रेय सहजपणे आपल्याला देऊन मोकळी होतात. त्यांच्या प्रगतीची इमारत भारतीय ग्रंथांतील माहितीच्या पायावर भक्कमपणे उभी आहे असं ते आवर्जून सांगतात. मग ही विदेश-सफर म्हणजे केवळ मृगजळामागची आंधळी धाव होती? विमान मुंबईच्या दिशेला लागलं होतं तर मन अडीच महिन्यांत घाईगर्दीनं जगलेल्या क्षणांचा निवांतपणे रवंथ करीत होतं, कुठल्याही प्रकारच्या शिस्तीला न जुमनाता उधळत होतं. आठवणींतून साकार होत होती आपल्या देशाची सुंदर प्रतिमा.

हॉलीवुडची सुप्रसिद्ध अभिनेत्री रॅक्वेल वॅश! सेक्स बॉम्ब म्हणून विख्यात असलेल्या मदनिकेनं एका योगशिबिरात आवर्जून सांगितलं होतं- 'माझ्या चिरतारुण्याचं रहस्य भारतीय योगासनात दडलंय. वार्धक्य दूर ठेवण्याचे उपाय मी योगासनाच्या अभ्यासानं आत्मसात केलेत.' खरोखरीच तिची विशीतली मुलगी आणि चाळिशी ओलांडलेली ती स्वत: बहिणीच वाटाव्यात.

तुकारामांच्या गाथेविषयी बोलणारा माणूस मुंबईत कधी भेटला नव्हता. पण फ्रान्स-मध्ये तुकारामांच्या अक्षर साहित्याविषयी सखोल ज्ञान असलेले बरेच भेटले. 'आझाद' समजल्या जाणाऱ्या, सैल नीतिमत्तेविषयी प्रसिद्ध असलेल्या, काही अंशी बदनाम लोकांच्या मनात गाथेविषयी आपुलकी असावी, सखोल ज्ञान असावं हे चकित करणारं सत्य होतं.

'ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष' (हात उंच करून आक्रोश करीत) आमच्या ऋषिमुनींनी सांगि-तलंय, 'वेद अपौरुषेय आहेत!' पाश्चिमेत देशांत वेदांवर रीसर्च करून ऋग्वेद हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ असल्याचं तारण काढण्यात आलंय. सर्वोत्कृष्ट साहित्याचाच नव्हे तर मानसशा-स्त्राची बैठक असलेला अनुपम ग्रंथ म्हणून ते महाभारताकडे बोट दाखवितात. 'म्हणोनि महाभारती जे नाही। ते नोहेचि लोके तिही। येणे कारणे म्हणिजे पाही। व्यासोच्छिष्ट जगत्रय।' या ज्ञानेश्वरीतील व्यासांविषयीच्या अवतरणाची 'तिथे' कदर होताना दिसली.

रशियात संशोधनांती निर्णयावर येणं झालंय, की ब्रह्मास्त्र ही दंतकथा नाही. वेदकालीन शास्त्रज्ञांना त्याविषयी नक्की माहिती होती. डॉ.ए.ए. गार बॉव्हेस्की गौरवानं म्हणतात, 'न्युक्लिअर वेपन्स' विषयी आजच्या वैज्ञानिकांहून कैक पटींनी अधिक माहिती प्राचीन भारतीयांजवळ होती. ब्रह्मास्त्रांमुळे उत्पन्न होणाऱ्या अकल्पनीय (बियॉंड इमॅजिनेशन) गरमीचं रूप न्युक्लियर वेपन्समुळे निर्माण होणाऱ्या उष्णतेहून वेगळं नाही. डॉ. बॉव्हस्कींच्या शब्दांत महाभारतातील 'त्या' भागाचे वर्णन करायचं झालं, तर अत्यंत तेजोमय अग्निदेवतेचं प्रचंड धूम्रविहीन स्वरूप प्रगट झालं. त्यामुळे चराचराच्या सांदीको-पऱ्यांत अंधार दाटला. प्रत्यक्ष सूर्य हादरला. समग्र विश्वाचा होम झाला. जे जगले-वाचले

त्यांच्या शरीरांवरचे केस नष्ट झाले. नखं गळाली, पर्यावरण कमालीचं मलिन झालं, सूर्य वर्षानुवर्षे वादळांनी झाकलेला राहिला...

डॉ. बॉव्हेस्की त्यांच्या अभिप्रायाच्या समर्थनार्थ चार हजार वर्षांपूर्वीच्या सापडलेल्या हाडांच्या सांगाड्यात आढळून आलेल्या रेडिओ ॲक्टिव्ह एलीमेंटकडे लक्ष खेचतात. प्राचीन भारतीयांजवळ न्युक्लियर वेपन्सविषयी अद्ययावत ज्ञान होतं हे सिद्ध करताना ते म्हणतात, "हिरोशिमांत पडलेल्या अणुबॉम्बचं वर्णन आणि त्याचे दुष्परिणाम ब्रह्मास्त्रानं उडविलेल्या हाहाकाराहून वेगळे नाहीत. असंख्य लोकांचे मृत्यू, बॉम्बच्या प्रत्यक्ष परिणामकक्षांबाहेरील लोकांच्या त्वचेवरचे केस वा नखं झडून जाणं हे सारं महाभारतातील मौसल पर्वात (पर्व क्रमांक १६) असलेल्या वर्णनाशी मिळतं जुळतं आहे." स्वीस विचारक इरीच व्हॉन डेनिकनंही हाच अभिप्राय दिलाय.

फ्रेंच स्कॉलर एडवर्ड या संदर्भात म्हणतो द्रोणाचार्यांचा पिता भारद्वाज! या भारद्वाजमुनींचा अवतार म्हणून आम्ही महान वैज्ञानिक आईन्स्टाईनकडे बघतो. भारद्वाज ऋषींनी लिहिलेल्या लेखात टेलीफोन, टी.व्ही. थर्मामीटर, बॅरोमीटर इत्यादींविषयी सखोल माहिती आहे. त्यांच्या 'अमुसुबोधिनी' ग्रंथात (प्रकाश, ध्वनी, विद्युत आणि सौरशक्ती) संकल्पनांविषयी व्यवस्थित माहिती सापडते. त्यातील बऱ्याच संकल्पनांचे मूर्त स्वरूप अजून आपण बघितलेले नाहीय. याविषयी कबुली देत ते म्हणतात, 'श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र आणि पाशुपतास्त्र' या कविकल्पना नाहीत. ज्याला 'बूमॅरंग' म्हणतात ते सुदर्शनचक्राच्या रांगेत बसू शकणारं, पण अत्यंत प्राथमिक अवस्थेतलं शस्त्र आहे. सुदर्शनचक्राच्या तसेच पाशुपतास्त्राच्या तोलाचा परिणाम साधायला आजच्या अणुशास्त्रात बरीच सुधारणा होणं आवश्यक आहे.

गायत्री संशोधन केंद्राची जर्मनीत स्थापना झाली आहे. या मंत्राच्या परिणामांवर तिथे संशोधन चालू आहे. याच प्रकारे ऋग्वेद रीसर्च सेंटर व्हावं, यासाठी प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी या विषयाचं सखोल ज्ञान असलेल्या पंडितांच्या ते शोधात आहेत. भाषांतरे करणारे नव्हे तर खुद्द तिथल्या लोकांना संस्कृत शिकवू शकतील असे पंडित त्यांना हवेत. भाषा शिकायची त्यांची धडपड चकित करणारी आहे.

म्हणजे संस्कृती आपली! धर्मग्रंथ आपले! पण ते खरे की खोटे? त्यात अनुभवाचं अधिष्ठान आहे की नाही, ते नक्की करायला आपल्याला 'वेस्टर्न ब्रेन'ची मदत घ्यावी लागते. ज्या ग्रंथांचं भाषांतरित रूप बघण्यापेक्षा खुद्द त्या भाषेत वाचन करणं जमावे म्हणून ते संस्कृत शिकायला धडपडणारे लोक आहेत. जी भाषा आज 'मृतभाषा' म्हणण्याची आपल्याकडे फॅशन येतेय हे आपल्या परधार्जिण्या वृत्तीचेच द्योतक तर नव्हे? दुसऱ्याच्या सद्गुणांचं कौतुक असणाऱ्याला गुणग्राही म्हणतात; पण स्वतःच्या सोन्यापेक्षा दुसऱ्याचं तांबं जेव्हा मोहक वाटू लागतं तेव्हा तो दैवाचा दुर्विलास वाटतो.

फक्त विज्ञानांतच का? त्यांना संगीताविषयीही आकर्षण आहे. सूर्यप्रकाश रेशनच्या मापाने मिळविणारे हे लोक दीपक रागाने उष्णता प्रगट झाली तर? या विचारांचे मनात

मांडे खातानाही आढळतात. उलट दिशेच्या प्रवासात मन पाहिलेल्या, अनुभवलेल्या घटनांचा चवीनं रवंथ करीत पुन:प्रत्ययाचा आनंद घेत होतं. आपल्या सामाजिक जीवनाविषयी, दांपत्यजीवनाविषयी, कुटुंबसंस्थेविषयी त्यांच्या मनात अपार कुतूहलमिश्रित आदर असलेला आठवून मन फुशारत होतं. लग्न, काडीमोड, पुन्हा लग्न, काडीमोड या चक्रात अडकलेले हे लोक खरं म्हणजे कमालीचे वैतागलेत. त्यांचे सामाजिक जीवन पार ढवळून निघालेय. मुलं आणि स्त्रियाच नव्हेत तर पुरुषही असुरक्षिततेच्या भयाचे बळी ठरतायत. अनाथालये, होम्सची संख्या झपाट्यानं वाढतेय. म्हणूनच मुलांच्या शैशवाची जाण असणारी, वृद्धांना आदर देणारी आणि स्त्रियांकडे गौरवानं बघणारी आपली कुटुंबसंस्था त्यांना आकर्षित करतेय. यासाठीच मग कॉन्फरन्सचा विचार होता. भारतीय भाषांतील लेखिकेला आमंत्रण जाते एशियन ग्रूपकडून. पण स्पॉन्सर करण्याची जबाबदारी हे लोक उचलतात.

फ्लोअर डिक्सशन्समध्ये खरोखरीच चर्चा होतात. भारतीय लोकांच्या हिपोक्रसीबद्दल स्पष्ट शब्दात नावड ओठी आली तरीही चांगलं ते घेण्याची नीर-क्षीर विवेकबुद्धीही दिसते. एशियन ग्रूपमध्ये व्यापारी गुजराती भाषिकांची संख्या अधिक! मग स्वाभाविकच गुजराती साक्षरांना आमंत्रणाची शक्यता वाढते. आपल्या लग्नमंत्राविषयी, शपथविधीविषयी जाणून घ्यायचे प्रामाणिक प्रयत्न होतात.

"ऋतुभ्य: षट्पदी भव। सा या अनुव्रता भव। सखा सप्तपदी भव।" हे मंत्र मात्र पोपटागत बोलून ढोंगीपणाला शरण जाण्याची इथे प्रथा नाही. उघड्या डोळ्यानं ते कसे आचरणात आणता येतील याविषयी इथे विचारणा होते. सर्वच प्रसंगांत तू माझ्या संगे अस, सर्वार्थानं आपण अद्वैत साधण्याचा प्रयत्न करू, असं मनापासून वाटू लागलेले हे लोक आता म्हणू लागले आहेत. "लव्ह इज द प्रोसेस इन विच टू हार्टस् सिंग वन सॉंग इन द सेम ट्यून." किंवा "इन हॅपी मॅरेज, वाईफ प्रोव्हाइडस् द क्लायमेट ॲंड द हसबंड द लॅंडस्केप." डॉ. विली ग्रॅहॅमच्या विचारप्रणालीप्रमाणे, "द हायेस्ट इन गॉड इज द डीपेस्ट इन अस् द अर्ज टू लव्ह ॲंड बी लव्ह्ड." स्त्रीशक्तीकडे गौरवानं बघताना ते म्हणतात, "ॲडजस्टमेंट दाय नेम इज वुमेन!" आता, "जेलसी दाय नेम इज वुमन" हा विचार तिरस्कारपात्र ठरलाय.

विमान पाच हजार फुटांहून अधिक उंचावर उडत असल्याची अनाऊन्समेंट होत होती. भारतीय संस्कृतीची जमेची बाजू आठवत मनात सार्थ अभिमान दाटत होता. अडीच महिने उच्च संस्कृतीची वारसदार प्रतिनिधी म्हणून लोकांनी माझ्याकडे बघितलं होतं. त्या कौतुकात आदराची भावना बेमालूमपणे मिसळली होती. मनात अहंकार फणा काढू बघत होता. विमान तर पाच हजार फूट उंचीवर होतं; पण मनाचं विमान त्याहून कित्येक पटींनी उंच तरंगत होतं. पूर्वजांच्या ज्ञानाची खोली, आपल्या कुटुंबसंस्थेच्या उभारणीसाठी पायाभरणीत त्यांनी वापरलेल्या उदात्त कल्पना, दांपत्यजीवनाचं आदर्श रूप, ताना रीरीसारखा संगीतज्ञ स्त्रियांनी दुष्काळनिवारणार्थ गायलेला मेघ मल्हार...

साऱ्या आठवणींनी उल्हसित झालेला मनमोर पिसारा फुलवून नाचत होता. आपल्या इथे सुंदर जलाशय आणि पश्चिमेत मृगजळ असल्या काहीशा खुळ्या कल्पना मनात आकार घेऊ बघत होत्या. या अहंकाराची उंची फुटात मोजता येण्याजोगी नव्हती. इतक्यात....

कुठूनसा दबल्या हुंदक्यांचा आवाज कानी पडला. मी चमकून आजूबाजूला पाहू लागले. रात्र चढत होती. विमानातील ते चिमुकलं जग गाढ निद्रेत होतं. जी काही मोजकी मंडळी जागी होती ती स्क्रीनवर दिसणारा नायक-नायिकेचा प्रणय बघण्यात रमली होती. अशा वेळी दबल्या हुंदक्यांचं अस्तित्व चकित करणारं होतं. मी कान टवकारले - पुढच्या रांगेतल्या गुजराती दांपत्यात खळबळ माजली होती. पत्नी कुजबूजत होती. "माझा थोडाही विचार करीत नाही तुम्ही ! रात्रंदिवस मर मर मरायचं. तुमच्या वडील माणसांचे जोडे खाते. मुलांच्या खस्ता काढते, इथवर ठीक आहे. पण तुम्हीही कधी समजून घेऊ नये ? सतत वसवस करावं ?"

"वटवट बंद कर !" आपण घरात नाहीय. याची जाणीवही नसलेला नवरोबा गुरगुरला. "तू काय मला हिंदी सिनेमाचा हीरो समजलीस ? लाळ घोटत तुझी खुशामत करू मी ? साली बायको आहे की सोंग ?"

"जरा हळू नं ! कुणी ऐकलं तर..." ती चाचरत म्हणाली.

'तर काय ?' तिच्या कापऱ्या आवाजानं अधिकच चेव आलेला नवरा ओरडला, "जे आहे तेच समजेल. तू आहेसच अडेलतट्टू बायडी." हळू बोलणं तर दूरच. पण त्याचा आवाज टिपेस पोहोचला. तिरसट स्वरात तो डाफरला "फार वटवट करशील तर...चोंटलो ढसडी बारणे लई जईश. सीधी दरवाज्याबहार धकेली दईश समजी ?" (बुचडा हिसडून फरफटत दाराशी नेईन आणि सरळ फेकून देईन समजलीस ?) माझ्या तालावर नाचता येणार नसेल तर..."

मगरूर स्वरात जहर ओकणं कितीतरी वेळ चालूच होतं. हुंदके वाढत होते. त्या हुंदक्यांत 'आता पुरे नं ! ..आता नाही बोलणार...' हे करुण शब्द विरघळत होते. मन फार उंचीवर पोहोचलं होतं ते त्यांच्या खडाष्टकानं सप्तपाताळात कोसळलं. टचटचीत फुग्याला कुणीतरी टाचणी मारावी तशी माझी गत झाली. हवा निघालेल्या फुग्याचं विरूप मी लाचार नजरेनं बघत राहिले. काही क्षणांपूर्वी अहंकारानं आत्मोन्नत झालेलं मन निराशेच्या गर्तेत कोसळलं.

मन कटू प्रश्नांच्या भोवऱ्यात भोवंडत होतं. त्याही परिस्थितीत माझ्या ओठी कडवट स्मित पसरलं. विमान इतक्या उंचीवर असताना हा 'आदतसे मजबूर' महाभाग शक्याशक्यतेचा विचार दुर्लक्षून जवळून पत्नीला बाहेर फेकून देण्याच्या बाता मारत होता. दरवाजा उघडणं जमण्यातलं नाही, जमलंच तर तिच्याबरोबर आपणही उडून जाऊ, याची जाणीवही त्याला स्पर्शत नव्हती. कारण. ..कारण उंची गाठली होती शरीरानं ! मनाच्या उंचीशी त्याचा दुरूनही संबंध नव्हता. मन अजूनही शेणात वळवळणाऱ्या

किड्यासारखं रौरव नरक फेंदत होतं...

मन उदास विचारांत गरगरू लागलं. आजवर, 'फासन युअर बेल्ट' या सूचनेकडे दुर्लक्ष करून छोटे-मोठे प्रवास करताना कधी भोवळ आली नव्हती ती आता येतेयसं वाटलं. पायाखाली काय जळतेय ते न दिसणं हेच का माणसाचं खरं रूप? चकवा माझी पाठ सोडीना. दूरचं दिसतं; पण जवळचं दिसत नाही हेच खरं! माणसाचं मन म्हणजे खरंच अजब रसायन वाटत आलंय मला! म्हणूनच त्याचा वेध घेण्याचा कळू लागलंय तेव्हापासून प्रामाणिक प्रयत्न मांडला. अटीतटीचा अभ्यास आरंभला. कारणपरत्वे अवलोकनं शब्दबद्ध केली. खवचट समीक्षकांत, गणना होणाऱ्या समीक्षकांनीही 'मनापासून मनाचा तळ गाठणारी व्यक्ती' म्हणून कधीमधी नावाजलं होतं, ते सारं सारं आठवलं. पण या आठवणी मनात आनंद फुलविनात. उलट समीक्षकांच्या शब्दांतला फोलपणा जाणवून मन छिन्नभिन्न होत राहिलं. मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न निश्चितच प्रामाणिक होता; पण दमछाक झाल्यानंतरही तळ गाठता आला नव्हता हे कबूल करायलाच हवं होतं. ही जाणीव सुखद नव्हती.

मनाचा तळ गाठण्यासाठी खोलवर गेल्यावरही श्वास खुंटायची वेळ आली, पण तळ वीत वीत दूरच जाताना दिसला. तसं नसतं तर भारतीय जीवनाची ढोंगी बैठक, झाकापाक करण्याच्या वृत्तींमुळे दबलेल्या व्यथांच्या जिवंत कथात वावरत असूनही, अश्रू, हुंदके परिचित असूनही अवघ्या अडीच महिन्यांसाठी दूर जाताच सारं विस्मरणात गेलं नसतं. इथली फक्त जमेची बाजू मनात ठाकली नसती.

आपल्या इथलं जीवन, निरक्षरता, ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्नांचा अभाव, मेहनत करण्याऐवजी झटपट समृद्ध होण्याचे शॉर्टकट शोधणारा विद्यार्थीवर्ग, त्यासाठी त्याला मदतरूप होऊ बघणारे उथळ विचारांचे पालक यातच तर वावरत होते मी! संस्कृतीचे ढोल-नगारे वाजवून दाबून टाकलेला शोषितांचा आवाज जेव्हा जवळून बघत होते तेव्हा नजर होती पाश्चात्त्यांच्या स्वतंत्र कलंदर वृत्तीकडे! त्या वेळी नजरेत भरत होती त्यांची ज्ञानपिपासा! भौतिक प्रगती साधलेल्या देशात मिळणारं मशीनच्या मदतीने बेतलेलं आरामशीर जीवन! तिकडे जाताच नजरेत भरले स्वतंत्र वृत्तीत दडलेले स्वैराचाराचे पडसाद! कलंदर जीवनाची काटेरी बाजू आणि मग मनात दाटला पौर्वात्त्य संस्कृतीविषयीचा सार्थ अभिमान!

पूर्वजांनी बेतलेल्या कुटुंबसंस्थेचे आदर्श स्वरूप! या डौलदार इमारतीच्या पायाभरणीत उदात्त तत्त्वं असली तरी ही थियरी झाली. प्रॅक्टिकलमधले अपयश नजरेआड झाले. वास्तवाची पुन्हा जाणीव करून दिली; भारतातील दांपत्यजीवनाचे नग्न स्वरूप दाखविणाऱ्या 'त्या प्रातिनिधिक' जोडप्यानं! आनंदमय प्रवासाचं भरतवाक्य त्यांनी उदास विचारांनी लिहिण्याचे कटू काम आरंभलं. कारलं तोंडात घोळल्यागत तोंड कडूसर झालं. कधीतरी कारलंही हवंसं वाटलं तरी ते सतत खावंसं वाटत नाही. सतत उदास विचारात डुंबत राहणं ही सहजप्रवृत्ती नव्हेच. म्हणून कदाचित वाटत राहिलं, 'तिथल्या' चांगल्या

बाजू इथून दिसत होत्या तर 'इथल्या' जमेची बाजू 'तिथे' गेल्यावर दिसली, जाणवली.

याचा अर्थ ? डोंगर दुरूनच साजरे असे म्हणायचे ? पाश्चिमात्यांना वाटतं, भारतीयांची आयडियालिझम (आदर्शवाद) मोहक आहे. तर पौर्वात्त्यांना त्यांची निखालस वृत्ती आकर्षित करते. सुंदर जलाशयाचे अस्तित्व कदाचित कुठेच नाही. वास्तवात भेटतात मृगजळं ! इथून वाटतं, जलाशयाचं अस्तित्व पश्चिमेत आहे, पूर्वेत आहेत सारी मृगजळं. तर तिथे गेले, की इकडची मृगजळं. सुंदर जलाशयाचं रूप धारण करतात नि तिथल्या आभासी मृगजळाचे रूप स्पष्ट होतं. मृगजळ आहे तरी कुठे ? इथे की तिथे ? मन सैरभैर होतं.

क्षणभर वाटलं, विमानानं पूर्वेकडून पश्चिमेकडे वा पश्चिमेकडून पूर्वेकडे पूर्ण प्रवास करूच नये. जिथे मर्यादांची वजाबाकी होते आणि चांगल्या तत्त्वांची बेरीजच काय पण गुणाकार होत असतील अशा सुवर्णमध्यावर विमान थांबावे ! खरंच पूर्व आणि पश्चिम या 'मधील' जग किती सुंदर असेल ? कल्पनेतही मी रोमांचित झाले. त्या भारावल्या अवस्थेत मी आजूबाजूला पाहिलं. लोक गाढ झोपेत होते. गात्रं सैलावून मीही डोळे मिटले.

बंद पापण्यांआड नव्याच मृगजळाची नवनिर्मिती स्वप्नरूपात फुलू लागली.

◆ ◆

# १५ / वीत दूर आकाश

गुजरात सरकारच्या सुरत आवृत्तीत 'नारी तू नारायणी' सदर चालू करताना मनात फक्त एक अभिनव प्रयोग आकार घेत होता. जखमी मनाच्या लोकांसाठी मन मोकळं करायला एक जागा तयार करायची. जमलं तर त्यांच्या जखमेवर मलमपट्टी करायची. इतकंच मनात होतं. कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि बदलीच्या नोकरीमुळे विंचवासारखं पाठीवरचं बिऱ्हाड या मर्यादांची रास्त जाणीवही होतीच. म्हणून वाटत होतं, आपली जात मुंगीची! फक्त सरपटणं जमू शकेल अशी!

तरीही मनाचा छांदिष्ट कोपरा हाती असलेल्या पेन्सिलच्या थोटकाची आठवण करून देत होता. सतत तिचा भरीव उपयोग करून घे नं, म्हणत टुमणं लावीत होता. काहीतरी करावं असं मलाही मनापासून वाटत होतं. पण 'काहीतरी'चा अर्थ स्पष्ट होत नव्हता. तरी वाटत होतं, जात्यावर बसलं, की आपोआपच ओवी ओठी येईल. मनानं उचल खाल्ली आणि 'नारी तू नारायणी' या सदराच्या माध्यमातून 'कलमद्वारा काऊन्सेलिंग' सुरू केलं, काहीशा अस्वस्थ अवस्थेत! प्रयोगाच्या यशाविषयी मन दोलायमान असतानाच! म्हटलं गाजराची पुंगी वाजली तर वाजली, नाहीतर करडून खाल्ली.

पण गाजराची ही पुंगी खरोखरीच वाजू लागली. चक्क सुरेल भासू लागली. मग वाटलं, खरंच आपली जात मुंगीची! कणाकणानं साखर गोळा करू बघणारी! जखमी मनावर फुंकर घालता घालता, त्यांच्या जखमांवर मलमपट्टी करत असताना त्यांच्या मुखी अलगद साखरेचा कण भरवणंही जमतंय की!

मग आंतरराष्ट्रीय वितरण असलेल्या 'गुजरात समाचार' च्या 'श्री' साप्ताहिकात कौटुंबिक समस्यांचं ज्वलंत स्वरूप प्रगट करायची संधी लाभली. काऊन्सेलिंगचा पसारा वाढू लागला. गुजरातचा निरोप घेऊन मुंबईकर झाल्यावरही त्या भरतीला ओहोटी लागेना. फ्रान्सच्या गुजू वाचकांनी मला काऊन्सेलिंगच्या संदर्भात वैचारिक आदान-प्रदानासाठी आमंत्रण पाठवलं. तो क्षण अतीव आनंदाश्चर्याचा होता. वैचारिक देवाण-घेवाण मला नक्कीच आवडणार होती. घरातील माझ्या गैरहजेरीच्या प्रश्नांचा बाऊ न करता त्यांची सुखद उत्तरं मिळवून विमानात पाऊल ठेवलं, तेव्हा अंगभर अक्षरश: काटा फुलला. वाटलं, अरेच्चा! मुंगी आकाशी उडणार की!

फ्रान्सच्या एशियन यूथ क्लबचं आमंत्रण आलं. पाठोपाठ लंडनचेही बरेच कार्यक्रम

हाती आले. अगदी ऑक्सफर्डच्या फेमिनिस्ट् विंगकडूनही आमंत्रण मिळालं आणि मन कदाचित जरुरीपेक्षा जास्तच हुलारलं. आनंदाच्या भरात मर्यादांचं अस्तित्व बेगडी वाटून गेलं. वाटलं, प्रश्नांना समस्या समजून आपण उगाच मर्यादांचा बाऊ करीत राहिलो. उडण्याची क्षमता पंखात असूनही स्वत:ला मुंगी समजत राहिलो. गगनाला गवसणी घालायची, महत्त्वाकांक्षा बाळगायचं सोडून फुकट स्वत:ची गणना सरपटणाऱ्या प्राण्यात करीत राहिलो. तेव्हा का जाणवलं नाही - की - कधी-कधी मुंगीतही आकाशात उडण्याचं सामर्थ्य असतं. नसलेल्या पंखात वेग भरून आकाशात झेपावणाऱ्या मुंगीसाठी सूर्याला गिळणं अशक्य ठरू नये.

मनात आनंदाच्या लहरी उठत होत्या. आनंदाच्या भरात नजरही बदललीच जशी! पावलांनी जमिनीचं नातं सोडलं आणि भन्नाट उधळलंच ते! उरली नाही मर्यादांची जाण की वास्तवाचं भान! या बदललेल्या चष्म्यातून जग कमालीचं लोभस वाटत होतं. कलमद्वारा काऊन्सेलिंगचा प्रयोग सुरू करताना हेच जग मला हुंदक्यांखाली दबलेलं, मूक वेदना-व्यथांत गुदमरणारं वाटलं होतं. बदललेल्या नजरेला तेच जग सह्यच नव्हे तर अनुपम सुंदरही वाटू लागलं. आकाशात झेपावताना वाटलं, माझ्या आसपासच्या चिमुकल्या जगाची त्रिज्या वाढली आहे. जग सुंदर झालंय- आकाश समस्याविहीन झालेलं बघणं जमेल आपल्याला! पण...

हा 'पण' मात्र ठेचकाळायला लावणारा ठरला. समस्यांचा गुंता सोडविण्याच्या खटपटीत असणाऱ्याला वाटतं, संपूर्णपणे गुंता सुटणार आहे. आज ना उद्या प्रश्न संपतील. आपलं इवलंसं विश्व समस्याविहीन आकाश पाहणार आहे. आपला समाज प्रतिगामी आहे त्यामुळे आपली दमछाक होतेय. अशी घुसमट पुरोगामी पाश्चात्त्य समाजात होत नसणार. आपल्या समाजानं पाश्चात्त्य विचारसरणीचा अंगीकार केला, की सुख आपल्या खिशात बंदी होणार आहे. पण. ..

पुढची स्वप्नं रंगवीत वाटचाल करणं सुखद असतं. हेच खरं! पुरोगामी पाश्चात्त्यांची भेट झाली आणि याचा विशेष प्रत्यय आला. त्यांच्या समृद्ध जीवनाची काळी बाजू पाहून मन कासावीस झालं! गोऱ्या कातडीवरही 'चटके' बसतात. तसे चटके बसले, की पडणाऱ्या डागांचा रंग काळाच असतो. हे प्रकर्षानं जाणवलं. आपल्या समाजात 'अशी' दमछाक होते तर त्यांच्या समाजात 'तशी' दमछाक होते. म्हणजे प्रकार वेगळा वाटला तरी दमछाक त्यांनाही चुकत नाहीच. हे जाणवलं आणि मन गर्ऽकन मागे वळलं. थेऽऽट शंख-शिंपले गोळा करणाऱ्या अबोध वयात शिरलं.

चांदणं भरलं आकाश बघून एकदा ते असंच खुळावलं होतं. बागेतून आकाश बघताना मनात विचार आला होता. धावत वर जावं आणि मूठभर चांदण्या खिशात भरून आणाव्यात. सुदैवानं जिथे जाणं झालं होतं, ते घर चांगलं पाच मजली उंच होतं. सैराट मनाला वाटत होतं, जिन्यांमागून जिने चढून छप्परावर गेलं, की आभाळाला हात लागेल. मूठभर का? भरपूर चांदण्या खुडून आणता येतील. उत्साहानं मग बाळ-पावलं

एकामागून एक जिना चढून छप्परावर पोहोचली होती. शेवटचा जिना चढताना जाणवलं होतं, छोटे पाय भरून आले आहेत. श्वासाची गती वाढली आहे. नवा कोरा फ्रॉक घामानं चिंब भिजलाय. तरी आशावादी मन धीर देत होतं. आता हा शेवटचा जिना! मग खिसाभर चांदण्या! ज्या एकाही मैत्रिणीकडे नाहीत. पण...

छप्परावर पोहोचताच जाणवलं, चांदणं भरलं आकाश अजूनही वीतभर दूरच राहिलंय. चमचमणाऱ्या चांदण्या माझ्याकडे बघून खट्याळपणे हसतायत. मग मात्र मला रागच आला. ते वीतभर अंतर कापणं जमत नाहीय, हे कबूल करणं हळव्या मनाला जमेना. हव्याशा वाटणाऱ्या चांदण्या मिळवण्यात अपयश आलंय हे सहन होईना. म्हणून आपोआप कोल्ह्याच्या आंबट द्राक्षांचा न्याय प्रिय वाटला. पळवाट शोधणारं मन चिवचिवलं, 'अय्या! या फ्रॉकला मुळी खिसाच नाहीय. चांदण्या खुडल्या तरी भरणार कशात? त्यापेक्षा खालीच जावं ते बरं! थोडी उंच उडी मारली, की आकाशाला हात नक्की पोचणार (?) आहे. पण नकोच ते!' मी मागे फिरले.

चांगल्या फ्रॉकच्या खिशात वाटेल तो कचरा भरून कपड्यांचा सत्यानाश करते हे माझ्याविषयी आईचं अनुभवसिद्ध मत होतं. यावर उपाय म्हणून सणावारी घालायच्या उंची कपड्यांना खिसे शिवणं तिनं बंद केलं, तेव्हा मला ती फार दुष्ट वाटली होती. पण तिनं फ्रॉकला खिसा शिवला असता तर पळवाट न सापडल्यामुळे खिशात चांदण्यां-ऐवजी अपयश भरून यावं लागलं असतं, या विचारानं मी खुदकन हसले. धावत खाली जाऊन गर्दीतून आईला शोधून तिच्या गळी पडले.

'विजे, काय हा धुसमुसळेपणा?' म्हणत ती डाफरली तरी त्या दिवशी मला वाईट वाटलं नव्हत. चार लोकांत मला 'विजे' म्हटलं, की हातपाय आपटून थैमान घालणारी मी तिच्याकडे पाहून प्रेमानं हसले होते. 'खुळंच आहे' म्हणत तिनं मारलेली चापटही मला गोडच वाटली होती तेव्हा! हार स्वीकारावी लागली नव्हती म्हणून! खिशात अपयश भरावं लागलं नव्हतं म्हणून!!

पण पुढच्या वाटेवर हार नवलाची बाब उरली नाही. कितीही 'जिने' चढलं तरी 'आकाश' वीतभर दूरच असणार. ही कडवट जाण रक्तात भिनली. श्वासाइतकी हारही सवयीची होत गेली. आशावादाचा अग्नी विझून राख बनला. असं असूनही एक नवा 'जिना' नजरेस पडताच पुन्हा मन हुलारलं. का? हरल्या राखेतही 'ते' वीतभर अंतर कापण्याची इच्छा धगधगत होती? राखेच्या ढिगाऱ्यात कुठेतरी ठिणगी शिल्लक होती? चक्रावलं मन प्रश्नांच्या भोवऱ्यात गरगरत होतं.

सहार एअर पोर्टवर परदेशगमनाच्या पहिल्या अनुभवाचा थरार अनुभवताना मन रोमांचित झालंच होतं. त्या झपाटल्या अवस्थेत खरंच 'मुंगी उडाली आकाशी' असं मनापासून वाटलं होतं. पण परतताना कडू-गोड आठवणींनी जड झालेल्या मनाला पटवून घ्यावं लागलं होतं. समस्याविहीन आकाश शोधायची गुरुकिल्ली तिथेही नाहीय. त्यांना वाटतंय अशी 'मास्टर की' आपल्याजवळ आहे. आपल्याला वाटतं सुखाची चावी

त्यांच्या पुरोगामी विचारांत, सुबत्तेत दडली आहे. पण...समस्याविहीन आकाश कुणाकडेच नाहीय....

भरकटणाऱ्या मनात सुधीर मोघ्यांच्या कवितेच्या ओळी आकार घेत होत्या :-

*"मन मनास उमगत नाही.*
*आधार कसा शोधावा ?*
*स्वप्नातील पदर धुक्याचा,*
*हातात कसा तो यावा ?"*

खरंच दयनीय परिस्थिती झाली होती मनाची ! आकाशात झेप घेतली तरीही सूर्याला गिळणं नाहीच जमलेलं मुंगीला !

ही हार आता नाकारावीशी वाटेना. द्राक्षांना आंबट म्हणणं अजिबात रुचेना ! समस्याविहीन जीवन स्वप्नस्थितीत उत्तम वाटलं तरी कमालीचं कंटाळाजनक ठरतं, हे प्रेरणा - निखिलच्या उदाहरणांवरून सहज पटलं होतं, तरीही ! तरीही ती पळवाट शोधून हे अपयश झाकावं वाटेना. उलट अठरा वर्षं सातत्यानं सासरच्या गुजराती भाषेत लेखन केल्यावर अचानक मराठी साहित्याशी तुटलेली नाळ जोडावीशी वाटली. अनुभव माय मराठीत शब्दबद्ध करावेसे वाटले. अनावर होत पेनमध्ये मी मराठी शाई भरली. का बरं ? असं का व्हावं ?

मनातील 'सल' 'माहेरी' शब्दरूप घेऊ बघतो. म्हणून तर नव्हे ? मनाच्या जखमेवर मातेनं फुंकर मारावी अशी इच्छा अगदी चाळिशीनंतरही शिल्लक राहते, का ? कुणास ठाऊक. पण उडायच्या प्रयत्नांत यशस्वी झाल्यावरही मुंगीला सूर्याला गिळणं काही जमलेलं नाही, आकाश अजूनही वीतभर दूर राहून दुष्टपणे हसतंय, मिश्कीलपणे खिजवतंय हे मातृभाषेत मोकळ्या मनानं सांगायची इच्छा दाटून आली, हे खरं !

◆ ◆

REFBK-0028169

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
प्रवास ८८८
२८१६९
२५४८५
शाखा (स्थळ प्रत)